# KÂVYASANGRAHA. 14.

A

# COLLECTION OF MARÂṬHÎ POEMS

BY

# VARIOUS MARÂṬHÎ POETS.

*"Poetry is a speaking picture"*— *SIMONIDES.*

## PART I.

*EDITED WITH*

CRITICAL AND EXPLANATORY NOTES

BY


VÂMANA DÂJÎ OKA.

HEAD MASTER, HIGH SCHOOL, RAIPORE.



PRINTED AND PUBLISHED

BY

TUKÂRÂMA JÂVAJÎ,

PROPRIETOR OF JÂVAJÎ DÂDÂJÎ'S "NIRṆAYA-SÂGARA" PRESS.

Bombay.

1895.

*Price* $1\frac{1}{4}$ *Rupee.*

*(Registered under Act XXV of 1867.)*

[ All rights reserved by the publisher. ]

काव्यसंग्रह. १४.

अनेककविकृत

# लघुकाव्यमाला.

## भाग पहिला.

'कान्पृच्छामः सुराः स्वर्गे निवसामो वयं भुवि ।
किं वा काव्यरसः स्वादुः किंवा स्वादीयसी सुधा. ॥'

सुभाषित.

हा


वामन दाजी ओक,

हेडमास्तर, हायस्कूल, रायपूर;


यांनीं अर्थद्योतक, व अवांतर माहितीच्या टीपा देऊन,
हस्तलिखित प्रतींवरून शुद्ध करून व तीन
परिशिष्टें जोडून तयार केला.

तो


मुंबईत जावजी दादाजी यांच्या 'निर्णयसागर' छापखान्याचे मालक
तुकाराम जावजी यांनीं छापून प्रसिद्ध केला.

१८९५.

किंमत १। रुपया

महाराष्ट्र भाषेचें आणि कवितेचें

आस्थापूर्वक अध्ययन

करूं पाहणाऱ्या सज्जनांस

हा ग्रंथ

सप्रेम अर्पण करतों

'काव्यसंग्रह'कार.

# प्रस्तावना.

आज ही काव्यमाला गुंफतां गुंफतां पंचवीस पुष्पें ओंवून एक माळ (भाग) पुरी झाल्यामुळें फुलमाळ्यास फार आनंद होत आहे. ह्या माळेंत पंचवीस पुष्पें (काव्यें) आहेत त्यांपैकीं अकरा अनाघ्रात म्हणजे आजपर्यंत कोणींही वास न घेतलेलीं (न छापलेलीं) अशीं आहेत. ही नवीन पुष्पांची संख्या जरी कांहींशी थोडी दिसते; तरी त्या पुष्पांच्या पांकळ्या (ग्रंथसंख्या) आठशें एक्यायशीं आहेत, म्हणजे या माळेंत ज्या एकंदर पंधराशें त्रेपन्न पांकळ्या आहेत त्यांपैकीं अर्ध्या अधिक नूतन आहेत.

(१) या माळेंत गुंफलेलीं नवीन पुष्पें कोणाकडून व कोणतीं मिळालीं हें पुढें दर्शविलें आहे:—

- रा. रा. **गोविंद विष्णु श्रीखंडे**, रा. रा. **नारायणराव मास्तर** } (खांडवा)—एकनाथचरित्र व वीरमणिकथा.
- रा. रा. **शिवराम तानबा दुबे, बी. ए.** (नागपुर)—वीरमणिकथा.
- रा. रा. **व्यंकटेश यशवंत शिंगबाळ** (गोवें)—द्रौपदीस्वयंवराख्यान व शांतादुर्गास्तुति.
- रा. रा. **भगवंत बाळकृष्ण पै रायकर** (होडावडें)—परमप्रकाश व अमृतसार.
- रा. रा. **विष्णु रामचंद्र जोशी, बी. ए.** (संबळपुर)—मंत्रमयध्रुवचरित.
- रा. रा. **सदाशिवराव मास्तर** (रायपुर)—शिवरात्रिकथा.
- रा. रा. **गोपाळ राजाराम रंगनाथ**—'नागपुर आणि वऱ्हाड टाइम्स' पत्राचे संपादक—(नागपुर)—रामदासलीला.
- रा. रा. **श्रीनिवास नीलकंठ सरमोकादम** (वणी)—वीरमणिकथा.
- रा. रा. **काशीनाथ पांडुरंग परब** (मुंबई)—पारिजातकाख्यान व गयगंधर्वाख्यान.

(२) या भागास तीन परिशिष्टें—(१) शुद्धिपत्र, (२) पाठभेद व (३) अधिक पद्यें—जोडिलीं आहेत. त्यांतील पहिलें तयार करण्याचे कामीं आमचे सन्मान्य मित्र रा. रा. **मोरो गणेश लोंढे**, व **गोविंद विष्णु श्रीखंडे**; दुसरें व तिसरें तयार करण्याच्या कामीं **गोविंद विष्णु श्रीखंडे**, **भगवंत बाळकृष्ण पै रायकर** व **व्यंकटेश यशवंत शिंगबाळ** यांनीं मनापासून साहाय्य केलें.

वरील सद्गृहस्थांचे आम्ही फार फार आभार मानतों व 'अशीच वारंवार मदत करावी' अशी सविनय प्रार्थना करून तूर्त रजा घेतों.

**'काव्यसंग्रह'कार.**

# अनुक्रमणिका.


| अनुक्रमांक. | काव्यनाम. | कविनाम. | ग्रंथसंख्या. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|---|
| १ | द्रौपदीस्वयंवराख्यान. .... | पांडुरंग | ६७ | १–१७ |
| २ | गजेंद्रमोक्ष. .... .... | कचेश्वर | ९५ | १७–२६ |
| ३ | सुदामचरित्र. .... .... | साम्राज्यवामन | ११८ | २६–४० |
| ४ | पारिजातकाख्यान. .... | श्रीधर | २३ | ४१–४३ |
| ५ | प्रऱ्हादचरित्र. .... .... | धुंडिराज | ५७ | ४३–४८ |
| ६ | नारदीचरित्र. .... .... | आत्माराम | १२ | ४८–५२ |
| ७ | गयगंधर्वाख्यान. .... .... | पांडुरंग(?) | १२५ | ५३–७२ |
| ८ | सत्यभामाविनोद..... .... | १ | १२ | ७३–७५ |
| ९ | गजगौरिव्रताख्यान. .... | बस्वलिंग (?) | ३९ | ७३–८१ |
| १० | सारीपाटकथा. .... .... | मुकुंद | ४९ | ८१–८७ |
| ११ | मंत्रमयध्रुवचरित्र. .... | १ | २७७ | ८८–१११ |
| १२ | द्रौपदीवस्त्रहरण. .... .... | भिक्षुकवि | २४ | १११–१२१ |
| १३ | परमप्रकाश (पावनप्रकाश). | निवृत्तिनाथ | ८५ | १२२–१३१ |
| १४ | शिवरात्रिकथा–प्रसंग पहिला. | नारायणसुत | ७१ | १३१–१४१ |
| | ,, –प्रसंग दुसरा. | ,, | ३६ | १४१–१४७ |
| १५ | राजयोग. .... .... | साम्राज्यवामन | १८ | १४७–१४९ |
| १६ | कृष्णदानकथा. .... .... | रामात्मज | ४७ | १४९–१५५ |
| १७ | शांतादुर्गास्तुति. .... .... | व्यंकटेश | ९ | १५६–१५७ |
| १८ | एकनाथचरित्र. .... .... | खंडेराय | २८ | १५८–१६१ |
| १९ | श्रीरामदासलीला. .... | १ | ५ | १६१–१६७ |
| २० | उमाविलास. .... .... | सदाशिव | ६१ | १६७–१७७ |
| २१ | अमृतसार. .... .... | मृत्युंजयस्वामी | ४३ | १७७–१८१ |
| | गंडिकाख्यान. .... .... | शिवरामस्वामी | २३ | १८२–१८७ |
| २३ | वीरमणिकथा. .... .... | राघव | ११२ | १८७–२१० |
| २४ | राधाकृष्णसंवाद..... .... | १ | १६ | २१०–२११ |
| २५ | चंद्रावळीचरित. .... .... | मोरेश्वर | १०१ | २१२–२२१ |
| | | | एकंदर ग्रंथसंख्या–१५५३ | |


१. ह्या काव्यांच्या कर्त्यांचीं नांवें माहीत नाहींत.

# परिशिष्टें.


| अनुक्रमांक. | परिशिष्टनाम. | पृष्ठांक. |
|---|---|---|
| १ | शुद्धिपत्र .... .... .... .... .... | १–१२ |
| २ | पाठभेद .... .... .... .... .... | १३–१६ |
| ३ | अधिक पद्यें .... .... .... .... .... | १७–२० |

# अनेककविकृतलघुकाव्यमाला.

## (भाग पहिला.)

## पांडुरंगकविविरचित

### १. द्रौपदीस्वयंवराख्यान[१].

(पद.)

पांडवभाग्यकळा । हे वर्णितां शेषहि तो थकला. ॥ ध्रुवपद. ॥
त्रैलोक्याचा नाथ जयांतें । भावबळें विकला. ॥ हे वर्णितां० ॥ १ ॥
ब्रह्मांडीं न समाय हरी तो । पार्थरथीं टिकला. ॥ हे वर्णितां० ॥ २ ॥
मुख्य हरि जयां वश्य तयांतें । सौख्यनिधी पिकला. ॥ हे वर्णितां० ॥३॥१

(श्लोक.)

वंदूनि जि[४]ष्णुप्रियकृ[५]ष्णपदाब्ज आधीं,
ज्याचे कृपें सकळ नाशति दो[६]षआधी; ।
जन्मेजयो नृप वि[७]नीत पुसे ऋ[८]षीला,
'कृ[९]ष्णें कशी द्रुपदजा वरिली सुशीला?' ॥ २
सांगे तेचि कथा पि[१०]तामहपिता मागें, तयाच्या व्रता
वक्ता ऐकुनियां म्हणे सफळता येणें तुझ्या बा! व्रता; ।

---

१. हें आख्यान महाभारतांत आदिपर्वाच्या स्वयंवरपर्व आणि वैवाहिकपर्व या दोन उपपर्वांत आहे. आदिपर्व–अध्याय १६५-१९९ पहा. हें आख्यान बरेंच सुबोध, सरळ आणि रसाळ आहे. २. मावे. ३. स्वाधीन. ४. अर्जुनप्रिय. ५. कृष्णाचें चरणकमळ. ६. मानसिकव्यथा. ७. नम्र, विनयसंपन्न. ८. वैशंपायनाला. **वैशंपायन**–हा **व्यास** ऋषीच्या प्रसिद्ध चार शिष्यांपैकीं एक. हा यजुर्वेदाध्यायी होता व ह्यानें **या**ज्ञवल्क्याला यजुर्वेद शिकविला. पुढें ह्या गुरुशिष्यांमध्यें कलह झाला व ह्यामुळें याज्ञवल्क्याला शिकविलेला यजुर्वेद त्यानें परत मागितला. त्यावेळीं याज्ञवल्क्यानें तो ओकून टाकला व वैशंपायनाच्या इतर शिष्यांनीं तित्तिरपक्ष्यांचे रूपानें त्याचें ग्रहण केलें. यावरून या वेदाला 'तैतीर्य' असें नांव पडलें. वैशंपायनाची पुराणवक्ता अशी फार ख्याति आहे. ह्यागेंच जनमेजय राजाला सर्व महाभारत सांगितलें हें सुप्रसिद्ध आहे. ९. अर्जुनानें. ['कृष्णः सत्यवतीपुत्रे वायसे केशवेऽर्जुने' इति.] १०. व्यास.

घेंई कर्णपथा सविस्तर, तुतें आतां निवेदीन मी;
श्रोता भूपति [1]तापसांघ्रि सुहिता घेऊनि माथां नमीं. ॥ ३
द्रोणें गांजियलें नृपाळद्रुपदा [2]पार्थाकरीं जेधवां,
ते खंती धरुनी मनीं विजनिं तो शोधी ऋषी [3]साधवां; ।
तों [4]तेथें [5]उपयाज याजऋषिचा बंधू तपस्वी महा,
भावें सेवुनियां तयाप्रति [6]निवेदी जो मनीं काम हा. ॥ ४
‘[7]द्रोणांतें वधिसा सुपुत्र परिसा देऊनि संसारसा,
माझा तूं करि [8]सारसा भरंवसा वाहें मनीं फारसा; ।
कन्या सुंदर रूपसा मज दिसे जामात पार्थाअसा
व्हावा आवडि स्वामिनें पुरवितां आनंद [9]हृत्सारसा.’ ॥ ५
ऐकूनी विनितोत्तरा [10]मुनिवरा आली कृपा [11]अंतरा,
[12]कुंडीं त्या द्विशिरासि स्थापुनि तदां आरंभिलें [13]अध्वरा; ।
त्यापासूनि [14]स्मरासमान कुमरा, कन्या दुजी [15]इंदिरा,
दोघें लाधुनियां [16]धराधिप निघे घेऊनि त्यां मंदिरा. ॥ ६
[17]धृष्टद्युम्न कुमार, द्रौपदि अशा नामेंहि कन्या भली,
मान्या ते मृगलोचना सकळिकां जे [18]षड्गुणीं शोभली; ।
पाचारी तिसि तात लाड करुनी, ‘पार्थाचिये वल्लभे!
ये पंडूनृपतिस्नुषे! मजपुढें लोकत्रयीं दुर्लभे!’ ॥ ७

(सवाई.)

यापरि लालन तात करी, तंव [19]मात जनांत उठे परिसें,
‘[20]कौरविं घात करूनि पृथासुत पांचहि [20]आळियले [21]सरिसे;’ ।

---

१. वैशंपायनमुनिचरण. २. अर्जुनानें द्रुपदास जिंकून त्याचें अर्धें राज्य भागीरथीनदीच्या उत्तरेचें द्रोणास दिलें अशी कथा आहे. या उत्तरप्रदेशांत द्रोणाची राजधानी कांपिल्यपुर आणि त्याच्या राज्याची सीमा चर्मण्वती नदीपर्यंत होती. [आदिपर्व–अ० १३८ श्लोक ७०-७७; मुक्तेश्वरकृत आदिपर्व–अ० ३२ पहा.] ३. साधुजनांला. ४. भागीरथीतीरीं. ५. उपयाज आणि याज हे सख्खे बंधु, यांत उपयाज हा कनिष्ठ होता. ६. येथें यतिभंग आहे. ७. ही द्रुपदोक्ति आहे. ८. सफळ. ९. हृदयकमळाला. १०. उपयाजाला. ११. हृदयाला. १२. होमकुंडांत. १३. यज्ञाला. १४. कामदेवासमान. १५. लक्ष्मी. १६. राजा द्रुपद. १७. अध्याय १६७ श्लोक ५३ पहा. [धृष्ट (प्रगल्भ) आहे द्युम्न (वित्त, बल-शत्रूत्कर्षासहिष्णुत्व) ज्याचें तो धृष्टद्युम्न.] १८. जी षड्गुणमंडित होती, जी यश, श्री, कीर्ति, ज्ञान, औदार्य आणि वैराग्य अशा सहा गुणांनीं भूषित होती, जी षड्गुणैश्वर्यसंपन्न होती. १९. वार्ता, बातमी. २०. कौरवांनीं पांडवांस लाक्षागृहांत जाळिलें या पौराणिक कथेचा येथें कवीनें उल्लेख केला आहे. २१. सदृश, जवळ, सारखे, एकदम.

ऐकुनि शोक करीत नृपाळ, कपाळ पिटी, 'करुं काय कसें;
कर्म कुंडें[1]च पुढें न चले कधिं स्वप्निंहि सौख्य मला न दिसे.' ॥ ८

(श्लोक.)

तों कोणी ऋषि विप्र बोलति मुखें कीं, 'वांचले पांचही,
गेले टाकुनि जातुषालय[2] दुरीं, वार्ता असे साच ही.'।
झाला तोष नृपास ऐकुनि मनीं तो आस[3] कांहीं धरी,
'माझा ध्यास **धनं**जयावरि असे पाहूं' म्हणे 'सैंवरीं[4].' ॥ ९

(दिंड्या.)

सख्यामेळीं ये तदां राजबाळी, दिव्य तेजें लोपला अंशुमाळी[5]; ।
चंद्र शोभे आननीं[6] सर्वकाळीं, तुळे जीतें सिंधुजा[7] धवा[8] बाळी. ॥ १०
क्षीरसिंधू[9] लागला दिसे कासे, सिंहमाजी[10] ते मेखळा[11] विकासे; ।
स्वर्णवल्ली देदीप्यमान भासे, रूपरेखा[12] देखूनि सभा तोषे. ॥ ११
सभा शोभे घनदाट राजयांची, कीर्ति बंदीजन वानिती[13] जयांची; ।
फिरे कन्या सुकुमार फार साची, बाप मानी विश्रांति मानसाची[14]. ॥ १२
मोहें बसवी आणूनि सभेमाजी, म्हणे, 'कन्या उपवर[15] दिसे माजी[16]; ।
लग्न करणें, कल्पना नसे दूजी.' सैंवराची मानसीं त्वरा योजी. ॥ १३

---

१. खोटें, वांकडें, वाईट. २. जातुष+आलय=लाखेचें+गृह=लाक्षागृह. [जतु—लाक्षा, याव, अलक्त, लाख.] ३. आशा. ४. स्वयंवरप्रसंगांत. ५. सूर्य. (अंशु=किरण.) ६. मुखीं. ७. सिंधुजा=क्षीरोदतनया, रमा. ८. शुभ्र, निष्कलंक. ९. क्षीरोदक, पाटांव. १०. सिंहकटिमाजी. ११. कमरपट्टा. मेखला हा कमरेचा दागिना आहे. कमरेच्या दागिन्यांचीं नांवें—"कांची—सोन्याची एकपदरी सांखळी, मेखला—सान्याची आठ पदरी सांखळी, रसना—षोडशपदरी कटिवेष्टण, कांचिदाम—चार बोटें रुंदीचा गोंडे व गुंग्रु असलेला सोन्याचा पट्टा. (देशी हुन्नर—पृष्ठें ४९-५०.) १२. सौंदर्यरेषा. १३. वर्णिती. १४. चित्ताचें विश्रांतिस्थान. १५. विवाहोचित. १६. माझी. प्रासासाठीं कवि कधीं कधीं **झ**च्या स्थानीं एकांशी सवर्ण जो **ज** त्याचा आदेश करतात—जसें माझी=माजी, माझें=माजें, माझे=माजे, तुझा=तुजा, इत्यादि. पंताच्या काव्यांत देखील अशीं स्थळें आढळतात. (१) दावाया सैरंध्रीप्रति हें मति वरिल केंवि मुख **माजी** (विराटपर्व—३-५३), (२) सेवुनि वांचेल कसी म्हणत्या गुरुस प्रजा गरा **माजी** (उद्योगपर्व—३-७८), (३) तें न स्मरे न तुमच्या वनवासालाहि चित्त मी **माजें** (उद्योगपर्व—१०-५१), (४) होइल कसा स्वपरिभव सांगा साहित्य होय जें **माजें** (भीष्मपर्व १-७७), (५) मज जिंकिलें नदीजें न चले बळ यापुढें तिळहि **माजें** (उद्योगपर्व—१३-१७८), (६) पुत्री म्हणोन नारदमुनि कळविति तेंचि चर मला **माजे** (उद्योगपर्व—१३-१९६), (७) चिंता करी बहु म्हणे कोण निवा-

(श्लोक.)

[1]मंत्री सुज्ञ दुरा पुढें नृपवरा जोडोनियां ते करा
विज्ञप्ती करितां, धराधिप म्हणे, 'भूपाळ येते[3] करा ।
पंडूच्या कुमरांसि शोध करणें, दावूनियां तस्करा
योजावा पण, त्याविणें न जिणवे या निर्बळां लस्करां.' ॥ १४
आज्ञा होतक्षणीं विचक्षण गुणी मंत्री दुतांचे करीं
देती धाडुनि पार्थिवांस लिखितें पृथ्वीवरी लौकरी, ।
पाचूवर्ण भुमीवरी विकसते ज्या मंडपाची कळा
पाताळीं न भुमीं सुरासुरसभा ज्यासन्मुखें वीकळा. ॥ १५

(कामदावृत्त.)

गरुडपाचुचे स्तंभ शोभले, विचित्र चित्रकीं चित्रले भले, ।
जडित माणिकें दिव्य पोंवळीं, सुरस रेखिलीं चोख पोंवळीं. ॥ १६
चांदवा जसा चंद्र तो नभीं, अक्षयींच हा राहु तो न भी, ।
पातले भुमीपाळ मांडवा, वर्णिती महाश्चर्य तांडवा. ॥ १७
दाटले सुधापानिही नभा, वाटला तयां स्वर्ग हीन बा ! ।
मध्य मंडपीं यंत्रसि क्षिती, स्थापितां धराधीप लक्षिती. ॥ १८
तैलयुक्त ते ठेविली कडा, लाविला स्वंधानाथ चौकडा ।
बाणपंचकें ठेविलीं तळीं, ऊर्ध्व बांधिली मत्स्यपूतळी ॥ १९
सापसारिखें चाप मांडिती, भूप देखतां हूप सांडिती ।
बोलती महाघोर हा दिसे, पाहुं ना कधीं आम्हि या दिशे. ॥ २०

---

रील शाप हा **माजा** (आदिपर्व–२-६), (८) होतों ब्राह्मणसुत मी मन्नाम सहस्रपात् सखा **माजा** (आदिपर्व–३-५०), (९) बा ! सांगे मज, नेली कोणिकडे राक्षसी प्रिया **माजी** (बालमंत्ररामायण–४-१३), (१०) सीतेला अवलोकुनि, झाली हे दृष्टि निर्मला **माजी** (मंत्ररामायण–५-११९).

१. सचिव. २. दुरुन, अंतरावरुन, लांबून. ३. भूपाळ येतील असें करा. ४. चतुर, बुद्धिमान्. ५. राजांला. (पार्थिव=पृथ्वीचा ईश्वर.) ६. देवांच्या आणि दैत्यांच्या सभा. ७. ज्या विवाहमंडपापुढें. ८. शोभाहीन, निस्तेज. ९. चित्रांनीं. १०. अग्नि.

(गीति.)

शर पांच मात्र धनु हें त्र्यंबककोदंडमित्र कठिणपणें ।
करवुनि ऐसें भिववी सकळांच्याही मनांत कठिण पणें. ॥ २१

(सवाई.)

छप्पन देश नृपाळ विशाळ पराक्रमि काळ [1]कृतांत जसे,
[2]शौण्णव कूळ कुमारहि [3]माररूपें विभवेंही कुबेर तसे, ।
[4]द्रौपदिमन्मथ मानसिं [5]भावुनि पावति धांवुनि [6]मोहवसें
हंसगती जगतीपति सर्वहि येउनियां बसती सरिसे. ॥ २२

(श्लोक.)

आले तापस श्रेष्ठ श्रेष्ठ, विधितें दृष्टीस जे [7]नाणिती,
ज्यांतें भूत भविष्य [8]दृश्य अवघें, व्यासादि वाखाणिती; ।
त्यांमध्येंच सुलक्षणीं नृपगुणीं कीर्तिक्षितिक्षेत्र जे
ते पंडूनृपबाळ चाळक जगीं [9]पद्मापतीमित्र जे. ॥ २३

सौंदर्यें [10]रतिनाथ, [11]भार्गव दुजे शस्त्रास्त्रविद्याबळें,
[12]जीवा तुल्य चतूर, पाळक जगीं चंद्राहुनी [13]आगळे; ।
गांभीर्यें [14]वरुणालयासि [15]जिणती, औदार्य मेघापरी,
कीर्ती[16]भास्कर [17]तस्करासम प्रभा लोपूनि आले [18]पुरीं. ॥ २४

---

१. यम. २. या राजांचीं नांवें सह्याद्रिखंडांत दिलीं आहेत तीं—अनुज, देवक, पृथु, ऋतुपर्ण, जय, सुभीभ्र, सौवाम, सुमंत, कौंडिण, मंडुक, कुशीक, मार्तंड, कामपतीचे पुत्र सोमवंशी—पद्म, शाम, पृथु, श्रीधर, ब्रह्मश, चंपक, शार्दूल, नोल, विद्युत्पति, सुरब्रह्म, रघु; माधव, शैल, मान, श्रीपति, शल, नकुल, शैल, भूरथ, यदु, पौंडीक, जघव, मन्मथ, पार्थिव, रंधक, प्रघोश, शशी, दान, सारंग, वज्रदंष्ट्र, देव, मंत्रोद्भव, श्रीपाल, मयुरण्य, सुरसेन, नरहरि, मंडुक, भार्गव, सुग्रीव, सप्तसंधर, चैत्र, धर्म, रिपु, शाश्वत, दान, शाल्मली, जायव, विदर्भ, प्राणताथ, वैजयंत, पार्थिव, भूरिसेन, पृषद, वासुकी, कीर्तिमान, सुवर, गोत्रज, अतिवार, सुदेष्ण, रुक्मरथ, सुरथ, महाराज, अरिमर्दन, प्रीतिनाम, सहस्रजित, चित्ररथ, सीम, आदि, गज, असीमहीधर, श्वेत, सुक्षेत्र, महाविद्वान्, सुविद्वान्, कामद, श्रीधर, प्रजापाल, देववार, ध्रुववंश, स्वायंभुमनुचा रघुवंश, वैवस्वत मनूचा जनकवंश, पुरुचा कुरुवंश, यदुवंश, सूर्यवंशशिवराज. ३. रूपानें मारा(कामा)समान. ४. द्रौपदीची इच्छा. ५. चिंतून. ६. मोहवशानें. ७.न आणिती. ८. दिसतें, समजतें. ९. लक्ष्मीपतीचे (कृष्णाचे) मित्र. १०. कामदेव. ११. परशुराम. १२. बृहस्पति. १३. थोरे, श्रेष्ठ. १४. सागराला. १५. जिंकतात. १६. सूर्य. १७. चोराप्रमाणें स्वप्रभा (स्वतेज) नाहींसें करून आले. १८. द्रुपदनगरांत.

आला [1]कौस्तुभधारी गिरिधर [2]अधरीं वेणुधारी मुरारी,
कंसारी पूतनारी [3]क्षितिधरवर जो कृष्ण [4]काकोदरारी।
[5]शंखारी शंखधारी [6]जलजदरगदाचक्रधारी [7]भवारी
विश्वाचा सूत्रधारी धरित शिरिं [8]ज्यापायिंचें सांब वारी. ॥ २५
तो राधापति दीनभक्तपति जो शोभे सभारंगणीं
संगें [9]रेवतिचा पती [10]रतिपती त्या यादवांचे गणीं।
भेरी दुंदुभिनाद वाद्यगजरें बंधूशता घेउनी
गर्वें उन्मत [11]अंधनंदन बसे सर्वांपुढें येउनी. ॥ २६
शल्यादीकहि कर्ण मुख्य मिरवे दुर्योधनासन्मुखें,
देखोनी चकती समस्त नृपती [12]शांती वरूनी मुखें;।
बोले भूपति, 'सर्वेही [13]महिपती हे सैंवरा पातले,
ज्यां चित्तीं वरिला धनंजय, कदां देखों न तें पावलें.' ॥ २७

(पद.)

परिसा नवला हो! त्या सैंवरिंच्या। द्रुपदाचे घरिंच्या ॥ ध्रुवपद. ॥
आज्ञा करि द्रुपद [14]सुतातें, '[15]करिणी-। वरि आरुढ करुनी ॥
कन्या आणावी [16]कनकाभरणीं। शृंगारुनि तरुणी; ॥
आज [17]भाँज करणार राज म्हणऊनि माज धरिताति पहा हो!' ॥ परि०॥ १ ॥
क्वनासरिसा जाउनियां सदनीं। आणित [18]शशिवदनी, ॥
नृपती बसले मंडपिं त्यांमधुनी। वेष्टित बहु वदनीं, ॥
[19]द्विरदवहनिं गजगमनि नमनि नृप हृदयिं अचल दिप विजयिं प्रकाशे॥ परि०॥२
भुलले नवरीतें पाहुनि राजे, । घवघवित विराजे; ॥
थकली वर्णितां [20]स्वरूप [21]गिरा जे। उपमा जिस लाजे ॥
कुशल सकलगुणिं विमल सुशिलपणिं भ्रमरनृपतिमुखकमलसुवासा॥ परि०॥ ३

---

१. कौस्तुभ धारण करणारा. (कृष्ण.) २. ओंठांत. ३. नृपालश्रेष्ठ. ४. सर्पारी=गरुड. (काकोदर=सर्प.) ५. शंखासुराचा वैरी. ६. जलद+दर+गदा+चक्र+धारी=कमळ+शंख+गदा+सुदर्शन +धारण करणारा. ७. संसारनाशकर्ता. ८. ज्याच्या पादतीर्थाचें वारी (उदक). ९. बलराम. ('रेवतीरमणो रामः' इत्यमरः) १०. काम. ११. धृतराष्ट्रपुत्र दुर्योधन शंभर भावांसह. १२. मुखें शांती वरूनी=स्तब्ध राहून, मौन धरून. १३. राजे. १४. धृष्टद्युम्नातें. १५. करिणी=हत्तीण. १६. सुवर्णाच्या आभरणांनीं (अलंकारांनीं). १७. भार्या. १८. चंद्रानना. १९. गजवाहनांत. २०. सौंदर्य, लावण्य. २१. वाणी, सरस्वती.

[1]रंभागर्भासम कोमळ बाळी । वदुं काय [2]नवाळी ॥
बिंबाधरतेजें [3]दशन झळाळी । माणिकमणिवोळी ॥
सरस वदन, मृगनयन, कुरळ कच, सरळभुजग वेणिवरि [4]नगश्रेणी॥ परि० ॥ ४
पायीं सांखळ्यादि [5]नेपुर वाळे । रुणझुणति खळाळे ॥
श्रवणीं पडतां नृपसमूह [6]भाळे । नवयौवन बाळे ॥
कनककलशसम अचल हृदयिं कुच सरळ, रुळति वरि हार गळींचे ॥परि०॥५
शोभे कडदोरे सिंहकटीतें । निरखूनि दिठितें ॥
झाले नृप मटमट [7]लाळ घटीते, । लागलि चडफडि ते ॥
**धृष्टद्युम्न** करिं धरुनि धरणिवरि करिणिवरुनि [8]मनहरणिसि उतरी. ॥ परि०॥६
धरुनी करकमलीं अग्रज शीला । भगिनीसि असीला ॥
झळके नगरत्नें कवतशेला । ते नमित ऋषीला ॥
**[9]पांडुरंग** मुखिं गात ध्यात मनिं सतत हाचि अभंग वसेला ॥ परि० ॥८॥ २८

(श्लोक.)

हस्तीं हस्त धरूनि [10]अग्रज तितें दावी समस्ताकृती
भूपांचीं कुळ गोत्र नाम स्वमुखें वर्णूनि विद्याकृती, ।
'पृथ्वीनाथ जनांत ख्याति,' परि हे भिक्षूक आम्हांपुढें,
इच्छा हे हृदयीं तुझीच धरिती, रंकापरी बापुडे. ॥ २९
पाहे सुंदर सूतनंदन दुजे [11]अंधा नृपाचे कुशी
झाले भाग्यचिवंत हे शतमणी माळाच एक्या कसी ? ।

---

१. रंभा+गर्भ+सम=कदली+अंतर्भाग+समान=केळीच्या गाभ्यासारखी. २. नवीनता. ३. दांत. ४. अलंकारपंक्ति. ५. हा पायांच्या दागिन्यांपैकीं एक आहे. नूपुर "म्हणजे चाळ, परंतु प्राचीन काळचे चाळ सोन्याचे असत व ते सीतेसारख्या पुण्यशील स्त्रियाही वापरीत असत. हल्लींचे नूपुर पितळेचे असतात, व बहुतकरून कळावंतिणी वापरतात." ह्या शिवाय पायांचे इतर दागिने आहेत त्यांचीं नांवें:—"पादचूड—रत्नजडित सुवर्णाचा वाळा. पादकंटक—चौकोनी तीन शिरांचा सोनेरी वाळा. यांत ध्वनि निघावा म्हणून दाणे असतात. पादपद्म—तीन किंवा पांच सोनेरी सांखळ्यांचा जडावाचा दागिना. बंगाल्यांत चर्णचाप किंवा चर्णपद्म या नांवाचा एक चांदीचा दागिना हल्लींही प्रचारांत आहे. किंकिणी—सोन्याचें पैंजण. मुद्रिका—हा दागिना सोन्याचा करून त्याजवर तांबडा रंग देत असत. हाही घुंगराप्रमाणें वाजत असे." (देशी हुन्नर—पृ० ५०). ६. भुलून जाई. ७. लाळ घोटणें=इच्छा धरणें. ८. मनोहारिणी—द्रौपदीला. ९. हें कवीचें नांव. १०. वडील बंधु धृष्टद्युम्न. ११. धृतराष्ट्राचे.

मेरू श्रेष्ठ वरी सुयोधन पहा मोजूनियां माळिके,
बुद्धिप्रेरक[1] मुख्य यांसि शकुनीमामासि या वोळखें. ॥ ३०

(पद.)

पांडव झाले दग्ध, पातले येरे[2] सर्व पाहीं ॥ ध्रुवपद. ॥
आला दुर्योधन शंत[3] बंधू घेउनि तुजसाठीं ।
राधानंदन[4] हा बळसिंधू आला तुजसाठीं ।
विराट सहसुत शांती इंदु आला तुजसाठीं ।
जयत्सेन नृप धरोनि छंद[5] आला तुजसाठीं ॥ पांडव० ॥ १ ॥
अश्वत्थामा दंडधार हा आला तुजसाठीं ।
पौंड्रिक कलिंग नृप गांधार आला तुजसाठीं ।
चैद्येश भूप सह दळभारें आला तुजसाठीं ।
काश्मिरनाथ कीर्ति अपार आला तुजसाठीं ॥ पांडव० ॥ २ ॥
कौसल्यादी बाल्हिक सैंधव आला तुजसाठीं ।
भगिरथ भगदत्तादी पार्थिव[6] आला तुजसाठीं ।
दावित शैल्य बळाचें वैभव आला तुजसाठीं ।
वीर सुधन्वा हा रणभैरव[7] आला तुजसाठीं ॥ पांडव० ॥ ३ ॥
द्वारावतिपति आला यदुपति बंधू तुजला गे! ।
पाहे उत्सव ब्रह्मानंदें ध्याया तुजला गे! ।
अनन्यभावें करून जावें शरण त्याला गे! ।
कौतुक पाहूं आला, 'पुण्योदय हा झाला गे!' ॥ पांडव० ॥४॥ ३१

(श्लोक.)

बोले काननिं सिंह घोरत तसा, 'ऐका' म्हणे 'आवघे,'
'या चापा उचलोनि पाहुनि कडायंत्रासि जो आव[8] घे ।
लक्षालक्ष अचूक वामनयना[9] मत्स्याचिया भेदणें,
तेणें हें प्रमदानिधान[10] प्रतिमा पुण्योदयीं साधणें.' ॥ ३२
भूपांच्या श्रवणीं पणार्थ[11] पडतां, पाहोनि चापाकडे,
झाले भ्रांतचि, दंत ते विचकिती जैसीं पहा माकडें; ।

---

१. धीसचिव. २. अन्य, इतर. ३. या शंभर बंधूंचीं नामें मुक्तेश्वरकृत आदिपर्व–अध्याय २६ ओंव्या १००-११७ यांत आहेत तीं पहावीं [काव्यसंग्रह–मुक्तेश्वरकृत आदिपर्व–पृ०२३१–२३२]. ४. कर्ण-[राधेने पळलेला म्हणून राधानंदन]. ५. नाद, आवड. ६. राजा. ७. रणभयंकर. ८. धैर्य. ९. डाव्या डोळयाला. १०. स्त्रीरत्न. ११. प्रतिज्ञार्थ.

'हा देवा! पण कोण पां! कठिण तो आम्हीं कसा जिंकिजे?
द्यावा प्राण कसा? अकाम उगला, हें काजची ना किजे.' ॥ ३३

(पद.)

'नोहे रे! यंत्रभेद हा खेदकारी. ॥ ध्रुवपद. ॥
काळें प्रेरिला हा दंड। चाप शैलशृंगचंड।
होतें हृदय दुखंड। पाहतांची बंड हें. ॥ नोहे० ॥ १ ॥
यंत्ररूपें काळपाश। पडतांचि जीवा नाश।
कोण आहे पृथिवीस। भेदी पूत माईचा. ॥ नोहे० ॥ २ ॥
कडा हेचि काळकूट। पाहूं शके कोण धीट?।
ज्यासी जीवित्वाचा वीट। बापा! तेणेंची जावें.' ॥ नोहे० ॥ ३ ॥ ३४


(श्लोक.)

कर्णाचा मनिं कौरवां भरंवसा, कीं [1]यंत्र याचे करीं
होतें खंडदुखंड, वीर तरि हा युद्धांतरींचा [2]कैरी; ।
ज्यातें पार्थवृकोदरादिक मनीं काळापरी मानिती
ऐसे कौरव आपणांतचि तया [3]भानूसुता वानिती. ॥ ३५

तो जैसा [4]क्षितिजास्वयंवरपणीं [5]पुष्पोत्कटेपासुनी
झाला [6]उद्भव, तत्समान उठला [7]सावित्रि उल्हासुनी ।

---

१. राधायंत्र. २. गज. ३. सूर्यपुत्राला. (कर्णाला.) येथें छंदोभंग न व्हावा म्हणून 'भानु' शब्द दीर्घ ऊकारान्त केला आहे. ४. क्षितिजा+स्वयंवरपणीं=सीता+स्वयंवरप्रतिज्ञाप्रसंगीं. ५. पुष्पोत्कटा=रावणाची माता. महाभारताच्या वनपर्वांतील रामायणाप्रमाणें रावणाचा वंशवृक्ष पुढें दिला आहे:—




मोरोपंतांनीं वनपर्वांत (अध्याय १० गीति ६-१२ काव्यसंग्रह-वनपर्व पृ० १३९-१४०) असेंच

हातें थापटुनी भुजां म्हणतसे, 'दावा तुळेतें दुजा,
रे! रे! या भूभुजांत[1] वीर मजसी मेरूहि वाटे खुजा. ॥ ३६

(पद.)

स्वरूपें रतिपतिच[2] तुका रे! । धृतिनें[3] गुरु[4] मजसिं मुका रे! ।
विद्याधीश मी, तुम्हिही शिका रे! । रविसुत वळखा रे! ॥ ध्रुवपद. ॥
झुजतां शस्त्रास्त्रीं हा रे! । मजसीं भार्गव[5] ही हारे[6]! ।
सकळां मम विक्रम विदित अहा रे! । रविसुत वळखा रे! ॥ स्वरूपें० ॥ १ ॥
धनु हें मजवीण नुभारे । समस्त ही दुजे या रे! ।
आले यास्तव मी येथ उभा रे! । रविसुत वळखा रे! ॥ स्वरूपें० ॥ २ ॥ ३७

(श्लोक.)

म्यां कर्णें पण जिंकणें, उभवणें[7] कोदंड[8] यंत्रास या
भेदावें, द्रुपदी वधू प्रणुनियां[9] देणें नृपा त्रास या, ।
गेला नेमुनियां विधी द्रुपद हा माझा असे सासरा.'
ऐसें गर्जत गर्वसागर वदे झेलोनि पाणी शिरा. ॥ ३८

---

वर्णन महाभारतास अनुसरून केलें आहे. हें वर्णन रामायणांतील वर्णनाशीं जुळत नाहीं. अध्यात्म-रामायण—उत्तरकांड (सर्ग १२) यांत हा रावणवंशवृक्ष दिला आहे तो असा:—

प्रजापति (स्वयंभू.)
|
पुलस्त्य × तृणबिंदुकन्या गो.
| (स० १।३२.)
सुमालिकन्या कैकसी × विश्रवस् × भरद्वाजकन्या देववर्णिनी.
(स० १।३४.)
वैश्रवण (कुबेर) × ऋद्धि.
|
नलकूबर × रंभा.

१ दशग्रीव × मंदोदरी. (स० २।४०.) | मेघनाद.
२ कुंभकर्ण × वैरोचनदौहित्री वज्रज्वाला. (स० २।४१.)
३ शूर्पणखा × विद्युज्जिव्ह.
४ बिभीषण × शैलूष-गंधर्वकन्या सरमा.

६. जन्म. ७. कर्ण.

१. भूभुजांत=राजांत. २. कामदेव. ३. धारणाशक्तीनें. ४. बृहस्पति. ५. परशुराम. ६. पराभव पावे. ७. उभारणें, उचलणें. ८. चाप. ९. परिणय करून.

'चापाप्रती [1]दिग्गजसाच राहे, हो **द्रौ**पदी सून [2]नभश्वरा हे' ।
संकल्प ऐसाचि करोनि चित्तीं, योजावया कार्मुक यत्न चिंती. ॥ ३९

ऐसा कर्कश **क**र्ण कार्मुक [3]गुणीं सज्जावया पातला,
**पां**चाळें मनिं [4]भाविला, '**र**विज हा सांचा नवा ओतला; ।
झाला द्वादश आत्मजेसि मजला जन्मस्थ प्रत्यक्ष तो
आहे श्री**ह**रि साह्य पूर्ण मजला एकादशा रक्षितो. ॥ ४०

(पद.)

दावीं **ह**रि! **पा**र्थ रे! । मम [5]दुहितावर तो कीं. ॥ ध्रुवपद. ॥
जामात तो मनिं वरिला रे! म्यां । दुजयातें न विलोकीं. ॥ दावीं० ॥ १ ॥
तुजविण आणिका [7]प्रार्थुं मी कवणा? । पाहुं तुझा **[6]कि**रिटी कीं. ॥ दावीं०॥२॥
दीननाथ ब्रीद तुझें गाजे । म्हणउनि तुला मी हटकीं. ॥ दावीं० ॥ ३ ॥ ४१

(श्लोक.)

झालें काय कसें असें? **[8]य**मभटा द्यावी कशी हे [9]सुता?
आला काळचि [10]वोखंटा [11]कटकटा आतांचि **पं**डूसुता; ।
आणी कोण उठाउठीं हुडकुनी देशीं विदेशीं जगीं.'
आले ऐकुनि धीट सेवक तदां प्रेरावया [12]संजगीं. ॥ ४२

तों कोदंड प्रचंड **क**र्ण उचलूं जातां न हाले कदां,
घाली हात तदां समस्त [13]दशनां चावूनियां एकदां, ।
केली हारवटी बहूपरि त्रुठी कार्मूक बाहूवटी,
लोटी चावुनियां मुखें मणगटी ते व्यर्थची [14]चौंवटी. ॥ ४३

झाला वीर हटीं पडोनि उचली कष्टेंचि [15]जानूवरी,
नोहे ऊर्ध्व पुढें तया तिळभरी, 'आणा' म्हणे 'नोवरी.' ।
राजा हास्यमुखें वदे, 'पण भला आदीं तुम्ही जिंकिला,
जाणो [16]हेतचि राहिला तव [17]जिवीं पाहूनि जावें [18]तिला.' ॥ ४४

---

१. दिश्+गज=दिशांच्या ठायीं स्थापिलेले हत्ती. हे आठ आहेत. आठ दिशांच्या आठ बाजूला एक एक हत्ती पृथ्वीच्या धारणासाठीं ठेविलेला आहे. यांचीं नांवें:—'ऐरावतः पुंडरीको वामनः कुमुदोंऽजनः । पुष्पदंतः सार्वभौमः सुप्रतीकश्च दिग्गजाः ॥'. २. सूर्याला. ३. गुण=धनुष्याची दोरी. ४. मानिला. ५. कन्येचा नवरा. ६. अर्जुन. ७. प्रार्थितों. ८. यमदूताला. ९. कन्या. १०. वाईट. ११. हायहाय. १२. संयुगीं, युद्धांत. १३. दांतांला. १४. चेष्टा. १५. गुडघ्यापर्यंत. १६. हेतु, आशा. १७. प्राणांत. १८. कन्येला.

धांपें[1] पावुनि, भानुनंदन मनीं सांडीच ना आस ते,
शक्ती वेंचुनि सज्जितां शैवकळा[2] आंगीं तया भासते; ।
जैसा वृक्ष अनीळ[3] चंड सुटला ओलांडला[4] ज्यापरी,
तेव्हां कौरवभार काक करिती हा:कार आपापरी. ॥ ४५

(पद.)

इतिहट कां करी धीटपणें हा? ॥ ध्रुवपद. ॥
कैंची हे हटबुद्धि तयातें । उद्भवली मरणासि कटाहा. ॥ इति० ॥ १ ॥
देखुनि दीप पतंग[5] तयापरी । भुलला द्रौपदीरूप कटा हा. ॥ इति० ॥ २ ॥
सुभट[6] महाविर जो झुजतां रणीं । नाटोपेचि कृतांतभटा हा. ॥ इति० ॥ ३ ॥
त्यागुनियां शिर मुकुट उडाला । तुटलीं पदकें हारमणी हा. ॥ इति० ॥ ४ ॥
देखुनि कर्णदशा हे ऐशी । कौरव करिति हा:कार असा हा. ॥ इति० ॥५॥ ४६

(श्लोक.)

माळाहार मुकूट वस्त्रभुषणें लंवीत गेलीं दिशा,
भानूनंदनसंग टाकुनि अशी पाहूनि त्याची दशा, ।
गात्रें पावुनियां विकार दडलीं धाकेंच चापा बुडी,
येती काकुळती बहू अवनि[7] ते रक्षी तदां बापुडी. ॥ ४७
दडपला[8] डप लाघव दाखवी, भुवरि तो वरितो धुळ माखवी, ।
नुखळतां खळ तामस कौरवी, उचळला चळला धव भैरवी. ॥ ४८
बसविती सविती मग आसना, अचळसा[9] चळ सांडुनि वासना, ।
समजला मजला यश हें [10]नये, फुकट कां कटकांत बसूं नये. ॥ ४९

(पद.)

येउनि धृष्टद्युम्न म्हणे, 'नृप कां बसले न उठा? ।
सज्जुनि धनु हें यंत्र भेदुनी न्यावी हे प्रमदा[11].' ॥ ध्रुवपद. ॥
'प्राप्त जरा हे वर्षें अमूप.' । 'कां बसले न उठा?' ।
'जन्मापासुनि आम्हीं कुरूप.' । 'कां बसले न उठा?' ।
...................... । 'कां बसले न उठा?' ।
'नेणों कांहीं विद्येचें रूप.' । 'कां बसले न उठा?' ॥ सज्जुनि० ॥ १ ॥

---

१. श्वासानें. २. प्रेतकळा. ३. वायु. ४. खालीं जमिनीवर पडला. ५. शलभ. ६. उत्तम योद्धा. ७. पृथ्वी. ८. या व पुढल्या श्लोकांत त्या त्या अक्षरांची आवृत्ति झाली आहे, म्हणून येथें अनुप्रास अलंकार झाला आहे. ९. पर्वतासारखा निश्चळ. १०. मिळत नाहीं. ११. स्त्री.

'पहातां पुरतें न दिसे डोळां.' । 'कां बसले न उठा?' ।
'बापा! तुटलों प्रस्तुत काळा.' । 'कां बसले न उठा?' ।
'पुसणें उचीत नव्हे बाळा.' । 'कां बसले न उठा?' ।
'वरुनि श्रम लोकपाळ शूळा.' । 'कां बसले न उठा?' ॥ सज्जुनि० ॥२॥
'दुर्धर वायू भरला माजी.' । 'कां बसले न उठा?' ।
'आंगीं भरला हा ज्वर आजी.' । 'कां बसले न उठा?' ।
'न पडों आम्ही ऐशा काजीं.' । 'कां बसले न उठा?' ।
'नाहीं आमुचे वडील राजी.' । 'कां बसले न उठा?' ॥ सज्जुनि० ॥ ३ ॥
'आलों दुरूनि हो! उपवासी.' । 'कां बसले न उठा?' ।
'व्याप्त सुषुप्ति हो हृदयासी.' । 'कां बसले न उठा?' ।
'एकचि पत्नीव्रत आम्हांसी.' । 'कां बसले न उठा?' ।
'ज्ञानें विटलों या विषयांसी.' । 'कां बसले न उठा?' ॥ सज्जुनि० ॥ ४ ॥
'द्रौपदी सखीच आम्हां जननी.' । 'कां बसले न उठा?' ।
'नमिती मस्तक लावुनि धरणी.' । 'कां बसले न उठा?' ।
'कैसी करणी ऐकों श्रवणीं.' । 'कां बसले न उठा?' ।
'**कृष्ण कृष्ण हरि हरि हरि** वदनीं' । 'कां बसले न उठा?'॥सज्जुनि०॥

(श्लोक.)

**धृष्टद्युम्न** म्हणे, 'समस्त नृप हो! ऊठा जिणाया पणा,
योजा चाप.' तदां कितेक वदती, 'व्याधी पिडा आपणा.' ।
एका आड दडूनि एक वदती, 'हे चाड नाहीं धरूं,
आली धाड निवारली, तरि पुढें भिक्षा सुखें आदरूं.' ॥ ९१
क्रोधें **पांचाळराजा** वदत, 'क्षितीच हे आजि निर्वीर झाली
वाटे निश्चित मातें परिसुनि सकळें भूपवृंदें बुजालीं; ।
केली म्यां हे प्रतिज्ञा फुकट न कळतां चापयंत्रा अशाला,
हीं भूपें काय रूपें मिरविति प्रहुडी सूर्यतेजीं मशाला.' ॥ ९२
कर्णीं शब्द असा उणार्थ पडतां **जिष्णू ऋषी**मंडळा-
पासूनी उठतांच सौख्य न धरे देखोनि आखंडळा; ।

---

१. घोर निद्रा. २. ऐहिक सुखोपभोगाच्या पदार्थांस. ३. जमिनीला. ४. पृथ्वी. ५. अर्जुन. ६. इंद्राला.

निच्छेदूनि[1] मुखें अनेकवचनीं त्यातें मुनी सांगती
क्षेत्री[2] सूर्यवतंस जेथ खचले भंगूनि अस्तागती. ॥ ५३
आधीं ब्राह्मणबाळ निर्बळ बळें 'बापा!' बहू बोलती,
'बा रे ! यंत्र भले भले बैळनिधी[3] त्यांहीं मुखें खालतीं ।
केलीं, त्यांप्रति तूं कसा वळकटीं बाहूबळें भेदिसी?
बाळा ! बैसुनि बुद्धिबोध बरवा घे कांहिं तो मानसीं. ॥ ५४
दाता द्रौपद दक्ष दानशुर तो दे लक्ष घे दक्षणा,
दारोदारहि दूर दुर्वळ घरें धुंडूं नको भक्षणा, ।
दारिद्रा दवडोनि द्या दशदिशा या दातियाच्या कृपा,
यंत्रीं भेद करावया भय पडे ज्या **कर्ण द्रोणा कृपा**. ॥ ५५

(पद.)

कृपेनें आज्ञा द्यावी यंत्र भेदायासी. ॥ ध्रुवपद. ॥
एक बोलति ऋषिवर नकळे ईश्वरमहिमा कैसी? ।
कवणा हृदयीं कवण स्थिति वर्तत ऐसी. ॥ कृपेनें० ॥ १ ॥
ऐकलेनचि[4] **भार्गवरामें** मारुनियां नानाक्षेत्रीं[5] ।
नाहिंच[6] केले पृथ्वीवर ते दुर्धर महाक्षत्री[7]. ॥ कृपेनें० ॥ २ ॥
ज्याला उद्भव[8] कुंभापासुनि, कांता **लोपामुद्रा** ।
त्याणें[9] आपोषणासि[10] केलें क्षारसमुद्रा. ॥ कृपेनें० ॥ ३ ॥
यास्तव ब्राह्मणतेजें शक्ति अवघड घडते ।
कवणें युक्ति मानोनि छेदन न करा बडबड ते. ॥ कृपेनें० ॥ ४ ॥
देती आशिर्वाद समस्तहि विजयी हो बा रे ! ।
येतां **अर्जुन** मंडपिं लोकीं नाना तर्क उभारे. ॥ कृपेनें० ॥ ५ ॥ ५६

(श्लोक.)

भूदेवआज्ञा[11] धरुनी शिरीं तो कार्मूकनागाप्रति केसरी तो, ।
येतां मनीं नोवरिलागिं बाणें भेदील हा यंत्र दशार्धबाणें[12]. ॥ ५७

---

१. निषेध करून. २. क्षत्रिय. ३. बळसागर. ४. एकट्या. ५. अनेकस्थळीं. ६. नाहींसे. ७. मोठे क्षत्रिय. परशुरामानें एकवीसवेळा पृथ्वी निःक्षत्रिय केली ही पौराणिकी कथा येथें अनुसंधेय आहे. ८ जन्म. ९. त्या अगस्त्यानें. हें पर्यायोक्त अलंकाराचें उदाहरण होय. १०. आपोशान—भोजनाच्या पूर्वी व नंतर म्हणण्याचा मंत्र. 'अमृतोपस्तरणमसि स्वाहा' आणि 'अमृतोपिधानमसि स्वाहा' असें मंत्र यथानुक्रमें म्हणतात. ११. विप्रांची आज्ञा. १२. पांच.

(पद.)

दुसरें कौतुक वदती घडलें, नृप संशयीं पडले. ॥ ध्रुवपद. ॥
दिसतो पाहतां मुल हा लघुसा रे ! । वदती नृप सारे ।
द्विज हें धनु चंड उभारी कसा रे ! । लटिकेचि पसारे, ।
दिसति म्हणुनि मुखिं हंसति खदखदुनि रसिक म्हणति, 'शाबास भला रे !'॥ दु०॥
शैल्यादिक कर्णहि जेथें वेडी । तेथें हा प्रेहुडी ।
दावी द्रौपदिची धरुनी गोडी । धिट याची जोडी, ।
नाहिं नाहिं हटकुनि पाहूं तरि अन्य यथास्थित धन्य म्हणों ये. ॥ दुसरें० ॥२॥
राजा पांचाळ म्हणे, 'हें भारी । धनु काय उभारी ? ।
मुल हा यंत्रातें भेदुनि हारी । निरुपम हे नारी, ।
मिथ्या मात सकळांत होय परि सत्य एक भगवंत करी रे !' ॥दुसरें०॥३॥५८

(श्लोक.)

ऐसे सर्व अनेक तर्क करितां तों सव्यसाची करीं
चापातें उचलोनि तेक्षणिं जैसा घे इक्षुदंडा कैरी; ।
सज्जूनी शर पंच दक्षिण करीं, चिंती गुरू केशवा
'तूं माता मज बाप, आन न कळे भूपाळ नाकेश वा.' ॥ ५९

(पद.)

'श्रीहरि ! करुणा तूं करि रे ! ॥ ध्रुवपद. ॥
भेदिन यंत्र मी त्वत्कृपायोगें । धनु हें मी करकरी रे ! ॥श्रीहरि !०॥ १ ॥
कौरवकरिला तूं हरि असतां । न गणी विफळ करी रे ! ॥श्रीहरि !०॥२॥
पांडवपाळक ब्रीद तुझें हें । प्रकट करीं लौकरी रे ! ॥श्रीहरि!० ॥ ३ ॥ ६०

(श्लोक.)

ऐसा मंत्र जपोनि यंत्र निरखी भेदावया त्या कडा
चापातें उचलोनि पंचकशरीं विंधी वरी रोकडा, ।
विद्या चित्ररथाचिये रुपकडां पाहूनि मीनाक्ष तो
छेदी वाम तदां सहस्रनयनें सौख्या पिता लक्षितो. ॥ ६१

(चूर्णिका.)

तेव्हां तो पांडवेय नृपतिवीर विजय सायकासन वामकरें उभारुनि, पंच नाराच दक्षिण हस्तीं घेऊनि, यंत्रासि प्रदक्षिणा त्रिवार करुनि, गंभीर धीर नर-

---

१. प्रौढी. २. हा उपमालंकार आहे. ३. हत्ती. ४. इंद्र. ५. कौरवरूप गजाला. ६. सिंह. ७. मत्स्याचा डोळा. ८. डावा. ९. इंद्र. १०. अर्जुन. ११. धनुष्य. १२. डाव्या हातीं.

वीर आनकदुंदुभीय यदुवीर हेळी[1] दैदिप्यमान हृदयाकाशीं आणूनि, सद्भाव-युक्त गुरुद्रोणचरणस्मरण करूनि, अधोदृष्टी तप्ततैलकडां पाहूनि, ऊर्ध्व मत्स्य-वामनेत्रासि भेदिलें. ॥ १ ॥

देखोनि दशशतनेत्रीं आनंदाश्रु लोटले, ते काळीं सकळ भूपाळ चित्तीं सात्विक भिन्नाकार भाव[2] उदेले, जयजयकार सकळ सुरभार[3] करुनि सुमन-हार[4] किरिटिच्या किरिटिवरी वर्षों लागले, सोल्हासयुक्त परमानंदभरें पांचाळबाळी[5] मराळी सरसगति चमकत येउनि सुमनमाळा गुडाकेशमराळगळां[6] घालिती झाली. ॥ २ ॥ ६२

(श्लोक.)

होतां भंजन यंत्र कंजनयना[7] संजोगुनी[8] पातली,
माळा आवडिनें करीं धरुनियां पार्था गळां घातली; ।
लज्जायुक्त सतोष वामनयना[9] लक्ष्मी पति आवडी,
मानी ईश्वरअंश, संशयलता झाली सवें रोकडी. ॥ ६३

देखोनी ऋषि नाचती सुखभरें, 'शाबास या लेंकरें
कैसें यंत्र[चि हें] सुकोमल अशा या भेदिलें हो! करें? ।
राहे रोम उभी नभीं उडविती तैं विप्र आंगोस्तरें
लीला भाव विनोद लाघव जगीं नानापरी विस्तरे. ॥ ६४

ऐसे देव भुदेव[10] यादवपति सर्वत्र झाले सुखी,
दुःखी कौरव मात्र दुष्ट वदनें आच्छादिलीं अंशुकीं[11], ।
चित्तीं घेउनियां विषाद अवघे युद्धार्थ ते धांवती,
भीमार्जून करींच अस्त सकळै[12] शेखीं[13] पिडा पावती. ॥ ६५

यानंतरें त्वरित लंघुनि विप्रवेशा कौंतेय द्रौपदिगृहीं करिती प्रवेशा; ।
ऐका समस्त रचना मग शोभनाची होईल वृष्टि सुचरित्र सुधाघनाची[14]. ॥ ६६

---

१. पाही. २. अष्ट सात्विक भाव येणेंप्रमाणें आहेत:—'स्तंभः स्वेदोऽथ रोमांचः स्वरभंगोऽथ वेपथुः । वैवर्ण्यमश्रुप्रलयौ अष्टौ भावाश्च सात्विकाः ॥' याचा भावार्थः—१ स्तंभ=स्तब्धता, २ स्वेद=घाम येणें, ३ रोमांच=आंगावर कांटा उभा राहणें, ४ वेपथु=कंप सुटणें, ५ वैवर्ण्य=तोंडाचा वर्ण बदलणें, ६ अश्रु=डोळ्यांतून पाणी येणें, ७ प्रलय=बेशुद्धि, ८ बैवर्ण्य=स्वर पालटणें. ३. देवमंडळ. ४. पुष्पाचे हार. ५. द्रौपदी. ६. अर्जुनरूप हंसाच्या गळ्यांत. [गुडाकेश=अर्जुन.] ७. कंज+नयना=कमल+नेत्रा. ८. सजून. ९. सुंदराक्षी. १०. भूदेव=ब्राह्मण. ११. वस्त्रांनीं. १२. सकळही. १३. अंतीं, अखेरीस. १४. अमृतमेघाची.

## उपसंहार.[१]

(श्लोक.)

श्रीपांडुरंगपदपद्मज[२] नाम घे या,
चिंतूनियां सतत उत्तमनामधेया,[३] ।
हे वर्णिली रसिक होय कथा सुवाचा
धोका नसेचि श्रवणें पठणें भवाचा.[४] ॥ १७

---

# कचेश्वरकविकृत

## २ गजेंद्रमोक्ष.[५]

(श्लोक.)

वक्रतुंड[६] हा ध्याउनी मनीं, शारदा दिसे भव्य लोचनीं, ।
सद्गुरूसवें हस्त मस्तकीं ठेवुनी पुढें ग्रंथ बोल कीं. ॥ १

---

१. 'वरदानस्य उक्तिर्या सा काव्य उपसंहृतिः'–ज्या श्लोकांत वरदानाचा उल्लेख असतो त्याला 'उपसंहार' असें म्हणतात, या न्यायानें प्रस्तुत श्लोकाच्या चतुर्थ चरणांत वरदानाचा उल्लेख आहे. २. चरणकमलोत्पन्न. ३. उत्तम आहे नामधेय (नांव) ज्याचें त्याला. (श्रीविष्णूला.) [धेय प्रत्यय रूप भाग आणि नाम या शब्दापुढें स्वार्थी होतो. 'रूपनामभागेभ्यो धेयप्रत्ययो वक्तव्यः'. जसें:– नाम=नामधेय, भाग=भागधेय.] ४. संसाराचा. ५. गजेंद्र–ही कथा श्रीमद्भागवत–स्कंध ८ अध्याय २-४ यांत आहे. क्षीरसागरांत त्रिकूट नामक एक पर्वत होता. त्याच्या खालच्या तटावर वरुणाचें ऋतुमत् नामक उद्यान होतें, आणि त्यांत एक अत्यंत रमणीय सरोवर होतें. तेथें उन्हानें संतप्त आणि तृषेनें आर्त असा एक गजेंद्र आपल्या कळपासह पाणी पिण्यासाठीं आला. [हा मूळचा इंद्रद्युम्न राजा असून यानें अगस्त्यमुनीचा अनादर केला तेव्हां मुनीनें 'तूं गज होशील' असा यास शाप दिला.] तो सरोवरांत प्रवेश करून तेथील पाणी यथेच्छ पिऊन बाहेर येऊं लागला, तों त्याला एका सुसरानें (शापदग्ध गंधर्वानें) पकडिलें. तेव्हां त्यानें नक्राच्या हातून सुटण्याचा पुष्कळ यत्न केला, परंतु सुटेना. त्याची सुटका करण्यासाठीं इतर गज, गजस्त्रिया आणि कलभ (गजशावक) यांनींही पुष्कळ प्रयत्न केला. पण त्यांचेंही कांहीं चालेना. या उद्योगांत हजार वर्षे गेलीं; सर्व उपाय हरले. अखेरीस निरुपाय होऊन गजेंद्रानें हें प्राणसंकट टाळण्यासाठीं परमेश्वराचा धांवा केला (अध्याय २ श्लोक २-२९). 'मी ग्राहापासून मुक्त होण्याची इच्छा करीत नाहीं, तर अज्ञानमोक्षाची इच्छा करतों' इत्यादि स्तोत्र ऐकून प्रसन्न होऊन श्रीभगवान् हरि प्रकट झाला. त्याला पाहतांच 'हे नारायणा! अखिलगुरो! भगवन्! नमस्ते' असें म्हणून गजेंद्रानें सोंडेनें एक कमळ उपटून भक्तिभावानें त्याच्या प्रीत्यर्थ वर आकाशांत फेंकून दिलें. तेव्हां त्या पीडिताला पाहून विष्णूला दया आली. त्यानें एकदम गरुडावरून उतरून सग्राह गजेंद्राला सरोवराच्या बाहेर काढून, चक्रानें नक्राचें तोंड कापून त्यास सोडविलें (अध्याय ३ श्लोक ३३). अशी ही गजेंद्रमोक्षाची कथा आहे. ६. गणपति.

ऋषीसी पुसे व्यास जन्मेजया ! हो ! वदे हात जोडोनि भावें तया हो ! ।
‘गजेंद्रासि विष्णू कसा भेटला हो ! मुळाहूनि सांगा मला हे कथा हो !’ ॥ २
बोलला ऋषी, ‘एक भारता ! सांगतों कथा तूज सर्वथा. ।
इंद्रद्युम्न हा मुख्य भूपती द्राविडांमधें [1]सर्वसंपती. ॥ ३
आचरे सदा वेदशास्त्रता, नाचरे कदा [2]आणिका मता, ।
विष्णुभक्तिसी [3]रातला असे, [4]सत्यसंगतीं नित्य तो वसे. ॥ ४
धर्मशीलही दानशील तो, खड्गधारणीं शूर वीर तो, ।
नम्रता बहू विष्णुभक्तिसी बाणली तया प्रीतही असी. ॥ ५
पुष्करातिरीं ध्यान लावुनी, बैसला असे योगचिंतनीं, ।
तों ऋषी अगस्ति पातला त्वरें नाहिं देखिलें राजया ! विरें. ॥ ६
कोपला ऋषी काय बोलिला, ‘इंद्रद्युम्न तूं [5]दुर्मती भला, ।
देखिल्या मला ध्यान लाविसी, हेच भक्तिनें पार पावसी. ॥ ७
न राहेसि ऊभा मला देखिल्यानें वृथा कष्टसी भक्ति हे सेविल्यानें. ।
‘मदोन्मत्त तूं हस्ति होसील रानीं’ ऋषीवाक्य हें सत्य साचार मानीं.’ ॥ ८
‘[6]राम ! राम ! राम ! राम ! व्यर्थ काय शापिलें ?
[7]हाय ! हाय ! हाय ! हाय ! शापघातें ताडिलें ।
[8]पाहें पाहें पाहें पाहें कोण न्याय वर्तलें ?
[9]त्राहें त्राहें त्राहें त्राहें काय आजि पावलें ? ॥ ९
जरी तुम्हांसि देखिलें असेल आजि लोचनीं,
तरी घडेल पतन देह त्वरित [10]यांचि भूवनीं. ।
असें असोनि शापिलें अनाथनाथ बंधुजी !
बरें तुम्हांसि मानलें, अहा ! अनाथनाथ ! जी ! ॥ १०
अन्यायाविण शापिलें मज तुम्हीं स्वामी ! अगस्ती ! मुनी !
ध्यानीं मी निजमंदिरीं नदितिरीं ध्यानस्थ होतों मनीं, ।
कर्माची गति नाटळे विधिहरा लक्ष्मीपतीलागुनी
[11]‘बोलों काय कुडें तुम्हां ऋषि मला उश्राप द्यावा [12]झणीं.’ ॥ ११

---

१. धनवान्, मोठा श्रीमान्. २. अन्य मताला अनुसरला नाहीं. ३. रत झाला. ४. ‘साधुसंगमीं’ असा अन्य पाठ आहे. ५. दुष्टबुद्धि. ६. ‘ इंद्रद्युम्नाची उक्ति. ७. ‘जाय जाय जाय जाय शापघायें ताडिलें’ असाही पाठ आहे. ८. पाहि (रक्षण कर). ९. त्राहि (त्रायस्व)=संरक्षण कर. १०. याच लोकांत. ११. ‘बोलें काय तुम्हां पुढें ऋषि मला उश्राप द्यावा झणीं’ असाही पाठ आहे. १२. लौकर.

'बरें' म्हणोनि बोलिला अगस्ति देव तो ऋषी,
'लागतांच दिव्य हस्त पूर्ण हेत पावसी. ।
परी सहस्र एक वर्ष [2]नागयोनि भोगिसी'
असें वदोनि चालिला अगस्ति देव तो ऋषी. ॥ १२

पुढें वर्तलें काय तें ऐक तूं हो ! स्त्रियायुक्त गंधर्व राहे जळीं हो ! ।
जळीं क्रीडतां थोर उन्मत्त झाला, न मानीं कदां देवऋषीगणाला. ॥ १३

स्नाना तो ऋषि पुष्करांत शिरला, अर्घ्यांजुळीं घेतलें,
गंधर्वें क्रिडतां जळांत ऋषिला हातें पदीं वोढिलें. ।
क्रोधें शाप वदे जळांत ऋषि तो, 'ज्याणें मला वोढिलें,
तो तूं नक्र जळांत हो' म्हणउनी त्या [3]पुष्करीं शापिलें. ॥ १४

ऋषीलागिं गंधर्व तो काय बोले, 'विनोदें कसे स्वामि ! रागासि आले ? ।
बरें, शीघ्र उश्राप द्यावा [4]दिनाला !' असें ऐकतां दीनवाक्यें निवाला. ॥ १५

'सहस्रेक वर्षं जळामाजि राहे, गजेंद्रासि रे ! झोंबसी [5]शीघ्र पाहें, ।
तयालागिं तो विष्णु येईल जेव्हां तया दर्शनें मुक्त होसील तेव्हां.'॥ १६

दोघही असे शाप पावले, द्वेषें भांडणा नित्य लागले. ।
एक [6]भीतरी एक बाहिरी राखिती बहू वैर अंतरीं. ॥ १७

शाप पावतांक्षणींच इंद्रद्युम्न भूपती
विशाल थोर हस्तिजन्म पावे भूप संप्रती. ।
गजेंद्र नाम पावला, वनांत वस्ति डोंगरीं
पुत्रपौत्र सूखरूप वास तीर सागरीं. ॥ १८

त्रिकूटाचळीं पर्वतीं मत्तहस्ती सुखें सागराच्या तिरीं त्याचि वस्ती, ।
गिरीचे परी शोभती स्थूल देखा असंख्यात त्यांचा करी कोण [8]लेखा ? ॥ १९

सहस्र वर्षं वनिं नांदतां हे परस्परें नांदति प्रीतिमोहें, ।
जन्मांतराचें सुखदुःख पाहीं विसूरोनि गेलें समुळींच देहीं. ॥ २०

उन्मत्त झाला मुनि, श्वापदांतें हाणे, गिरी वृक्षहि मोडि दांतें, ।
असा वनामाजि विनाश केला, मदें न मानी स्मृतियोग ज्याला. ॥ २१

गजेंद्र मानी मनिं, 'मीच धन्य. अनंत ऐसें मज [9]नागसैन्य,' ।
[10]तृषानळें तो बहु पीडिलासे, सरोवरातें जळिं चालिलासे. ॥ २२

---

१. हस्तिदेह. २. हाच गंधर्व शापानें नक्र झाला. ३. सरोवरांत. ४. दीनाला. ५. त्वरित. ६. अंतरीं. ७. मनांत. ८. पर्वा, किंमत. ९. हस्तिसैन्य. १०. तहानरूप अग्नीनें.

पांच योजनें दूर [1]गंडिका तेथ जातसे नित्य उदका, ।
सेविना जरा पुष्करीं जळा [2]ग्राह आमुचा नक्र या स्थळा. ॥ २३
ऐसिये परी काळ कर्मिला, मोक्षकाळ तो शीघ्र पावला. ।
त्याचिसारिखी बुद्धि योजिली, तैं तया तृषा फार लागली. ॥ २४
चैत्रमासिंचें उष्ण लागलें, आंगही बहू त्याणें पो[3]ळलें, ।
गंडकी बहू दूर राहिली, पुष्कराकडे चाल मांडिली. ॥ २५
तेच दीवशीं चित्तविस्मृती जाहली असे मंद ती मती, ।
पूर्व वैर तें आठवे मनीं, सर्वही दिसे स्थूळलोचनीं. ॥ २६
जसें आदरें सेविलें सीतळातें तसें, भाविलें फार सेवू जळातें, ।
बहू शांत तो चालला शीघ्र वेगें, सवें [4]संतती शोभली सर्व मागें. ॥ २७
मिथ्याचि माया [5]मृगनीर जैसें होती मना इच्छुनि व्यर्थ तैसें. ।
होणार जें कांहिं खरेंच होतें, भिवों नको तूं भवसागरातें. ॥ २८
आधि पाजिलें नीर बाळकां तयानंतरें सकळसेवकां, ।
धूतलें तयां स्नेह आदरें हर्ष पावलीं सर्व [6]अंतुरें. ॥ २९
करोनी सुखी सर्वही संततीतें निघाला जळीं, वोढिलें [7]जीवनातें, ।
अमर्याद तें घेतलें नीर[8] पाहीं, पुढें चालिला शांत सूखें स्वदेहीं. ॥ ३०
झुगारे शिरीं नीर[9] आंगावरी तो, जळाभीतरी खेळ क्रीडा करीतो, ।
अकस्मात तों झोंबला नक्र पायीं, मिठी सोडिना कांहिंकेल्या उपायीं.॥३१
बहू झूजती पर्वताकार देहीं गजें वोढिला चेपिला नक्र पाहीं, ।
फिरे दांत खावूनियां नक्र [10]जेठी धरी सोंड मारी पदीं नक्र मीठी. ॥ ३२
आसुदी जेव्हां पाय हस्ति तो मागुता तेव्हां नक्र वोढितो, ।
झूजतां बहु क्लेश जाहले, पुत्र पौत्रही शीघ्र पावले. ॥ ३३
घातल्या अढ्या पायिं [11]कुंजरीं ओढुं लागले हांवेबाहेरी, ।
श्रेष्ठ आमुचा राहिला जळीं मीन[12] गुंतती ज्यापरी गळीं. ॥ ३४
काय पाहतां? सांखळी करा, सोंड पुच्छ हो! सर्वही धरा, ।
एक नेट घ्या सर्वही बळें वोढिती बहू शक्तिच्या बळें. ॥ ३५

---

१. नदीविशेष. २. सुसर. ३. भाजलें. ४. पुत्रपौत्रादिक. ५. मृगजळ. ६. स्त्रीइत्यादिक सर्व. ७. उदकातें. ८. उदक. ९. दांत खाऊन फिरणें हें अत्यंत क्षोभाचें आणि त्वेषाचें द्योतक आहे. १०. ज्येष्ठ, बलिष्ठ ११. कुंजर=हत्ती. १२. मासे.

ओढ मांडिली त्यासि दोंकडे, यातना बहू कुंजरा घडे, ।
स्थूळ देहि तो वोढिती किती? त्रास पावले आस टाकिती. ॥ ३६
मरावें कसें मेलिया पाठिसी हो! क्षुधा लागली फार आतां चला हो! ।
परी सर्वही एकची नेट घ्या हो! जळीं स्वामिसी लोटुनी शीघ्र द्या हो! ॥३७
जीव जायसें सत्वरें करा लोभ मोह त्यां नीकरा करा. ।
येश हें तुम्हा येइ हे घडी, स्वामि! लोटुनी द्या चला तडी. ॥ ३८
सरोवरांत लोटिला गजेंद्र पुत्रपौत्रकीं
निघोन सर्व चालिले जळांत तोचि एक कीं, ।
पूर्वभक्ति धांवली मनांत हर्ष वाटला,
सर्व दुःख वीसरोनि [1]सद्गदीत दाटला. ॥ ३९
स्मरोनि **विष्णु** अंतरांत धाय फार मोकली,
म्हणे, 'असा [2]तसाचि धांव, शक्ति फार वेंचली. ।
व्यर्थ फार पीडिलों जळांत नक्रसंगतीं
तयाकडून सोडवीं [3]त्वरीत तूंचि **श्री**पती! ॥ ४०
पीडिलों बहू, [4]पाव गा! **हरी**! पायिंची व्यथा शीघ्र तूं हरीं, ।
लागल्या कळा थोर या पदीं, पीडिलें मला नक्रआपदीं. ॥ ४१
नक्रगांठिसीं अग्नि लागला, पाहतोस तूं काय ऊगला? ।
पाव गा! **हरी**! दासपालका! मोकळूं नको विश्वव्यापका! ॥ ४२
भक्तवत्सल दीनमोचन पाव सत्वर तूं **हरी**!
थोर संकट विघ्न [5]उद्भट पातलें मज केसरी ।
नक्रगांठिसि सोडुनी पद मोकळें करिं **या**दवा!
झोंबला करूं काय [6]तस्कर नाकळे मज, **मा**धवा! ॥ ४३
शंख चक्र पद्म दंड मेघवर्ण ध्यान कीं
पीतवस्त्र [7]पद्मनेत्र नाम तोचि **विष्णु** कीं, ।
वैजयंतिमालधारि स्थूलभाल लोचनीं
पहावयासि वासना गजेंद्र [8]आर्तला मनीं. ॥ ४४

---

१. 'सद्गदित' अथवा 'गद्गद' भाषण कशाला म्हणावें हें पुढच्या उताऱ्यांत सांगितलें आहे:—'मदप्रमोदव्रीडादेर्वाक्स्तंभो गद्गदं विदुः' [मालतीमाधव—तृतीय अंक, त्रिपुरारिकृत टीका—पृष्ठ ८५.]
२. जसा असशील तसाच. ३. वृत्तसुखार्थ येथें शब्दाची ओढाताण केली आहे. ४. प्रसन्न हो. ५. मोठें, भयंकर. ६. चोर. ७, कमललोचन. ८. उत्सुक झाला.

विधीकारणें[1] मत्स्य झालासि वेगें वैरें[2] दानवां मारिलें शीघ्र आंगें, ।
बळें आणिले वेद हीरोनि चारी, गजेंद्रास वेळेस आलासि हारी ॥ ४५
महीमाजि[3] मंदागिरी चालियेला, तई कूर्म होवोनियां स्थीर केला, ।
अशी कीर्ति केली महीमाजि भारी, गजेंद्रास वेळेस आलासि हारी. ॥ ४६
धरित्री[4] बळें दानवीं चालवीली, वराहेरूपें स्वामि! तूं थांबवीली ।
हिरण्याक्ष मर्दोन भक्तास तारी, गजेंद्रास वेळेस आलासि हारी, ॥ ४७
तुवां नारसिंहें बहू खेळ केला, महाभक्त प्रल्हाद तो रक्षियेला ।
अरी मर्दुनी फोडिला स्तंभ भारी, गजेंद्रास वेळेस आलासि हारी. ॥ ४८
क्षितीकारणें[5] वामना धांवलासी बळीदान[6] घेऊनियां राहिलासी ।
तयाकारणें तूं उभा नित्य द्वारीं, गजेंद्रास वेळेस आलासि हारी. ॥ ४९
अरे भार्गवा! थोर अद्भूत केलें, सहस्त्रार्जुनालागिं तूं मर्दियेलें, ।
जहालासि तूं ब्राह्मणा साहकारी, गजेंद्रास वेळेस आलासि हारी. ॥ ५०
तुझी राघवा! वर्णुं मी काय लीला? पदस्पर्शनीं तारिली शापलीला[7] ।
सुरां सोडुनी मर्दिला तो सुरारी[8], गजेंद्रास वेळेस आलासि हारी ॥ ५१
अरे कृष्णजी! काळिया नाथिला[9] रे! रिकामा तिव्हां काय होतास तूं रे! ।
अरी मर्दुनी तारिल्या दीननारी[10], गजेंद्रास वेळेस आलासि हारी. ॥ ५२
पहा बौद्धरूपा कलंकीस्वरूपा, बहू वेचला प्राण रे! नामरूपा. ।
न देखों तुझी स्वामिजी! वाट येतां, क्षणामाजि हा देह टाकीन आतां.॥ ५३
तुझें नाम घेतां हरे सर्व वेथा[11] असें ऐकिलें संतमूखें अनंता! ।
तयालागिं त्वां लाविला बोल आतां' असें ऐकतां धांवला जीवदाता. ॥ ५४

बरें मनांत बोधला बऱ्यास सर्व साजिरी,
स्मरोनि विष्णु अंतरीं अनंतमूर्ति ती बरी, ।
भक्तहाक ऐकुनी त्वरा करूनि ऊठिला,
रमासुखा न घे तईंच कळ्वळोनि चालिला. ॥ ५५

---

१. या व पुढील पद्यांत अनेक अवतारांस उद्देशून वर्णन आहे. २. 'त्वरे दानवां मारुनी त्यां अभंगें' असाही पाठ आहे. ३. भूमीमध्यें. ४. पृथ्वी. ५. क्षिति=पृथ्वी. ६. जबलपुरानजीक भेडाघांट म्हणून जो रमणीय भूप्रदेश त्यांत बटु वामनानें पृथ्वीदान मागून बळीराजाला पाताळांत लोटिलें असें म्हणतात. ७. शापलेली अहल्या. ८. रावण. ९. मारिला. १०. 'गोपनारी' असा अन्य पाठ आहे. ११. व्यथा.

सूख संपदा टाकुनी हरी लक्षुमी पुसे, 'काय अंतरीं ? ।
धांव मांडिली खेद घेतला, काय वर्तलें सांगिजे मला !' ॥ ५६
देव बोलिला, 'चंद्रआनने[1] ! गुह्य सांगतों पंकजानने[2] ! ।
गजेंद्र भक्त हा गांजिला अरीं, बाहतो 'मला पाव गा ! हरी !' ॥ ५७
दीनबंधु हें नाम सुंदरी ! वागवीतसें ब्रीद अंतरीं, ।
धांवणें तयालागिं सर्वथा पूससी प्रिये ! मूळ ही कथा.' ॥ ५८
कृपासागरें[3] घेतली धांव वेगें, गरूडासही टाकिला फार मागें, ।
जसा कष्टला देखिला भक्त दृष्टी म्हणे, 'भेटला धन्य हा भक्त सृष्टी.'॥५९
न साहे अवस्था गजा तेचकाळीं, मना मंदिरीं ब्रह्मरूपा न्यहाळी ।
परब्रह्म तें शांतवी हस्तियातें, उभें देखिलें आदरें स्वामियातें. ॥ ६०
दाटले बहू सद्गदीत ते देव भक्तप्रीय एकमेक ते ।
शांतवी बहू विष्णु हस्तितें, दुःख वीसरें सर्वकाळिं तें. ॥ ६१
देखिलें जसें ध्यान विष्णुचें, दुःख वीसरे सर्वकाळिचें. ।
मुकुट देखिला जडित[4] मस्तकीं दिव्य आयुधें चार हस्तकीं. ॥ ६२
शंख चक्रही साजिरी गदा, इंदुनूपुरें[5] शोभती पदा, ।
दंत शोभती रत्नपंक्तिका, साजिरी दिसे दिव्य नासिका. ॥ ६३
कर्णिं झळकती कुंडलें कसीं वीजुचे परी तेज वोतिसीं. ।
वैजयंतिची[6] माळही गळां हेमवर्णही[7] साजिरी लिळा. ॥ ६४
वीरकंकणें मुद्रिका करीं, श्रीवत्स हे लांच्छनें उरीं. ।
पीत[8] अंबरीं रत्नमेखला शोभली कटी साजिरी लिला. ॥ ६५
असें देखिलें ध्यान त्या हो ! गजेंद्रें कृपाळूपणें पाहिलें राघवेंद्रें; ।
परी सोडिना नक्रमीठी कदांही बहू आगळा झोंबला स्थूळदेहीं. ॥ ६६
त्वरें काढिलें विष्णुनें चक्र हातें मुखीं ताडिलें वज्रघातें निघातें; ।
तरी सोडिना नक्र मीठी बळी तो बहू विक्रमें झोंबलासे जळीं तो. ॥ ६७
रिघाला[9] जळीं श्रीहरी शीघ्र वेगें, त्वरें सोडिला दीन तो दास अंगें, ।
जळावेगळें काढिलें त्या दिनाला, बहू थोर आनंद त्याच्या मनाला. ॥६८

---

१. 'चंद्रमानने' 'सोमभानने' असे अन्य पाठ आहेत. २. कमलमुखि ! ३. विष्णूनें. ४. रत्न-जडित. ५. पैंजण. ६. ही वैजयंती पुष्पांची माला विष्णूची होय. हिचीं कुसुमें कोमजत नाहींत असा समज आहे. या वैजयंतीची पुष्पें जशीं सदां ताजीं आणि टवटवीत असतात, तशींच Laurel नामक झाडाचीं पुष्पें कधीं वाळत नाहींत, सदां ताजीं असतात असा प्राचीन रोमन लोकांचा समज आहे. ७. सुवर्ण वर्ण. ८. पिंवळ्या वस्त्रीं. ९. शिरला.

गरूडध्वजें लावितां हात आंगें स्वयें जाहला दिव्यदेही निजांगें; ।
करूं लागला स्तूति नानापरीची बहू वर्णना मांडिली श्रीहरींची. ॥ ६९
'शापदग्धही तारिलें मला, काय वर्णु मी श्रीहरी तुला? ।
शेष वर्णितां भागला तुतें आन तूळणा कायसी इथें? ॥ ७०
वेदें वर्णितां मौन्य राहिले **'नेति नेति'** हें वाक्य बोलिले ।
तेथ मी किती? काय किंकर काय मी स्तवूं दीन पामर?' ॥ ७१
हरीचे कृपें शीघ्र वीमान आलें, हरीकिंकरीं त्याजला बैसवीलें. ।
असें देखुनी हांसला नक्र दृष्टीं म्हणे 'वर्तलें थोर आश्चर्य सृष्टीं.' ॥ ७२
पुसे श्रीहरी, 'कां तुवां हास्य केलें?' म्हणे, 'म्यां तुला लोचनीं देखियेलें, ।
विमानीं गजा घालुनी चालवीसी, मला रे! कसा हे वनीं मोकळीसी? ७३
पतितपावन नाम तुझें हरी! तरि कसा मज टाकिसि तूं दुरीं? ।
नवल थोर मनीं मज वाटलें, ब्रिदेंचि काय तुझें हरि! सूटलें. ॥ ७४
बहु वाटतसे खंति रे! मजला, असि भेदरिती हरि! कां तुजला? ।
समबुद्धि जरी असती तुजला तरि तें बरवें दिसतें मजला. ॥ ७५
क्षितिही बरवी मज वाटतसे तुजला कुमती मज भ्रांति दिसे. ।
गजराज कसा वरि चालविला? हरि! नक्र तुवां वनिं सांडियला ॥ ७६
जरि पातकि मीच खरा असतों, तरि हेचि जळीं हरि रे! नसतों; ।
परि गांठिसि तें बहु पुण्य असे, सुखरूप तुझें मज ध्यान दिसे. ॥ ७७
फुटकें जरि मानुं कपाळ मनीं, तरि मी तुज देखतसें नयनीं, ।
म्हणऊनि असा सुकृती हरि! मी तुज पाहतसें तरि रे! दृढ मी. ॥ ७८
दिनबंधु तुझें हरि! नाम बरें, मज उद्धरिसी तरि हेंचि खरें, ।
म्हणजे बहु मानिन मी तुजला, तुजवांचुनि कोण असे मजला? ॥ ७९
कितिएक तुतें भजती पतितें कितिएक तुतें जपती मुनि ते, ।
कितिएक गिरीवरते असती कितिएक उदास तुतें भजती. ॥ ८०
कितीएक ते पर्वतीं राहताती कितीएक ते कर्वतीं देह देती, ।
कितीएक ते अग्निसंगा सहाती, तुझेवीण अन्या न जोडूं पहाती. ॥ ८१
परी नांतुडे स्वप्निं त्यां ध्यान तूझें तयां आगळें श्रीहरी! पुण्य माझें, ।

---

१. श्रीविष्णूनें. २. थकला. ३. आणखी. ४. चार वेद, उपनिषद्ग्रंथ इत्यादि. ५. चाकर. ६. स्वीकृत व्रत. ७. पुण्यवान्. ८. दीनांचा बंधु. ९. पापी जन. १०. न स्पर्शे, न लाभे, न मिळे. ११. अधिक, श्रेष्ठ.

अकस्मात म्यां तूजला देखियेलें, मला टाकुनी इंद्रद्युम्नासि नेलें, ॥ ८२
म्हणोनी मला हास्य आलें दयाळा! त्वरें उद्धरीं श्रीहरी! हो! कृपाळा!'।
असें बोलतां देव भक्ताभिमानी म्हणे, 'चालवा नक्र आधीं विमानीं.'॥८३
पहा नक्र हो शीघ्र गंधर्व झाला, हरीदर्शनें शाप त्याचा निमाला. ।
[1]हरीकिंकरीं बैसवीलें विमानीं, स्मरूं लागले दोनही चक्रपाणी. ॥ ८४
हरीनें बहू आदरें भेटवीले [2]विरोधी परी अंतरीं नीववीले. ।
मिळाले सुखें आदरें दोन बंधु, तयां [3]पावला तोचि हो! दीनबंधु. ॥ ८५

पहावयासि पातले समस्त देव [4]अंबरीं,
विमानपंक्ति दाटल्या बहूत हर्ष [5]अंतरीं; ।
पुष्पवृष्टितें करोनि 'धन्य धन्य' बोलती,
[6]आरत्या सुरांगना करूनि सर्व पाहती. ॥ ८६

[7]सत्संग होतां तरती दुरात्मे, सत्संगयोगें परब्रह्म आत्मे, ।
सत्संग होतां बहु सौख्य आहे, सत्संग नक्रा फळलाचि पाहें. ॥ ८७
संतसंग करितां हरि भेटला, संतसंग करितां [8]शिण फीटला. ।
संतसंग करितां सुख आहे, संतसंग करितां तरलाहे. ॥ ८८

दिसे भूवनीं दिव्य वीमान कैसें? महामेरुच्या शीखरातुल्य जैसें, ।
पताका शिरीं झळ्कूताती निशाणें वरी मुक्ति हें जो करी गीत गाणें. ८९
अशा विमानींहि गजेंद्र नक्र त्यांतें पहाती सुरराज शक्र ।
हें सूख नाहीं विधि त्या हरातें तें दीधलें यां म्हणती अनंतें. ॥ ९०

चालिलें विमान, तेजरूप त्यांत बिंबलें,
अनंतकोटि घंटिका अनंत नाद कोंदले, ।
गीत नृत्य सर्व भाव दाविताति आदरें,
पुढें उभ्या [9]सुरांगना धरोनि दिव्य [10]चामरें. ॥ ९१

विमानामधें शोभले दिव्यदेही, त्वरें पातले स्वर्गलोकास तेही; ।
असो दीधलें सूख त्यांला दयाळें, क्षणामाजि ते मुक्त केले कृपाळें. ॥ ९२

---

१. विष्णुदूतांनीं. २. वैरी. ३. प्रसन्न झाला. ४. आकाशांत. ('अंबरं व्योम्नि वाससि' इत्यमरः, 'अंबरं वाससि व्योम्नि कार्पासे च सुगंधके' इति विश्वः.) ५. मनांत. ६. आरती करणें=दीप ओंवाळणें. ७. साधुसमागम. [श्लोक ८७-८८ यांजमध्यें सत्संगाचा महिमा वर्णिला आहे.] ८. श्रमाचा परिहार झाला. ९. देवांच्या स्त्रिया. १०. चंवऱ्या.

निमेषांत ते दोनही मुक्त केले, दयाळें सर्वें **वि**ष्णुलोकासि नेले. ।
कृपाळू असा मुक्तिकैवल्यदानीं स्मरें रे! मनामंदिरीं **च**क्रपाणी. ॥ ९३
शापदग्ध[1] तो लाविला गती[2] माहराज तो एक **श्री**पती, ।
ऐक राजया[3]! पूसिली कथा गजेंद्र जाहला मुक्त सर्वथा. ॥ ९४

(अभंग.)

गजेंद्राची कथा ऐकती जे भावें । पावती स्वभावें मनोरथा. ॥ १ ॥
भक्ति मुक्ती तयां पुत्र पौत्र मित्र । पावती कलत्र[4] हरीवाक्यें. ॥ २ ॥
उणें पूरें असे त्याचा तोचि जाणे । दीन कांहीं नेणें कर्ता तोची. ॥ ३ ॥
जैसें करवीलें तैसें दीनें केलें । गजेंद्रातें नेलें मुक्तिपदा. ॥ ४ ॥
तोचि महा**वि**ष्णू सर्वां चालवीता । सृष्टीतें पाळीता भक्तराज. ॥ ५ ॥
त्याचा दास ब्रह्मा कवि कचेश्वर[5] । ध्यातो निरंतर सदा त्यासी. ॥ ६ ॥ ९५

---

# सामाज्यवामनविरचित

## ३. सुदामचरित्र[6].

(श्लोक.)

श्रीसद्गुरूच्या पदसारसातें[7] वंदोनियां, या कवितारसातें ।
बोलेन जी[8]! **भा**गवतीं **शु**कानें जें वर्णिलें आयकिजे[9] सुकानें[10]. ॥ १
**सु**दामाच्या धामीं[11] किमपि हि नसे अर्थ[12] भलता[13],
पहातां वायूची सदनिं[11] दिसते कीं प्रबळता[14], ।

---

१. इंद्रद्युम्न. २. मुक्ति. ३. जन्मेजया! ४. स्त्री. ५. येथें कवीनें आपलें नांव दाखल करून भिन्न वृत्तांत काव्याची समाप्ति केली आहे. ६. ही कथा श्रीमद्भागवतांतील दशम स्कंधाच्या८०-८१ या अध्यायांत आहे. सुदामा हा सत्वशील भगवन्निष्ठ महासाधु होता. हा कृष्णाचा सहाध्यायी बालमित्र होय. याच्या बायकोनें याची केलेली निंदा, कृष्णानें केलेला याचा आदरसत्कार, मूठभर पोहे खाऊन प्रभूचें संतुष्ट होणें आणि तदनुरूप स्वभक्ताला प्रसन्न होऊन सोन्याची नगरी देणें—इत्यादि गोष्टी सुप्रसिद्ध आहेत. या काव्यावर कै० बाळकृष्ण मल्हार हंसकृत वामनपंडितांवरील निबंध—पृष्ठें ९६-१०४ यांत गुणदोषविवेचक टीका आहे ती पाहण्यालायक आहे. तसेंच 'वामनीग्रंथ'कर्त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या वामनचरित्रांतही कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत, तेही अवश्य पहावे. ७. पदकमळांस. ८. अहो. (संबोधनार्थ अव्यय.) 'मी' असाही पाठभेद आहे. ९. आयकावें. १०. चांगल्या कानानें. ११. घरांत. १२. द्रव्य. १३. 'बघतां' असा पाठभेद आहे. १४. प्रबळपणा, प्राबल्य.

[1]तृणें [2]पर्णें [3]जीर्णें करुनि [4]शत [5]छिद्रें मिरवलें
[6]जणों ‘गंधर्वांचें [7]नगर’ नभिं जैसें उगवलें. ॥ २
लागे त्या [8]रजनीस विप्रसदनीं [9]काजूक्रमीचा दिवा,
जैसा [10]तंतुपट [11]स्वभाविक गमे कीं बांधला [12]चांदवा; ।
[13]पृथ्वीपीठ पलंग विस्तृत दिसे निद्रा करी त्यावरी,
[14]कांतालिंगन मंद दे [15]द्विजवरा तो इंद्रियें आवरी. ॥ ३
[16]जन्मादारभ्य नेणे [17]द्विजवरवनिता एकही [18]जीर्ण [19]चोळी,
त्या रागें ते स्थळीं ते न कळत पतिला जें [20]करद्वंद्व चोळी, ।
[21]दसरा येतां दिवाळी किमपिहि न मिळे [22]गोडेशी पूर्णपोळी,
दोषें [23]दारिद्र्यतापें करुनि [24]निजमनीं आपुलें [25]चित्तें पोळी. ॥ ४
‘वस्त्रें जशीं केवळ [26]मीनजाळीं’ वदे ‘कधीं [27]पावकही न जाळी ।
जें धुंडितां ही नव खंड खंडें अप्राप्य, कीं [28]जर्जर [29]खंडखंडें. ॥ ५
नसे अन्न भक्षावया मंदिरीं हो ! म्हणोनी [30]तयां वर्जिलें उंदिरीं हो ! ।
न ज्या आंगणीं त्या [31]विहंगादि जाती गृहा त्याचिया कोण भिक्षेसि जाती ?’॥ ६
तो [32]द्विजोत्तम तसा [33]वनवासी [34]सौख्यलेश न कधींच जिवासी, ।
[35]दंपती [36]कृशशरीरगतीनें वागती परम [37]मंदगतीनें. ॥ ७

---

१. गवतानें. २. पानांनीं. ३. ‘जीर्णें’ हें तृणाचें व पर्णाचें विशेषण. ४. शंभर. ५. भोंकांनीं. ६. हें उत्प्रेक्षालंकाराचें उदाहरण आहे. ७. कल्पनेचें शहर. क्षणांत दिसणारें व क्षणांत नाहींसें होणारें शहर. [पृथ्वीवरील नगरासारखें आकाशांत केवळ दिसणारें जें नगर त्याला गंधर्वनगर म्हणतात. याचें सविस्तर वर्णन वराहमिहिरानें ‘बृहत्संहितें’त दिलें आहे—अध्याय ३०.] ८. रात्रीं. ९. काजवा नामक कीटकाचा. १०. दोऱ्यांचें—सुतांचें वस्त्र. ११. ‘स्वाभाविक’ असा शब्द पाहिजे. १२. छत. १३. भूमीचें तळ. १४. कांता आणि आलिंगन हे वेगळे शब्द पाहिजेत. १५. ब्राह्मणश्रेष्ठाला. १६. जन्मापासून. [जन्मात्+आरभ्य=जन्मापासून+आरंभून. हें शब्दरूप चिंतनीय आहे.] १७. ब्राह्मणश्रेष्ठाची बायको. (वनिता=स्त्री.) १८. फाटलेली. १९. कंचुकी. २०. हस्तद्वय. २१. विजयादशमी. २२. ‘गोड पूराण पोळी’ असा अन्य पाठ आहे. २३. दारिद्र्याच्या दुःखानें. २४. आपल्या मनांत. २५. मन. २६. माशाचीं जाळीं. (समास चमत्कारिक.) २७. अग्नि. २८. फाटलेलें. २९. तुकडे तुकडे झाल्यामुळें. ३०. त्या घराला. ‘क्षया’ असाही पाठ आहे. ३१. पक्षी आदिकरून. ३२. ब्राह्मणश्रेष्ठ. (सुदामा विप्र.) ३३. वनांत राहणारा—गरीबी भोगणारा. ३४. सुखाचा थोडकाही अंश. ३५. नवराबायको—सुदामा व त्याची स्त्री. ३६. रोड होऊन. ३७. हळू हळू. हें तीन अक्षरी यमक आहे.

खाती [1]कंदमुळें, पिती [2]मधुजळें, जे नेणती ओंवळें,
दंपत्यें [3]अमळें [4]स्वसाधनबळें ज्याचें सदा सोंवळें, ।
नेसाया [5]धवळें न वस्त्र पिंवळें, [6]शीतें सदा [7]व्याकुळें
पृथ्वी [8]पादतळें फिरे हळहळें प्रारब्ध [9]दै[10]वांगळें. ॥ ८
वस्त्रीं [11]बालतृणांकुरें पसरलीं जाती न आच्छादिलीं,
[12]कौपीनांबरछिद्रतोन्मुख सदा निर्लज्ज संपादिलीं, ।
कांखे पुष्कळ दों भुजीं अणिकही संपूर्ण विस्तारलीं,
नाहीं [13]नापित [14]काढण्या म्हणुनियां [15]स्वस्वस्थळीं [16]थारलीं. ॥ ९
दाढी मिशा [17]बाबरभूत [18]ज्यांतें [19]अश्लाघ्यते [20]ने [21]मुखपंकजातें, ।
दिसोन येतें समजा मनीं रे! सळे पळे देखुनि [22]कामिनी रे!॥ १०
[23]नासापुटीं तों [24]भरणी [25]जयांची, [26]अन्यत्र नाहीं [27]गणना [28]तयांची, ।
ज्या मस्तकींच्या [29]कबरीभरानें सभोंवतीं दंग [30]भुजंगरानें. ॥ ११
सर्वत्र [31]मंदादर कीं जयाला बंधू न ते बोलविती जयाला, ।
कांता [32]सती होउनियां जयाची [33]संतोषवार्ता [34]नकरी [35]जयाची. ॥ १२
तो काळ [36]कंठी जंव ये रितीनें, तों बोधिला ब्राह्मण कीं सतीनें ।
‘[37]द्वारावतीचा पति मित्र लोकीं तूं आपुला बोलसि कीं, विलोकीं. ॥ १३

---

१. ‘कंदमूळें’ असा शब्द पाहिजे. २. गोड पाणी. ३. निर्मळ. ४. आपल्या साधनाच्या योगानें. ५. शुभ्र. ६. थंडीनें. ७. दुःखी. ८. पायांच्या तळांनीं, अनवाणी. ९. दैव. १०. विलक्षण. या पद्यांत ‘ळें’ याची आवृत्ति वारंवार झाली आहे म्हणून हा ‘वृत्त्यनुप्रास’ नामक शब्दालंकार झाला आहे. ११. केंस. १२. लंगोटींतून बाहेर येणारीं. १३. ‘नापिक नापिका’ असा अन्य पाठ. १४. काढण्याकरितां. १५. आपापल्या ठिकाणीं. १६. राहिलीं. १७. वाढलेल्या. ‘बर्बरभूत’ याचा अपभ्रंश. १८. ‘ज्याच्या’ असाही पाठ आहे. १९. अश्लाघ्यतेला, निंदेला. ‘अश्लाघ्य तेणें मुखपंकजाच्या’ असाही पाठ आढळतो. २०. नेई–नेत असे. २१. मुखकमळाला. ‘मुखपंकजातें अश्लाघ्यते ने-असा अन्वय. २२. बायको. २३. नाकपुडींत. २४. अतिशय. २५. ज्या केंसांची. २६. दुसऱ्या ठिकाणीं. २७. गणती. २८. त्या केंसांची. २९. वाढलेल्या केंसांच्या समुदायानें. ३०. सर्पांचीं अरण्यें. ‘कबरीभरानें भुजंगरानें दंग’=डोकीवरील वाढलेल्या केंसांच्या समुदायास पाहून सापांचीं अरण्येंही दंग झालीं–असा भाव. हें सुदाम्याच्या शरीराचें वर्णन ठीकसें नाहीं. ३१. आदराची कमताई. ३२. पतिव्रता. ३३. सुखाची गोष्ट. ३४. करीत नसे. ३५. ज्या सुदाम्याची. (हें सतीच्या लक्षणाशीं विरुद्ध आहे; व अमृतरायाच्या कटावाशींही विरुद्ध आहे. काव्यसंग्रह–अमृतराय–सुदामचरित्र पृष्ठ २९।३० पहा. ३६. घालवी. ३७. हें सुदाम्याच्या सुशील बायकोचें भाषण पतिव्रता स्त्रियेला शोभण्यासारखें नाहीं, म्हणून तिच्याकडे हीनत्व येतें.

तडतडां मज तोडिति बाळकें, न मिळती उदरास हि [1]वाळकें, ।
बहुत हे समजा [2]शिशुजाचणी, मन असे पडिलें अति [3]कांचणीं. ॥ १४
हीं सोकलीं दूध दहीं तुपासीं सांगों किती दुःखहि तूजपाशीं ? ।
बाळें अम्हां कां दिधलीं [4]सुदैवें न जाणतां श्रीपति वासुदेवें ? ॥ १५
जे मागती त्यांस हरी न देतो, न मागती त्यांस बळेंचि दे तो. ।
जो [5]कामुकाची समजे [6]अपेक्षा म्हणोनि [7]तोकीं करितो उपेक्षा ? ॥ १६
दुर्गंधि तों कधिंचही न चुके मुखाची, [9]शय्यासनीं किमपि गोष्टि नसे सुखाची, ।
[10]तांबूलहीनवद[11]नाधरपान[12]काळीं स्वप्नीं परंतु हि कधीं न पडे सुकाळीं. ॥ १७
[13]खदिरपूर्णरसें [14]दशनांबरें [15]वदन देखियलें न कधीं बरें, ।
परम [16]शुष्क तुझ्या [17]अधरासि या रसविहीन [18]अपेक्षित [19]कासया ? ॥ १८
जालिया [20]वमनही न मिळे कीं तूज तें [21]क्रमुक फोडि फळें कीं ।
कोण सौख्य म्हणऊनि क्रमावें जें परस्पर मिळोनि रमावें ? ॥ १९
[22]स्नेहशून्य वरि भार जटांचे व्यर्थ हे [23]वरुनि पाय [24]भटाचे, ।
[25]दैवहीन अम्हि काय करावें जाण या अजि वयांत मरावें. ॥ २०
[26]मरण कां मज नयेचि कळेना [27]पावकीं पडुनि देह जळेना, ।
व्यर्थ जन्म धरिला नरलोकीं कीं अम्ही उभयतां श्रमलों कीं. ॥ २१
अहा! पाप म्यां काय केलें कळेना पहा सौख्य स्वप्नांतही आढळेना, ।
वृथा जन्म घेवोनियां या [28]नृलोकीं किती [29]यौवनीं [30]दंपती शीणलों कीं. ॥ २२
त्वां हा मनीं खेद न तो करावा, यानंतरें यत्न मनीं धरावा, ।
श्रीकृष्णजीच्या चरणां भजावें, भेटावया शीघ्र निघोनि जावें.' ॥ २३
सुदामा बोले कीं, 'जरि वदसि जा तूं मज सती !
अहो ! तेथें गेल्या सकळ जन देखोनि हंसती, ।

---

१. एकप्रकारची कांकडी. २. बाळ. ३. जाच. ४. चांगल्या दैवानें. ५. ज्यास इच्छा आहे त्याची. ६. इच्छा. ७. मुलांच्या ठिकाणीं. ८. दुर्लक्ष्य, हयगय. ९. शय्येवर. १०. विड्याशिवाय. ११. तोंडाचा खालचा ओंठ. १२. चुंबन घेतांना. १३. कात. १४. ओंठ. १५. तोंड. १६. सुकलेला, कोरडा. १७. खालचा ओंठ. १८. इच्छिलेला. १९. कशाकरितां. २०. ओकारी. २१. सुपारी. २२. तेल. २३. लग्न लावून. २४. भिक्षुकाचे, भट्टाचें. (भटाचें=वीराचें.) २५. फुटक्या नशीबाचे. २६. येथें छंदोभंग झाला आहे. येथें 'मृत्यु' असें असावें. २७. अग्नींत. २८. नरलोकांत, मनुष्यलोकांत. २९. तारुण्यांत. 'यातनीं' पाठभेद. ३०. 'संप्रती' असाही पाठ आहे.

तयीं चित्तीं दुःखें परम[1] उपजेती[2], न धरवे
क्षमा पाहों जातां तदुपरि हि आम्हां न करवे. ॥ २४
अयासनें करुनि हीनहि दीन लोकां कां बोध नाद पुसती जगतीं भुलोका, ।
आम्ही अकिंचन[3] सकिंचनता[4] जयासी जागे समान प्रतिपाद्य न हो तयासी.॥ २५
ऐश्वर्यें[5] भ्रमले[6] जगीं मिरवले, थोडे भले देखिले,
नाहीं पारखिले[7] तुवां वळखिले गर्वेंचि जे आंखिले[8], ।
तारुण्यें पहिले भरें दडपले सौंदर्यें सदा मातले[9],
दुष्पंकीं[10] रुतले[11] बळेंचि उतले[12] कामीं सादा रातले[13]. ॥ २६
परधन[14] परदारा[15] सर्वदोषापहारी[16]
अनुदिन[17] प्रियकांताकामसंगीं[18] विहारी[19], ।
किमपिहि न करी जो सज्जनासी प्रवृत्ती[20]
अतिकठिण घडेना साधुनिंदानिवृत्ती[21]. ॥ २७
देखतां ऋषि तयासि न पूजी, वाटतो द्विजें[22] तयास रिपू[23] जी, ।
भोंवई करुनि वक्र पहातो मित्र भिक्षुक अमान्य अहा! तो. ॥ २८
न तो हालवी मस्तकातें कदापी, दुरूनीच तो शुष्क[24] शब्देंचि दापी[25], ।
तयीं बोबडी ते वळे भिक्षुकाची न ते गोष्टि ही गोड बोले फुकाची. ॥ २९
अलक्ष्मीसलक्ष्मीस तों वैरभाव स्त्रियांचाच नैसर्गि[26] कीं तो स्वभाव, ।
म्हणूनीच शत्रुत्व या संततीतें विचारूनि पाहें सती! तूं मतीतें.[27]' ॥ ३०
'प्रतिष्ठा[28] लज्जाही धरुनि बसतां काय न घडे,
प्रयत्नावांचूनी समज सहसा दैव नुघडे[29]; ।

---

१. फार. २. उत्पन्न होतील. ३. भिकारी. ४. श्रीमंतपणा. ५. संपत्तीनें. ह्या श्लोकांत 'ले' ह्या वर्णाची वारंवार आवृत्ति झाल्यामुळें येथें अनुप्रासालंकार झाला आहे. ६. वेडे झाले. ७. परीक्षा केली. ८. रेखिले. ९. माजले. १०. वाईट मार्ग—किंवा व्यसन—ह्याच चिखलांत. ११. गुंतले. १२. गर्वानें फुगले. १३. रममाण झाले. या श्लोकांत वृत्त्यनुप्रास नामक शब्दालंकार 'ले' याची वारंवार आवृत्ति झाल्यामुळें झाला आहे. दुसऱ्या पादांत 'खिले' आणि चवथ्या पादांत 'तले' या दोन दोन अक्षरांची आवृत्ति तीनदां झाल्यामुळें त्या त्या पादांत 'छेकानुप्रास' नामक शब्दालंकार झाला आहे असें समजावें. १४. दुसऱ्याचें द्रव्य. १५. दुसऱ्याची बायको. १६. सर्व दोषांचा अपहार करणारा म्हणजे दोष करणारा. १७. निरंतर. १८. आवडत्या स्त्रीच्या संगतींत. १९. रमणारा. २०. सोबती, संगती. २१. पराङ्मुखता. २२. ब्राह्मण. २३. शत्रु. २४. सुक्या, नुसत्या. २५. दाबतो, बोलतो. २६. स्वाभाविक. २७. हें सुदाम्याचें भाषण प्रसंगास अनुचित आणि अप्रयोजक दिसतें. सकलैश्वर्यसंपन्न भगवंताच्या ठिकाणीं साधारण धनिकाच्या दोषांचा आरोप करणें म्हणजे प्रसंगाचा आणि पात्राचा विचार न करणें होय. २८. ही सुदाम्याची पत्नीची उक्ति त्यानें श्रीकृष्णाकडे जाऊन आपल्या दारिद्र्याचा परिहार करून श्रीमंत होऊन यावें या उद्देशास अनुसरून आहे. २९. उघडत नाहीं.

दिनानाथा ! कांता ! मजवरि करावी बहु दया
विचारें आणावें वचन बरवें [1]स्वात्महृदया. ॥ ३१

करूं नये [2]स्त्रीवचना अमान्य समस्त लोकांत तुम्हीच मान्य, ।
दारिद्र्यदोषास त्वरें हरावें, [3]प्रस्थान येथूनि उद्यां करावें. ॥ ३२

[4]द्वारावतीचा पति आजि मान देतो जना अन्य न तो समान, ।
अज्ञान हो [5]दांभिक भाग्यवंत तूं कृष्ण तो जाणसि ज्ञानवंत. ॥ ३३

त्याची तुम्हां कीर्ति असोनि ठावी, कां कल्पना व्यर्थ मनीं उठावी ? ।
देवोनियां राज्य [6]बळीस [7]दारा राहे उभा जो समजा उदारा. ॥ ३४

उचलुनि [8]तळहातें जो धरी [9]पर्वतातें,
[10]वसुं[11]दिनकृतसंख्या जाणसी मारतातें, ।
कशि करिल उपेक्षा आपुली या जनातें ?
[12]द्विजवरिं समजावें तत्व हें कीं मनातें. ॥ ३५

उच्छिष्ट धर्मा घरिंचें [13]स्वहातें काढीतसे हें जनही पहातें, ।
[14]ऐश्वर्यतेचा [15]बडिवार नाहीं हें जाणशी तूं तंव सज्जना ही. ॥ ३६

देतां उरीं तो [16]भृगु लात सोशी [17]सुब्राह्मणाचीच तया [18]असोशी, ।
जाणोनि हें जा अजि दर्शनासी दारिद्र्य हें तत्क्षणिं देव नाशी.' ॥ ३७

हे [19]आयकोनि वचनोक्तिसुधा सतीची [20]मालिन्यता [21]परिहरी अपुल्या [22]मतीची, ।
त्यानंतरें करितसे स्वमनीं विचार सांडोनि दे मग समस्तहि पूर्व [23]चौर. ॥ ३८

'रित्या हातें जावें स्वमनिं समजावें गुणवती'
उभी मुष्टीं पोहे धरुनि [24]पतिसन्मुख युवती ।
म्हणे, '[25]शाकेचें घे [26]दळ [27]अशन मानी बहु [28]चवी'
म्हणोनी [29]भर्तारा त्वरित [31]गमनोद्देश सुचवी. ॥ ३९

---

१. आपल्या मनांत. २. बायकोच्या (माझ्या) वचनाला. ३. 'प्रस्थान ठेवूनि उद्यां निघावें' असाही पाठ आहे. ४. द्वारकेचा. ५. ढोंग करणारा. ६. बलिदैत्याला पाताळीं राज्य-देऊन कृष्ण (वामन) त्याचा द्वारपाल झाला—अशी कथा आहे. ७. दारावर. ८. तळहातानें. ९. गोवर्धन पर्वताला. १०. वसु=आठ. ११. मदनपिता. (कृष्ण.) १२. ब्राह्मणश्रेष्ठांनीं. १३. आपल्या हातानें. १४. श्रीमंतीचा. १५. डौल. १६. भृगुऋषि. भृगूनें लाथ मारल्याची पौराणिकी कथा सुप्रसिद्ध आहे. १७. चांगल्या ब्राह्मणाची. १८. अति आवड. १९. अमृत. २०. मळिनपणा. २१. हरण केली—टाकली. २२. बुद्धीची. २३. चाळे. २४. नवऱ्याच्या पुढें. २५. भाजीचें. २६. पान. २७. भक्षण. २८. गोडी. २९. हें शब्दरूप चिंतनीय आहे. ३१. जाण्याचा हेतु.

घेवोनियां पृथुक[1] ते मग चालिला हो! वाचेसि सेवित असे प्रभु[3]नामलाहो, ।
तों देखिली दुरुनियां नगरी हरी[2]ची चित्रें विचित्र दिसताति परोपरीचीं. ॥ ४०

नौरत्नें[4] खचितें करूनि बरवें मंदीर[5] तें देखिलें,
सज्जे[6] सुंदर माडिया तदुपरी त्या त्या स्थळीं रेखिलें, ।
पाहे पांवठणीं[7] हिरे जडियले द्वारावतीचे पुरीं
बिल्लोरांगण[7] त्या घरांतहि धरे सौंदर्य तें नूपुरीं[8]. ॥ ४१

नक्षत्रशोभा प्रभु[9]अंगणीं रे! बिंबें तयां कोण असा गणी रे? ।
देखोनियां ते द्विज[11] हंस[12]जाती मुक्ता[13]भ्रमें सर्व भुलोनि जाती. ॥ ४२

प्रत्यक्ष मानससरोवर त्या द्विजांसी[14] भासोनि धन्य म्हणतो मनिं त्या द्विजांसीं[14] ।
आश्चर्य होउनि तटस्थ उगाच राहे मिथ्या[15] भ्रमे[16] मतिंत ते गति कीं नरा हे.॥ ४३

जीवेश्वरीं[17] जरि असा भ्रमभेद[18] जाला यालागिं नेणति तया पुरुषा[19] अंजाला[20], ।
कृष्णा! तुझी प्रकृति[21] काय अशी कुडी[22] रे! जे राजहंस परि घालिति फूगडी रे!॥ ४४

तो बैसला दिसतसे हरि चित्रशाळे[23] सोपे समस्त चहुंफेर महा विशाळे, ।
ज्याच्या अमीत[24] फिरती वदनेंदु[25] जाया[26] सिंहासनासमिप तो भयभीत जाया.॥ ४५

तो आंगणीं जंव तटस्थ असे उभा रे! विद्युल्लतासम दिसे वनिताप्रभा[27] रे! ।
देखोनि भ्रांत मग तो द्विज पूर्ण जाला, पाहों कसा विसरलाच अधोक्षजाला[28]. ४६

तों देखे हरि अंगणीं द्विजवरा[29] कीं हा सुदामा खरा,
कोठें ये क्षणिं पातला म्हणुनियां देवांचिया शेखरा[30] ।

---

१. पोहे. २. कृष्णाच्या नांवाचा छंद. ३. कृष्णाची. ४. नऊ रत्नांचीं नांवें:—१ हिरा, २ माणीक, ३ मोत्यें, ४ गोमेद, ५ इंद्रनील, ६ पाच, ७ प्रवाल.(पोंवळें), ८ पुष्कराज. ९ वैदूर्य (अथवा तोरमल्ली). ५. बैठक, दिवाणखाना. ['मंदिरं नगरेऽगारे मंदिरो मकरालये' इति विश्वः.]'मंदिर' असा शब्द आहे. ६.'सेजे' असाही पाठ आहे. ७.पायरीमध्यें. पावठणी हा 'पायठेवणी'=पाय ठेवण्याची जागा असा शब्द असावा. व पुढें 'पायठणी' असा शब्द प्रचारांत येऊन सध्या 'पावठणी' असा अपभ्रंश झाला असावा. ७. बिल्लोरांचें आंगण. ८. पैंजण. (पृष्ठ ७ टीप ५ पहा.) ९. प्रभूच्या (कृष्णाच्या) आंगण्यांत. १०. पक्षी. ११. हंसाच्या जातीचे. १२. मोत्यांचा भास होऊन. १३. ब्राह्मणाला–सुदाम्याला. १४. खोटें. १५. भ्रांतीनें. १६. जीव आणि ईश्वर यांमध्यें. १७. भ्रांतीचा भेद. १८. पुराण पुरुषाला. १९. विष्णूला (कृष्णाला). २०. स्वभाव, माया. २१. कपटी. २२. चित्रशाळेंत. २३. पुष्कळ. येथें वृत्तसुखार्थ 'मि' हा वर्ण दीर्घ केला आहे. २४. चंद्रासारखीं तोंडें आहेत ज्यांचीं अशा. येथें 'इंदुवदना' असें असावें. २६. स्त्रिया. २७. स्त्रीशोभा. २८. कृष्णाला. २९. ब्राह्मणवर्याला. ३०. श्रेष्ठास.

वाटे अद्भुत अंतरीं म्हणुनि ये सिंहासनाखालता
धांवूनी पद वंदुनी करिं धरी झाला मुखें बोलता. ॥ ४७
सिंहासनीं बैसवुनी तयासी सांगे हरी 'मित्र' असें स्त्रियांसी, ।
[1]चंद्रानना विस्मित होति भारी, कीं कौतुकाचीच गुढी उभारी. ॥ ४८
सुदाम्याच्या पायां पडति सकळा [2]इंदुवदना,
खुणावूनी सांगे, 'त्वरित अणवा पुत्र मदना' ।
हरीच्या आज्ञेनें [3]द्विजपद [4]सैल्या त्याच नमिती,
अनेका कृष्णाच्या, समज गणितां त्यांस न [5]मिती. ॥ ४९
बोले अनंतर तयांप्रति '[6]पात्र पाणी आणा,' असें त्वरित कीं प्रभु चक्रपाणी, ।
[7]प्रक्षाळणार्थ चरणा [8]शरणागतीनें पूजावया परम योग्य हि [9]दंपतीनें. ॥ ५०
[10]कुंचकलशसुवर्णा [11]कांचनी घे घटातें
[12]अभिनव [13]सति शोभे पूजितां हो! [14]भटातें; ।
[15]सजलभरित पूर्णा श्री स्वयें [16]श्रीकरानें
धरुनि लवुनि ओती पाय धूतां करानें. ॥ ५१
कृष्ण आणिखिहि रुक्मिणी सती पूजितां स्त्रिजनवृंदें[17] हांसती, ।
हें समस्त जरि यांस साजलें [18]किंनिमित्त मग भाग्य [19]लाजलें? ॥ ५२
कैंचा पूजिति [20]जांबवंत वदतां ते [21]जांबवंती रडे,
तों तों हांसति गोपिका खदखदां डोळे न कीं कोरडे, ।
[22]हास्यानंद हि बिंदु लोचनिं भरे [23]हेमांबरें वारिती,
[24]नाटोपूनि कृशोदरें धरिति कीं दोहीं करें ये रिती. ॥ ५३
जों हांसती तों तंव अंग नाचे सभोंवते वृंदहि [25]अंगनांचे ।
[26]चर्चा द्विजाची बहुधा करीती, असो स्त्रियांची असि हेचि रीती. ॥ ५४

---

१. चंद्राप्रमाणें आहेत वदनें (आननें) ज्यांची अशा स्त्रिया. विधुमुखी. २. चंद्रमुखी. ३. ब्राह्मणाचे (सुदाम्याचे) पाय. ४. पतिव्रता. ५. मर्यादा, गणती. ६. पूजेचें साहित्य. ७. धुण्याकरितां. ८. शरण जाऊन. ९. जोडप्यानें. १०. कलशांसारखें कुच असून रूप सुंदर अशी स्त्री. ११. सोन्याच्या. १२. सुंदर. १३. 'सती' असा शब्द आहे. १४. 'भट्टातें' असा शब्द आहे. १५. पाण्यानें भरलेले. १६. लक्ष्मीपति कृष्णानें. १७. समूह. १८. कशाकरितां. १९. 'लाजलें' असाही पाठ आहे. २०. म्हातारा आस्वल. २१. कृष्णस्त्रीविशेष. २२. हास्य आणि आनंद. २३. सोनसळ्यानें. २४. न आटोपून. २५. बायकांचे. २६. थट्टा.

ज्याचें [1]पायवणीं शिरीं धरि [2]धणी जो [3]शूलपाणी क्षणीं
तो हा [4]षड्गुणलक्षणी द्विजपदें प्रक्षालितो जे क्षणीं ।
[5]वामांगीं [6]रमणी रमापति गुणी [7]त्रैलोक्यचूडामणी
सेवे तत्पर [8]भूसुराप्रति गमे [9]चातुर्यचिंतामणी. ॥ ५५
[10]आतिथ्य सर्व तदनंतर त्या हरीनें केलें द्विजासि विधियुक्त परोपरीनें, ।
तांबूल देउनि पुसे, 'कुशळें मुलें कीं स्त्री एक आणिक तुला किति लेंक लेंकी ?' ॥
'कृष्णा ! तुझे जाण दयेकरूनी आम्ही असों जीव [11]तनू धरूनी, ।
विश्वंभरा ! जें तुज [12]नाठवावें तें सौख्य कैंचें मनिं सांठवावें ?' ॥ ५७
लज्जेकरूनि द्विज तो [13]पृथुकां न दे हो ! तो रुक्मिणीपति तयाप्रति कीं वदे हो ! ।
भेटीस भेटि बहुतां दिवसां जपे हे तो दे हरीस मग तो द्विज [14]मुष्टि पोहे. ॥ ५८
तों भोंवत्या सकळही मिळती [15]सती हो ! देखोनि मुष्टि पृथुकां मग हांसती हो ! ।
श्रीकृष्णजी परम आदरतेकरूनी बांधीतसे अपुलिया पदरीं धरूनी. ॥ ५९
झोंबी पडे त्यावरि बायकांची, लीला अहो ! हे [16]यदुनायकाची. ।
'[17]विप्रप्रसादासि अयोग्य नारी, म्हणे तयांला मग [18]पूतनारी. ॥ ६०
म्हणे, 'तुम्हां भक्ति नसे द्विजाची कशी घडे प्राप्ति [19]पृथूरजाची' ।
काकूलती येउनि त्यास [20]दारा पोहे स्वयें मागति त्या उदारा. ॥ ६१
[21]नेदीचें पोहे मग तो कदापी नेत्रें हरी त्या सकळांस [22]दापी, ।
स्थळीं स्थळीं स्तब्ध [23]थवे तयांचे गळोनि जाती [24]मदेंही स्त्रियांचे. ॥ ६२
तयानंतरें श्रीहरी त्या द्विजातें पुसे [25]पूर्ववृत्तांतठेवागुजातें, ।
'कसे त्या गुरूचे गृहीं वर्तलों कीं तुतें ठाउकें काय आहे त्रिलोकीं ? ॥ ६३

---

१. पायांचें पाणी, पायांचें तीर्थ. [पायवणीं—'वणीं' हा प्रत्यय नामाला लागून नामप्रदर्शित पदार्थानें मिश्रित पाणी अशा अर्थाचे शब्द होतात. जसें:—चिंचवणीं, मिठवणीं, गुळवणीं. 'वणीं' हा संस्कृत 'पानीयम्' शब्दाचा अपभ्रंश आहे.] २. पुष्कळ. ३. शूल धारण करणारा. (शंकर.) ४. सहा लक्षणांनीं युक्त, षडैश्वर्यसंपन्न भगवान्. ह्या श्लोकांत व श्लोक ८, ९, २६, ह्या श्लोकांत अनुप्रासालंकार आहे. ५. डाव्या मांडीवर पत्नीला बसवावें आणि उजव्या मांडीवर मुलीला—सुनेला—धाकट्या बहिणीला बसवावें—असा लोकरूढ प्रचार आहे. ६. स्त्री. ७. लोकत्रयाचें शिरोभूषण. ८. पृथ्वीदेव ब्राह्मण. ९. शहाणपणाचा चिंतामणी. १०. अतिथीचा आदरसत्कार. ११. शरीर. १२. आठवूं नये. १३. पोह्यांस. १४. मूठभर. १५. स्त्रिया. १६. कृष्णाची. १७. ब्राह्मणाच्या प्रसादाला. १८. पूतनेचा शत्रु. (कृष्ण.) १९. पोह्यांच्या कणाची. २०. बायका. [आप्तजनाचा स्नेहसंबंध जी लोभकलहादि द्वारा तोडते—विदीर्ण करते—तिला 'दार' असें म्हणतात.]. २१. देईना. २२. दावी, रागें भरे, दटावी. २३. समूह. २४. गर्व. २५. पूर्वींच्या हकीकतीचा सांठा हीच गुप्त गोष्ट तीतें.

नये वर्ण उच्चार जैं अक्षरांचा तयीं क्रोध दावीतसे कीं [1]क्षराचा ।
जसें बागुलाच्या भयें बाळकाशीं तसा सद्गुरू अंतरीं तो द्विजाशीं. ॥ ६४
माता [2]मृषा क्रोध शिशूस दावी तशीच शिष्या गुरु रीति दावी, ।
घेवोनियां [3]प्रज्वळ जाण भीतें देखोनियां बालक जेंवि भीतें. ॥ ६५
हरोनियां सर्व पहा [4]अविद्या बोधीतसे जाण कसी सुविद्या, ।
गुरूविणें थोर न तो दिसे रे ! आम्ही तुम्ही वर्ततसों कसे रे ? ॥ ६६
[5]क्षुधेनें बहू [6]पीडिलें जे [7]दिनीं रे ! कळे त्यास कैसें पहा तूं मनीं रे ! ।
दयालुत्व तो सद्गुरूचेचि पायीं पडों नेदिती सर्वथा ते अपायीं. ॥ ६७
वेंचूं [8]शुभा जाउनि दूरि रानीं आम्ही तुम्ही या आपुले करांनीं, ।
परस्परें वाहुनियां शिरीं रे ! न वाटती क्लेशहि अंतरीं रे ! ॥ ६८
गंगोदका घेउनि घागरीला राहों न देतां स्वसुखें गरीला ।
जातां पहा अध्ययनीं [9]रती रे ! वाटे तुझी जाण सुसंगती रे ! ॥ ६९
एके दिनीं श्रीगुरुचे [10]सतीनें सांगीतलें कार्य अम्हांस तीनें, ।
माते ! करूं वो म्हणवोनि वाचे बोलोनि गेलों [11]शिशु [12]मानवाचे. ॥ ७०
जावें म्हणे आजिच [13]इंधनातें निघों करूनी तिस वंदनातें, ।
[14]काष्ठानिमित्तें मग पर्वतातें येतें वदा कीं तुमच्या मतातें. ॥ ७१
त्यानंतरें जात असों [15]वनाला शंका न वाटे पहतां मनाला, ।
भारे बहू बांधुनि इंधनांचे घेतां शिरीं मोर समोर नाचे. ॥ ७२
तों [16]श्रांत जालों मग [17]क्षुत्पिपासीं वनामधें त्या पडलों उपाशीं, ।
तूं भक्षिसी चोरुनियां [18]शिदोरी शिंकीं [19]वृथा दाविसि दीर्घ दोरी. ॥ ७३
[20]जलद गर्जत ये जंव [21]अंबरीं झळकते अणि वीज न ते बरी, ।
सुभय ते स्थळिं वाटतसे मनीं फिरुनि येत असों जंव नेमुनी. ॥ ७४

कडकडुनि तयीं तो वर्षला मेघ भारी
तनुवरि मग जो कां [22]रोमराजी उभारी, ।

---

१. नाशिवंत, लौकर जाणारा. २. खोटा. ३. मोठी. ४. अज्ञान. ५. भुकेनें. ६. दुःख दिलें. (भूक लागली.) ७. दिवशीं. ८. गोंवऱ्या. ९. प्रीति. १०. स्त्रीनें. ११. लहान मुलें. १२. माणसाचे. १३. लांकडांतें. १४. शोभनांकरितां. १५. रानांत. १६. दमलेले. १७. भूक व तहान यांनीं. १८. हा शब्द पंतांच्या काव्यांतही अनेक स्थळीं आढळतो. [सभापर्व—अध्याय ७ आर्या ३८; कृष्णविजय (पूर्वार्ध) अध्याय ४९ गीति ३६ प्रश्नोत्तररत्नमाला—आर्या १२.] १९. फुकट. २०. मेघ. २१. आकाशांत. २२. रोमांच.

अ[1]शनव[2]सनहीनें आ[3]ननें [4]म्लान दीनें
करुनि जंव बसों तों वेष्टिलें त्या नदीनें. ॥ ७५
पहा रवीचा मग अस्त जाला, घडे तयीं [5]व्याकुळता द्विजाला, ।
'कांहीं तरी ठाउक कीं सुजाणा ?' पुसे सुदाम्याप्रति देव जाणा. ॥७६
केला कोप [6]सतीवरी तदुपरी धांवूनि ये लौकरी
पायीं नग्न मिरीं खडे क्षि[7]तिवरी प्रेमा अम्हां किं[8]करीं, ।
हाका मारुनि अंबरीं मुखभरीं रे रे सुदाम्या ! हरी
तों आम्हां वदनावरी मिठि पडे [9]शीतें अहाहा करी. ॥ ७७
[10]मौनें [11]सन्मुख जातसों, श्रमतसों, कंपीत कीं होतसों,
ओझें मस्तकिं घेतसों हळुहळू पाऊल टाकीतसों, ।
विप्राला न दिसों उठों अणि बसों हुं[12]कारही देतसों,
[13]पश्चात् भेटतसों, पुसे तंव हंसों, संतोष मानीतसों. ॥ ७८
तों तो म्हणे श्रम तुम्हा दिधले सतीनें संपादिला परम दोष अगत्य तीनें, ।
बाळें पहा बहुत हीं असती भुकेलीं कष्टी उगेंचि वनिं धाडुनि फार केलीं'. ॥७९
वृत्तांत ऐसाच सुदामयातें पुसे हरी हेंचि पहा तयातें, ।
'कांहीं तरी आठवतें जिवीं रे !' दिलें न त्वां यासहि सूचवी रे !॥ ८०
तों तो सुदामा मनिं खोंचला हो ! कृष्णास या ग्रास न अर्पिला हो ! ।
म्हणोनियां प्राप्त दरिद्र झालें अद्यापि संतप्त न तें विझालें. ॥ ८१
कृष्णार्पणाविण कसें फळ प्राप्त होतें केल्याच सर्वहि समर्पण यास हो ! तें, ।
भक्तीस व[14]श्य अणिखी निज मुक्ति देतो ऐसें मनींच अपुले द्विज कीं वदे तो. ॥
पश्चात्तापें म्लानता आ[15]ननाला आली वाटे त्याचिया त्या मनाला, ।
अंतर्यामीं कृष्ण साक्षी तयाचा जाणे ऐसें ना[16]शकर्ता भयाचा. ॥ ८३
श्रीकृष्ण पोहे मग तो स्वहातें घेवोनियां तो करितो स्वा[17]हा ते, ।
तोषावया चित्त सुदामयाचें धरूनियां प्रेम महा तयाचें. ॥ ८४
जो नित्य तृप्त अ[18]नपेक्षित देव जाणा रक्षी म[19]नोगत असेंचि हि कां न जाणा ?।
कीं दीनबंधु परि तो न अनाथबंधू ! तोडी अनादि भवपाश[20]अघोरबंधू[21]. ॥ ८५

---

१. भक्ष्य. २. वस्त्र. ३. मुख. ४. सुकलेलीं. ५. खिन्नपणा. ६. साध्वीवर—संदीपिनीनें आपल्या बायकोवर. ७. भुईवर. ८. सेवक. ९. थंडीनें. १०. बोलल्याशिवाय. ११. समोर, जवळ. १२. 'हुं' म्हणणें. १३. मागून. १४. स्वाधीन. १५. तोंडावर. १६. नाश करणारा. १७. भक्षण. १८. ज्याला कसलीही इच्छा नाहीं असा. १९. मनांतला हेतु. २०. भयंकर. २१. बंधन.

तों त्या घरोघरिंच वाट पहाति नारी रात्रींच येइल जपोनि हि पूतनारी[1], । ६
लक्षोनि मार्ग क्रमिती जंव जागृतीनें[2] तों पाहती म्हणति कीं द्विजसंगतीनें[3].॥८
तों पाहती 'अययो !' म्हणती, 'अगाई ! रानासि जाति जंव येथ मिळोनि गाई ।
तों बोलणें किति असे अजुनी सरेना या ब्राह्मणासहि मनांत कसें स्मरेना? ८७
याचें असो परि तयास न नीज लागे, आश्चर्य वाटत असे मनिं हें मला गे !' ।
सर्वांहुनीं हरिस आवड या द्विजाची[4], चारी प्रहार[5] परि झोंप सतीस[6] जाची[7].८८
देखोनियां द्विज तयां मग बायकांसीं जाऊं पुसे त्वरित कीं यदुनायकासी. ।
'जाऊनि या' म्हणउनी हरि बोलिला हो! श्रीकृष्णवंदन विलोकुनि चालिला हो !
तो बोळवीत हरि जात असे पहा हो तों त्या द्विजासि म्हणताति, 'सभाग्य[8] हा हो
ब्रह्मादि इच्छिति तयांसहि संग नाहीं' मार्गीं असेंचि मग बोलति अंगना[9] ही.॥
द्वारावतीनगरलोक[10] मिळोनि सारे 'हा ब्राह्मणोत्तम[11] सभाग्य पहा कसा रे !' ।
ऐसेचि शब्द उठती सकळां मुखीं रे! श्रीकृष्ण हो म्हणतसेच तसे सुखी रे !॥९१

आतिथ्य तें पूर्ण करोनि सीमा राहे उभा क्षेत्र धरोनि सीमा, ।
पुनः पुन्हा वंदुनियां द्विजासी, 'आतां' म्हणे 'काय घरासि जासी? ॥९२
माझा नमस्कारहि वोहिनीला[12] सांगा' म्हणे देव तया मुनीला, ।
प्रार्थूनियां वंदन जेंचि केलें त्या वर्णनीं चित्त असो भुकेलें. ॥ ९३
प्रयाण तेथूनि सुदामदेवें केलें असें देखुनि वासुदेवें, ।
फिरे समस्तां सहवर्तमानें[13] पाहे सुरांचीं[14]च नभीं[15] विमानें. ॥ ९४
प्रवेशला कीं सदनीं हरी तो लीला जसे लोक तशी करीतो, ।
त्यानंतरें त्याच सुदामयाचें जालें कसें आइकिजे तयाचें.॥ ९५

द्विज मनीं मग होय विचारिता हलवुनी कर जात असे रिता, ।
'किमपि नेदुनि[16] शीघ्रचि धाडिलें, मजपुढें किति दुःखहि काढिलें?॥ ९६
पोटांत क्रोध असतां हरि काय देतो नाहीं तयासि दिधलें मज केंवि दे तो? ।
'नादत्तमुपतिष्ठति'[17] असे रिति वेद[18]वाणी ते केंवि होइल कदापि असत्यवाणी? ॥

---

१. पूतना राक्षसीचा शत्रु. (कृष्णविजय–अध्याय ६ पहा.) २. जागून ३. ब्राह्मणाच्या सोबतीनें. ४. ब्राह्मणाची. ५. 'प्रहर' पाहिजे. 'प्रहार' अशुद्ध. 'प्रहर' घातल्यास वृत्तभंग. 'चारीहि याम' असा पाठ असता तर वृत्तभंग न होता. ६. स्त्रीस. ७. दुःख देई. ८. भाग्यवान्. ९. स्त्रिया. १०. द्वारकेंतील नगरवासी लोक. ११. ब्राह्मणश्रेष्ठ. १२. भ्रातृपत्नी. १३. बरोबर. १४. देवांची. १५. आकाशांत. १६. न देऊन. १७. न अदत्तं उपतिष्ठति='जर कांहीं देवाला दिलें नाहीं तर आपणास कांहीं प्राप्त व्हावयाचें नाहीं.' जें दिलें नाहीं तें मिळत नाहीं. येथें छंदोभंग झाला आहे. १८. वेदांची वाणी.

नाहीं तयांसि दिधलेंचि पहा वदे तो त्याला अशी सय[1] असे कधिंचें वदे तो ।
माझे मनीं कृपणता नसती जरी हो देता मला करुनि पूर्ण कृपा हरी हो.॥९८

स्वभार्येतें[2] पूर्वीं वदत असतां तीस न कळे
दरिद्राच्या द्रोहा[3]स्तव परम हें चित्त विकळे[4], ।
पहा काळें कैसें करुनि घडला भ्रंश मतिचा
न मानूनी राहे अजि घरिं नये शब्दहि तिचा. ॥ ९९

अप्रार्थितां[5] प्राप्तहि दुःख होतें तैसेंचि तेंही सुख कीं अहो ! तें, ।
असोनिही निश्चय ये रितीचा प्रसाद हा केवळ त्या सतीचा[6]. ॥ १००

नसे प्राक्तनीं[7] तें कधीं देव देना फुकाचा कधीं शब्द कोणी वदेना, ।
भला कीं हरी सद्य[8] आतिथ्य[9] दावी उदासीनता[10] सर्वथा[11] तो न दावी. ॥१०१

मान्यताच धन थोर जयाशी मेरु[12]पर्वतहि तुच्छ तयासी, ।
म्यां बरेंचिहि न मागुनि केलें चित्त मुख्य हरिलागिं भुकेलें. ॥ १०२

मागे हरीस नर तो बरवा न वाटे मी बोलिलों स्वसुखरूप पहा सुवाटे,' ।
ऐसें मनीं वदत येत असे स्थळासी, तों देखिलें नगर रम्य महा[13]विलासी.॥१०३

म्हणे मार्ग मी चूकलों स्वस्थळाचा[14] कसा भोग कीं पाश[15] हा दुर्बळाचा[16] ? ।
पुन्हा द्वारका देखिली संभ्रमानें[17] पहा पाठि हे घेतली कां भ्रमानें[18]?॥१०४

आतां कृष्ण म्हणेल आणिक घरा आला सुदामा खरा
मागायास मनीं तयासहि गमे देवांचिया शेखरा[19], ।
मोठा भोग पहा अहा! पिडितसे आतां करावें कसें?
येती लोक तयांसही पुसतसे गांवासमीपीं[20] असें. ॥ १०५

'कोणाची नगरी दिसे महिवरी द्वारावतीचे परी
सज्जे आणिक माडिया तदुपरी विस्तीर्ण ते ऊपरी ।
कृष्णानें रचिली नसेलहि पहा किंवा स्वयें दूसरी
इंद्राची अमरावती मज गमे पाहूं न ते कुसरी[21].' ॥ १०६

---

१. आठवण. २. आपल्या बायकोला. ३. भांडणाकरितां, त्रासाकरितां. ४. दुःख पावे. ५. न प्रार्थना करितां, न बोलावितां. ६. स्त्रीचा. ७. दैवीं. ८. आज. ९. पाहुणचार. १०. उदासपणा. ११. अमर्दी. १२. हा सुवर्णाचा आहे अशी कथा आहे. १३. मोठें विलासानें युक्त. १४. आपल्या ठिकाणाचा. १५. दुःख संकट. १६. गरीबाचा. १७. भ्रांतीनें. १८. घाईनें, गोंधळानें. १९. श्रेष्ठास. २०. गांवाजवळ. २१. कौशल्य.

तों ते तयास वदती जन लोक सारे, 'हा मूर्ख केवळ असें पुसतो कसा रे?।
अद्यापि काय न कळेचि सुदामयाची नौरत्न[1]शोभित अशी नगरी जयाची.' १०७
आश्चर्य मानित असे मग तो मनांत, 'कृष्णा! दरिद्र हरिलें अमुचें जनांत,।
कोणासही हरि! तुझी करणी[2] कळेना माझें मला सुकृत[3] तों तंव आकळेना[4].१०८

विनापराधी[5] जरि मी म्हणूं रे! घडे मनीं दोष किती गणूं रे!।
परंतु तूं दीनदयाळु[6] साचा न आवरे पूर कृपारसाचा[7]. ॥ १०९
म्यां दीधले[8] मुष्टि भरूनि पोहे तुझा कृपाब्धी[9] नर कोण पोहे?।
उत्पत्तिचें स्थान रमापतीचें[10] केलें तुवां आपुलिया रितीचें.' ॥ ११०
ऐसा पहा प्रेमभरें[11] करूनी सुखाश्रुबिंदू[12] वदनावरूनी[13]।
ते चालती नौबरती[14] तयाला सभोंवते हांसति कीं जयाला. ॥ १११

नेणोनि हांसति तया जनवृंदें[15] सारे, 'वेडा पहा द्विज अहा रडतो कसा रे!।
ऐश्वर्य येउनिहि कां सुखलेश[16] नाहीं' आश्चर्य वाटत असे सकळां जनांही.११२

वाद्यें अश्व गजादियान[17] सह ते सन्मूख[18] येती प्रजा
श्रीकृष्णें करुणार्णवें[19] निजदया केली असे कीं द्विजां[20],।
गाती भाट[21] अचाट घोष करिती, थाटीं[22] पुढें चालती,
छत्रें[23]चामरयुक्त मंडित दिसे सर्वत्रही बोलती. ॥ ११३

---

१. नऊ रत्नांनीं शोभलेली तीं नऊ रत्नें हीं:—'मुक्ताफलं हिरण्यं च वैडूर्यं पद्मरागकम्। पुष्परागं च गोमेदं नीलं गारुत्मकं तथा। प्रवालयुक्तान्युक्तानि महारत्नानि वै नव॥' दुसरा पाठ:—'मुक्तामाणिक्यवैदूर्यगोमेदा वज्रविद्रुमौ,। पद्मरागो मरकतं नीलश्चेति यथाक्रमम्॥' २. कृति. ३. पुण्य. ४. कळेना ५. अपराधी नव्हे असा. ६. गरिबांविषयीं दयाळू. ७. दयारसाचा. ८. दिले. ९. दयासागर. १०. कृष्णाचें. ११. मोठ्या प्रीतीनें. १२. आनंदाश्रूचे थेंब. १३. तोंडावरून. १४. आटोपतना. १५. समूह. १६. थोडें सुख. १७. वाहन. १८. समोर, सामोरे. १९. दयेच्या समुद्रानें. २०. ब्राह्मणाला. २१. पूर्वीं भाट, चारण यांची प्रतिष्ठा फार असे. ते राजाचे उपाध्ये असत, आणि राजाच्या वंशाचें वर्णन कवितारूपानें करीत, व तें वर्णन वीररस उत्पन्न करण्याकरितां स्वारींत राजापुढें ह्मणत. त्यांस 'वहिवंचे भाट' म्हणतात. राजांची वंशावळ त्यांजवळ लिहिलेली असते, व दरएक राजकुळास नेमलेला भाट असतो. तो वर्षास राजदरबारीं येतो, व त्यास कांहीं द्यावें लागतें. याप्रमाणें भीक मागून ते निर्वाह करितात. जामीन घेणें तरी त्यांस घेत; मुलीबरोबर पाठविणें तरी भाट पाठवीत; त्यांचे सारखा विश्वासू कोणी नाहीं, व तो प्राण दिल्याशिवाय राहावयाचा नाहीं, अशी लोकांची समजूत असे. ते त्रागा करीत म्हणजे 'त्यांजवर कोणीं जुलूम केला तर ते आपले घरच्या म्हाताऱ्या माणसाचें डोकें मारीत; आणि जो जुलूम करील त्याचे घरीं त्या प्रेतास आणून त्याचें तोरण बांधीत व 'तुझ्यावर ही हत्या पडली' असें म्हणत! मर-

जों पावला तो गजरें करूनी गृहासि दारिद्य पहा हरूनी ।
सालंकृता[1] स्त्रीसह लेंकरांसी दृष्टीस देखे धनधान्यराशी. ॥ ११४

जें पाहिजे तें परिपूर्ण देखे दारिद्य स्वप्नांतहि जो न देखे ।
स्त्री पाहतो तों जणु उर्वशी[2] हो! तात्काळ जाली म्हणतो कशी हो? ॥ ११५

जो षड्गुणैश्वर्य[3] दया तयाची दारिद्यचिंताच[4] सुदामयाची ।
हरी[5] हरी[6] ये रितिनें, शुकानें सांगीत भूपाप्रति कौतुकानें. ॥ ११६

'साम्राज्य[7] वामन' तयासहि वामनानें केली कृपा अनुभवोनिहि या मनानें ।
ऐश्वर्य सासहित देहपुरींत ठेवी ज्याची जनास न कळे अनुभूति[8]ठेवी. ॥ ११७

श्रीसद्गुरूच्या पदसारसा[9] रे! अर्पूनियां काव्यमहारसा रे! ।
साम्राज्य जाला कृतकृत्य लोकीं तेणें स्वसौख्यास हि पावलों कीं.॥ ११८

---

णाची तर त्यांस बिलकुल पर्वा नसे. अहमदाबादेंत एका भाटिणीवर सरकारांत खोटी फिर्याद झाली सबब ती आपले पोटांत कटार मारून घेऊन मेली! तिचें देऊळ हल्लीं शाहापुरांत आहे. कोणीं त्यांस नेमणूक वगैरे दिली नाहीं तर ते त्याचें चित्र करून, तें एका उंच काठीवर टांगून त्याजबद्दलचें कवन व निंदा सर्व मुलुखभर दाखवीत फिरत. व याजकरितां राजेसुद्धां त्यांस भीत असत, आणि त्यांचा संतोष राखीत! हल्लीं भाटांमध्यें ज्या अनेक जाती आहेत त्या:—ब्राह्म भाट, बारवट भाट, वहीवंचे भाट, कंकाली भाट, तुर्की भाट, श्रमण भाट वगैरे. भाट लोक रजपुत लोकांपासून उपजीवन करितात. त्यांच्या कवितेस कुंडली, सवाई, चौपाई, छप्पा, कबीत, छंद, प्रबंध, दोहा, केहेवत, गीत, असें म्हणतात. हे असें म्हणतात कीं, कृतयुगांत वेलंग, बळास व भीमसी, हे मोठे भाट झाले; त्रेतायुगीं बळीराजाजवळ पिंगळ नामक भाट होता; रामाजवळ रंपाळ होता; द्वापारयुगांत पांडवांजवळ सूत व संजय हे होते; पृथ्वीराजाजवळ चंद भाट म्हणून होता, त्यानें 'रासा' म्हणून मोठा भारतासारखा ग्रंथ केला आहे; विक्रमाजवळ वेताळ भाट होता आणि तसाच अकबराजवळ गंग भाट म्हणून होता. २२. थाटानें. २३. छत्रचामरांनीं युक्त.

१. अलंकार घातलेल्या. २. स्वर्गीची अप्सरा. ३. सहा गुण हेंच ऐश्वर्य त्यानें युक्त. सहा गुण हे:—१ 'समग्र ऐश्वर्य, २ समग्र धर्म, ३ समग्र यश, ४ समग्र श्री, ५ समग्र ज्ञान, ६ समग्र वैराग्य. ४. दरिद्ररूप चिंता. ५. कृष्ण. ६. हरण करी. ७. वामनानें साम्राज्य वामनावर कृपा केली असें या श्लोकांत वर्णिलें आहे, तेव्हां साम्राज्य वामन हा पंडितांचा शिष्य असावा असें होतें ८. अनुभव. ९. चरणकमळातें. साम्राज्य वामनानें 'सुदामचरित्र' काव्य श्रीगुरुचरणीं (वामनपंडितचरणीं) समर्पण केलें.

## श्रीधरकविविरचित

# ४. पारिजातकाख्यान.[1]

(प्रबंध.)

श्री[2]रंगाची लीला सादरें ऐका हो! ॥ ध्रुवपद. ॥

विष्णुनाभीनंदन । स्वर्गपुष्प घेऊन ।
आला द्वारके लागोन । प्रेमानंदें नाभीप्रबंध गातसे. ॥ १ ॥
पारीजातक सुमन[3] । श्रीकृष्णासी देऊन ।
नारद गेला तेथून । सुवास त्याचा द्वारकेमाजी न समाये. ॥ २ ॥
भी[4]मकेचे सदनीं । आले हो! कैवल्यदानी ।
सामोरा आली रुक्मीणी । निंबलोण[5] उतरी श्रीमुखावरोनी. ॥ ३ ॥
पद्मजातजनकाप्रति । पद्माक्ष तो धरिला हातीं ।
ढोलग्यावरी बैसले श्रीपती । षोडशोपचारें पूजिती प्राणवल्लभा. ॥ ४ ॥
स्वर्गपुष्प तयेवेळे । रुक्मीणीसी दीधलें ।
सुख तें न[6]वजाय वर्णीलें । वर्तलें तें दासी भामेसी सांगती. ॥ ५ ॥
ऐकोनि तयाची मात । सत्यभामा संतप्त ।
भूमीवरी शयन करीत । अलंकार काढोनि त्यजिले भोग. ॥ ६ ॥
नेत्रीं वाहातसे नीर[7] । मोकळे क[8]बरीभार ।
खेदें विव्हळ शरीर । सत्यभामा म्हणे! 'ऐका गे! सखयांनो! ॥ ७ ॥

---

१. एकदां नारद द्वारकेस आले होते, त्या वेळीं त्यांनीं एक पारिजातक पुष्प कृष्णास दिलें व कृष्णानें तें पुष्प रुक्मिणीला दिलें, ही बातमी सत्यभामेला कळली तेव्हां तिला फार राग आला आणि वेणी सोडून व सर्व अलंकारांचा त्याग करून ती जमिनीवर लोळूं लागली असतां, कृष्ण आला आणि त्यानें तिची परोपरीनें मनधरणी केली. तो तिला म्हणाला, 'एवढ्याशा फुलाकरितां काय रुसावें? मी तुझ्या आंगणांतच एक सबंध वृक्ष लावणार आहें. तुझ्या सवतीची फक्त एका फुलानें समजूत केली.' इत्यादि संभाषण चाललें असतां इंद्रादि देव भौमासुराचें गाऱ्हाणें घेऊन आले. भौमासुराचा वध सत्यभामेचे हातून आहे हें कृष्णास ठाऊक असल्यामुळें तो तिस घेऊन त्याचेवर लढाईस चालून गेला व त्यानें त्याचा वध केला. नंतर परत येतांना नंदनवनांतून पारिजातकवृक्ष आणून सत्यभामेचे दारांत लावला व तिचें कोड पुरविलें—ही कथा या आख्यानांत आहे. २. कृष्णाची. ३. पुष्प. ४. भीमकराजाच्या कन्येचे. ५. 'दृष्टीचा अगर भूतबाधेचा विकार न व्हावा म्हणून मीठ, मोहऱ्या व कडू निंबाचीं पानें हीं ओवाळून टाकणें, ह्या कृत्याला "निंबलोण करणें" म्हणतात.' [नवनीत.] ६. न जाई. ७. उदक, अश्रु. ८. वेणी.

गोवळेया चित्तचोरा । नका येऊं देऊं घरा ।
माझिया सवतिच्या प्रियकरा । त्याचा स्पर्श अणुमात्रें न करा गे ! सखयांनो ॥ ८ ॥
हृदय त्याचें कठीण । केलें घोर विषपान ।
असंभाव्य गिळिला हो ! यज्ञ । पतित महा जपती हो ! नाम तयाचें. ॥ ९ ॥
जारा चोरा कपटी खरा । असंख्यात भोगिल्या दारा ।
प्राण गेलिया सत्वरा । स्पर्श त्याचा अणुमात्रें न करा गे ! सखयांनो !' ॥ १० ॥
वर्तमान जाणोन । पातला तो जगमोहन ।
खुणावितो दासीलागोन । उग्याची राहा, आलेति बोलूं नका गे ! ॥ ११ ॥
मौन्येंचि येऊनी । शिर तिचें उचलोनी ।
उशाप्रति मांडी देऊनी । कंसांतक बोलत सुरस वचनें. ॥ १२ ॥
'आमची तूं प्रियराणी, । शयन कां केलें धरणी[1] ? ।
मुखचंद्र गेला उतरोनी । कायसा खेद जाला तो आजि न कळे हो ! ॥ १३ ॥
सुकले ते अधरा अधर । द्विज[2]समुदाय शुभ्र ।
मळवट पुसिला सुंदर । खेदें भाळीं मृगमद[3] पसरिला दीसे. ॥ १४ ॥
प्रिये ! नयन उघडोनि । आम्हांकडे पाहें राणी ! ।
विषाद कां धरिला हो ! मनीं ?' । पीतांबरें नयनींचें अश्रु पुसीले. ॥ १५ ॥
सद्गदीत कंठ झाला । वचन बोले वेल्हाळा, ।
'परता जाइं रे ! गोवळ्या ! । लटिकाचि लोभ कासया येथ लावीसी ?. ॥ १६ ॥
जिसीं दिधलें सुमन । तिचें करावें समाधान ।
आतां मी त्यजिन प्राण'. । ऐकोनियां हांसला यादवराणा. ॥ १७ ॥
'फुल देउनि उतराई । जालों मी तीसी पाहीं ।
वृक्ष आणिन ये समयीं । मुद्रांकित लावीन तुझेचि आंगणीं'. ॥ १८ ॥
करोनियां समाधान । बैसविली उठवोन ।
आलिंगिली हृदयीं धरून । आपुले हातीं वेणी घातली माधवें. ॥ १९ ॥
नूतन भूषण पायीं । लेवविले ठायीं ठायीं ।
देव आले हो ! ते समयीं । गाऱ्हाणें तें सांगती नरका[4]सुराचें. ॥ २० ॥

---

१. पृथ्वीवर. २. दंतपंक्ति. ३. कस्तूरी. ४. नरकासुर हा भूमीचा पुत्र होता म्हणून याला 'भौमासुर' असें म्हणत. हा प्राग्ज्योतिषपुरीचा राजा होता. त्याच्या आईनें विष्णूस प्रसन्न करून त्याजपासून आपल्या मुलासाठीं वैष्णवास्त्र मागून घेतलें होतें. त्यामुळें भौमासुर अत्यंत बलिष्ठ होऊन गेला. तो देवांस पीडा देऊं लागला. त्यानें इंद्राची अपार दौलत व अदितीचीं कुंडलें हरण केलीं. ह्या त्याच्या अनिवार्य त्रासामुळें इंद्रादि सर्व देव श्रीकृष्ण सत्यभामेच्या मंदिरांत असतां त्यास शरण जाते झाले. कृष्णानें

भामा संगें घेऊनी । [1]दळासहित चक्रपाणी ।
नरकासुराचें नगर वेढोनी । अपार सैन्य आटीलें तेव्हां मुकुंदें. ॥ २१ ॥
वधोनियां भौमासुर । गोपीका आणिल्या सोळासहस्र ।
सोडोनि आणिल्या सत्वर । सुरांसहित शक्र सोडिला ते वेळीं. ॥ २२ ॥
सुरेशें पूजिला हरी । पारीजातक तरुवरी ।
उपटोनि घेतो कंसारी । भामेचे ते आंगणीं लावितो मुरारी. ॥ २३ ॥
रुक्मिणीचें [2]मनोहर । करीतसे यादवेंद्र ।
नित्यसुमनें अपार । स्वर्गाहूनि वरुषती तिचेच आंगणीं. ॥ २४ ॥
ऐसा तो परमानंद । द्वारकेचा गोविंद ।
नांदे श्रीधर वरद । सच्चिदानंदें [3]लीलाविग्रही गोपाळ. ॥ २५ ॥

---

## धुंडिराजकविकृत

## ५. [4]प्रल्हादचरित्र.

(गीतिवृत्त.)

[5]नत्वा नरहरिमाद्यं सादरभावैर्वदामि तत्कीर्तिम् ।
याभूत्कांचनकशिपोः शासनकर्त्री विमुक्तिदात्री च. ॥ १
भो ! निजमानसमधुकर टाकुनि वृत्ती [6]निसर्ग जो तरला ।
सेवी तत्पदपंकज जो कां स्तंभामधूनि अवतरला. ॥ २
आतां सादरभावें निजचित्तीं मी नमूनि नरहरिला ।
वर्णिन तद्गुणकीर्ती जेणें कोपेंच [7]दैत्य संहरिला. ॥ ३

---

सत्यभामेसह त्याचेवर स्वारी करून त्याचा वध केला. भौमासुराचा पुत्र भगदत्त कृष्णाला शरण गेला, आणि त्यानें अदितीचीं कुंडलें व इंद्रादिकांची संपत्ति परत केली, म्हणून कृष्णानें त्यास त्याचे बापाचें राज्य दिलें. भौमासुरानें बंदींत ठेवलेल्या सोळा हजार राजकन्यांस कृष्णानें मुक्त केलें व त्यांनीं आपण होऊन कृष्णास वरिल्यामुळें त्यानें त्यांस द्वारकेस आणून त्यांचें पाणिग्रहण केलें—अशी कथा आहे.

१. सैन्यासहित. २. 'मनोहर' शब्द 'मनोगत' या अर्थी योजिलेला असावा. ३. लीलेनें विग्रह (देह) धारण करणारा, लीलेस्तव नरदेह धरणारा. ४. प्रल्हाद हा हिरण्यकशिपूस कयाधूपासून झालेला ज्येष्ठपुत्र. हा भगवन्निष्ठ आणि विष्णूचा उपासक म्हणून बापानें ह्याचा बहुत छळ केला. शेवटीं या परमभागवताच्या सेवेनें प्रसन्न होऊन नृसिंहानें याच्या पित्याचा वध केला आणि याचें संरक्षण केलें. (भागवत-स्कंध ७ अध्याय १-१०.) ५. नमन करून. ६. स्वभाव. ७. हिरण्यकशिपु.

पूर्वी जयविजयांतें सनकादिकिंच्या विषादशापानें ।
झालें जन्मत्रय परि मुक्तिस नेले रतीशबापानें. ॥ ४

तो हा विजयचि शापें दितिसुत हो ! त्या हिरण्यकशिपूस ।
धाता वांछित वर दे, जे जे वेळीं तयासि जशि पूस. ॥ ५

त्याची उग्र तपस्या पाहुनि ब्रह्मा वदे उतावीळ, ।
'बा रे! काय तुझें जें वांछित देतों, नको उतावीळ.' ॥ ६

निश्चययुक्त तयानें परमेष्ठीच्या वरप्रदोक्तीस ।
ऐकुनि स्वीयचिकीर्षित मागें धरिलें विरोधिभक्तीस. ॥ ७

'मजला मृत्यु नसावा नरहस्तीं वा स्त्रियांचिया पाणीं, ।
न दिवा, रात्रि न, जाळो अग्नि न, बुडवू न सिंधुनदपाणी. ॥ ८

देवकरीं दैत्यकरीं शस्त्रास्त्रांनीं घरांत बाहेर ।
धरणीमाजि नभीं वा न शिवो मारावयासि यमहेर ॥ ९

द्यावी सर्वाधिकता पाताळासह सुराज्य जगतीचें ।
माझा दर्प असावा भय मनिं वाहो कृतांत मद्गतिचें". ॥ १०

ऐसें जें जें याचित गेला तें तें विरंचिनें त्याला ।
दिधलें, तद्बलयोगें न गणीं इंद्रादिकां विधात्याला. ॥ ११

झाला भक्त विरोधी विष्णुद्वेषी सुराधिकारांसी ।
हरिलें, स्थापित केलें त्यात्यास्थानीं स्वकीयचारांसी. ॥ १२

---

१. **जयविजय**–हे दोघे सहोदर बंधु होते. हे ब्राह्मण असून यजन हवन करीत असतां, एका प्रसंगीं यांचें यज्ञदक्षिणेनिमित्त भांडण झालें. तेव्हां त्यांनीं रागाच्या आवेशांत एकमेकांस शाप दिले. एक हत्ती झाला व दुसरा नक्र होऊन गंडकी नदींत राहिला. पुढें श्रीविष्णूनें कृपाळू होऊन त्यांस शापनिर्मुक्त केल्यावर ते उभयतां वैकुंठांत विष्णूचे द्वारपाळ होऊन राहिले. पुढें या जयविजयांनीं ब्रह्मदेवाचे सनकादिक जे मानसपुत्र ते वैकुंठास गेले असतां त्यांस यांनीं आंत जाण्यास प्रतिबंध केला. तेव्हां त्यांस राग आला, व त्यांनीं 'तुमचें देवत्व जाऊन तुम्ही तीन वेळ असुरयोनींत जन्म घेऊन नंतर पूर्वपद पावाल' असा यांस शाप दिला. या शापानुसार जय आणि विजय हे अनुक्रमें हिरण्यकशिपु व हिरण्याक्ष, रावण व कुंभकर्ण, आणि शिशुपाळ व वक्रदंत असे तीनदां असुर झाले, व नंतर पूर्वपद पावले. २. विष्णूनें. (रति+ईश=मदन, त्याचा बाप=कृष्ण, विष्णु.) ३. दितीचा पुत्र झाला. हिरण्यकशिपु हा दितिज होय. ४. घाबरा. ५. ब्रह्मदेवाच्या. ६. वरप्रदउक्ति. ७. आपला मनोरथ. ८. हस्तानें. ९. यमाचा दूत. १०. पृथ्वीचें. ११. यम. १२. माझ्या गतीचें. १३. ब्रह्मदेवानें. १४. आपल्या दूतांस.

प्रऱ्हादाख्य तयातें बाळक झाला [1]महातपोराशी, ।
'हरिहरनामसुधा घ्या' हें सांगे अन्यदैत्यपोरांशी. ॥ १३
जें जें शिकवी गुरु तें लेखन मोडी लिही न ओनामा, ।
बोले, 'व्यर्थ मला हें शिकवा, मी अंतरेन [2]वो! नामा'. ॥ १४
सारे वर्ण पुसावे एक हरी हेचि चार [3]वेगळावे, ।
करितां शासन हरि घे कीं दासाश्रू महीस न गळावे. ॥ १५
कळलें वृत्त पित्याला, आत्मज झाला [4]षडग्रणीकुळहा ।
सांगे दूतगणाला, 'न्या रे! मारा करून आकुळ हा.' ॥ १६
केलें कूपनिपातन कंटकभूमीवरूनि लोळविला, ।
परि तो स्वस्थ असे हें पाहुनि [5]वैश्वानरांत घोळविला. ॥ १७
[6]न मरे यास्तव नेला पर्वतशिखरासि लोटिला खोली, ।
तरि तो निर्भय चित्तें वाहे नारायणासि लाखोली. ॥ १८
शूलरोपण केलें [7]करिपादीं [8]कुंभिनीस तुडवीला, ।
भासे सिंह तसा त्या मग तो मोठ्या [9]ऱ्हदांत बुडवीला. ॥ १९
होतां [10]कांताज्ञा ते माता हातें भरोनि [11]गर [12]प्याला ।
देतां घेउनि जैसा सिंधुस्थानीं यथार्थ हर [13]प्याला. ॥ २०
जे जे घात नियोजी, तेथुनि वांचे, न ये क्षमा राया; ।
घाली [14]तैलकढाई पाक कराया समक्ष माराया. ॥ २१
झालें तैल सुशीतळ नामस्मरणें मुरारिच्या सकळ, ।
ऐसें पाहुनि रागें अधिकाधिक त्यापरी तयास कळ. ॥ २२
जिकडे बांधुन नेती तिकडे जावें, न ये तया [15]निधन, ।
कैसीं विघ्नदरिद्रें येती, असतां [16]रमेशनामधन? ॥ २३
मग तो दैत्यप कोपें बोले, 'दुष्टा! असा वदे कोण? ।
ज्यातें ध्यासि सदां तो कोठें राहे? करीन मी श्रवण.' ॥ २४
'ताता! ऐक महासुरदानवदैतेयरक्ष माराया ।
धरिजे जन्म युगायुगिं, तो ध्यातों, जे धरी क्षमा राया! ॥ २५

---

१. तपस्येच्या राशी. २. अहो! ३. वेगळे करावे, सोडावे. ४. कामक्रोधादि षड्रिपूंमध्यें श्रेष्ठ. ५. अग्नींत. ६. 'न मरे यास्तव नेला, नगशिखराहूनि पाडिला खालीं' असाही अन्य पाठ आहे. ७. हत्तीच्या पायीं. ८. पृथ्वीवर. ९. पाण्याच्या डोहांत. १०. पतीची आज्ञा. ११. विष. १२. वाटी. १३. प्राशन केलें. १४. 'तैलकटाहीं' असा अन्य पाठ आहे. १५. मरण. १६. लक्ष्मीपतीचें नाम हेंच धन असतां.

भू जल तेज समीरण[1] रवि शशि काष्ठादिकींहि जो पुरला[2], ।
स्थिरचर व्यापुनि अवघें जगदात्मा तो दशांगुळें उरला. ॥ २६
राहे तुझिया देहीं, माझेही, तोचि या सभालोकीं, ।
त्याविण ठाव रिकामा न दिसे मज, तूं मनांत अवलोकीं.' ॥ २७
इतुकें ऐकुनि रोषें कार्तस्वरतुल्य[3] त्या कुमारास ।
वदला 'काय असे या स्तंभीं[4]? मी सिद्ध त्यास मारास[5]'. ॥ २८
'आहे स्थाणुंत' ऐशा ऐकुनि वाक्या स्वखड्ग महिवरला[6] ।
उचली भेद कराया तेव्हां क्षीरोदजेश[7] गहिंवरला. ॥ २९
विश्वीं स्वीयतनूच्या व्यापकतेनें स्वदास सद्वाणी ।
न घडो निरर्थ यास्तव झाला नरहरि रमेश निर्वाणीं. ॥ ३०
कृतयुग माधवशुक्लीं[8] भूतातिथि[9] [10]मंद कृत्तिका ऋक्ष[11] ।
वेळा संध्यामुख तें स्तंभीं प्रकटे मुकुंद सुररक्ष ॥ ३१
कडकड शब्द उडाला गडगड गगनांत खांब जों चिरला, ।
प्रगटे सिंहनराकृति देव तदां तो विलोकुनी विरला. ॥ ३२
अवघे सभ्य पळाले, एकचि धरिला अमित्र नेमानें, ।
[12]क्षणदावक्त्र विलोकुनि वक्षस्थळिं वळचणीस ने मानें. ॥ ३३
जंघाधार नियोजी स्वनखीं त्याचें विदारिलें उदर, ।
जयजयकार नभीं हो, निर्जर[13] नादें सुखावले अदर[14]. ॥ ३४
काढी अंतरमाला काळिज फाडूनि शोधिला काय[15], ।
कीं या पोटीं दुसरा भक्तसुमणि गुप्त राहिला काय? ॥ ३५
नेला वाहुनि यानीं, त्याचा त्याला निवास दे हरि तो, ।
करुणासिंधु असा जो निजदासांचे अघौघ[16] संहरितो. ॥ ३६
उठला तेथुनि पुनरपि प्रल्हादातें चहूंभुजीं कवळी, ।
मोठा क्रूर भयंकर पाहुनि कोणी न येति त्याजवळी. ॥ ३७
गेले सर्व सभासद सभयें तेथें न राहिला एक[17] ।
त्याचा कोप शमाया स्तुति अनुवादे सुरासवें एक[18]. ॥ ३८

---

१. वायु. २. 'भरला' असाही पाठ आहे. ३. तप्तसुवर्णवत्. [कार्तस्वर=सोनें.] ४. खांबांत. ५. मारावयास. ६. पृथ्वीवरचा. ७. लक्ष्मीपती. [क्षीरोदजा+ईश=लक्ष्मी+पति. क्षीरोदापासून दुग्धसागरापासून जा (झालेली) जी ती लक्ष्मी.] ८. वैशाख शुक्लपक्षीं. ९. चतुर्दशी तिथि. १०. शनवार. ११. नक्षत्र. १२. रात्रिमुख. १३. देव. १४. भयरहित. १५. देह. १६. पातकसमुदाय. १७. एकही. १८. ब्रह्मदेव.

‘जयजय [1]पुष्करनयना! [2]पुष्करशय नाथ पुष्कराकारा! ।
करधृतपुष्करवारण! [3]**पुष्करमर्दिन्**! विभो! [4]निराकारा! ॥ ३९
जयजय [5]मीनशरीरा! कच्छपदेहा! वराहरूपा! ही ।
क्रूरा मूर्ति विलोकुनि भय मज वाटे **नृ**सिंह! भो! [6]पाहि ॥ ४०
जयजय **वा**मन! **भा**र्गव! हे श्री**ब**ळिभद्र! **कृ**ष्ण! **कं**सारे! ।
जयजय **बौद्ध**! **नि**रंजन! **कल्क्या**कारा! विलोकिं हे सारे. ॥ ४१
केल्या बहुविध गाथा परि तो न शके तयापुढें जाया ।
तेव्हां [7]विघ्ननिषूदन **ग**णपति आला प्रशांति योजाया. ॥ ४२
तोही त्याच पदाही परता शुंडा विलोकुनी सरळ ।
धांवे चंचल धाकें शब्द निघेना करी मुखीं [8]बरळ. ॥ ४३
कवणा तेज सहेना, शांत नव्हे क्षीरसिंधुजामाता ।
म्हणउनि सन्मुख झाली हळुहळु विनवी [9]समुद्रजा माता. ॥ ४४
जयजय कमलदलाक्षा! कमलासनतात! **कं**जनाभा! हे. ।
[10]कमलांबक! मी कमला, दुर्धर तूझी दिसे जना [11]भा हे’. ॥ ४५
मग ते श्रेष्ठ तपोनिधि ऋषिमुनि **इं**द्रादि सर्व [12]गीर्वाण ।
**प्र**ऱ्हादासि नियोजुनि प्रार्थविला कीं, ‘करीं न निर्वाण’. ॥ ४६
झाला नम्र करांबुज जोडुनि ठेला पुढें उभा दास ।
मंजुळवाक्यपदाहीं स्तव करि वंदी [13]पदारविंदास. ॥ ४७
‘जयजय ब्रह्म सनातन ब्रह्मस्तुत ब्रह्मनामताता! हे ।
ब्रह्म ब्राह्मण तुजला स्तविती ब्रह्मांडभेद होतां हे’. ॥ ४८
ऐसीं प्रेमविमिश्रित स्तोत्रें केलीं जगैकपाळाचीं ।
झाला शांत महात्मा ऐकुनि वाक्यें [14]सपत्नबाळाचीं, ॥ ४९
केलें प्रेमविलोकन द्विजलेख स्वीय देव सदनासी ।
आज्ञा देउनि ईशें घालविले जे दुरात्ममदनाशी. ॥ ५०
केला [15]भागवतोत्तम भक्तसखा [16]पुण्यनाम **प्र**ऱ्हाद ।
ज्याचा **व्यास** **शु**कादिक कविवर वदले सुकीर्ति [17]निऱ्हाद. ॥ ५१

---

१. कमललोचना! २. कमलहस्त. ३. पुष्करासुर मारणाऱ्या. ४. आकृतिरहिता. ५. हे मत्स्यावतार धारण करणाऱ्या देवा! ६. रक्षण कर. ‘त्राही’ असाही पाठ आहे. ७. विघ्ननाशक. ८. बडबड. ९. लक्ष्मी. १०. कमलनेत्र. [अंबक=नेत्र.] ११. कांति. १२. देव. १३. पादकमलास. १४. शत्रुपुत्राचीं. (प्रऱ्हादाचीं.) १५. भागवत+उत्तम. १६. शुचियशस्क. १७. शब्द.

आपण भक्तसुखास्तव परमानंदें [1]तदीय गेहातें ।
राहे **[2]मा**सह निश्चल तत्कृतपूजादि सर्व घे हातें. ॥ ५२
ऐसी आत्मख्याती [3]महिता लोकीं [4]रतीशजनकानें ।
केली विस्तृत देवें ते हे ऐका समस्त जन कानें. ॥ ५३

## उपसंहार.

(गीतिवृत्त.)

[5]जो हें दिव्य कथानक लेखन करुनी सदैव गाईल, ।
तो हा दुस्तरतर भवजलनिधि अवघा तरूनि जाईल. ॥ १
जेथें वार्षिक पूजा कुलधर्मोत्सव सुजन्मकाळाचा ।
तेथें गायन करितां न घडे भयलेश [6]रक्षकाळाचा. ॥ २
तें हें आर्यकथामृत आर्याछंदें यथामती कथिलें ।
ग्रंथार्णवजल भेदुनि [7]वाग्मंथ्यानें सुखें असे मथिलें. ॥ ३
यास्तव सेवन याचें करि तो नर **[8]विष्णु**मंदिरा जातो ।
म्हणउनि सत्पदवांछक विनवी सर्वांसि **धुंडिराजा** तो. ॥ ४

---

# आत्मारामकविकृत

## ६. नारदचरित्र.

(लावणी.)

लीलाकौतुक निजभक्तांला दावुनियां हरि तो ।
प्रापंचिक भ्रम, निजपदिं प्रेमा लावुनियां, हरितो.॥ध्रुवपद.॥
स्त्रीसुतधन[9]धामींच जयाची चित्तवृत्ति जडली ।
माया अविद्या मोहभ्रमाची माजुम हे चडली ॥
कुटुंबसंगति वृक्षावरिले पक्षि तेंवि घडली ।
जाणत असतां नेणपणें हे भूल असी पडली. ॥
चाल ॥ हें क्षणभंगुर सर्वही असे [10]उसणें ।
[11]नलिनीजलवत् या संसारीं असणें ।
या मनास भक्ती वैराग्यें [12]कसणें ॥

---

१. त्याच्या. २. लक्ष्मीसहवर्तमान. ३. प्रख्यात. ४. मदनाच्या जनकानें. (कृष्णानें.) ५. ही 'फलश्रुति' आहे. ६. मृत्यूचा. ७. वाणिरूपमंथनदंडानें. ८. पृष्ठ ३२ टीप ५ पहा. ९. धाम=गृह. १०. वसणें, जीवंत असणें. ११. कमळावरील उदकाप्रमाणें. १२. बांधणें.

तोड ॥ लोक[1]संग्रहानिमित्त नारद देवऋषी करितो ।
विनोद, आला द्वारावतिये श्रीहरिच्या घरिं तो. ॥लीला०॥१॥
तो विधिनंदन पाहुनि, वंदन करितो हरि त्याला ।
जो यदुभूषण नामस्मरणें हरितो दुरितांला[2] ॥
यथाविधी उपचारें पूजुनि करितो आरतिला ।
ब्राह्मणसेवा बहुप्रिय त्या फाल्गुनसारथिला[3] ॥
चाल ॥ 'स्वागतोऽसि'[4] सुखशब्दें बहु तोषविला ।
स्तवितो मुनिला जो वेदीं स्तविला ।
कविला त्या निजमायेनें ठकिला ॥
तोड ॥ बोले मुनिला, 'सांगा इच्छित असेल तें करितों ।
करणें साधूसेवा व्रत आम्ही हें दृढ धरितों.' ॥ लीला० ॥ २॥
'सोळासहस्र एक शतावरि अष्ट[5] तुला जाया ।
एक लक्ष एकषष्टि सहस्र ऐसी तनुजाया ॥
सहस्र सोळा शत एकावरि आठ तुला तनया ।
संततिसंपतियुक्त वरा संसार यदूराया! ॥
चाल ॥ हा प्रपंच बरवासा मजला गमला ।
भ्रमतां भ्रमतां मम जिव बहु हा श्रमला ।
तो ज्ञाता परि त्या मायेनें भ्रमला ॥
तोड ॥ असती जरि गृहिणी तरि गृहसंसार सुखें करितों'. ।
'बहु बरवें' म्हणऊनि मुनीच्या भ्रमासि संहरितो ॥ लीला० ॥३
मंदस्मितवदनारविंद गोविंदें विधि[6]जाला ।
बोलियलें बहु निकें वंदिती सुर नर विधि ज्याला, ॥
'सोळासहस्र अष्टाधिक शत युवती[7] ऐशाला ।
शाला पृथका निर्मियल्या कीं विचित्रा विशाला ॥
चाल ॥ सदनीं मी बा! ज्या नसें जया दिनीं ।
तेची न्यावी त्वां अवश्य कामिनी[8] ।
बा! आशंका न धरावी किमपि मनीं'. ॥

---

१. जनांला चांगला मार्ग लागावा यासाठीं. [गीता ३-२०.] २. पापांला. ३. अर्जुनाचा सारथी जो कृष्ण त्याला. 'कृष्णाला' असें सरळपणें न म्हणतां 'फाल्गुनसारथिला' असें वळसा घेऊन वर्णन केलें आहे म्हणून हें पर्यायोक्ताचें सुरेख उदाहरण होय. ४. 'चांगलें येणें झालें' 'तुमचें येणें आम्हांला आवडलें' असें बोलून कृष्णानें नारदाला संतुष्ट केलें. ५. सुप्रसिद्ध अष्टनायिका. ६. नारदाला. ७. तरुणी. ८. स्त्री.

तोड ॥ आज्ञा प्राज्ञाला होतां निश्चयासि तो धरितो. ।
'याच काळिं मी या वनमाळीभार्येतें[1] हरितों. ॥ लीला० ॥ ४ ॥
पाहों कौतुक' म्हणउनि नारद भामेच्या सदना ।
गेला, तेथें संध्या करितां पाहे सुखसदना ॥
जांबुवंतिचे सदनीं जातां तेथें यदुराणा ।
पद्मासनिं जपतपध्यानीं पाहे पुरुष पुराणा ॥
चाल ॥ मित्रविंदेचे घरिं पढतो स्तोत्रा, ।
परमान्न हरिपुढें राइ ठेवि पात्रा ।
लक्ष्मणा विड्या देते कोमलगात्रा[2] ॥
तोड ॥ चामर ढाळिते भद्रा, काळिंदीचे घरिं हरि तो ।
पर्यंकीं बैसला मनमोहन जो मन हरितो. ॥ लीला० ॥ ५ ॥
इतरांघरिं तो जेथें तेथें व्यापक विश्वाचा ।
अर्भकांसि[3] करि लालन बोबडि वदे मधुर वाचा ॥
कोठें आले व्याहि जांवई आदर करि त्यांचा ।
कोठें बहुसत्कारें बोळवि सुना विहिणि त्यांच्या ॥
चाल ॥ कोठें कन्या भीमा चंद्रभागा ।
नर्मदा कावेरी गोदावरि गंगा ।
सासुरां बोळवी गहिंवर श्रीरंगा ॥
तोड ॥ नयनिं अश्रुधारा आणि इतरां जनांपरी हरि तो ।
पाहुनि विरंचितनय[4] मनीं आश्चर्य बहुत करितो. ॥ लीला० ॥६॥
कोठें मुंजी कोठें शोभन मंडपप्रतिष्ठा ।
कोठें अहेर देतो घेतो स्वकीयमित्रश्रेष्ठा ॥
कोठें भोजनपंक्ती सुहृदां आप्त परमइष्टां ।
कोठें ब्राह्मणसंतर्पण पुजि द्विजां एकनिष्ठा ॥
चाल ॥ कोठें बेती बारा तिर्पगडा ।
सारि खेळतां बहु करितो झगडा ।
कोठें सहजस्थिति बैसे उघडा ॥

---

१. कृष्णाच्या भार्येतें. २. सुकुमारतनु. ३. मुलांस. ४. नारद. (विरंचि+तनय=ब्रह्मदेव +मुलगा.)

तोड ॥ कोठें अष्टहि[1] आय साधुनी मंदिर ऊभवितो. ।
कोठें तुरंबि सुमनें स्वकरें ललना शोभवितो. ॥लीला० ॥ ७ ॥
कोठें हास्यविनोदें, कोठें रोष धरुनि बसला ।
कुठें स्त्रियेनें विनोदवाक्यें बोलितांचि रुसला ॥
कोठें द्विभुज कोठें चतुर्भुज मुनिवर्या दिसला ।
समग्र सदनीं भास्कर[2] जलकुंभांत जसा वसला ॥
चाल ॥ जो ओतप्रोत या विश्वाचा तंतू ।
चहुं[3] सा अठरां नकळे ज्याचा अंतू ।
जो झालासे यदुकुळिं नातू पणतू ॥
तोड ॥ मम पितुमह हें जाणोनि मनीं रुक्मिणिच्या घरिं तो ।
धातासुत[4] येतां हरि हास्य भीमकिसह करितो. ॥ लीला०॥८॥
कंसारि म्हणे, 'संसारीं मन वांछी रमाया ।
तेचि पूर्ण हो' म्हणोनि मुनिला दावित निज माया[5]. ॥
आज्ञा घेउनि जातां नारद पाहे जंव तो या ।
'स्नान करुनि' म्हणे 'शीतळ उदकीं श्रमासि हरितों या. '॥
चाल ॥ तो जळीं प्रवेशुनि देई बुडि जेव्हां ।
त्या नारदाचि नारदी झालि तेव्हां ।
ते माया नकळे काय करिल केव्हां ॥
तोड ॥ स्त्रीरूप होतां पुरुष एक येऊनि करीं धरितो ।
बलात्कार करुनियां घेउनी गेला निजघरिं तो. ॥ लीला० ॥९॥
दंपतिधर्में[6] रमतां गेले बहुत दिवस त्याला ।
प्रभव विभव इत्यादि प्रसवे साठ[7] दिवस त्यांला ॥

---

१. ध्वज, सिंह, वृषभ, गज, धूम्र, स्वान, खर आणि ध्वांक्ष (उंट) असे आठ आय शिल्प शास्त्रांत प्रसिद्ध आहेत. २. सूर्य. ३. चार वेद, सहा शास्त्रें आणि अठरा पुराणें यांस ज्या परमेश्वराचा अंत लागला नाहीं. चार वेद=सामवेद, ऋग्वेद, अथर्ववेद आणि यजुर्वेद. सहाशास्त्रें=न्याय, वैशषिक, सांख्य, योग, मीमांसा आणि वेदांत. अठरा पुराणें='ब्राह्मं पाद्मं वैष्णवं च शैवं भागवतं तथा । तथान्यन्नारदीयं च मार्कंडेयं च सप्तमम् ॥ आग्नेयमष्टमं प्रोक्तं भविष्यन्नवमं तथा । दशमं ब्रह्मवैवर्तं लिंगमेकादशं तथा ॥ वाराहं द्वादशं प्रोक्तं स्कांदं चात्र त्रयोदशम् । चतुर्दशं वामनं च कौर्मं पंचदशं तथा ॥ मात्स्यं च गारुडं चैव ब्रह्मांडाष्टादशं तथा ॥.' ४. नारद. ५. क्रीडा. ६. नवराबायको या नात्यानें.
७. प्रभवविभवादिक साठ संवत्सर हे नारदाचे पुत्र होत.

उसंत[1] ना दिनयामिनि[2] करितां बहु गृहकृत्याला ।
श्रमला जिव बहु मनिं आठवि पितयाच्या पितयाला[3] ॥
चाल ॥ केर खर्कटीं सोज्वळ उपकरणें[4] ।
करणें संमार्जन, त्या शेणी वळणें ।
उदक आणणें कांडण कीं दळणें ॥
तोड ॥ पाकनिष्पतीं उशीर होतां क्रोध बहुत करितो ।
भ्रतार तो अतिक्रूर अहर्निशि ते नारदिवरि तो ॥ लीला० ॥ १० ॥
एक चालतें, एक रांगतें, असतां गर्भिणि ते ।
बृहदुदरीं धुनिं धून आणितां पावलांसि गणिते ॥
बहु झाली जोजार[5] अती बेजारपणें मनिं ते ।
चिंतितसे श्रीकृष्णपदांबुज घडि पळ लव क्षण ते ॥
चाल ॥ कामिनि[6] ते पावतसे विटाळा ।
मानितसे मनिं बहुतचि कंटाळा ।
'हे नाथ!' म्हणे 'या उपाधीस टाळा.' ॥
तोड ॥ करितां हे आंघोळी नारदी नारद झाला तो ।
स्त्री अवयव ते नाहीं पूर्वरुपि देह लाधला तो ॥ लीला० ॥ ११ ॥
गोविंदाच्युत नाम स्मरुनि स्वप्न असें म्हणतां ।
साठ पुत्र ते म्हणती आम्हां तूंचि माय जनिता[7] ॥
सन्निध पाहे कृष्ण, म्हणे, 'पाहिजे काय वनिता[8]?' ।
मुनी वदे, 'मी भ्रमलों हे अपराध काय गणितां? ॥
चाल ॥ दुःखद या संसारिं जीव श्रमला ।
जो क्षणइक परि तो युगें कोटि गमला ।
हे जाहले सुत ना सोडिति पहा मजला.' ॥
तोड ॥ प्रतिसंवत्सरनामस्थानीं एक एक हरि तो ।
स्थापि स्थिरचरिं आत्माराम गोपवेष धरि तो. ॥ लीला० ॥ १२ ॥

---

१. विलंब. २. यामिनी=रात्र. ३. बापाच्या (विधीच्या) बापाला (विष्णूला)=कृष्णरूपी परमेशाला. हें पर्यायोक्ता'चें उदाहरण समजावें. ४. देवपूजेचीं भांडीं. ५. खटपट, भार, जंजाळ. ६. स्त्री. ७. जनक; बाप. ८. स्त्री.

# पांडुरंगकविकृत

## ७. गयगंधर्वाख्यान.

(श्लोक.)

नमन करुनि [1]आखूवाहना शंभुपुत्रा
स्वकरिं धरुनि जो या नाचवी विश्वसूत्रा ।
कथिन चरित कांहीं तत्कृपे माधवाचें
सुजन निजदये जें वाचितां गाढ वाचे. ॥ १

वैशंपायन सांगता गुरुवृता पारिक्षता वीनवी,
'अद्वैताभिधकाननीं गयकथा स्वामी! वदावी नवी ।
कृष्णीं द्वैत नसे, परंतु घडलें ऐसेहि ऐकों जनीं
तद्बीजास न जाणुनी गमतसे आश्चर्य मोठें मनीं.' ॥ २

(गीति.)

प्रश्नासरिसा वक्ता मुनि राजा तो वदे सविस्तर तें, ।
गयगंधर्वकथा हे समज नृपा! [2]संसृतींत जन तरतें. ॥ ३
[3]सौग्रज [4]सांबपिता निजपरिवारें वर्ततां स्वनगरातें ।
भेटावयास [5]नलिनोद्भवसुत ये त्वरित शत्रुनगरातें. ॥ ४

(छंद.)

देखतां घनश्याम रामही मूळ पातले टाकुनि [6]मही ।
नमुनियां मुनींद्रास त्या करीं धरुनि आणिला राजमंदिरीं. ॥ ५
मुख्य आसनीं पूजुनी तया म्हणति, 'जाहली स्वामिची दया' ।
त्या [7]धरामरासहित भोजन रामकृष्णही सारि बहुजन. ॥ ६

(दिंडी.)

विडा देवुनि घननीळ नारदासी । 'वृत्त सांगा' म्हणे बुद्धिच्या नदासी, ।
'फिरत असतां जरि देखिलें अपूर्व । वदा स्वामी! परिसोत सभा सर्व.' ॥७
रमाकांता! हा खेळ तुझा सारा । जगीं व्यापक तूं जेंवि नभीं वारा ।
युगायूगीं घेऊनि अवतारा । दुष्टसंहारा परिस या विचारा. ॥ ८

---

१. गणपतीला. २. संसारांत. ३. वडील बंधु बलराम यासह. ४. सांबाचा बाप. (कृष्ण.)
५. ब्रह्मदेवाचा पुत्र. (नारद.) ६. पृथ्वी. ७. धरा+अमर+सहित=पृथ्वी+देव+संयुत=ब्राह्मणसहित.

(घनाक्षरी.)

**नारद**— परिसा देउनि श्रवण । आजि नक्षत्र श्रवण ।
करा वृत्त आचरण । जेणें भव तरती ॥ १ ॥
आणी **पद्म**योनितात । आजि योग व्यतिपात ।
होय **यमु**नेंत स्नात । येणें अघें हरती ॥ २ ॥
अर्घ्य देउनी मि[1]त्रास । मग पूजिजे विप्रांस ।
पंक्ति घालुनि सुग्रास । ऐसें व्रत करिती ॥ ३ ॥
पुढें **क**लिचा प्रवेश । **ध**र्म राहेल निःशेष ।
व्रत वाढेल विशेष । जरि **ह**रि धरिती.' ॥ ४ ॥ ९

(ओंवी.)

ऐकोनि **ना**रदाचें वचन । आनंद पावला **ज**नार्दन, ।
ह[2]लधरासि करुनि श्रवण । गि[3]रा गहन बोलत. ॥ १०
'जरि दादा येईल तुझिया चित्ता । तरिच आचरों यया व्रता ।
श्रवणनक्षत्र व्यतीपाता । जाण निश्चिता योग असे.' ॥ ११

(सवाई.)

**रु**क्मिणिकांतमनोरथ जाणुनि **रो**हिणिचा सुत **रा**म तदा
'**दा**रुक प्रेषुनि सर्वहि वा[4]हिनि सिद्ध करि' म्हणे बु[5]द्धिनदा ।
**या**दव छप्पन कोटि दळासह घेउनियां **ब**ळभद्र हरि
**ना**रदसंगति शीघ्रचि पावती **य**मुनेच्या शुभ तीरसरीं. ॥ १२
स्नानविधी **वि**धिनंदन बोलत, **के**शव सा[6]रित स्नान जळीं,
नंतर नेसुनि दिव्य पि[7]तांबर ज्यावर रूळत माळ गळीं, ।
भाळ विशाळ टिळे अतिसुंदर रेखियले निजमूर्तिवरी
दी[8]नकरार्पण अर्घ करूं म्हणे अंजुळिमाजि सु[9]वारि धरी. ॥ १३

(साक्या.)

**श्री**धरअनुजात्मज पुत्रोद्भव **सां**बसखाचा सुत ।
विद्याभ्यासधनाशा धरुनी आराधी पु[10]रुहूत ॥ १४
तों तत्अर्घ्योच्छिष्ट गळुनियां **ह**रिअर्घ्यांजळि भंगे ।
होउनि क्रोधाविष्ट घेतला शपथ असा **श्री**रंगें. ॥ १५

---

१. सूर्याला. २. बळरामाला. ३. वाणी. ४. सेना. ५. नारदाला सातव्या श्लोकांतही हेंच विशेषण योजिलें आहे. ६. संपादीत, करीत. ७. पीतांबर असें पाहिजे. ८. सूर्यार्पण. 'दिनकरार्पण' असें पद पाहिजे. ९. उत्तम उदक. १०. इंद्र.

(पद.)

'हा सुत देवकिचा तरिच म्हणो । तो खळ वधिन जणो. ॥ ध्रुवपद. ॥
मम अर्घ्यांजळी भंगुनि पळला । त्रिभुवनिं ही न गणो ॥ हा० ॥ १ ॥
विधि शचिवर हर रक्षिति जरि तरि । आणि यमासी प्रणो ॥ हा० ॥ २ ॥
साक्षि सुरर्षि तूं शपथा या । शकतां भूमी खणो'. ॥ हा० ॥ ३ ॥ १६

(अभंग.)

पुसुनि अनंता ऋषि जाय जेव्हां । अश्वारूढ तेव्हां गय भेटे. ॥ १ ॥
तदां तो गंधर्व करी नमनातें । आशिर्वचनातें ऋषि वदे. ॥ २ ॥
म्हणे, 'हयें तूझा स्थिर करि आतां । सांगों तव हीता वार्ता कांहीं. ॥ ३ ॥ १७

(पृथ्वीवृत्त.)

गया! परिस तूं दयानिधि हरी करीतां व्रता
तैवाश्व गॅगनोदरीं फिरवितां तुवां तिव्रता ।
तदास्यरस तो पडे हरिकरार्घसंधी सरे,
म्हणे, 'खल वधीन हा न भरता वसू दीस रे!' ॥ १८
सिताधवहताग्रजात्मज तदा भयें कांपला,
म्हणे, 'कवण रक्षिता जरि दिना प्रभू कोपला.' ।
मुनींद्रचरणीं पडे घडिघडी उठोनी रडे
कडे करि भवाब्धिच्या गुरुजवास कीं ऊघडे. ॥ १९

(पद.)

गय—'रक्षिल कोण मला गुरुराया! । शरण मी आलों पायां. ॥ ध्रुवपद. ॥
मजवरि कां कोपे कंसारी । वांचविता संसारीं ॥
सांगा कवण असा निर्धारीं । संकटीं पडलों भारी ॥ रक्षिल० ॥ १ ॥
यदुपति म्हणती कीं बलबंधु । अतिशौर्याचा सिंधू ।
त्यासरि होय कसा! मी जलबिंदु । मन्मनचकोर इंदु.' ॥ रक्षिल० ॥ २ ॥ २०

(ठुंबरी.)

नारद—'जाईं शरण धनदात्मज तूं! । दशभुजपंचवदना ॥ ध्रुवपद. ॥
कैंचें गृहधन सुतदारा । जाण वोंजळीचा वारा ।
जया नसे स्वकरिं थारा । तया कैं ठेविसी सदना'. ॥ जाईं० ॥ १ ॥ २१

---

१. इंद्र. २. घोडा. ३. तुझा घोडा. ४. आकाशांत. ५. त्याच्या तोंडांतील रस. ६. सीताधवानें (रामानें) हत (मारलेला जो रावण त्याचा) अग्रज (वडील बंधु जो कुबेर त्याचा) आत्मज (पुत्र—गयगंधर्व). हें 'पर्यायोक्त' अलंकाराचें उदाहरण आहे. ७. शंकराला.

(दोहरा.)

सहहय **गय** मग जाय **ह**रिपुरीं । भरररररर जैसा कीर ।
फीर फीर त्या कवण म्हणे कवि । सररररर सुमधनुचा तीर. ॥ २२

(कटाव.)

**गय**—'जय जय जय जय **सांब शिव**हरा ! रक्षि रक्षि मज स्वामी ! **शं**करा ! शरण आलिया दीन किंकरा, तारीं तारीं **चं**द्रशेखरा ! सुहास्यवदना ! भुवनसुंदरा ! **पा**र्वतीरमणा ! परमउदारा ! भक्तवत्सला ! दुष्टसंहारा ! षडास्यजनका[1] ! रहितविकारा ! **हे**रंबताता ! दीनोद्धारा ! व्याघ्रांबरधर ! कृपासागरा ! भस्मलेपना ! कर्पूरगौरा ! स्मशाननिलया ! फणींद्रहारा ! कपाळपाणी[2] ! पूज्यसुरवरा ! चराचरात्मारूपविहारा ! सज्जनमनमांदूसकरारा[3] ! **हि**मनगकन्याप्राणप्रियकरा'. ॥ जय० ॥ २३

(प्रबंध.)

**महादेव**—'अरे ! शरण तूं कोण कोठील कैंचा ? ।
मला पातला कासया सांग वांचा[4] ॥ ध्रुवपद. ॥
कवण वंशीं तुला जन्म झाला मुला ! कवण नामाथिला[5] बाप तूझा ? ।
कवण शत्रू तुला त्रास देतो भला कासया कोपला सांग वहिला[6]'. ॥अरे०॥ २४

(प्रबंध.)

**गय**—'अहो ! स्वामिसखसूत मी कृत्तिवासा[7] ! ।
रक्षि **श**शिशेखरा ! मंदहासा ! ॥ ध्रुवपद. ॥
**रा**धिकारमण जल अर्घ देतां, नभामाजि मी वरुनियां जात होतों ।
मद्धयोच्छिष्ट[8] गळुनी **ह**रीअंजळीं जळ तदां भंगतां शपथि ऐसा ॥ अहो०॥
दीन अष्टांतरीं न वधिं खळ हा जरी पुत्र मी श्रीहरी **दे**वकीचा ।
न वदुं जन हें कदां बोल हा धृतगदा बोलिला धृतिनदा ! रक्षि सहसा॥अहो०॥२५

(गीति.)

**महादेव**—'निर्लज्जा जायेसी शरण कसा **वि**ष्णुवल्लभा माते ।
**कृ**ष्णकृपामृत जोडी मणिसह देऊनि राय **भा**मातें'॥ २६
म्लानमुखी **गय** येवुनी **शं**भुउपेक्षा वदे मुनीराया ।
'दावा' म्हणे 'निजोक्ति रक्षःकृतपांजिरा स्वकीरा या'. ॥ २७

---

१. कार्तिकेयाच्या जनका ! २. कपाळें आहेत पाणीच्या ठायीं ज्याच्या अशा हे शंकरा ! ३. सज्जनांच्या मनोरूपी पेटीच्या अरसा (कपाटा !). ४. वाचेनें, वाणीनें. ५. नामयुक्त. ६. सत्वर. ७. कृत्ति (चर्म) आहे वासस् (वसन) ज्याचें अशा शंकरा ! ८. माझ्या हयाचें (अश्वाचें) उच्छिष्ट (उष्टें.)

(छंद.)

**नारद**–'शरण तूं **गया**! जाइं **धा**तया; बहु असे दया जाण बा! तया. ।
तत्कृपेचिया पाजितां पया, न पवुनी भया पावसी जया.' ॥ २८
वंदुनी मुनीराय धांवला, **ब्रह्म**सुत वनीं त्वरित पावला, ।
वृत्त आपुलें सांगुनी रडे, चरणयूगुळीं घडिघडी पडे. ॥ २९

(दिंड्या.)

**गय**–'त्राही त्राही मज [1]**स**त्यलोकराया! [2]**य**दुप पाहातो मजसि वध कराया, ।
म्हणुनि आलों तव चरण हे धराया, तूंचि होसी समर्थ भय हराया.' ॥ ३०
**ब्रह्मदेव**–'अरे परियेसी अंतरिक्षपाळा! **याद**वेंद्रादी रक्षवे न काळा, ।
चाळवूनी तूं तया **प**द्मनाळा, पातलासी कासया यक्षबाळा!?' ॥ ३१

(ओंव्या.)

**ब्र**ह्मा करितां उदास । पुनरपि प्रार्थी **ना**रदास, ।
म्हणे, 'रक्षीं निजदास । धरिलि आस पायांची.' ॥ ३२
**नारद**–'**ग**या! चिंता न करीं जाण, । [3]**सु**नासीरासीं जाईं शरण, ।
तो तुझें चुकवील मरण, । संरक्षण करूनी'. ॥ ३३
मग नमस्कारोनि ऋषीश्वरा । गंधर्व निघाला [4]अमरपुरा, ।
आसनीं पाहोनी [5]**पु**रंदरा । दाटुनी गंहिवरें बोलत. ॥ ३४

(सवाया.)

**गय**–'स्वामि **श**चीपति! तूंचि महामति शौर्यनिधी अति होय पहा,
[6]भूधर कांपति, दानव ते किति? मेघहि वर्षति तोय महा; ।
जे तुज भाकिति आत्मज न च्युति त्यांसि पुनर्गति सोयवहा,
यास्तव सूमति मी शरणागति पातलों हा किति होयवहा'. ॥ ३५
**इंद्र**–'कोठिल? कोण? किमर्थ भयाभित? सांग [7]निजाभिध? काय तुला,
त्वद्रिपुत्रासक जो वपुनाशक बोल अरे! निज बाप मुला! ।
काय निमित्तक? सांग अलौलिक रे शिशु भाविकवैरमुला!
रक्षिन भाविसि वीनति हे मसि बोलुनि सूरस आत्मगुळा.' ॥ ३६

---

१. हे विधे! २. कृष्ण. (यादवांचा राजा.) ३. इंद्राला. ['वृद्धश्रवाः सुनासीरः पुरुहूतः पुरंदरः' इत्यमरः । सुष्ठु नासीरं सेनामुखं, नासीरा अग्रेसरा वा अस्य इति सुनासीरः । या शब्दाचें शुनासीर किंवा शुनाशीर असेंही रूप आढळतें । शुनो वायुः (शीरः) सीरः सूर्यः, तावस्य इति शुनासीरः शुनाशीरो वा.] ४. अमरावतीला. ५. इंद्राला. ६. पर्वत. ७. निज (आपलें)+अभिध (अभिधा, नांव).

(साक्या.)

**गय**–'कुधृघ्ना[1] ! **गय** म्हणती मातें, तव **धन**दाचा सूत, ।
रक्षाया निज योग्य तुम्हाला जो शराणगत दूत'. ॥ ३७

**इंद्र**–'वद गंधर्वा ! मरणमुळातें तूझ्या, आधीं मातें, ।
मी मग देइन अभय तुला तें आहे माझ्या हातें'. ॥ ३८

(पद.)

**गय**–'सुरेश्वर ! निज सेवकजन हा । तारुनि भय वारीं. ॥ ध्रुवपद. ॥
स्वाश्वीं[2] विद्येचा अभ्यास । कराया **वि**धिच्या मी सदनास ।
जातां लंघुनियां गगनास[3] । करि उपहास सदैव पहा. ॥ सुरे० ॥ १ ॥
हैयवदनोत्थ[4] करी तो घात । उडाला **य**दुपतिच्या अर्घ्यांत, ।
विलोकुनि कैसा मन्मथतात[5] । **रु**क्मिणिकांत काय वदे. ॥ सुरे० ॥ २ ॥
'धिक् ! दिन नव्हतां हे संपूर्ण । अर्घ्यघ्नाला[6] या न वधीन ।
तरिच हरि **दे**वकिचा म्हणऊन । न वदुत जन सुतसा रे !' ॥ सुरे० ॥ ३ ॥ ३९

(अभंग.)

**इंद्र**–'मारी जरी **ना**रायण । तरी तुज रक्षिल बा ! कोण ॥ १ ॥
आतां जावें त्वां येथुनी । नको शरण येऊं झणी.' ॥ २ ॥
मग तो होउनी उदास । पुनरपि वदे **ना**रदास. ॥ ३ ॥

**गय**–'आतां स्वामी ! करूं कायी । शरण आलों तुझ्या पायीं ॥ ४ ॥ ४०

(पृथ्वीवृत्त.)

सुरर्षि ! गमतें मला असुर मानसीं रक्षितो
शरण्य वदल्यासि मी नमुनि प्रार्थिलें सिक्षितो, ।
परंतु मम शत्रुचा उदधिची न वारी पिती,
करूं वद समर्थ तूं प्रभु कसे भले दापिती.' ॥ ४१
वदोनि निजवृत्त 'हा !' इति करूनि खेदास तो
मुनिप्रति म्हणे, 'उणे न म्हणतां धरा दास तो, ।
वधीन म्हणतो महाभुजग तो मला भेकसा[7].'
म्हणे ऋषि, 'हरी हरील तुज आजि पाहूं कसा ? ॥ ४२

---

१. हे पर्वतसंहारका इंद्रा. २. आपल्या घोड्यावर. ३. आकाशाला. ४. मागें पद्यें १४-१५-१६ पहा. (पृ० ५४-५५.) ५. कृष्ण. ६. अर्घ्याचा नाश करणाऱ्या (गयगंधर्वाला). ७. भेक=बेडुक.

(लावणी.)

मृतिभयचिंता न धरि गया! हे! शरण जाईं तूं तया।
[1]माधवकरधृतसितहया. ॥ ध्रुवपद. ॥
अद्वैताभिध काननांत तो [2]सानुज वसतो बरा।
जयाश्वा त्वद्रिपुपटतोबरा ॥
वचनीं गुंतुनि घेइ तयाच्या निजशिरिं अभयकरा,।
जिंतिलें समरिं जयानें हरा; ॥
[3]खांडवरण्योषधी देउनि करि [4]अगदी [5]वैश्वानरा।
धरुनि पद प्रार्थि तया बा! [6]नरा. ॥
चाल॥ करिल हरि तुजवरती तो दया।
प्राशिसी आयुर्वर्धनपया।
लंघुनी हरिशपथाच्या भया।
तोड ॥ पावसि निश्चित जाण जया.' ॥ माधव० ॥ १ ॥ ४२

(पद.)

मग [7]वृंदारकमुनिपद वंदुनि तो [8]धनदाचा बाळ. ॥ ध्रुवपद. ॥

---

१. अर्जुनाला (माधव+कर+धृत+सित+हया=कृष्ण+हस्त+धरले+शुभ्र+अश्व=कृष्णाच्या करानें धरले आहेत शुभ्र घोडे ज्याचे तो अर्जुन. अर्जुनाचे घोडे शुभ्र होते अशी पुराणप्रसिद्धि आहे.) २. अनुजांसहित. ३. ही कथा अशी आहे—श्वेतकी नामक एका प्रख्यात राजानें असंख्य यज्ञ केले; शेवटीं शतसंवत्सरात्मक यज्ञ दुर्वासा ऋषीच्या आश्रयानें केला. या अनेक यज्ञांत हविर्भक्षण केल्यामुळें अग्नीला इतकें जाड्य आलें कीं, 'त्याचा प्रतिकार कसा करावा?' असें विचारण्यासाठीं त्याला ब्रह्मदेवाकडे जावें लागलें. अनेक वर्षें घृतधारा सेवन केल्यानें अग्नि निस्तेज आणि म्लान झाला. 'खांडववन भक्षण करून अग्नीनें आपलें जाड्य निरस्त करावें' असा उपाय पितामहानें सांगितला. पण हें वन इंद्ररक्षित होतें म्हणून तें अग्नीस सुप्राप्य नव्हतें. तेव्हां पितामहाच्या अनुमतानें अग्नि विप्रवेश घेऊन मनुष्यलोकीं कृष्णार्जुनास शरण आला. त्या उभयतांनीं खांडववन भक्षणार्थ देण्याचें कबूल केलें, पण अर्जुनापाशीं रथादियुद्धसाहित्याची कांहींशी उणीव असल्यामुळें अग्नीनें वरुणापासून मागून घेऊन अर्जुनाला गांडीव धनुष्य, अक्षय्य इषुधि, कपिध्वजयुक्त दिव्यरथ, इत्यादि सामुग्री दिली आणि कृष्णास वज्रनाभ नामक चक्र आणि कौमोदकी नामक गदा देऊन उभयतांस संतुष्ट केलें. नंतर अग्नि तें वन भक्षण करूं लागला, आणि कृष्णार्जुन रथारूढ होऊन वनाच्या दोन्हीं बाजूंस सर्व प्राणिनाश करूं लागले. हें वर्तमान कळतांच इंद्र अग्नीचें निवारण करण्यासाठीं सकलदेवांसह आकाशांत येऊन जलवृष्टि करूं लागला. तेव्हां कृष्णार्जुनांनीं त्याचा पाडाव करून त्यास परत लाविलें. नंतर अग्नि तें वन पंधरा दिवस यथेच्छ भक्षण करून व्याधिनिर्मुक्त झाला. (आदिपर्व—अध्याय २२३-२२५.) ४. गदहीन=रोगहीन. ५. अग्नीला. ६. अर्जुनाला. ७. देवर्षिचरण. ८. कुबेराचा.

[1]अद्वैताभिधकाननिं गांठुनि प्रार्थितसे भूपाळ ।
'पार्था! रक्षीं रक्षीं मातें ग्रासितो कृष्ण व्याळ'.॥ मग०.॥ १ ॥
तों मृगयार्थी तद्वीरबंधु ते चवघे कृपाळ ।
गेले होते ठेउनि रक्षक शिबिरीं [2]अर्कजकाळ.॥ मग०. ॥ २ ॥ ४४

(दोहरा.)

**गय**—'रक्षि कृपाब्धि! मूर्छित झालों । [3]रिपुवचघननादान ।
दीनपालक तुज ऐकुनि आलों । दे लवकर जिवदान. ॥ ४५

(कटाव.)

धांव धांव बा! श्रीमत्पार्था! शरण पातलों तूज समर्था! मातें रक्षीं दीन अनाथा, पुण्य लाधसी आणि परमार्था, म्हणति दि[4]नावन तुजला कर्ता, यास्तव आलों मी भयआर्ता, सांभाळीं मज [5]गांडिवधर्ता, [6]वदान्य न दिसे मज तुज पर्ता, हरिनामाचा उगाचि वर्ता, यास्तव रक्षीं रक्षीं मला.' ॥ ४६

(प्रबंध.)

**अर्जुन**—'नको वल्गना, सांग निज गत मातें । देउं मग अभय तुज उत्तमातें ॥ध्रु०॥
नाम गण गोत्र कुलग्राम मातापिता । कवण तुज रक्षिता वृत्ति काई ? ।
सर्व परि हे कथा टाकुनीयां व्यथा । रडसि कां? अन्यथा जात नाहीं'.॥नको०॥४७

(प्रबंध.)

**गय**—'अहो! देइं हरिसारथी! भाष मातें । कथिन मज वांचवील्या श्रमातें.॥ध्रु०॥
रक्षिसी भूपति तूंचि दीन सूमती । म्हणुनियां हे क्षिती शरण हा मी ।
उठवि मज बाळका स्वामि नरपाळका! शत्रुमदजाळका! हरचि [7]कामीं' ॥अहो०४८

(गीति.)

**अर्जुन**—'मृतिभयभीताभय घे दिधलें तुज हरिन क्षिप्र काष्टातें ।
त्वद्रिपुविलयन माझ्या सेविन होतां शराग्नि काष्टातें.' ॥ ४९
**गय**—'मद्वाजिवदनफेनें भंगुनियां हरिकरा[8]र्घ्य कोपविला, ।
कंदर्पतात शपथा करित्याचि कठिण तान कोपविला.' ॥ ५०

---

१. अद्वैतनामक अरण्यांत. २. अर्क+ज+काळ=सूर्य+झालेला+शत्रु यम=सूर्योत्पन्न कर्णाचा शत्रु. (अर्जुन.) ३. शत्रूच्या वचनरूप मेघाच्या नादानें. ४. दीनांचें अवन (रक्षण). ५. गांडीवचापधारी. ६. उदार. ७. कामदेवाच्या ठिकाणीं जसा शंकर तसा. ८. अर्घ्य=या शब्दाची व्याख्या आढळते ती अशी:—(१) आप: क्षीरं कुशाग्रं च दधि सर्पि: सतंडुलम् । यव: सिद्धार्थकश्चैव अष्टांगोऽर्घ्य: प्रकीर्तित: ॥ [तंत्रग्रंथ.] (२) आप: क्षीरं कुशाग्राणि घृतं मधु तथा दधि । रक्तानि करवीराणि तथा रक्तं च चंदनम् । अष्टांग एष अर्घ्यो वै भावने परिकीर्तित: ॥ (काशीखंड), (३) रक्तबिल्वाक्षतै: पुष्पैर्दधिदूर्वाकुशैस्तिलै: । सामान्य: सर्वदेवानामर्घ्योऽयं परिकीर्तित: ॥ (देवीपुराण).

(छंद.)

ऐकतां असें वीर **फाल्गुन**। भूवरी पडे न लगतां क्षण।
शोकगहिंवरें दाटला गळा। 'त्राहि' म्हणतसे 'स्वामि घननिळा!' ॥९१
**अर्जुन**—'कोण कोठुनी शरण पातला। भाष देउनी व्यसनिं घातला,।
धर्म केउता श्री**ह**रीविना? । मृत्युसागरा टाकितां मिना.'॥ ९२

(दिंड्या.)

परिस राया! मग काय पुढें झालें, शपथ केला यक्षार्थ भूमिपाळें,।
करुनि मृगया तंव **धर्मभी**म आले, म्लान पाहूनी **पा**र्थवदन बोले.॥९३
**धर्म**—'मंद काशास्तव आजि **गु**[1]डाकेशा! कवण बाणे तव मानसांत क्लेशा,।
असें संकट तुज काय तें नरेशा शक्य नव्हसी कीं त्रासितां सुरेशा.'९४

(घनाक्षरी.)

**अर्जुन**—'अहो! स्वामी बंधुराय!। रक्षीं' म्हणुनी माझे पाय।
धरुनि मोकली हा धाय। **गय** जेधवां.॥ ९५
मी मनीं स्मरूनि नय। यासी दीधलें अभय,।
परि तें सापावदनीं पै[2]य। जाहलें तेधवां.॥ ९६
**कृ**ष्णद्वेषी हा पामर। भाषें केला म्यां अमर।
कैसा करावा समर?। **ह**रिपासीं बांधवा!?'॥ ९७

(ओंव्या.)

**धर्म**—'पहा कर्माची कैसी गती। वैरि केला **सिं**[3]धुजापती,।
**वि**[4]जयासी पडली भ्रांती। विमुख भगवंतीं जाहालों.॥ ९८
अरे! **गया**सी उपेक्षा तत्वतां। श्री**कृ**ष्ण आमुचा प्राणदाता,।
यासीं द्वेष करितां सर्वथा। पात्र अनर्था हो! आम्हीं.'॥ ९९

(सवाई.)

यापरि तो नृपराज **युधिष्ठिर** बोलुनि होय सखेदमन,
पाहुनि **भी**म तयास म्हणे, 'मज मानसिं मोद न दे वचन,।
दीन उपेक्षुनि प्राण सुरक्षुनि राहति जे नर [5]ते वैमन,
रे **ह**रिसारथि! काय भिसी मसिं वंदिल तो समरीं [6]शमन'.॥६०

---

१. अर्जुना! २. दुग्ध. ३. लक्ष्मीपति. (कृष्ण.) ४. अर्जुनाला. ५. या चरणांत जे जन अधम नीच असतात त्यांचें सुरेख वर्णन केलें आहे असें म्हटलें पाहिजे. ६. यम.

(साक्या.)

**भीम**–'धर्मच्युति कां करिसिल **पार्था**! शरणागत रक्षावा, ।
जेणें क्षात्रोत्तम तुजलागीं म्हणतिल 'हा वीर पाहा'. ॥ ६१
पवनात्मजघननादा[1] परिसुनि नाचे **अर्जुन** मोर ।
गर्जुनि बोले आवेशानें बंधुजनासामोर. ॥ ६२

(पद.)

**अर्जुन**–जाउ मदीय प्राण । परंतु दीनरक्षण करीन. ॥ ध्रुवपद. ॥
निर्जरवृंदासह[2] वृंदारक । ईश्वर जीतीन[3] ॥ परंतु० ॥ १ ॥
स्यंदनपदपाणी[4] सह **याद**व । आणि **उ**मारमण.' ॥ परंतु० ॥ २ ॥ ६३

(पृथ्वीवृत्त.)

असा पण करूनियां **गय** दयाब्धि ते रक्षिती,
स्वचक्र निजहस्तकीं **ह**रिक्षयार्थ शोधि क्षिती ।
अशांत पद भक्तये स्वनगरीं तयाला पुजी
म्हणे मग 'उणी' मुनी 'मज दिसे मुखश्री तुजी.' ॥ ६४

(पद.)

**नारद**–'विप्र भवाटे मुख**पु**तनारी । चिंता न करीं जरीं बहु नारि ॥ध्रुवपद.॥
तूंचि सुखाब्धि काय उपाधी । करितां बोधिन बुद्धि विचारीं'. ॥ १ ॥ ६५

(पद.)

**कृष्ण**–'जाणुनी काय विचारीसी मातें । शोधीतसें मी रिपुअधमातें. ॥ध्रुवपद.॥
तुजदेखत मुनि भंगुनि पळला । देतां मत्कर अर्घ त्वरातें. ॥ जाणु० ॥ १ ॥
तद्वधकृत शपथास स्वकानें । परिसुनि गेला कीं गगनातें. ॥ जाणु० ॥ २ ॥
नलगे कोठें शुद्धि[6] तयाची । कीं तो लपला दूर वनातें. ॥ जाणु० ॥ ३ ॥
जरी श्रुत दृष्ट तुम्हाला आहे । हरि चिंता मज वदुनी मनातें.'॥ जा०॥४॥६६

(पद.)

**नारद**–'उरगेंद्रशयना[7]! । परिसें सांगतों [8]कंजनयना! ॥ ध्रुवपद. ॥
तव करांबुजपाणी । भंगुनियां **च**क्रपाणी ।
त्याणें स्तविला **गां**डीवपाणी । चुकविल हानी कुंदरदना! ॥ उर० ॥ १ ॥

---

१. वायुपुत्राचा (भीमाचा) मोठा मेघासारखा आवाज. २. देवगणांसह. ३. जिंकीन. ४. चक्रपाणि. (कृष्ण.) ५. पृष्ठ ३ टीप १६ पहा. ६. शोध, पत्ता. ७. शेषशयन (विष्णो! कृष्णा!) ८. कमललोचना!

तव अपराधी **गय** । **सि**ंतहय तया अभय ।
रक्षी देउनि हें बा! काय? । तूं बापमाय इंदुवदना! ॥ उर० ॥२॥
**पा**र्थ सखा **पां**डवांत । म्हणऊनि वदसि मात ।
तोचि दाउनि तुजला हात । इच्छित घात सौख्यसदना! ॥ उर०॥३॥
जाणोनियां तुझा वैरी । कैंवि जाले साहाकारी ।
साहतां तुज हें **पु**तनारी। उठतिल नारी युक्तमदना.' ॥उर०॥४॥६७

(दिंड्या).

**कृष्ण**–'वदसि अघटित मुनिराय! कसी मात, कसे करितिल मम पंचप्राण घात? ।
तुम्हां हंसतील कीं बोलतां दहांत, कृष्णतनुचे वद होय गौरहात.'॥६८
**नारद**–'वदति जन तुज तें साच पशूपाळ, अर्जुनि म्हणसी तूं प्राण **कुं**तिबाळ।
समरिं जेव्हां घालिती बाणजाळ, वदसि तेव्हां तूं बाळ नव्हे **काळ**'.॥६९

(साकी).

मुनिवचनासरिसा **ह**रि बोले निजानुजेप्रति 'काई ।
**पा**र्थ हितार्थ वदुनि उपेक्षा करवि **गया**ची, जाईं'.॥ ७०

(पद.)

**कृष्ण**–'जाइं जाइं **सु**भद्राबाई! । वळवुनि **भी**मानुज पाहीं. ॥ ध्रुवपद. ॥
मद्रिपु **गय** अन्याय न जाणुनि ठेउनि रक्षिन म्हणती काई॥जाइं०॥१॥
लक्षिति कैसे खलमलधीसम कनकगिरीवर **गय**, मी राई. ॥जाइं०॥२॥
सत्यप्रतिज्ञा **ह**रिच म्हणावा किंबहुना वंदु आणिक माई!'॥जाइं०॥३॥७१

(पद.)

वंदुनि **ह**रिचरणा । **सु**भद्रा गेली पतिसदना. ॥ ध्रुवपद. ॥
नेसुनि दीव्यपितांबर कंचुकि । लेउनि मनहरणा. ॥ सुभद्रा० ॥ १ ॥
करुनि वेणीफणी बहुनगश्रेणी । विनवी **गय**शरणा. ॥ सुभद्रा० ॥२॥ ७२

(पद.)

**सुभद्रा**–'गदाग्रजसारथी! **सी**तहया! । गया **या**दवडाहो. ॥ ध्रुवपद. ॥

---

१. अर्जुन. २. गवळी. ३. आपल्या धाकट्या बहिणीतें. ४. मेरुपर्वत. राई आणि गिरि यांचा प्रयोग लघुतमत्व आणि गुरुतमत्व दाखविण्यासाठीं करण्याचा प्रचार मराठी आणि इंग्रजी या भाषांत दिसून येतो:–राईचा पर्वत करणें=To make a mountain of a molehill. संस्कृतामध्यें तिले तालं पश्यति, परमाणुमपि पर्वतीकरोति, इत्यादि प्रयोगद्वारा अतिशयोक्ति दाखवितात. ५. अनेकभूषणान्वित.

यदुपति शोधीतसे याला । हा तद्द्वेषी बहु जाहला, ।
अशाचा संग्रह कां केला? । हा न भला पतिराया ! ॥ गदा० ॥ १ ॥
स्वामि ! परिसा हो ! दीनपाल । तुमचा रक्षक कीं गोपाळ? ।
तयाच्या चरणीं ठेवुनि भाळ । [1]धनपतिबाळ [2]वोपावो. ॥ गदा० ॥ २ ॥
सांडा खळरक्षण हे मात । वंदिती पद जोडुनियां हात ।
घाला इतुकें या पदरांत । न करा घात स्वहिताचा. ॥ गदा० ॥ ३ ॥
समरीं [3]नीवटितां हरि जाण । व्याजीं घ्यावा लागेल प्राण ।
तुम्हाला आहे माझी आण । न दिसे त्राण पळ मातें'. ॥ गदा० ॥७३

(साकी.)

पाहुनि युवती म्लानमुखी तो अभिमन्यूचा तात ।
'ऐक' म्हणे 'नंदात्मजभगिनि ! वदतों कांहीं मात.' ॥ ७४

(पद.)

**अर्जुन**—'कथितों तुज हित मम गत वृत कांते ! । निजमनि वसुकांते.॥ध्रुवपद.॥
बसलों आश्रमीं निवांत उगा मी । तों पद धरुनि [4]खगामी ।
भाकी मज रक्षि रक्षि अगा ! मी । शरणागत स्वामी ! ॥
कृष्णपाळ मज काळ ग्रासि नरपाळपाळ ! धनपाळबाळ मी हारे.॥कथितों॥ १॥
गमलें मज उचित [5]नेतावन साचें । देउनि अभय अशाचें ।
करुनी संरक्षण यासि कशाचें । भय पुसतां सुरसाचें ।
वचन देत कंदर्पतात निजघातहेतकृत मात जनाची ॥ कथितों०॥ २॥
वदसी निजबंधुबळातें वदनीं । पाहासी तूं कदनीं ।
शरणागत सोडीन जा सदनीं । वद हेची सजणी ! ॥
हरिहर सुरवरनरगुरुवरवरदभी समर करुनि जिंतिन समरीं.'॥कथितों०॥७५

(साकी.)

निजकांतोक्तें सचिंत होउनी उठुनि सुभद्रा चाले ।
शीघ्रगती द्वारावतिमाजी येउनि हरिसी बोले. ॥ ७६

(पद.)

**सुभद्रा**—'दयानिधी ! बहीण तुझी मी [6]सान । देईं [7]चुडे मज दान.॥ध्रुवपद. ॥
परिस मम वचन अरे ! यदुराय । सितहय वंदुनि धरिले पाय ।
विनविल्या नायकती करुं काय ? । झाली मी हैराण. ॥ दया० ॥ १॥

---

१. गय. २. स्वाधीन करा हो. ३. मारतां. ४. आकाशगामी. ५. शरणागताचें रक्षण.
६. धाकटी. ७. सौभाग्यदान.

तुम्हिच संन्यास तया नटऊन । **य**दुस मज नेवविलें फटऊन ।
कशास्तव सांग बरें पढऊन ? । नाहिं कीं रे ! तुज भान ? ॥ दया० ॥ २ ॥
मम प्रिय प्राणसखा वदसी । **ग**यास्तव काय तया वधिसी ? ।
उचित हें कृत्य नव्हे तुजसी । होसील तूं भगवान्. ॥ दया० ॥ ३ ॥
मागतीं [1]चलद्विद्युदाभा ! । रक्षिं पतिप्राण [2]नलिननाभा ! ।
[3]भाष्य मज देइं उशिर कां बा ! । गाइन **ह**रि ! महिमान्.' ॥दया०॥४॥७७

(साकी.)

ऐकुनियां विलापरवा या भगिनीचा दिनबंधु ।
हृदयीं धरुनि दाटुनियां बोले गंहिवर नीजानंदु. ॥ ७८

(पद.)

**कृष्ण**—'**सु**भद्रे ! किमर्थ रडसी ? । रक्षिन तव पतिप्राण । निश्चयें जाण. ॥ध्रुवपद.॥
नाहीं नाहीं त्रिभुवनीं वीर या । करिता [4]मद्रिपुत्राण. ॥ निश्चयें० ॥ १ ॥
वधिन **ग**यास्तव, हिंडुनि झालों । **न**रहरि मी हैराण.' ॥निश्चयें०॥२॥७९

(साकी.)

संबोधुनि अनुजेसि अशा रिति [5]निजयंत्या पाचारी ।
तो वंदी तंव **मा**धव त्यातें कथन कथा करि सारी. ॥ ८०

(पद.)

**कृष्ण**—'सांग असें सुजना । **दा**रुका ! जा **अ**द्वैतवना. ॥ ध्रुवपद. ॥
साम **ध**र्मरायासि निवेदीं । **भी**मासी कदना. ॥ दारु० ॥ १ ॥
मद्रिपु **ग**यरक्षकृतदक्षा । समर अस्त्रसदना. ॥ दारु० ॥ २ ॥
न त्यजितां रिपु भस्मचि करि हरि । **ह**र जैसा **म**दना.' ॥दारु०॥३॥८१

(साकी.)

वंदुनि [6]**ग**रुडध्वजपदपद्मीं **दा**रुक काननिं आला, ।
**पां**डवसदनीं वंदुनि तेव्हां **ह**रिमत वदता झाला. ॥ ८२

(पद.)

**दारुक**—'तुम्हाप्रती सांगतो **कृ**ष्ण गिरा ; । मान्य करा न करा. ॥ ध्रुवपद. ॥

---

१. चलत्+विद्युत्+आभा=चंचल+वीज+कांति=चंचल वीजेसारखी कांति आहे ज्याची अशा. २. हे कमलनाभा ! (कृष्णा !) ३. भाक, आण, शपथ, वचन. ४. माझ्या शत्रूंचें रक्षण. ५. आपल्या सूताला. (यंता=सारथि, रथ हांकणारा.) ६. कृष्णचरणकमलीं.

नैतावन योग्य तुम्हासी खरें । परंतु भक्त आणि सख रे ! ।
असोनी कर्म नव्हेचि बरें । होय तुम्हा सोयरा. ॥ तुम्हा० ॥ १ ॥
तुमचा जाणुनियां अनय । तुम्ही जरी त्यागाल हा न गय ।
नका म्हणुं केशव हा सदय । क्षिप्र हरिन नरा. ॥ तुम्हा० ॥ २ ॥
जरि मनीं इच्छितसां स्वहीत । तसातरि मद्रिपुला त्वरित ।
नाहीं तरि करिन मी निश्चित । पांडवरहित धैरा. ॥ तुम्हा० ॥ ३ ॥
असा प्रभु बोध तुम्हास बरा । करी हरि तद्वचनांत भरा, ।
प्रैत्योत्तर द्या मज किंकरा । मनांत धरा न धरा.' ॥तुम्हा० ॥४॥८३

(साकी.)

फिरवी दारुकवचनासरिसा भीम गरगरां डोळे, ।
होउनि क्रोधाविष्ट गर्जुनी काय धडधडां बोले. ॥ ८४

(पद.)

भीम—'नैरा ! म्हणसि 'तूं बरा बरा' परि जाणतसों यदुविरा. ॥ ध्रुवपद. ॥
गोकुळीं दधि पय नवनित भक्षुनि उन्मत्त झाला खरा, ।
वश होउनिया स्मरा, भुलविल्या गोपवधू सुंदरा. ॥ नरा० ॥ १ ॥
गोरक्षणीं गोपांस दटावी खोवुनि पळवी तुरा, ।
कपटसागरामाजि शिरोमणि आणी ही तस्करा. ॥ नरा० ॥ २ ॥
थोर पराक्रम भंगुनि दावी मातुल कंसासुरा, ।
घेत जयाग्रजधरा कसा या स्कंधिं मुसळनागरा. ॥ नरा० ॥ ३ ॥
छत्र सिंहासन नसतां मिरवी जेंवि सुखें नोवरा ।
ठाउक असतां चराचरा हरि किति वानिसि, पामरा !' ॥नरा० ॥४॥८५

(दिंड्या.)

असे परिसुनि दारुक बोल सारे, म्हणे, 'भीमा ! तूं मूर्खसा कसा रे ? ।
कृष्णनिंदा मज साहवे न कानीं, भिडे मजसीं तूं होसि जरी मानी'. ॥८६
असें ऐकोनी भीम चढे हावे, तया लक्षुनियां शीघ्र पुढें धांवे, ।
उभयतांही दोर्दंड पिटुनि हातीं, मल्लयुद्धा मारवुनि उभे होती. ॥ ८७
पैवनतनुजानें धरुनि दारुकाला, हस्तपाशीं बांधोनि स्वस्त केला. ।

---

१. नतांचें (शरणागतांचें) अवन (रक्षण). २. अन्याय, अपराध. ३. पृथ्वी. ४. प्रत्युत्तर. ५. सेवकाला. ६. हे दारुका ! ७. कामाला. ८. अभिमानी. ९. भीमानें. (वायुपुत्रानें.)

अधोवदनें लज्जीत द्वारकेला येत पाहुनि बळराम पुढें झाला. ॥ ८८
करुनि बंधनविमुक्त नीज हातें, म्हणे, 'मजला वृत्तांत सांग बा! तें, ।
काय कारण तुज बंधनार्थ येतां? कवण योद्धा हा सांग बुद्धिमंता?' ॥ ८९

(पद.)

**दारुक**–'माझे **भीम** करी बहु हाल. ॥ ध्रुवपद. ॥
स्वामिनिदेशें **पांडवबोधास्तव** गेलों दीनपाल! ।
होउनि क्रुद्ध **हरी**परि माझे चडकणि सुजविल गाल. ॥ माझे० ॥ १ ॥
तन्मुखशब्दशरानें केलें मद्व्याकुळ जिव्हार, ।
मग मी झालों [1]समर कराया सिद्ध, परी तो **काळ**.' ॥ माझे० ॥२॥९०

(गीति.)

[2]अहिपतिअवतार तदां ऐकुनि **दारुको**क्तिला म्हणे अनुजा, ।
'**कृष्णा**! परिसें परिसें यासच कां मारिती न काय तुजा.' ॥ ९१

(पद.)

**बळराम**–'हालवीन [3]चवदा । भुवनें **हलधर** तरिच वदा. ॥ ध्रुवपद. ॥
निःपांडवि [4]कुंभिनि हे करितों । टाकुनि क्षिप्र गदा. ॥ भुव० ॥ १ ॥
धांवसि संकटिं तत्फल हें तुज । सुंदर कुंदरदा! ॥ भुव० ॥ २ ॥
मर्दुनि सानुज **भीम** [5]अंधात्मज । करिन सुखी विमदा. ॥ भुव०॥३॥
**भीमार्जुन** अनिवार माजले, । हरिन तयांच्या मदा.' ॥ भुव०॥४॥९२

(ओंवी.)

कोपला पाहुनि **रे**[6]वतीरमण, । मग क्रोधावला **मनमोहन**, ।
म्हणे, 'सिद्ध करा रे! सैन्य । **पांडुनंदन** वधावया.' ॥ ९३

(दिंड्या.)

असें बोलुनि **यदुराज राम** सेना । सहित **यादव अद्वैत** नाम विपिना ।
पातला हे परिसोनि मात कानीं । **पांडुनंदन**सह सैन्य सिद्ध रानीं. ॥ ९४
**हि**[7]डंबात्मज घेउनी राक्षसाला । सहस्र अक्रासह सिद्ध रणीं झाला, ।
तदा झाली ते तुमुल रणधुमाळी । जया धुळीनें लोपला [8]अंशुमाळी. ॥ ९५

---

१. युद्ध. २. शेषाचा अवतार. (बलराम.) ३. सप्त लोक व सप्त पाताळें मिळून चवदा भुवनें होतात. [सप्त पाताळें–अतळ, वितळ, सुतळ, रसातळ, महातळ, तळातळ, पाताळ; सप्त लोक–भूर्लोक, भुवर्लोक, महर्लोक, स्वर्लोक, जनलोक, तपोलोक, सत्यलोक, मिळून चौदा भुवनें.]
४. पृथ्वी. ५. धृतराष्ट्रपुत्र. ६. बळराम. ७. घटोत्कच. ८. सूर्य, मरीचिमाली.

(लावणी.)

निजशस्त्र उभारुनि करीं ।
'हर हर हर हर' उभयदळींचे वीर गर्जती समरीं. ॥ ध्रुवपद. ॥
यदु घालुनियां धनुवरी ।
स:सररररर बाण सोडितां गिळिले रजनीचरीं[1]. ॥
मग असुर मारिती नरीं ।
भ:भररररर तोमर येतां वारिति त्याचे अरी ॥
विर घेउनि झोंबी वरी ।
गि:गिरिरिरिरिरि भवंडुनि गगनीं मारिति पृथ्वीवरी ॥
चाल ॥ एक फरफरफर फाडिती ।
एक चरचरचर कापिती ।
एक करकरकर चाविती ॥
टीप ॥ गरगरगरगर नेत्र फिरवुनी दाविति वरिच्यावरी. ॥ निज० ॥ १ ॥
किति सबळ बळें नाचती ।
घडघड घडघड स्यंदन[2] अवनीमाजि[3] भले धांवती, ॥
त्यारहि चौताळती ।
कडकड कडकड अस्थि मोडुनी दूर भले टाकिती ॥
किति रणवाद्यें खांकती ।
दण दण दण दण [4]कुंजरभेरी नादभरें थोकती ॥
किति एक शंख स्फूरिती ।
थों थों थों थों करणे वाजतां रणशिंगें वाजती ॥
किति सनया उद्गारती ।
दुम दुम दुम दुम रणमोहरिया एकसरें[5] कूदती[6] ॥
चाल ॥ ताल मृदंगासरी ।
विर नाचति नानापरी ।
सुर पाहाति कौतुक वरी ॥
टीप ॥ सर सर सर सर दूर न म्हणती साक्षि जयां श्रीहरी.॥निज०॥२॥९६

---

१. राक्षसांनीं. २. रथ. ३. पृथ्वीवर. ४. कुंजरावरच्या (गजावरच्या) भेरी. ५. एकदम. ६. उड्या मारतात.

(साकी.)

यापरि यादव रजनिचरांसी संगर झाला जेव्हां,
उभयदळींचे परिसा श्रोते! कोण कसे विर तेव्हां. ॥ ९७

(छंद.)

झूजती भले राम भीमही, पार्थ कृष्णही समरिच्या मही।
पवननंदनोद्भव घटोत्कचा गांठुनी भिडे वदुनियां वचा. ॥ ९८

**दारुक**—'काय रे शिशु! भिडसि जा घरा, रक्षितों तुला आजि पामरा! ।
न मर तूं वृथा माझिया करापासुनी अरे! आइकें बरा.' ॥ ९९

**घटोत्कच**—'काय दारुका! वदसि हें अरे! मृत्यु पावसी माझिया करें, ।
म्हणसि बाळ तूं काळ मी त्वरें, समरिं जिंतुनी ग्रासितों खरें.'॥ १००

(दिंड्या.)

असे झुजतां ते वीर समरभारीं एकमेकांचा शस्त्रघाय वारी, ।
तदां भीमाचा तनय खड्ग मारी, वार चढवुनि दारुक आणि हारीं.॥ १०१
राम घेउनियां मुसळनांगरातें, साहाकारी मग होय दारुकातें, ।
असें पाहुनियां भीम आत्मजातें पाठिं घालोनि स्थीर म्हणे त्यातें. ॥ १०२

(ओंव्या.)

**भीम**—'कासया नामाभिधान वाहासी, । तूं जंबुक वाटे मज केसरीसी, ।
जरी लंघावया पाहासी । तरी मरसी मत्करें.' ॥ १०३

**बळराम**—'भीमा! तूं मंदमती पूर्ण, । तुज जवळीं आलें मरण, ।
म्हणोनि वदसी वचन । मुंगीस जाण पक्ष फुटले.' ॥ १०४

(गीति.)

ऐसें वदोनि हलधर भवंडुनि मुसळास गरगरां ताडी, ।
भीमहि रामास तदां स्वगदाघातें धरातळीं पाडी. ॥ १०५
मूर्छागत भीमातें पाहुनियां पार्थ निजरथीं खवळे, ।
हरिवरि हरिसा हरिवरि, सज्जुनि निज चाप शर करांत, वळे.॥ १०६
श्रीधर सुदर्शनातें अवलंबुनि क्षोभला सख्यावरिता ।
बोले, 'अर्जुन! गर्जुन रे! त्वन्मनिंचा करीन आव रिता.' ॥ १०७

---

१. राक्षसांशीं. २. रण. ३. वायुसुतोत्पन्न. ४. हारीं आणणें=जेरीस आणणें, वठणीस आणणें. ५. कोल्हा. ६. सिंहाला. ७. सिंहावर सिंहासारखा. ८. आपल्या चक्रातें. ९. प्रियमित्रावर.

(पद.)

**कृष्ण**—'तत्फल काय अरे! वद मातें. ॥ ध्रुवपद. ॥
तुज सदनांतरीं केश न जळतां। रक्षियेलें निजहातें. ॥ तत्फल० ॥ १॥
मद्रिपु हा **गय** रक्षण करितां। नाठवलें अधमा! तें? ॥तत्फल०॥२॥
रक्षिसि कैसा पाहुं ययातें?। हरि वधितां निज घातें.'॥तत्फल०॥३॥ १०८

(पद.)

**अर्जुन**—'रक्ष स**भी**म तुझा हरि! साचा. ॥ ध्रुवपद. ॥
ज्यास्तव **म**थुरात्याग तुं करिसी। भृंग[2] जसा सरसाचा[3]. ॥ रक्ष० ॥ १ ॥
तो खल **मा**गध कंटक उपडुनी। टाकियला बहु वरुषांचा. ॥ रक्ष० ॥२॥
भ्याल कसा हरि दाविल जरी तरि। पाहुनि आवरि साचा.'॥रक्ष०॥३॥ १०९

(सवाई.)

यापरी **अ**र्जुन गर्जुन सज्जुन चाप करीं रविदत्तशरा
जोडुनि ओढुनि सोडुनि मूर्च्छित भूतळीं पाडित चक्रधरा[4];।
तो **कुरु**नंदन सावध होउन पाहे विलोकुन **कृ**ष्णदशा,
घे तळिं घालुन टाकुनि स्यंदन मांडित रूदन मोहवशा.॥ ११०

(लावणी.)

**अर्जुन**—'**य**दुकुळटिळका! भक्तपाळका! कां बा! रुसलास?।
**पां**डवपाळक म्हणउनि होतों धरुनि तुझी आस. ॥ ध्रुवपद. ॥
मी अपराधी क्षमा करावी दीनबंधु सखया!।
नेत्र उघडुनी पाहीं मातें निजकरुणामृतपया. ॥
समरभूमिसी शयन करुनि कां दीधलें मजला जया?।
कां निष्ठुरता अविलंबितसां कीं न त्यजिलें **गया**? ॥
चाल ॥ कमलनयन उघडुनि बरें पाहे।
मी दास तुमचा शरण पातलों हें।
तव चरणसरोजीं मस्तक हा पाहें ॥
टीप ॥ प्राण त्यजुनि हरी! तुजसंगें येइल तव दास.' ॥ **पां**डव०॥ १ ॥ १११

(गीति.)

रथचरणपाणि[5] उठला परिसुनि निजशोक सखविलापरवा,।
घेउनि निजचक्र, 'वदे रे! **वि**जया[6]! कायसी तुझी परवा?' ॥ ११२

१. लाक्षागृहामध्यें. २. भ्रमर. ३. तलावाचा. ४. सुदर्शनधारी कृष्णाला. ५. चक्रपाणी. (कृष्ण.)
६. हे अर्जुना!

(पद.)

**कृष्ण**–'रक्षिन म्हणसी नरा[1]!। परि मी वधितों गगनचरा. ॥ ध्रुवपद. ॥
मूर्छित पाडुनि दाविसि मातें । तूं आपला नरवरा!॥ परि० ॥ १ ॥
पाहुं पराक्रम आजि आहवीं[3]। जिंकियलें जें हरा[4]. ॥ परि० ॥ २ ॥
सावध राहें पाहे सुदर्शन। गति आहे हरिच्या करा.'॥परि०॥३॥ ११३

(गीति.)

यापरी गर्जुनि टाकी निजचक्र उरीं सख्याचिया समरीं। ११४
तेव्हां धडडड धरणीवरि पडला पार्थ दाटुनी भवरी. ॥
पाहुनि नररथ रिक्त:, भक्तसखा[6] गंहिवरे, गळा दाटे, ।
शोक करी, पार्थाविण शून्य जयाला दिशा दहा वाटे. ॥ ११५

(पद.)

**कृष्ण**–'विजया! रुसलासि काय?। हाय! हाय! हाय! हाय! ॥ध्रुवपद. ॥
क्षण न गमे तुजवांचुनि मातें । आतां करुं तरि काय? ॥ हाय० ॥ १ ॥
पाहुं कसी मी हे तव ललना[7] । सांग सुभद्राबाय? ॥ हाय० ॥ २ ॥
राहिल कैसी वत्साविरहित । विजनीं एकट गाय? ॥ हाय० ॥ ३ ॥
प्राणाहुनि प्रिय वदसी मातें । घडी घडी तूं यदुराय. ॥ हाय० ॥ ४ ॥
राहेल कसा या संसारीं । हा हरि घेउनि काय[8]? ॥ हाय० ॥ ५ ॥ ११६

(पद.)

विजया! नवपंकज[9]कोमलकाया!। आहा रे! सखया!।
त्यजिली कां बा! माजी माया?। वद कांहीं सदया? ॥ ध्रुवपद. ॥
न गमे तुजवांचुनि मातें कांहीं । क्षण एक पाहीं ।
कैसी पाहूं सुभद्राबाई?। सकुमार जाई. ॥ विजया० ॥ १ ॥
कैसी साहेल विरहानळ तव जाया?। सती प्राणराया!।
तिजला मारुनियां शरघाया । वधिलीस वायां. ॥ विजया० ॥ २ ॥
रुसला यास्तव कोमलगात्रा!। तुजलागीं पवित्रा!।
केला समर म्हणुनि प्रिय मित्रा! मम प्रीतिपात्रा.' ॥ विजया० ॥३॥ ११७

---

१. हे अर्जुना! २. गय गंधर्वाला. ३. युद्धांत. ४. शंकराला. मोरोपंत–वनपर्व–अध्याय ३; काव्यसंग्रह–पृ० २७-२८.] ५. अर्जुनाच्या उरावर. ६. कृष्ण. ७. स्त्री. ८. देह. ९. कमल.

(साकी.)

झाला सावध **पार्थ** निजरथीं देउनि ताव मिशांला, ।
तव निजचक्रें **गय** निवटुनि **ह**रि बोले **सि**[1]तअश्वाला. ॥ ११८

(गीति.)

**कृष्ण**–'कां आहवास स्वीकृत **कि**[2]शकेता ! रक्षिसी शवास कसा ? ।
आतां त्यजुनि शै[3]रासन प्रज्वालित वन्हि करि स्वनाश कसा ?' ॥११९
**पार्थें** मृत सहसा तो अक्षय भात्यांत पाहिला नत जी ! ।
मग टाकुनि चापशरा, द्याया प्राणास, आहवास त्यजी. ॥ १२०
करुनी है[4]रीकतानें दीप्त रणीं हॅ[5]व्यवाहनास तदा ।
झाला सिद्ध क्यार्थी निज, पाहुनि वैा[6]रि **कृष्ण** त्यास तदा. ॥ १२१

(दिंडी.)

**कृष्ण**–'परिस **पार्था** ! मी साच, मदिय शपथ, अरे ! केला, तूं प्राण त्यजिसि व्यर्थ. ।
घडे पाहा बा ! ज्यांत तुझा स्वार्थ होय पेक्षां **गय** ऊठवूं यथार्थ.' ॥ १२२

(गीति.)

यापरि निज प्राणसखा संबोखुनी **कृैं**[7]**ष्ण**सारथी **कृष्ण** ।
स्मरतां **वि**[8]धातयाला येउनि **गय** क्षिप्र उठविल तृष्ण. ॥ १२३

(साकी.)

होउनि **पांडव** हर्षभरित मग **य**दुपति पाय नमीती ।
**कृष्ण**भगिनि **कृ**ष्णाद्या आरति करुनि **ह**रिस विनवीती. ॥ १२४

(आरती.)

**कृष्णभगिनी**–'निजानंद पाहा पाहा । **य**दुतम ! हा. ॥ ध्रुवपद. ॥
**नं**दनंदन ! मंदहांसा ! । जगन्निवासा ! या ।
पाहुनियां **पी**तवासा ! । विरघोष महा. ॥ निजा० ॥ १ ॥
**उ**रगशयना ! कुंदरदना ! । सौख्यसदना ! या ।
लक्षुनियां **कं**जनयना ! । **ज**लजनाभ ! पाहा. ॥ निजा० ॥२॥
**पां**[9]**डु**नंदनवंदिताखिलगंडमौक्तिकमंडणा ! ।
[10]स्यंदनांगायूध ! वंदुनि **ह**रिस गाऊं महा.' ॥ निजा० ॥३॥ १२५

---

१. अर्जुनाला. (श्वेतवाहनाला.) २. हे वानरकेतो ! हे अर्जुना ! ३. धनुष्य. ४. कपिध्वज अर्जुनानें. ५. हव्यवाहन=अग्नि. ६. निवारी. ७. कृष्णाचा (अर्जुनाचा) सारथि. ८. ब्रह्मदेवाला. ९. हें कविनाम (पांडुरंग) असावें. १०. स्यंदनांग (चक्र) आहे आयुध (शस्त्र) ज्याचें अशा.

# ८. [1]अनामकविकृत

## सत्यभामाविनोद.

(श्लोक.)

येतां देखोनि [2]सद्मा [3]यदुकुलतिलका सत्यभामा विनोदें
[4]देवोनि द्वार तेव्हां समरसलिलया लागिं ठाके प्रमोदें; ।
कृष्णें बोटें [5]कपाटप्रहरण करितां बोलिली [6]सानुरागें,
'द्वारातें अंगुलीनें प्रहरण करिशी, कोण तूं सत्य सांगें?' ॥ १

हरि म्हणे कपटी हो! 'ऐक तूं सत्यभामे!
भ्रम तुज बहु आहे भूलशी देहधर्मे, ।
अभिनव अभिमानें नेणशी कोण मातें
भवनट नटला जो, माधवो नाम ज्यातें. ॥' २

[7]बाला [8]सत्राजिताची पुनरपि पुसते, 'माधवो कोणता तूं?
[9]कंदर्पाचा सखा जो कुसुमनिधि कृती क्षांतिला कीं वसंतू ।
हा काळो [10]शारदेचा सुख करि सकळां नाहिं गेला [11]हिमंतू
येथें येणें अकाळीं अवचित घडलें सांग पां कोण हेतू.' ॥ ३

ऐसें प्राणप्रियेचें वचन परिसतां बोलिला कृष्णनाथ
'जो कां लीलाविलासी निजजन सुख दे [12]इंदिराप्राणकांत ।
'मुग्धे! [13]वैदग्ध्य सोडीं, म्हणसि मज झणी [14]पुष्पछंदें वसंत
जो कां प्रख्यात [15]चक्री खलदल [16]समरीं जाणिजे तोचि कांत.' ॥ ४

---

१. हें प्रकरण वामनाचें म्हणून आमचेकडे आलें आहे, पण तें वामनपंडितकृत नसावें असें समजून 'अनेककविकृत लघुकाव्यमाले'त समाविष्ट केलें आहे. याच्या अंतिम श्लोकांत पंडितवर्याच्या नांवाचा उल्लेख नाहीं आणि या काव्याच्या कर्त्याचें नांव ठाऊक नाहीं, म्हणून यास 'अनामकविकृत' असें इष्टार्थद्योतक विशेषण योजिलें आहे. संस्कृतामध्यें "अंगुल्या कः कपाटं प्रहरति?' 'कुटिले! माधवः.' 'किं वसंतो?' 'नो, चक्री.' 'किं कुलालो?' 'नहि, धरणिधरः.' 'किं द्विजिह्वः फणींद्रः?' । 'नाहं घोराहिमर्दी.' 'किमपि खगपति?' 'नों हरिः.' 'किं कपींद्रो?' इत्येवं सत्यभामाप्रतिवचनजितः पातु वः पद्मनाभः ॥" असा एक सुभाषितपर प्रश्नोत्तररूप मंगलवाचक श्लोक आहे त्याचें हें प्रकरण भाषांतर आहे. २. गृहा. ३. कृष्णाला. ४. द्वार देणें=द्वार बंद करणें. ५. दार. ६. प्रीतीनें. ७. मुलगी. ८. सत्राजित=सत्यभामेच्या बापाचें नांव. ९. मदनाचा. १०. शरदृतु. ११. हेमंतऋतु. १२. इंदिरा=लक्ष्मी. १३. शहाणपण. १४. फुलाच्या नादानें. १५. ज्याच्या हातीं चक्र आहे तो. (कृष्ण.) १६. युद्धांत.

श्रवण करुनि सत्या वाक्य विश्वंभराचें,
'म्हणसि कवण चक्री? होसि गा! कोण मातें? ।
घडिशी बहु घटातें, काय होशी कुलाल[1]?
मज तंव तुजशीं गा! कार्य नाहींच, चाल.' ॥ ५

अमृत मधुर तीचें वाक्य कृष्णासि वाटे,
पुनरपि वदताहे, 'बोलसी केंवि खोटें? ।
झणि म्हणसि कुलाला रूसणें कोण कैसें?
धरणिधर असा जो जाण मी तोचि ऐसें.' ॥ ६

यदुपतिवचनांतीं बोलिली सत्यभामा,
'धरणिधर असा जो सांग तूं कोण आम्हां? ।
अगुण सगुण बोली पावला द्वैत जिव्हा,
फणिधरवर शेषो येथ आलासि केव्हां?' ॥ ७

लक्ष्मीकांत वदे तियेसि पुढती, 'नोहे प्रिये! मी फणी[4];
चातुर्यों बहु वाटतें म्हणउनी हे आमची साजणी ।
आम्ही घोरफणींद्रमर्दन[3] जगीं प्रख्यात हें बोलणें
जिव्हा ऐकचि आमुतें शरण जो आला तया पाळणें.' ॥ ८

यदुपतिमुखचंद्रीं चंद्रिका वाक्य पाहे,
श्रवणपुटचकोरां[5] सेवितां तृप्ति नोहे, ।
म्हणउनि पुसताहे, 'कोण तूं सर्पहंता?
खगपति विनतेचा[6] पुत्र पीयूषहर्ता[7].' ॥ ९

गोपीवल्लभ मागुती रमणितें बोले, 'प्रिये! धन्य तूं
जो कां सौभाग्यवैभवो(?) मजसवें नानापरी हास्य तूं ।
नोहें मी खगराज[8] गे! भवहरी[9] जाणें प्रिये! सत्य तूं'
ऐसें देवकिनंदनू सुवचनीं सत्येप्रती बोलतू. ॥ १०

पद्माक्षी पुसती, 'हरी[10] कवण तूं? त्वद्दास वृक्षावरी
होसी वानर तूं, तरी झडकरी जाई वनाभीतरीं.' ।

---

१. कुंभार. २. साप. ३. भयंकर कालियसर्पाचा दमनकर्ता. ४. द्विजिव्ह (सर्प) नव्हे असा भाव. द्विजिव्ह=सर्प; चहाड. ५. श्रवणपुट हेच चकोरपक्षी. ६. विनता=गरुडमाता. ७. पियूष=अमृत. ८. गरुड. ९. संसार (हरण) करणारा. १०. वानर.

'जो देवां[हि] श्रुतिस्मृतींस न कळे जो योगियां नातळे'
फीटे जेथ परात्परा वृत्ति तया लक्षासि जो नातळे. ॥ ११
पद्माक्षी हरिपाद सेवन करी श्रीशंभुतीर्थावरी
त्या मागें हरिशीं विलास करितां तो हासत श्रीहरी, ।
हे श्रीकृष्ण मुकुंदपादरज हे देखावया उत्सुक
उद्घाटोनि कपाट कृष्णचरणीं ठेवीतसे मस्तक. ॥ १२

---

## ९. बस्वलिंगकृत

### गजगौरीव्रताख्यान[1].

(पद.)

पांडवां ऐसे महाराज जगीं थोडे. ॥ ध्रुवपद. ॥
श्रेष्ठ हा धर्म सत्वाचा सागर । भूतदया[2] शांति विवेक आदर. ।
प्राणांतीं न करी असत्याचा आदर । ज्ञानियां भक्तां भगवंत सादर.॥पांडवां० ॥ १ ॥
परवनिता[3] माता, परद्रव्य पाषाण, । परपीडा वारी देवोनियां प्राण, ।
बलप्रज्ञा ऐशी काळातें जिंकोन । ऐसेंही असतां भीमासिही ध्यान.॥पांडवां०॥२॥

(साक्या.)

कोणि येके वेळीं सखियांमेळीं गांधारी विराजे, ।
ब्रह्मपुत्र हा नारद तेथें अवचित केलें बीजे[4], ॥
कुरुपतिमाता[5] परमाल्हादें नमिलीं पादांबुजें[6], ।
तंव करुणामृत दृष्टि जयावरि नांदति अक्षय ओजें. ॥
'आजि सुदिन पहाला हो! । साधुलाभ जहाला हो!' ॥ ३ ॥
श्रीकारक 'गजगौरीव्रत' हें बोलति निगमपुराणीं[7], ।
यथाविधि आचरावें जैशी वदली व्यासवाणी. ॥

---

१. या व्रताची कथा भविष्योत्तर पुराणांत असून तिचा समावेश विश्वनाथदैवज्ञप्रणीत सुप्रसिद्ध 'व्रतराज' नामक ग्रंथांत आहे. हें व्रत 'हस्तिगौरीव्रत' या नांवानें 'व्रतराजां'त निर्दिष्ट केलेलें आहे. (व्रतराज—पृ० ३७२.) 'गजगौरीव्रताख्यान' नामक एक लहानसें प्रकरण अनंतकवीनें केलेलें 'काव्यसंग्रहां'त प्रसिद्ध झालें आहे, तेंही जिज्ञासु वाचकांनीं पहावें. [अनंतकविकृत काव्यें पृ० ६९-७४.] २. प्राणिमात्रांची दया. ३. स्त्री. ४. येणें. ५. गांधारी. ६. नारदाचीं चरणकमलें. ७. वेदांत आणि पुराणांत.

[1]अर्कवार हस्त नक्षत्रीं भाद्रपदीं ये मिळणी ।
पुत्राहातीं आणुनि माती हस्ति करावा रमणी ! ॥
बैसुनि वाणें दीजे हो ! । [2]श्री इंद्राची हरिजे हो ! ॥ ४ ॥

(पद.)

मृत्तिकेचे गजीं आरुढोनि **गां**धारी । देतसे वाणें हरुषे अंतरीं ।
ऐशी ते आली **कुं**तीचे मंदीरीं । 'घेइं कां वाण' बोले ते सुंदरी. ॥**पां**डवां० ॥५॥
धन्य हो ! धन्य **गां**धारी वैभव । दृष्टि भरुनी पाहिलें शांभवें ।
............................... । ................................ ॥**पां**डवां० ॥६॥

(साक्या.)

वस्त्राभरणीं अलंकारिली बैसे मंगलधामा ।
ब्राह्मणसुवासिनी विधिमंत्रें भाट वर्णिती महिमा. ॥
ऐशी वाजत गाजत मिरवत आली **कुं**तीधामा ।
'देई वाण सोडि अभिमान एकोत्तरशतमहिमा' ॥
ऐशी बोले मानें हो ! । **कुं**तीला लाजिरवाणें हो ! ॥ ७ ॥

(पद.)

ऐशी चिंता करी ततक्षणीं । **पां**डव आले [3]व्याहाळीं खेळोनी ।
पाहाती माता चिंतेनें कवळोनी।राहिली पुसती समस्त मिळोनी॥**पां**डवां० ॥८॥

(साक्या.)

ऐक **भी**मा ! तुजलागिं सांगतें दुःख हो ! माझें जिविंचें ।
**गां**धारीच्या हर्षा देखुनि अंतर माझें खोंचे ॥
एकोत्तरशत पुत्र मिळोनी व्रत पुरवीलें तीचें, ।
काय तुम्ही आणाल माती बळ किती पांचांचें ? ॥
काय सांगों **भी**मा ! रे ! । अधिक तिचा महिमा रे !' ॥ ९ ॥
'[4]अंकापासुनी पडतां तुझिया माते ! जन्मकाळीं ।
शतयोजनें शिळा होती झाली ते रांगोळी ॥
आतां तरि तारुण्य आमुच्या भुजा कंद कल्लोळी ।
**शे**ष फणावरि माती जितुकी आणुनि देतों समुळीं ॥
तरी तुज पोटीं आलों गे ! । नाहीं तरि पाथर झालों गे !' ॥ १० ॥

---

१. रविवार. २. लक्ष्मी. ३. वनीं (व्याहाळ=वन, अरण्य.) ४. मांडीवरुन.

ऐसें बोलुनियां मातेप्रति भीम आला अरण्या ।
अमित [1]मेदिनी खाणुनि [2]कर्दम मेरुसम करि तुळणा ॥
आणुनि भरल्या [3]हाटबिंदी[4] चौफेर न कळे गणना ।
न भेटती कोणी कोणासी कोंडुनि पावति मरणा ॥
म्हणती बरवें न दिसे हो ! । कुंती व्रत हें कैसें हो ! ॥ ११ ॥
तों आले धर्मादिक [5]किरिटीनकूळसहदेवेंशीं ।
पाहति तंव ते प्रचंड माती भरली नगरप्रदेशीं, ॥
येउनि पुसती निज मातेप्रति तंव ते सखेद क्लेशी ।
अर्जुन म्हणे, 'अजि ! अपूर्व वाटे हिमकर कां ज्वर सोसी ॥
मजला कैसें कळलें हें । कोणें केले तुज छळ हे.' ॥ १२ ॥
पृथा म्हणे, 'हो ! ऐक फाल्गुना ! पूर्व वृत्तांत मी सांगें ।
नारद येउनी व्रत सांगितलें तंव गांधारीसंगें ॥
एकोत्तरशत पुत्र मिळोनी गज केला अभंग ।
बैसुनि त्यावरि दिधलीं वाणें वोवसिलें तिणें त्रिजग ॥
मजला दुःख तें भारी हो ! । कोण माझें संकट वारी हो ! ॥ १३ ॥
ऐशी सोळा दिवस पूजा करोनि दिधलीं वाणें ।
पुढिले जन्मीं ऐरावतप्राप्ति होय सन्मानें.' ॥
ऐकोनी वीर हास्य करिती, 'आइक माते ! वचनें. ।
नेणों जन्म पुढील कोण अतांचि मज हें करणें ॥
आणितों ऐरावतितें । पाहें माझे गतितें.' ॥ १४ ॥

(पद.)

अर्जुन म्हणे, 'याचेनि फळ काये ?' । पुत्रातें माता कुंती सांगताहे ।
'गजपूजनें ऐरावती प्राप्त होये। पुढिलिये जन्मीं येवढें फळ लाहे' ॥पांड० ॥ १५ ॥
'कवण हो ! खेद घाटला अंतरा ? । त्रिभुवन ऊभें करूं तुझ्या उत्तरा ।
आतांची ऐरावत आणूं सत्वरा । तरीच तुझा पुत्र मी हो खरा.' ॥पांड० ॥ १६ ॥
पुत्राची गोष्ट ऐकोनी हर्षली । म्हणे, 'हो आजी गांधारी वोसली, ।
गजस्कंधीं बैसोनि मिरवली । आम्हांसि वाण देऊं जे पैं आली. ॥पांड० ॥ १७ ॥

---

१. पृथ्वी. २. चिखल. ३. बाजार. ४. रस्ते. ५. अर्जुन.

(साक्या.)

बोलसि तूं अघटित वार्ता ऐकवेना जे कर्णीं ।
स्वर्गींचा ऐरावत प्रचंड केंवि पाय दे [1]धरणी ? ॥
पूर्वीं रामें आपुल्या प्रौढी दगड तारिले [2]जिवनीं ।
परि हा दिग्गजकुळमंडण तो नाहिं देखिला कोणीं ॥
आक्रमी भूमीसि हो ! । करणी उत्तम कैशी हो !' ॥ १८ ॥
अर्जुन म्हणे, 'जननीये ! आजि तूं पाहें आपुले नेत्रीं ।
स्वर्गींचा ऐरावती आतां चालवितों या [3]धात्री ॥
तरीच पांडूकुमर तूं मानीं सोमवंशिचा [4]क्षेत्री, ।
नाहींतरि व्यर्थचि भूभार होऊनि राहें धरित्री ॥
ऐसा केला जो पण हो ! । आणितां न लगे मज क्षण हो !' ॥ १९ ॥
देखुनी बाण सतेज पत्र मुखीं [5]वज्रधर थरथर कांपे ।
गर गर गर गर फिरवी डोळे सद्गुरु पाहे कोपें ॥
चक चक चक चक सर्वहि झाले म्हणती, 'कोणें भूपें ।
बाणाग्रीं लेहोनि पत्र कां पाठविलें इंद्रासमिपें ॥
ऐसा कोण बळी हा हो ! । करितो आम्हांसी [6]रंळी हो !' ॥ २० ॥

(पद.)

'अमरेंद्र ऐरावती पाठवावें । कुंतीव्रत करावें वैभवें ।
न द्यावें तरि तैसेंची लिहावें । कांहीं एक मग करिजेल स्वभावें॥पांडवां०॥२१॥

(साक्या.)

व्रत झालिया सवेंचि धाडूं ऐरावती सुरेशा ! ।
न पाठवाल तरि उणें येतसे आमुच्या सोमवंशा ॥
कीं उत्तर सत्वर हस्ति पाठवा ऐसा हा अंदेशा ।
नाहिं तरि तैसा विचार करणें घडेल हो देवेशा ! ॥
पांडुकुमर आम्ही हो ! । कळों येइल स्वामी हो !' ॥ २२ ॥

(पद.)

विचारी शक्र सद्गुरु संपन्न । मानवीं धरिला देवांशीं अभिमान ।
बृहस्पति म्हणे, 'ऐसें आहे जाण। अजिंक्य पांडु त्रिभुवनीं नंदन'पांडवां०२३

---

१. पृथ्वीवर. २. जीवन=उदक. (पाण्यांत, सागरांत.) ३. धात्री=पृथ्वी. ४. क्षत्रिय. ५. इंद्र. ६. थट्टा.

(साक्या.)

बृहस्पति म्हणे, 'सुराधीशा[1]! ऐकें [2]अमृतपान! ।
पूर्वी राजे बहुत झाले कोण पाठवी बाण ॥
ऐशापरी पाठवूनि जरी किरिटी करि संधान, ।
काय आम्ही अवघे करितों घेता अमुचा प्राण ॥
पांडुकुमार बळी हो! । करिती रणखंदळी हो! ॥ ॥ २४ ॥

(पद.)

आणीक नवल तयांचें नेणसी । हस्तगत झाला वैकुंठनिवासी, ।
त्रिभुवन हातीं देईल तयांसी । मग तूझी कथा काय ते ऐकसी.' ॥पांड०॥२५॥

(साक्या.)

कठिणोत्तरें ऐशीं ऐकुन शचिवर क्रोध न साहे ।
'शैलांची मी [3]मौळें कुट केलीं वज्रघायें ॥
[4]दितिपुत्राचें निर्मूळ केलें, कोण पराक्रमि आहे? ।
अर्जुन बाल हें काल जन्मलें मजशीं भिडों पाहे. ॥
अपूर्व कैसें वाटे हो! । रुपती नवनितकांटे हो! ॥२६ ॥

(पद.)

प्रत्युत्तर ऐसेंचि लिहावें । दिधला जी हस्ती नेइजे स्वभावें ।
गज नेतां बळ कळेल स्वभावें । तेथें हें बहु कासया बोलावें.'॥पांड०॥२७॥

(साक्या.)

सुरगुरु म्हणे, 'सुराधीशा! ऐके सगुणराशी ।
पत्रीं लेहूनि धाडा ऐसें न्यावें ऐरावतिसी ॥
असेल जरि त्या शक्ति पराक्रम कळों ये सर्वांसी' ।
म्हणोनि लेहुनि बाणि पाठविलें भूर्जपत्र तळासी ॥
[5]मार्गण उतरे कैसा हो! । सपक्ष [6]अहिरिपु जैसा हो! ॥ २८ ॥
जैसा शंभू विराजमान बैसे सुरगणपाळीं ।
तैसा धर्म रत्नसिंहासनिं बंधूच्या [7]सम मेळीं ॥
भीष्म द्रोण कृपाचार्यादि हांसति आनंदकल्लोळीं, ।
तंव तो बाण मेघजळासम धर्मपाद प्रक्षाळी. ॥
म्हणती अपूर्व धरणी हो! । पार्थें केली करणी हो! ॥ २९ ॥

---

१. हे इंद्रा. २. इंद्र. ३. मस्तकें. ४. दैत्याचें. ५. बाण. ६. गरुड. ७. सह.

देवेंद्राचें पत्र कृपाचार्य वाचुनियां पाहे ।
'स्वस्ति श्रीसालंकृत पांडुकुमरा ! अक्षय राहें ॥
थोर पराक्रम बाणीं पाहुनि मम मानस सुख लाहे, ।
सोमवंशकुलतीलकमंडण कृष्णकृपा तुज आहे ॥
न्यावा दिग्गज तुम्हीं हो ! । आटक न करूं आम्हीं हो !' ॥ ३० ॥

(पद.)

पत्रिकागर्भ कळला अर्जुनासी । शराचा सेतु बांधिला गगनासी ।
महिपासुनियां अमरेंद्रभुवनासी।सुखरूप ऐरावति आणी सदनासी.॥पांड०॥३१॥
उच्छिष्टें काढी धर्माचे मंदिरीं । अर्जुनवाजी हांकितो निजकरीं ।
एक वेळ झाला तयाची [1]अंतुरी।अल्पही न्यून पडूं नेदी श्रीहरी. ॥पांड०॥ ३२ ॥

(साक्या.)

पाहतां दिसे शोभा दंता उटणें केलें ।
आरक्त नेत्रीं दीप्ति जैशी रत्न खेवणें केलें ॥
शुंडादंडें झेलित पर्वत मंद मंद गति चाले ।
ऐसा [2]इभ उतरतां भूतळीं देखुनि कौरव भ्याले ॥
मारिति दुर्धर हांका हो ! । पोटीं भरले धाका हो ! ॥ ३३ ॥
आला ऐकुनि गज तो धर्म सांगे भीमसेना ।
धृतराष्ट्रादिक गौतमपुत्रा नमिजे भीष्म द्रोणा ॥
सर्वांप्रति जाऊनि [3]वैराकोदर तो वंदित चरणा ।
ऐसे आले निजनगरासी नमिती दिग्गजचरणा. ॥
म्हणती भगीरथ जेव्हां हो ! । गंगा आणी बरवी हो ! ॥३४ ॥
मग तो वैरण पुजोनि सर्वेहि आले मिरवत नगरीं ।
नाना वाद्यें वाजत पांडुरायाचे महाद्वारीं ॥
सखियामेळीं परमाल्हादें कुंती ये सामोरी ।
बोलावुनि झडकरि गांधारी पूजाविधितें सारी ॥
बैसली दिग्गजपृष्ठीं हो ! । घडलें नाहीं सृष्टी हो ! ॥ ३५ ॥

(पद.)

वंदोनी गजा आरुढली त्वरित । तिळफळें युक्त शर्करासमवेत ।
नानापरीचीं वाद्यें हो ! वाजत । आनंदें कुंती वोवसा भरीत ॥पांड०॥३६॥

---

१. स्त्री. २. हत्ती. ३. वृकोदर, भीम.

(साक्या.)

ऐसा सोहळा हस्तिनापुरीं हस्तीचा पूर्ण झाला. ।
अमरेशाप्रति ऐरावत सन्मानें पाठविला. ॥
ऐशी पूर्वजकीर्ति वैशंपायन जन्मेजयाला ।
सांगे द्रोणदक्षिणे द्रूपद बांधुनि हस्तीं दिधला. ॥
केला सद्गुरु मान्य हो ! । बाळक राम अनन्य हो ! ॥ ३७ ॥

(पद.)

[1]झुंजारी ऐसा नकुळ आगळा । सहदेव जाणे ज्योतिषा सकळा ।
पांचाही परिस द्रौपदी जवळा । क्षण एक न्यून पडूं नेदी सांवळा॥ पांड०॥ ३८॥
पांडवचरित्र वर्णिलें श्रीव्यासें । जगवंद्य केलें वैकुंठनिवासें ।
श्रवणमात्रें तुटती [2]भवपाश । बस्वलिंगा तारिलें सहवासें. ॥ पांड० ॥ ३९ ॥

---

## १०. [3]मुकुंदकविकृत

### [4]सारीपाटकथा.

(श्लोक.)

कैलासशैलशिखरीं शिव आणि [5]काली, [6]सारीस मांडुनि विनोदति तेचि काळीं, ।
तों तेथ नारद मुनीशहि पावला हो, वीणा करीं सहित घे [7]हरिनामलाहो. ॥ १
आला मुनी निज घराला म्हणूनि शिव झाला सतोषहि तदा,
[8]भालाक्ष पाहतचि धाला मुनी विनत झाला गजांतकपदा; ।
खेळासि तत्परचि झाला तया पुरहरालागिं नारद वदे
बोलाविना चहुं पटाला न रंगहि कराला उगाचि श्रम दे. ॥ २
'संतोष व्हावा जरि आपणाला, बोला मुखें कांहिं तरी पणाला;' ।
ऐशी ऋषीची परिसोनि वाणी, दोघांचिया तैं न सुखासि [9]वाणी. ॥ ३

---

१. योद्धा. २. संसारबंधनें. ३. या कवीनें आपल्या मातापितरांचें नांव अखेरीस सांगितलें आहे. (श्लोक ४९.) याचा पिता गोविंद व माता सावित्री. गोविंद हा सत्कविता करणारा असून त्याची कविता संतांच्या मंडळांत बरीच प्रसिद्ध असावी असें ह्या ४९ व्या श्लोकावरून दिसतें. शोधक वाचकांनीं या गोष्टीकडे लक्ष पुरवावें अशी सविनय सूचना आहे. ४. हें आख्यान 'ब्रह्मोत्तर'खंडांत आहे. (पद्य ४७ पहा.) ५. पार्वती. ६. सोंगटी. [सारीपाट=सोंगट्यांचा पट.] ७. हरिनामाचा लाभ. ८. शिव. ९. कमताई.

कामादिकीं जो कधिं नाकळीला, दोघांसही लावुनियां कळीला ।
बैसे मुनी पाहत तो तमासा, डोले सुखें जेंवि जळांत मासा. ॥ ४

(चूर्णिका.)

श्रीमच्छशधरशकलविलसितोत्तमांग गंगातरंगरंजितजटातट मुनिजनसेवित-पदकमलपरागें । मुनिवरनिगदितवचन मनन करूनि अति सानुरागें । शरदभ्र-विभ्राजितशुभ्रतरभूतिकृतांगरागें । भक्तहृत्कमलभृंगें मत्तमातंगशुंडादंडायमान-भुजदंडनिर्जितचंडवेतंडदंडधरभीतिहरानें प्रेमयुक्त नेम करुनि व्याघ्रचर्मनृकपा-लमाला पणालागिं ठेविली. ॥ ५

(श्लोक.)

बोले तैं अबला म्हणे स्वपतिला, 'हा खेळ तों जिंकिला,
ठेवा जी! वहिला दुजा नग भला जो संग्रहीं चांगला.' ।
शंभू तैं चकला म्हणे, 'अजि! मला हारे न हे चित्कला,
कीं हा काळ मला न साह्य गमला चिंतांबुधीं मज्जला.' ॥ ६

(चूर्णिका.)

त्यानंतरें काळांतकें शेषभूषणाला । परशुडमरुपट्टीशखट्वांगादि आयुधाला । वृषभगजाजिनाला ठेवितां एकेक डाव करूनि चढा हिरोनि घे नगराजबाळा । विलोकितां अशाला लज्जाकुलित शिव देखोनि जगज्जननि म्हणे, 'नमस्ते न-मस्ते हरा! हरा!' ॥ ७

पिंगा जटा रुळति अंगावरी धरि कुरंगासि हस्तकमळें
शृंगार सर्वहि भुजंगाधिपाकृति अनंगारि जैं डळमळे, ।
गंगाधरानतक संगासि नाशक अभंगासि होउनि सदा
.............................शुभांगा वदे नतपदा. ॥ ८

'ध्यावी वस्तु समस्त हे मज नको, क्रीडार्थ हा खेळ जी!
स्त्रीनें हारविलें म्हणोनि हृदयीं वाहूं नका काळजी.' ।
या वाक्यासरिसा मुनी मग कसा बोले महेशाप्रती
'निर्लज्जें वसणें तयाहुनि बरें जाणें दिगंताप्रती. ॥ ९

माया अपार अनुमेया न तूज, सुरराया अजिंक्य समजें,
वायां पणासि करुनीयां उभीच तनु आयास युक्त करिजे; ।

---

१. चंद्रशेखर शिव. २. भस्म. ३. बुडाला. ४. गजचर्माला. ५. पार्वती. ६. नारद.

जाया वरी भव न काया[च] दावि तव पायांसि हें नमन घे,
जाया निरोप मज दे या क्षणीं, क्षण वसाया रती[१] न मन घे.'॥ १०
गेला असें वदुनि नारद शंकरातें, सक्रोध शंभु तइं चालियला वनातें, ।
तों आड येउनि वदे गिरिजा सुहासा, 'कां जातसां करुनि राग अजी! महेशा!?'

(सवाय्या.)

'बोलुं नको मजशीं बहु लाडपणेंच, न चाड तुझ्या वचनाची,'
'काय वदा मजपासुनि अंतर जें तुमच्या हृदयासहि जाची.' ।
ऐकुनियां शिव बोलतसे, 'ललनावचनें श्रवणीं न पडावीं.'
हांसुनि तैं गिरिजा वदली, 'कधिंपासुनि ज्ञानकळाहि वदावी.'॥ १२
बोलतसे भव कोपभरें गिरिजा म्हणुनी हृदयीं कठिणा जी!
'जासि पिशाचगृहीं रहिवास तयां लवलेश नसे करुणा जी! ।
भीड त्यजूनिच बोलसि यास्तव जाइन येथुनि शीघ्र वनाला,
जाल किती दिस हाल वनांतरिं याल उद्यां परतोनि घराला.'॥ १३

(श्लोक.)

वाक्य हें परिसुनी शिव बोले, 'यापरी उगिच फार न बोलें, ।
जातसें त्यजुनियां सदनाला[२], पाहिंनाच अधुना[३] वदनाला.' ॥ १४
यापरी वदुनियां गिरिजेला, पातला अतित्वरें गिरिजेला, ।
सोसुनी हिमहि वर्षतपातें, बैसला करुनि तीव्र तपातें. ॥ १५
कितेक दीस लोटले तरी नयेचि कां पती?
म्हणोनि शोध घ्यावया निघे तदां उमा सती; ।
जनीं वनीं फिरे पुसे ऋषींस आणि योगियां,
'तुम्ही महेश देखिला, तरी वदा वनांत या.' ॥ १६
असा करीत शोध तेथ पातली कृशोदरी,
महेश जेथ आदरी तपासि सेवुनी दरी. ।
विलोकुनी तयासि ते मनीं विचार ते करी,
अशा रुपेंचि गेलिया शिवासि कोप ये तरी. ॥ १७
चिंतूनि ते बहुत वेळ कपर्दियोषा[४], रूपासि पालटुनियां धरि भिल्लिवेषा, ।
नेसोनि बर्हि[५] कनकाभरणीं विराजे, पाहोनि जीस कुसुमायुधमाय[६] लाजे. ॥ १८

---

१. सुख, गोडी. २. घराला. ३. आतां. ४. कपर्दीची (शिवाची) योषा (पत्नी—स्त्री). ५. मोराचीं पिसें. ६. मदनमाता (लक्ष्मी).

बाळी सुकर्णयुगिं घाली शिरीं सुमनजाळी सुवासित भली,
भाळीं टिळा जडित ल्याली सुरत्न नगमेळी बहू झळकली, ।
चाली जिची जितमराली अशी गिरिश वांछी सुहीरकरदा,[1]
आलीसमेत[2] मग आली शिवानिकट ठेली अभीष्टवरदा. ॥ १९
तेव्हां मंद सुगंध मारुत सुटे झंकारशब्दें अली[3]
आलापासि करी, पिकाचि सह ते नाचे मयूरावली. ।
चापातें कुसुमायुधें शरगुणीं[4] सज्जूनि आकर्षिलें,
झाले साह्य समस्त हे परि शिवें ध्यानीं मना योजिलें. ॥ २०
आत्मचिंतनीं लक्ष लावुनी, बैसला मुनी जेंवि आसनीं, ।
'यावरी मला पाहतो कसा?' पावली उमा शोक तो असा. ॥ २१
झाली स्तब्ध क्षणेक त्यावरि कशी कल्पूनि बुद्धीस जी,
वीणा घेउनि मंजु मंजुळ रवें गानींच वाणी सजी; ।
ऐशी श्राव्य सुकर्णरंध्रयुगलीं जातां समाधी त्यजी,
नेत्रातें उकलूनि पाहुनि म्हणे, 'ब्राह्मी कला नित्य जी.' ॥ २२
असें वेधतां चित्त तीच्या गुणानें; वदायासि आरंभिलें निर्गुणानें, ।
म्हणे, 'कोण तूं? एकटी या वनीं गे!, तुला पाहतां मोहिलें कीं अनंगें.'॥ २३
'भिल्ली मी चिरकाल निर्भय मनें रक्षीतसें या वना.'
वाणी ऐकत तों म्हणे, 'बहु बरें होईं मदीयांगना.'[5] ।
ते बोले, 'न वदें अतःपर असें, रागीट माझा पती,
हें ऐकेल तरी अनर्थचि घडे, काळादि ज्या कांपती.' ॥ २४
'मी एक थोर सकळां विबुधांत[6] मानी, नाहीं दुजा मज असा त्रिजगांत मानी.' ।
'तूं सर्वश्रेष्ठ, तरि कां तुजलागिं जाया नाहीं? उगाच फिरतोसि वनोवनीं या.'॥२५
'जाया असे परि करूनि स्मिताननातें, मी खेळतां बहु करीच विनोदनातें, ।
यालागिं सोडुनि तिला मग या वनाला, आलों असें समज द्वद्रत जीवनाला.'॥२६
'सहास[7] खेळतां विनोद बोलिली सती तिला,
त्यजी अशा दुजी कशी वरील सांग तूजला?' ।
अशी निराश बोलतां पुन्हाहि नेत्र लावुनी,
करीत ध्यान चित्सुखें उमेश तोष पावुनी. ॥ २७

१. चांगल्या हिऱ्यासारखे रद (दांत). २. सखीसहित. ३. भ्रमर. ४. बाण व दोरी यांनीं. ५. माझी स्त्री. ६. देवांत. ७. हासपूर्वक.

मागुती हळुच गान ते करी, मानसीं विकळताच ते करी, ।
ऐकुनी मृग[1] सुखासि पावले, टाकिती मग पुढें न पावलें. ॥ २८
तेंव्हां ते निकटींच बैसुनि हटीं गातांचि तो धूर्जटी,
कंठीं सिंहकटीचिया मग मिठी घालावया तो उठी. ।
तेंव्हां सुभ्रुकुटी विलोकुनि दिठी बोले अतीगोरटी
'आशा दुष्ट न ती धरीं बळकटी, गुंतूं नको संकटीं. ॥ २९
मी परांगना साध्य होइना, जाण निश्चयें तूं तपोधना ! ।
यापरी सती बोलिली बहू, **काम** मोहिला ना म्हणे **सांब** हूं. ॥ ३०
टाळुनी तिचा बोल तो पहा, बोलतो कसा शोकतापहा, ।
'कल्पना त्यजीं दूर तीकडे, बैस येउनी माझिये कडे.' ॥ ३१
'शाला बहूतर विशाला नसे दश दिशा हा उगा भ्रमत जो,
शाला सुरंग न दुशाला गळां धरि विशाला स्वतंत्र मत जो, ।
माला अनेक नृकपालांचिया गळिं अशाला कशास युवती ?
भाळावया न पद **काळां**तका उगिच बाळा कशी सुखवती ?' ॥ ३२

(गीति.)

'रक्षक मद्द्रव्याला **कुबेर** केला असे सुमित्र भला, ।
देइल फार धनाला शाल दुशाला उणें नसेचि मला.' ॥ ३३

(श्लोक.)

'बापें प्रत्यक्ष **दाक्षायणि**[3] पति बहुसा निंदितां ते शुभाक्षा
कांक्षा सोडूनि काया हुत करिच तदां तो **विरूपाक्ष**[4] शिक्षा[5] ।
**दक्षाला** लावि, तेंव्हां उपरि **गिरिसुता** होउनी मागुती ते
अंगीकारी तुम्हाला म्हणुनि **पुरहरा** पावली या गतीतें.' ॥ ३४

(सवाया.)

'**शुंभ निशुंभ** वधी बहु चंड अखंड मला उपहास करी ते,
याकरितां त्यजिलें सदना, अधुना न लगे कठिणा नवरी ते.' ।

---

१. मृगांचें गानलोलुपत्व सुप्रसिद्ध आहे. २. पदें. ३. दाक्षायणी=दक्षकन्या सती. दक्षानें भव (शिव) सती (आपली कन्या) या दोघांना यज्ञासाठीं पाचारण केलें नाहीं. तथापि माहेरघराच्या मोठेपणावर भिस्त ठेवून दाक्षायणी पतिसह दक्षयज्ञांत आली. तेंव्हां त्यानें तिचा अपमान केला. त्यामुळें कोपानें हिनें आपला देह यज्ञांत दग्ध केला—अशी कथा आहे. ४. शिव. ५. दक्षानें शिवाचाही अपमान करून त्यास नाराज केलें. तेंव्हां त्यानें दक्षास शासन वीरभद्राकरवीं करविलें—अशी कथा आहे.

भिल्लि वदे, 'कपटी बहु तूं शिरिं वाहुनि जन्हुसुता अनुरागें,
त्याहि वरी पण आपण ठेवुनियां हरिलें म्हणुनी त्यजि रागें.' ॥ ३५
ऐकत हें बसला न वदेच पुन्हा शिव पाहुनियां च सतीला,
गान करी हळु, मानहि हालवि, भान त्यजी श्रवणें भव भोळा. ।
'काय उपाय करूं? कसि होय मला [1]महिला वश ते चपला हे'
'चिंतुनि यापरि कोप त्यजूनि उमापति [2]आण अशी वदलाहे. ॥ ३६
'त्यजी पृथ्वी [3]नागाधिप, जळधिमर्याद विघडे;
अकाळीं सूर्याला [4]चरमगिरिवस्ती परि घडे ।
न सोडीं तूतें मी, समज मनिं तूं तें दृढ तरी,
प्रिये! होईं [5]पुष्पायुधजलधिमध्यें मज [6]तरी.' ॥ ३७
यापरी वदत काकुळतीनें, ऐकुनी स्मित करूनि सतीनें ।
'याल कां जरि मदीय घराला, शांतवीन तरि [7]पंचशराला.' ॥ ३८
ऐसें वदोनि उठली मग ते भवानी, जीची चरित्ररचना [8]सुरवृंद वानी, ।
बोलें अशा म्हणत तो तरि शूलपाणी, वाहे शिरीं सुरधुनी अतिरम्यवाणी. ३९
जंव हळु सरके तों पाठिशीं शंभु येतो
समजुनि वश ऐसा मानसीं निश्चयें तो, ।
त्यजुनि कृतकवेषा ते धरी [9]नैज रूपा.
झगझगित विराजे नित्य जे चित्स्वरूपा. ॥ ४०
कांचोळी तगटी कुचीं तटतटी साडी [10]लसे भर्जरी,
कंठीं चिंचपटी चुडे मनगटीं बोटीं मुदी साजिरी; ।
साजे [11]दाम कटीं सुभव्य प्रगटीं रूपासि तैं तो दिठी,
पाहोनी बहु ठीक शंकर मिठी घाली गळां नेहटी. ॥ ४१

(चूर्णिका.)

तत्समयीं अनेक [12]यानगतशतमखादि सुर सुजातपारिजातकद्रुम[13]कुसुमनिकर वर्षोनियां निज करीं प्रत्यूहमत्तगजकेसरी विविधसुगंधचंदनकस्तूरिकेसरीं उत्कंठित होऊनि [14]नीलकंठ विध्युक्त पूजिती सुकमळीं, तंव उठोनि [15]नगराजबाळी होऊनि बद्धांजळी बोलती झाली तेधवां. ॥ ४२

---

१. स्त्री. २. प्रतिज्ञा. ३. शेष. ४. अस्ताचलवास. ५. कामसागरांत. ६. नौका. ७. कामाला. ८. देवसमूह. ९. स्वकीया. १०. विलासे, शोभे. ११. कमरपट्टा. १२. विमानांत बसलेले इंद्रादिक देव. १३. पुष्प. १४. शिव. १५. पार्वती.

(श्लोक.)

'ते पाहिजे तरि वदा अजि वामदेवा! आणूनि देइन तुम्हां अजि देवदेवा!' ।
शंभू तदा स्मित करूनि म्हणे, 'मला गे, तूंवांचुनी प्रियतमा दुसरी न लागे.' ॥
परस्परें हास्यविनोदरीती, करीत दोघेंहि अनेक रीती, ।
हळूहळू तोषभरेंच जाती, समागमें विष्णुमहेंद्र जाती. ॥ ४४

(सवाई.)

डोलत डोलत चालत हांसत बोलत शंकर तोषहि लाहे,
जात सवें गिरिजा विरजा मग राजत शैल विराजित पाहे, ।
त्यावरि मंदिर सुंदर पाहुनि हाटकपाट विशाळ बसाया
घालुनि माळ गळ्यांत सुवासित अर्पुनि गौरि नमी सुरराया. ॥ ४५

(श्लोक.)

आनंदला शंकर तो सुरांला, देताचि कीं ईप्सित हो वराला; ।
घेऊनि आज्ञा मग सर्व जाती, तैं क्रीडती वंद्य सदा द्विजाती. ॥ ४६

(गीति.)

जे ब्रह्मोत्तरखंडीं कथिली व्यासें कथा तिची टीका ।
सादर परिसति त्यांला दे सौख्याला अशी जिची टीका. ॥ ४७

(श्लोक.)

मंदाकिनीधर अमंदासुखैक शुभकंदा सुहीरकरदा
कुंदाभशुभ्रतनु वृंदारकानत मुकुंदार्चितांघ्रिवरदा ।
गंधासि लुब्ध अरविंदाचिया सुमकरंदा जसा भ्रमर तो,
वंदारुभक्तजनमंदारका पदरविंदा तसें मन रतो. ॥ ४८

## उपसंहार.

(श्लोक.)

ज्याची सत्कविता प्रसिद्ध मिरवे संताचिया मंडळीं,
तो गोविंद पिता पवित्र जननी सावित्रि नामें भली, ।
त्याचा पुत्र मुकुंदनाम गिरिजाकांतास सद्भक्तिनें
पूजी सद्वचनावली सुकमळीं गुंफोनियां युक्तिनें. ॥ ४९

---

१. शिवा! २. गंगाधर. ३. कमलांच्या.

# ११. [1]अनामकविविरचित

## [2]मंत्रमयध्रुवचरित्र.

(गीतिवृत्त.)

### मंगलाचरण.

श्रीहरगौरीतनया! करींद्रतुंडा! गणाधिपा! ईशा! ।
साष्टांगप्रणति तुला फलो चरित्रीं मदीय वाग्[3] वीशा[4]! ॥

### (कथारंभ.)

श्री[5]स्वायंभुवमनुचे श्रीशतरूपोदरप्रसूतनय ।
त्यांत वरिष्ठ प्रि[6]यव्रत कनिष्ठ उत्तानपाद युक्तनय ॥ १

न करी राज्य प्रियव्रत अनित्य जाणूनि देहगेहातें, ।
तो गंधमादनीं करि हरिपरिचर्या त्यजूनि मोहातें. ॥ २

मोहनिशातम[7]तरणी नारदउपदेश तो तयें वरिला ।
त्याणें त्यजूनि कामादिक निर्मल हृदयिं भाविलें हरिला. ॥ ३

भगवन्नामगुणस्मृतिकीर्तनवंदनसुपूजनीं सकळ ।
करितां काळ व्यय तो, क्षणभरि त्यावीण होतसे विकळ. ॥ ४

गरुडध्वज! गोविंदा! गोपाळा! गोपिवल्लभा! रामा! ।
श्रीशा! सीताकांता! कंसारे! कृष्ण! भक्तविश्रामा! ॥ ५

वदतां नामें हरिचीं अंगीं पावोनि [8]अष्टभावातें ।
नारदसमागमानें प्राप्तहि झाला महाप्रभावातें. ॥ ६

तेव्हां तातें राज्याभिषेक केला कनिष्ठ पुत्राशीं ।
उत्तानपाद तो नृप पाळी राज्यास, सद्रिपु त्राशी. ॥ ७

वाहे न वात मोठा काळीं पर्जन्यवृष्टि राज्यांत, ।
ज्याचे प्रजेशिं पीडा होणें तो धर्महीं नसे ज्यांत. ॥ ८

---

१. हें काव्य पंताचें म्हणून आमच्याकडे आलेलें आहे, पण तें त्याचें नसावें असें दिसल्यावरून त्याचा समावेश 'अनामकविविरचित' काव्यांत केला आहे. २. या काव्यांत 'श्री नमो भागवते वासुदेवाय' ह्या मंत्रांतील अक्षरांचा सन्निवेश प्रत्येक गीतीच्या प्रथमस्थानीं करून मंत्र साधिला आहे म्हणून 'मंत्रमय' असें अन्वर्थक विशेषण योजिलें आहे. ३. वाणी. ४. विनायका. ५. स्वायंभू मनु=हा प्रियव्रत व उत्तानपाद यांचा पिता. ह्याच्या स्त्रीचें नांव शतरूपा. ६. प्रियव्रत=हा स्वायंभू मनूचा ज्येष्ठ पुत्र. याच्या स्त्रीचें नांव बर्हिष्मती. याला दहा पुत्र होते. ७. सूर्य. ८. मागें पृष्ठ १६ टीप २ पहा.

**सु**रुची **सु**नीति दोघी भार्या[1] ज्येष्ठा कनिष्ठिका असती, ।
गुणकांतिरूपयुक्ता नृपयोग्या अन्य भामिनी[2] नसती. ॥ ९
**दे**वी **सु**नीति असतां, परि राजाची प्रिया **सु**रुचि अबला, ।
तीच्या भयें न ते[3] प्रिय, यास्तव ते सर्वथा असे अबला[4]. ॥ १०
**वा**तें कंपित कदली जैसी तैशी भयें सपत्नीच्या[5], ।
असतां नृपही तैसा रात्रिदिनीं भीतिनें स्वपत्नीच्या. ॥ ११
**य**ज्ञांश पुत्र झाला दैवबळें भाविकर्मयोगानें, ।
केलें नाम **ध्रु**व तो ध्रुवपदिं प्रत्यक्ष मंत्रसद्गानें[6]. ॥ १२
**श्री**[7]**ह**रिकृपा जयावरि होइल तो कां न होय सन्मान्य[8]? ।
वंदिति सर्वहि ज्यातें, त्या न म्हणावें कदापि सामान्य. ॥ १३
**न**यबुद्धि शौर्य सद्गुण विद्या बल कांति तेज रूपादि ।
त्याग न करिती, ज्याचा बाल **ध्रु**व, नम्र ज्यास भूपादि. ॥ १४
**मो**हुनि ज्याच्या रूपें स्थावर होती समस्त जंगमसे ।
जंगम होती स्थावर, ज्याचे मुखशब्द सर्व आगमसे[9]. ॥ १५
**भ**र्तृप्रियासु**रु**चिसुत उत्तमनामा[10] सुतोद्भवश्रवणें[11] ।
बोले 'उत्तम जालें' नृपमंत्र्याप्रति महत्सुखप्रवणें. ॥ १६
**ग**र्वें पतिप्रियत्वें **सु**नीति ससुता[12] तिला[13] जसें गवत ।
जाणे न ती अभाग्या कैशी जीचा प्रसूत भागवत[14]? ॥ १७
**व**य पांचा वर्षांचें असतां एके दिनीं नृपपास[15]विध ।
जाउनि प्रणाम केला **सु**नीतितनयें सभांतरीं संविध[16]. ॥ १८
**ते**थें पाहुनि जननीसपत्नि[17]तें, नम्र तीसही भावें ।
असतां, तिचे मनातें ईर्षेनें तच्चरित्र[18] ना भावे[19]. ॥ १९
**वा**हुनि अंतःकरणीं तीचें भय भूमिपाल[20] तनयातें, ।
प्रगट न देतां आशीर्वाद मनीं दे सुपालितनयातें. ॥ २०
**सु**रुचि सुतातें पाहुनि सिंहासनगत नृपांकिं आरूढ, ।
स्वयमपि इच्छी हृदयीं तत्स्थानीं व्हावया समारूढ. ॥ २१

१. स्त्रिया. २. स्त्री. ३. ती सुनीति. ४. निर्बळ. ५. सवतीच्या. (सुरुचीच्या.) ६. नारदमंत्राच्या उत्तम पठनानें. ७. हें पद्य सुभाषितरूप आहे. ८. साधुवंद्य. ९. वेदासारखे. १०. उत्तम नाम ज्याचें. ११. पुत्रजन्मश्रवणें. १२. मुलासहित. १३. सुरुचीला. १४. भगवद्भक्त. १५. समीप. १६. यथाविधि. १७. सुरुचिला. १८. ध्रुवचरित. १९. रुचे, आवडे. २०. उत्तानपाद.

देखुनि सपत्नजननी आरोहणविषयक ध्रुवोद्योगा, ।
पाहुनि वक्रकटाक्षें नृपासही बोलली अंसद्योगा. ॥ २२

'वायां करिशी चित्तीं राजांकीं मी बसूं अशी बुद्धी, ।
बालत्वें नाहीं तुज यो उदरींचा नसें अशी शुद्धी. ॥ २३

यद्यपि नृपसुत असशी परि दुर्भाग्योदयप्रसंगानें, ।
आसनयोग्य न तूं शिशु! नं मिळे सद्भाग्य दुष्टसंगानें. ॥ २४

श्रीहरिसेवा जरि तूं जन्मांतरिं सांग बाल! करितास, ।
तरि तूं माझ्या उदरीं जन्मांतीं सावधान येतास. ॥ २५

नरपतिवीर्यज असतां जरि सिंहासन मिळे न ताताचें, ।
तो भाग्यहीन, धरि परि बळकट सांडेच रत्न हाताचें. ॥ २६

मोठी इच्छा हृदयीं मी नरपतिसुत बसेन भूपांकीं, ।
केली कधीं फळेना बालमनोरथपरंपरा रंकीं. ॥ २७

भगवत्सेवायोगें दुर्घट परि तें घडे स्वभावानें, ।
ती जरि करिशी बाला! माझ्या उदरीं सुजन्म भावानें. ॥ २८

गरिमामहिमालघिमादिक सिद्धी यत्कृपावलोकानें, ।
होती समर्थ तो प्रभु बाला! त्वां ऐकिला कधीं कानें. ॥ २९

वनचर होउनि भजती श्रीपति करुणासमुद्र राधावा ।
त्यांस प्रयत्नें करुनी माझ्या उदरीं स्वजन्म साधावा. ॥ ३०

तेणें होशी इच्छितयोग्य जसा वर्तमानिं उत्तम हा ।
तूं अन्यथा न होशी नरपतिपदप्राप्तिरूप प्राप्त मेंहा.' ॥ ३१

वाणी भावी जैसे सुरुचीची तो प्रकार सुचवी ते ।
श्रीपतिप्रेरणयोगें जाणति सद्बुद्धि तेच याचविते. ॥ ३२

सुरुचिवचनश्रुतिमात्रें झाला नृपति स्वमानसीं ग्लान, ।
परि तद्भयें करूनी न वदे तो, ना करी मुख म्लान. ॥ ३३

देहस्फूर्ति विरांली ऐकुनि वचनें सुंनीतितनयाची, ।
येउनि मातेपाशीं रडे उभा, भक्षणाशि ना याची. ॥ ३४

वाहति अश्रू नयनीं क्रोधें संतप्त देह, फुरफुरती ।
ओष्ठ, भ्रुकुटी वक्रा कांपे सर्वांग वाच ना पुरती. ॥ ३५

---

१. दुष्टमानसा. २. या सुरुचीच्या उदरींचा नव्हे. ३. हा चरण सुभाषितरूप आहे. ४. अष्ट महासिद्धि–अणिमा, लघिमा, गरिमा, महिमा, ईशिता, वशिता, प्राकाम्य, प्राप्ति. (भारत–अनुशासनपर्व.) ५. उत्सवा. ६. नष्ट झाली. ७. ध्रुवाची.

**य**द्वत् पूर्व न तनया पाहुनि धांवूनि जाय संनिहित, ।
माता घेउनि अंकीं केलें कोणीं वदे तुझें अहित. ॥ ३६
**श्री**देवीतें सांगति पुरचे तो सर्व वृत्तवृत्तांत ।
ऐकुनि म्हणे सुतातें, 'माझें हें कर्म कुत्सित नितांत. ॥ ३७
**न** करीं तात! क्रोधा, स्वकर्मवश जीव सर्व राहाती, ।
पुण्याच्या पापाच्या अनुसारें क्षेम दुःख पाहाती. ॥ ३८
**मो**ठी मी दुर्भाग्या, असुनी उत्तानपादनृपजाया ।
लाजे भार्यात्वें सुत तात तुझा परि सुखें मज भजाया. ॥ ३९
**भ**य मानुनियां ज्याचें लपती हिंसक समस्त भूविवरीं, ।
वाटे भयें तयाच्या **का**ळहि येऊनि तो मला न वरी. ॥ ४०
**ग**ति दुर्घट दैवाची, असंभवी येउनी कसें घडलें? ।
व्हावे ना सुत तुजला दुःख कधीं तेंच पाहणें पडलें. ॥ ४१
**व**ज्रासमान माझें शतधाही होइना उरःस्थल हें, ।
देऊं मि दोष कवणा जन्मांतर कर्मपाक कां न लहे? ॥ ४२
**ते**ही संचितकर्मा भोगिति जे सर्वथा शरण हरिला ।
मी तों अबला, जीचा मतिवैभव मोहशत्रुनें हरिला. ॥ ४३
**वा**हे वारा ज्याचा भयें तपे द्वादशात्म अग्नि करीं ।
वर्षे **म**घवा काळीं, मृत्यु हरी, जंतुदाह वन्हि करी. ॥ ४४
**सु**रवरनुत तो श्रीहरि सर्वांच्या आर्ति दूरवी नामें, ।
दीनोद्धरण कृपालय त्याविण परदैन्य हे हरी नामें.' ॥ ४५
**दे**वी सोडुनि धैर्या विलपे दावाग्निदग्धदावलता ।
जैशी तैशी देहीं शोकाग्नीनें यदीक्षणें मलता. ॥ ४६
**वा**हावें अश्रू जें परि नयनीं शोकतापयोगानें ।
राहति, झाले श्यामच्छविदंतच्छेद सुरक्त रागानें. ॥ ४७
'**य**द्यपि मत्सर धरुनी **सु**रुचीनें वर्णिला महोपाय, ।
तदपि कपट सोडुनि तूं अंधोक्षजाचे भजे सुता! पाय. ॥ ४८

---

१. पहिल्याप्रमाणें नाहीं अशा. २. समीप. ३. पुरचे लोक, पौरजन. ४. अत्यंत. ५. पूर्वीच्या जमा झालेल्या कर्मांला. ६. सूर्य. ७. इंद्र. ८. पीडा. ९. ओंठ. १०. अधोक्षज=विष्णु. याचा विग्रहार्थ असाः—(१) 'अधो न क्षीयते जातु यस्मात्तस्मादधोक्षजः,' (२) 'द्यौरक्षं पृथ्वी चाधस्तयोर्यस्मादजायत। मध्ये वैराजरूपेण ततोऽधोक्षज इष्यते॥', (३) 'अक्षात् इंद्रियाज्जायते इति अक्षजम्=

श्रीहरिचे चरणाचे परिचरणें पारमेष्ठ्यपद भोगी, ।
द्विपरार्धांत विरिंची वंदिति ज्यातें मनोजयी योगी. ॥ ४९

नरवर तुझा पितामह स्वायंभुव मनु समस्त यज्ञांनीं ।
सेवुनि भौम स्वर्ग्या सुखा लभे मोक्षजासही ज्ञानी. ॥ ५०

मोठी ज्याची प्रौढी त्रिदेशीं ज्याच्या पदाब्जमार्गातें ।
शोधिति मुमुक्षु ज्याचे भृत्य न गणती तनूज स्वर्गातें. ॥ ५१

भगशब्दें जें विश्रुत वैराग्यैश्वर्य धर्म अपवर्ग ।
श्रीयश तद्युक्त हरी भृत्यांतें देत इच्छिले वर्ग. ॥ ५२

गति त्यावांचुनि दुसरी दुःखच्छेदार्थ न स्फुरे मजला, ।
श्रीही ज्यातें शोधी ब्रह्मादिक शोधिती सदां तिजला.' ॥ ५३

वचना ऐकुनि जननीच्या ध्रुव संक्षुब्ध युक्त आधीनें ।
हरिपरिचर्यार्थ निघे नगरात्संस्तभ्यमानसाधीनें. ॥ ५४

तेव्हां माता आशीर्वाद, 'वदे सर्व मार्ग शिव तनय! ।
तुजला असो दिशाही रक्षो श्रीकांतकांतविधितनय.' ॥ ५५

वाटे जातां भेटे नारद जाणूनि बालकृत्यातें, ।
स्पर्शुनि मस्तकिं हस्तें पापघ्नें विस्मयें वदे त्यातें. ॥ ५६

'सुव्रत नृप! जा तूझा काल न मानापमानबोधाचा, ।
खेळावें बाळांनीं, स्पर्शहि त्यांला न होय क्रोधाचा. ॥ ५७

देहा हंते करुनी कळलें जरि ना करी असंतोष, ।
जन्मांतरकर्में सुख दुःख घडे म्हणुनि ठेविं संतोष. ॥ ५८

वास करावा गेहीं, प्रारब्धें फार अल्प संनिहित, ।
पाहुनि गति दैवाची, मत्सर त्यागूनि त्यांत मानि हित. ॥ ५९

येज्ञेश्वरप्रसादा इच्छिशि मात्रोपदिष्टयोगानें, ।
सुलभ न वाटे मज तो जन्मशतार्जित सुकष्टभोगानें. ॥ ६०

श्रीविद्याकुळरूपप्रतापवयतेजशीलवीर्यांनीं, ।
होय न प्रसन्न श्रीहरि, सर्वद तो कीर्तिबुद्धिशौर्यांनीं. ॥ ६१

---

प्रत्यक्षज्ञानम्, तदधरं ग्राहकत्वाभावात् हीनं यस्य सः', (४) 'अधःकृतं अक्षजं=इंद्रियज्ञानं येन,' याप्रमाणें या शब्दाचे विग्रह आढळतात.

१. सेवनानें. २. देवतापद, सर्वांहून जें उच्च पद तें. ३. नियतमनस्क. ४. आज्ञा. ५. देवांमध्यें. ६. मोक्ष, जन्ममरणमुक्ति. ७. मानसिक चिंतेनें. ८. कल्याणप्रद. ९. श्रीविष्णुप्रिय नारद. १०. मान अथवा अपमान मानण्याचा. ११. स्कंध ४ अ० ८ श्लो० २७. १२. विष्णुप्रसादा.

**न** करीं आग्रह यास्तव बालवयीं तूं विमुक्त भोगानें, ।
शोधिति केवळ त्यातें जाणति ना पण सुतीव्र योगानें. ॥ ६२
**मो**ठे मोठे मुनिवर आचरती योग जन्मशतमानें, ।
श्रमती केवळ, परि ते न पाहिले माधवें न सुतमानें. ॥ ६३
**भ**गवत्परिचर्याग्रह तरि श्रेयस्कालिं बाल! संचरशी, ।
त्याच्या कृपाकटाक्षें क्रोधादिज सर्व ताप संहरशी. ॥ ६४
[1]**ग**ण हे स्वात्मरिपूचे मित्रत्वें करुनि शत्रुता करिती, ।
पाहुनि छिद्र नराच्या विवेकबुद्धीस सर्वथा हरिती. ॥ ६५
**व**दतों योग्य न त्यांच्या वश होउनि अप्रसंगिं हें करणें, ।
विश्वासानें त्यांच्या दुर्मार्गानें तिहीं सदा करणें.' ॥ ६६
**ते**जस्वी ध्रुव ऐकुनि वचनें देवर्षिचीं वदे नमुनी, ।
'दुर्घट हरिसंतोष ज्यांतें बहु जन्मिं पावती न मुनी. ॥ ६७
**वा**यां इच्छा माझी होती परि सत्समागमें वाटे, ।
होइल सत्य सुफळदा भवत्कृपापांगदृष्टिनें वाटे. ॥ ६८
[2]**सु**मनःसंगें चुंबी [3]शैर्वललाटस्थ चंद्रशकलातें ।
मुंगी भवत्सुसंगें दुर्घट परि सुलभ होय न मला ते. ॥ ६९
**दे**हीं होती माझ्या दुर्भाग्यस्थिति सुमस्तकें वरिली, ।
हस्तस्पर्शमिषें ती इच्छित दानार्थ सर्वथा हरिली. ॥ ७०
**वा**रित समस्त चिंताज्वर झालों भाग्यभाजन[4] प्रायें ।
भवदीय दृष्टिनीरें स्पर्शानें भाषणें अभिप्रायें. ॥ ७१
**य**द्यपि मातें कथिलें उपशमपीयूष[5] दाह जे हरतें, ।
सुरुचिवचनशरछिद्रित हृदयांतुनि तें क्षणींच पासरते. ॥ ७२
**श्री**चरणातें शरणागतपद उत्कृष्ट जें त्रिलोकांत ।
अन्यीं उपभुक्त न तज्जयशीला वद तु मार्ग एकांत.' ॥ ७३
**न**त सुर समस्त ज्यातें [6]कमलासन [7]तत्तनूज श्रीचरण ।
वीणावादनशील [8]द्युमणिपरी सर्वलोकतमहरण. ॥ ७४
**मो**हुनि ध्रुवोक्तवाक्यें **ना**रद [9]संप्रीत मंदहासातें ।
करुनि वदे अनुकंपाद्रव हृदय चंद्रकुंदभासा ते. ॥ ७५

---

१. समुदाय. २. पुष्पांच्या समागमानें. ३. शिवमस्तकावरील चंद्राच्या कोरेतें. ४. पात्र. ५. अमृत. ६. ब्रह्मदेव. ७. त्याचा पुत्र. (नारद.) ८. सूर्यासारखा. ९. संतुष्ट.

**भ**गवद्भजनसुपंथी [१]मात्रभिहित सर्व कामना पुरवी, ।
जो **वा**सुदेव भगवान् भृत्यांचे पापपर्वतां नुरवी. ॥ ७६

**ग**मन करी [२]रवितनयातटीं हरीसंनिधान दिनरजनी ।
तेथें जाउनि वेगें सर्वांशें [३]प्रवण होइ तद्भजनीं. ॥ ७७

[४]**व**नजातकांततनयाजलावगाहा करूनि [५]अनुसवन ।
गुरुदेवविप्रवृद्धादिकां करावें अहर्निशीं नमन. ॥ ७८

**ते**थें पाहुनि विजनस्थलनिरुपद्रव कुशाजिनी रचित, ।
आसति पद्माद्यासनरूढ समीरादिरोधनी प्रचित. ॥ ७९

**वा**रंवार सुपूरक कुंभकरेचकविधिक्रिया विमल, ।
करुनी क्रमें हरावें प्राणेंद्रिय [६]मानसप्ररूढमल. ॥ ८०

**सु**विचक हृदयीं ध्यावा प्रसादसंमुख प्रसन्नमुखनयन, ।
सुभ्रू सुनास सुंदरकपोल भृत्यार्तिभार अपनयन. ॥ ८१

**दे**व शरण्य कृपार्णव तरुण अरुण ओष्ठ ईक्षणें अधर, ।
रमणीयावयवप्रभु भृत्याश्रय गोत्रभूति भूमिधर. ॥ ८२

**वा**रिदनील चतुर्भुज शंखगदाचक्रपद्मयुत सुकर, ।
कंबुग्रीवविशालोरःस्थल भृत्यारिवीर शांतिकर. ॥ ८३

**य**ज्ञेशकंठकौस्तुभहारोज्ज्वल पीतवस्त्र [७]परिवीत, ।
[८]कांचीकलापवेष्टित वनमाला पादलंबि सुनिवीत. ॥ ८४

**श्री**वत्सकुंडल श्रीकिरीट वलयांगदादि युक्तांग, ।
मानसनेत्रविमोहक ध्यावा श्रीहरि क्रमें विभक्तांग. ॥ ८५

**न**खमणिपंक्तिसुशोभित रत्नखचित कनकनूपुरें [९]लसित, ।
[१०]हृत्पद्मकर्णिकास्थित [११]पादकजद्वंद्व संस्मरें कसित. ॥ ८६

**मो**दक सकल जनांचे श्रीमानस भृंगराज सत्पद्म, ।
तुलसीचे भक्तांचे सद्माश्रय संस्मरें सुपद पद्म. ॥ ८७

**भ**गवत्स्वरूप एवंविध मंदस्मित प्रसन्नतायुक्त, ।
संयुक्त सानुरागावलोकनें संस्मरे समायुक्त. ॥ ८८

---

१. जननीकथित. २. यमुनातीरीं. (मधुवनीं.) ३. नम्र. ४. कमलकांत(सूर्य)तनया–यमुना. कालिंदी. ५. ब्रह्मयज्ञानंतर. ६. श्लोक ४४ पहा. ७. पांघरलेला. ८. कांचीभूषणयुक्त. ९. शोभित. १०. हृदयरूप कमळाच्या गाभ्यांत रहाणारा. ११. कमल.

**ग**ति चंचल चित्ताची श्रीवत् परि सोडुनी [1]स्वगतधर्म ।
भगवत्स्वरूपध्यानें होउनि निर्वृत्त होय सुख धर्म ॥ ८९

**व**दनें मंत्र जपावा प्रणवादि श्र्यादि वा सुगुप्ततर ।
जरि सप्तरात्र जप करि तो पाहे खेचरांशि शीघ्रतर. ॥ ९०

**ते** जन मोहभगप्लव ते वारिति सुकर देहवास जय ।
अत्रोक्त मंत्रजाप्यें दुर्घट उत्कृष्ट लोक दे विजय. ॥ ९१

**वा**स समस्तीं ज्याचा प्रेरकरूपें समस्त ज्या उदरीं ।
अणुवद्ब्रह्मांड जसा [2]सर्षप कणसा स्थित स्थिरा सुदरीं ॥ ९२

**सुर** ज्याच्या वासातें वंदिति परि ते कदा न अनुभवती ।
तद्भक्त तत्कृपेनें भावित जी सर्वथा हरी भवति ॥ ९३

**दे**व क्रीडा विजय द्युति नुति सुज्ञानप्राप्ति गति पूर्ती ।
रसिक स्वभावरूप स्वभक्त भावगृहीत सन्मूर्ती ॥ ९४

**वा**रंवार सुमंत्रोच्चारें प्राप्तोपचारसंभारीं ।
शुचिजलतुलसिकुसुमफलमूलादिकिं नित्य पूंजि दंभारी ॥ ९५

**यदि** न मिळे श्रीप्रभुची प्रतिमा रविवन्हिनीरवसुधेंत ।
मौनें पुजा करावी तृप्त मितारण्यभवनवसुधेंत ॥ ९६

**श्रीह**रिची जीं भावी नृसिंह हरि कूर्म मीन अवतारीं ।
चरितें सदा स्मरावीं श्रवणस्मरणार्ह भक्त संतारी ॥ ९७

**[3]न**तसुरपादप कायें वचसा मनसा मनोगत स्वरसें ।
परिचितभावविवर्धन तोषुनि भृत्यासि दे फल स्वरसें. ॥ ९८

**मो**क्षार्थ इंद्रियार्थीं विरक्त अनुरागभक्तियोगानें ।
भजति रमाकांतातें योगि निरंतर मनःप्रयोगानें.' ॥ ९९

**भ**वहरसुरर्षिवाक्यश्रवणें [4]रोमांचकंचुतिकदेह ।
करुनी प्रदक्षिणा [5]सुप्रणति [6]विशे मधुवनीं असंदेह. ॥ १००

**ग**त नृपसुत तो असतां प्रविशे [7]नृपमंदिरीं सुरर्षिवर, ।
पूजित सुखासनस्थितदर्यें पुसे शीघ्र पाहुनी विवर. ॥ १०१

'**व**सशि पदीं सुखयोगें, परि चिंताग्रस्त भासशी वदनीं, ।
[8]धर्मार्थकाम ते कीं असती संसिद्ध सांग बा! सदनीं?' ॥ १०२

---

१. मूळचा स्वभाव. २. मोहरी. ३. कल्पतरूनें वंदिलेला. ४. रोमांचानें ज्याचें शरीर परिपूर्ण झालें असा. ५. नमस्कार. (श्लोक ६२.) ६. शिरला. ७. उत्तानपादसदनीं. ८. धर्म अर्थ किंवा काम हे सिद्ध आहेत किंवा नाहींत?

'ते मुनि! कृपाकटाक्षें जनमात्रा सिद्ध सर्व विषयांत, ।
एतन्न्यून असे मज स्त्रीजित संसक्त अक्षविषयांत. ॥ १०३
वायां स[1]मातृक ध्रुव निर्वासित[2] पंचवर्ष स[3]द्बुद्धी, ।
अकरुण पिशुन क्रूरस्वभाव मी धृष्ट दुष्ट दुर्बुद्धी. ॥ १०४
सुश्रांत निद्रित क्षु[4]द्युक्त परिम्लानकांति वदना तें ।
व्याघ्र वृकादिक हिंसक खातिल त्या काय भू[5]तिसदनातें?' ॥ १०५
'दे[6]वें रक्षित तूझा बाल, वृथा शोक त्याविषयिं करिशी, ।
जाणुनि न तत्प्रभावा ज्याचें यश त्रिभुवनांत संस्मरशी. ॥ १०६
वां[7]तादिकांस दुष्कर तनय तुझा करुनि कर्म ते लोकीं, ।
येइल थोड्या काळें विस्तारित तव यशास अवलोकीं.' ॥ १०७
यद्यपि देवर्षिवरें भविष्य कथिलें ध[8]रावरा सकल, ।
परि तच्चिंतायोगें अनादरुनि रा[9]ज्य, सर्वदां विकल. ॥ १०८
श्रीमधुवनांत जाउनि ऋष्युक्त विधी करूनि हरिभजन, ।
करिता झाला बाल ध्रुव पाहुनि वासभूमिका विजन. ॥ १०९
नमुनि श्रीचरणातें तिसऱ्या तिसऱ्या दिनांत भक्षूनि, ।
बं[10]दरकपित्था मासीं प्रथमीं युक्तीं स्वदेह रक्षूनी. ॥ ११०
भोजुनि षष्ठाषष्ठांतीं तृणपर्णादिकीं द्वितीयांचे[11], ।
नवमीं नवमीं जल[12]भुक् करि परिचर्या क्रमे तृतीयाचे. ॥ १११
भक्षुनि वायु द्वादश दिवसांतीं सर्व देववर्यातें, ।
धारणयोगें श्वासा जिंकुनि तो बाल नेइ तुर्यां[13]तें. ॥ ११२
गर्भी ज्याचे सकळ ब्रह्मांडस्थित नृपात्मज त्यातें, ।
ध्यातां पंचममासीं एक पदानें उभा सुभृत्यातें. ॥ ११३
वपु ज्याचें हालेना स्थिर जैसा न[14]ग समस्त आधारीं, ।
भूतेंद्रियाश्रयातें चित्तातें बाळ रोधुनी धारी. ॥ ११४
तेव्हां पादांगुष्ठाक्रांत मही ध्रुव यदैकपादानें, ।
स्थित अर्ध नम्र जैशी नौ[15]का होते गजेंद्रपादानें. ॥ ११५

---

१. मातेसह. (श्लोक ६५.) २. निष्कासित. ३. विचक्षण. ४. क्षुधार्त. ५. ऐश्वर्यधामातें. ६. देवगुप्त, हरिरक्षित. ७. श्लोक ६९ पहा. ८. राजाला. ९. राज्यलक्ष्मीचा अनादर करून. १०. कपित्थ व बदर यांतें भक्षून. ११ दुसऱ्या महिन्यांत प्रत्येक सहाव्या दिवशीं शीर्ण तृणपर्णें भक्षून आत्मवृत्ति केली. (श्लोक ७३.) १२. जलसेवी. १३. चवथ्या मासातें. १४. पर्वत. (श्लो० ७६.) १५. ज्या नौकेंत हत्ती असतो ती नौका जशी डळमळते तशी.

**वा**यू रोधुनि ध्यातां स्वांतीं विश्वाश्रया[1] अनन्यमती,[2] ।
पीडित लोक[3] सदेव श्वासनिरोधें[4] हरीस[5] संनमती. ॥ ११६

‘**सु**[6]रवृजिनार्दन! सकलां लोकांचे प्राणरोध जाणोनी, ।
आलों शरण्यवर्या! संप्रति तुज शरण ईश नेणोनी.’ ॥ ११७

**दे**वांच्या सभयोक्ती[7] ऐकुनि त्यां ‘जा’ म्हणे ‘स्वधामातें,[8] ।
युष्मत्पदा न इच्छी बाल ध्रुव, शरण विश्वधामातें. ॥ ११८

**वा**तनिरोध ज्याच्या[9] प्राणनिरोधें समस्त लोकाचा, ।
पाळीन मी समस्तां, देउनि उत्कृष्ट लोक तोकाचा. ॥ ११९

**य**ज्ञेश सर्वभूतीं वसतो तो **वा**सुदेव नमन तया, ।
स्वामी **वि**नायकाचा बालग्रह पालि देव सुमन तया.’ ॥ १२०

**श्री**भगवद्वचनातें ऐकुनि जाती सुर स्वंवासातें;[10] ।
**ग**रुडा तदां पहाया **मं**[11]धुवन अवलंबि पीतवासा[12] तें. ॥ १२१

**न**[13]रवरसुत निजहृदयारविंदकोशांत[14] योगतीव्रधियां[15] ।
पाहत होता विद्युत्प्रभस्फुरितविश्वसंश्रया[16] सुधिया.[17] ॥ १२२

[18]**मो**हांधकाररवि तो श्रीहरि होता सुगुप्त विभ्रांत ।
उघडुनि नयनें पाहे विकल पुढें स्वानुभूत संभ्रांत. ॥ १२३

**भ**गवद्दर्शनसंभ्रमसंभ्रांत **ध्रु**व समस्त अंगातें ।
नमवुनि दंडवदुर्वीतलिं[19][20] वंदी **म**[21]दनमातृरंगातें. ॥ १२४

[22]**ग**जकरलंबभुजांनीं आलिंगी, चुंबितो मुखीं जैसा ।
दृष्टीं पाहत जाणो पीतो तन्मुखसुधा,[23] नमी[24] तैसा. ॥ १२५

---

१. विश्वनाथा. २. एकाग्रचित्त, अनन्यमनस्क. ३. ‘लोक सलोकपाल निरोधें’ असा अन्य पाठ. ४. प्राणनिरोध झाल्यामुळें. ५. स्कंध ४ अ० ८ श्लो० ८१ पहा. ६. सुर+वृजिन+अर्दन=देव+पाप, क्लेश+नाशक=देवांचें पाप अथवा क्लेश नष्ट करणाऱ्या (ईशा!) ७. भयदर्शक वचनें. ८. स्वगृहातें. ९. ज्या ध्रुवाच्या. १०. आपल्या गृहातें (स्वर्गातें.) ११. या मधुवनांत ध्रुव होता. १२. पीतांबरधारी (कृष्ण, विष्णु.) १३. उत्तानपादपुत्र. (ध्रुव.) १४. निज+हृदय+अरविंद+कोशांत=स्वीय हृदय+कमल+गर्भांत=आपल्या हृदयरूप कमलांच्या गर्भांत. १५. योगानें तीव्र झालेल्या बुद्धीनें. १६. विद्युत्प्रभ+स्फुरित+विश्वसंश्रया=विजेसारखी प्रभा ज्याची अशा+स्फुरण पावलेल्या+विश्वाचा आश्रय अशा. १७. उत्तम धी (बुद्धि) ज्याला आहे त्याला. (अ० ९ श्लो० २.) १८. मोहरूप अंधकाराचा रवि (सूर्य—प्रकाशानें नाशक असा विष्णु.) १९. दंडाप्रमाणें सर्व आंगें नम्र करून. २०. उर्वीतलिं=पृथ्वीच्या पृष्ठावर. २१. मदनाची माता रुक्मिणी तिच्या रंगातें (क्रीडास्थानातें—कृष्णातें.) २२. हत्तीच्या सोंडेसारख्या लांब बाहूंनीं. २३. पीतो तन्मुखसुधा=त्या विष्णूचें मुखामृत प्राशन करतो. (अ० ९ श्लो० ३.) २४. वंदी, नमन करी.

**व**दनें [१]अधोक्षजाची [२]अतद्विदा स्तुति घडे न [३]बालाला ।
इंगित सर्व हृदिस्थ प्रभु जाणुनि शंख लावि गालाला. ॥ १२६

[५]**ते**णें [६]भगवत्प्रतिपादित दैवी [७]वाणि लब्ध भद्रातें, ।
[८]ज्ञातपरात्मविवेक स्तवी [९]तिणें शीघ्र त्या [१०]सुभद्रातें. ॥ १२७

**वा**सुविविधमंत्राचे [११]संप्रणवाचे द्वयेंदुसद्वर्ण ।
एकेकश्रवणानें न किमपि ते होति शुद्ध जे कर्ण. ॥ १२८

**सु**रवर ईश विधि स्वरगुणादियुक्तप्रणव शुद्ध सत्वांत, ।
निर्गुणसगुण बिचारे प्रेरक पाकांत शुद्ध सत्वांत. ॥ १२९

**दे**वक्रीडायोगें नानापरि एक चिद्धनानंद, ।
सद्वृत्तसंविदेनें प्रपन्न होती सुसंचितानंद. ॥ १३०

**वा**तादिशत्रुमित्रा भोगानंदादि काम जे भजती, ।
तद्भक्तसंग टाकुन नरकिंनर निजसुखा न ते सजती. ॥ १३१

**य**तिवरसावृतिमंडलमंडन पंडितज **वा**सुदेवातें ।
रोधुनि वा ते हृदयीं ध्याती त्या शरण **वा**सुदेवातें. ॥ १३२

**श्री**चरणातें जे मम प्रविष्टहृदिधींद्रियासुदेवातें ।
[१२]चेतविती तच्छक्ती निजधामें नमन **वा**सुदेवातें. ॥ १३३

**न**सतां अनेक एक स्वजून शक्त्याप्रविष्ट देवातें, ।
नानेवभांसती त्या **श्री**चरणा नम्र **वा**सुदेवातें ॥ १३४

**मो**हारण्यानलयद्दत्तज्ञानेजगद्विधी पाहे, ।
मुनिग्रहतदंघ्रिमूलाकृतज्ञ विसरे न ते सुधी पाहे. ॥ १३५

**भ**वभयहरा प्रभूतें भजती जे विषयभोगकामानें, ।
जे सर्वत्र सुलभ मति हरिली त्यांची समूल कामानें. ॥ १३६

**ग**मते न त्यास ते सुख ब्रह्मींही तुच्छ देवतावास, ।
त्वत्पादचिंतनीं जें त्वद्भक्तकथा श्रवी श्रितावास. ॥ १३७

---

१. विष्णूची. २. अ+तद्+विदा=न+तीला+जाणणाऱ्या=त्या स्तुतीला न जाणणाऱ्या. ३. मुलाला–ध्रुवाला. ४. श्लोक ४ पहा. ज्ञान प्राप्त होण्यासाठीं विष्णूनें ध्रुवाच्या गालाला शंखस्पर्श करविला. ५. त्या कंबुस्पर्शानें. ६. भगवंतानें दिलेल्या. ७. दैवी वाणी त्या भद्रातें (कल्याणप्रद कालातें) प्राप्त झाली. ८. ज्ञात+परात्म+विवेक=विदित+ईश्वरजीव+निर्णय=जाणिला आहे ईश्वर आणि जीव यांजविषयीं निर्णय ज्यानें असा (ध्रुव.) ९. त्या वाणीनें. १०. उत्तम मंगल असा विष्णु त्यातें. (श्लो० ५.) ११. ओंकारयुक्ताचे. १२. श्लो० ६ पहा.

**व**सशी ज्यांच्या निर्मल हृदयीं त्याचा असो विपुल संग ।
तत्प्राप्य [1]सत्कथामृतपानमदें गणिन मीन भवभंग. ॥ १३८
**ते** न स्मरती गृहधनकलत्र सत्पुत्र देह मित्रातें ।
रत संगीं जे सेविति पद्मोद्भवपौत्रपुत्रमित्रातें. ॥ १३९
**वा**ग्बाण दैत्यमर्त्यव्याल द्विजमृगनगादिकीं भरते, ।
[2]महदादि युक्त जाणे हें रूप ब्रह्म, न प्रभो! परते. ॥ १४०
**सु**रलोकांतें घेउनि [3]उदरीं कल्पांतिं [4]शेषिं जे निजते ।
[5]यन्नाभिपद्मसंभव **वि**धि त्या मी नम्रिजे भवन्निजते. ॥ १४१
**दे**ह श्रीचरणाचा भगवान्सर्वज्ञ [6]शुद्ध निजतंत्र ।
अविकारि [7]आदिपूरुष अभिन्नदृष्टा स्वभक्त परतंत्र. ॥ १४२
**वा**हति ज्यांपासूनि प्रवाहरूपें नदी तवाधारा ।
जैशा विद्याविद्यादिक शक्ती शरण त्या सुखाधारा. ॥ १४३
**य**द्यपि **श्री**चरणातें सेविति जे मूर्ख कामभावानें ।
परि धेनुके वदति ते फल रक्षति त्यां निज स्वभावानें. ॥ १४४
**श्री**कांत श्रितवत्सल श्रुतयशगुण कर्म नाम श्रमहरणा ।
प्रणवप्रतिपाद्य प्रभु प्रणववपू प्रणवरूप पुंभरणा. ॥ १४५
**न**रनागनीर निर्जर कृशानुनभपवनभूगुणाहून ।
मायेहुनिहि विलक्षण निषेध शेषप्रभूस पाहून. ॥ १४६
**मो**ठे मोठे **म**न्मथमदखंडनमंडनादि हस्तांतें ।
मस्तकिं ठेवुनि चरणीं नमती त्या नम्र शंखहस्तातें. ॥ १४७
**भ**वभीति मूरिभूभरभूतासुरभंजकास चक्रातें ।
जो उद्धरी करींद्रा वक्रीं फाडूनि क्रुद्धनक्रातें. ॥ १४८
**ग**विगातिगीतिनें गुण गूढ जयाचे गरिष्ठ गतकाम ।
**शु**कसनकादिक **ना**रद **ग**दाधर प्रभु सुपूर्ण सत्काम. ॥ १४९
**व**रवारिवारिवाहा व्रजवनिता वृतवनावनीभरणा ।
वनचरविनोदशीला वनजवदनवनजयुक्त करचरणा. ॥ १५०

---

१. श्लोक ११ पहा. २. श्लोक १३ पहा. ३. श्लो० १४ पहा. ४. शेषाच्या उत्संगीं. ५. ज्याच्या नाभिकमलापासून संभव (जन्म) ज्याचा असा. ६. मलिन नव्हे असा. ७. सत्त्वादिमान्. (श्लो० १५.)

**ते**तरिरिव तरती जे प्रस्तर तरती न तारती अन्या ।
वन्या तारुनि सैन्या सुरदैन्या हरि तया नमी धन्या. ॥ १५१

**वा**रधि पर्वतवासुकि सुपर्वगर्विष्ठ दैत्यदनुजांत ।
स्वांशें प्रविष्ट होउनि सुधार्थ मंथी प्रसिद्ध मनुजांत. ॥ १५२

**सु**रसरियित्पदसरसी जनरवतुंडे भिन्न अंडकवचाच्या(?) ।
छिद्रें येउनि तारी सकलासंगें सुरेंद्रकवचाच्या. ॥ १५३

**दे**वद्वेषें देता **प्र**ल्हादा दैत्य दुःखजातातें ।
[१]स्तंभीं प्रकटुनि विदरी उदरी नखरी **म**रीचनातातें. ॥ १५४

**वा**गीशदेवकिंनरदनुजमनुजसिद्धदैत्यनागानीं ।
स्तविला, गाती ज्यातें लुब्धा विद्या सुरांगना गानीं. ॥ १५५

**य**ज्ञें जया यजाया प्रवृत्तविधिमंत्रतंत्रवस्तूंतें ।
कल्पुनि यजी यदंगे शरण तया मी यतींद्रवस्तूतें.' ॥ १५६

**श्री**चरण स्तुति ऐकुनि प्रसन्न होऊनि [२]भूपबाला ते ।
[३]अनुरागें वदती, 'घे [४]दुर्रोप पद देत तूज बाला! तें. ॥ १५७

**न** कधीं जें कोणातें प्राप्त, न [५]नाशे [६]त्रिलोकभारांतीं, ।
करिती प्रदक्षिणा [७]मुनि **[८]धर्मा**नल**क**श्यपेंदु दिनराती. ॥ १५८

**[९]मो**हें [१०]संपन्नजननी [११]मृतपुत्रा [१२]दावदग्ध होईल, ।
तेव्हां राज्य तुला नृप देइल जेव्हां वनास जाईल. ॥ १५९

**भ**जसी सहस्र षड्गुण [१३]षड्वर्षें सत्य राज्यभोगातें, ।
बहु दानयज्ञभारें [१४]यजुनि स्मरशील अंतिं योगातें. ॥ १६०

**ग**मन घडे तेव्हां **विधिश**र्वसुरेंद्रादि वंद्य लोकातें, ।
ऋषिमंडळावरी, जो [१५]यद्रंत न करी कदापि शोकातें.' ॥ १६१

**व**र देउनि **ग**रुडध्वज बालातें शीघ्र जाय [१६]निजधामा, ।
**ध्रु**वही संतप्त [१७]पुरा, जरि [१८]हरिपादप्रसादजितकामा. ॥ १६२

---

१. स्तंभ=खांब. २. ध्रुवा. (श्लो० १८-१९.) ३. प्रीतीनें. ४. प्राप्त होण्यास कठीण. ५. जें पद न नाशे (नष्ट होत नाहीं.) ६. तीन लोकांच्या समूहाचा अंत झाला असतांही, लोकत्रयनाश झाला असतांही जें अनश्वर. ७. सप्तर्षि. ८. धर्म+अनल (अग्नि)+कश्यप+इंदु (चंद्र) [अ० ९ श्लो० २१.] ९. पुत्रमोहानें, उत्तम नामक पुत्र मृगयेला गेला असतां नष्ट झाला तज्जन्य मोहानें. १०. सुरुचि. ११. मृत आहे पुत्र (उत्तम बालक) जीचा अशी. १२. वनांत पुत्राचा शोध करीत असतां वनवन्हिदग्ध. (श्लो० २३.) १३. छत्तीस सहस्र वर्षें. १४. यजन करून, पूजन करून. १५. जेथें गेलेला. १६. श्लोक २६ पहा. १७. पुराला गेला. १८. हरिचरणप्रसादानें जित (जिंकिला) काम ज्यानें असा. विष्णुपादसेवनानें संप्राप्तमनोरथ असा.

**ते**व्हां मार्गीं येतां संतापें चिंत्ति चिंति, 'हें काय ।
केलें मी मूर्खानें, प्रसन्न करुनी हरी जगत्काय[1]? ॥ १६३

**वा**तादिरोधनानें अनेक जन्में न जाणिती ज्याच्या[2] ।
**स**नकादिक स्वरूपा पादच्छायेसि पावुनी त्याच्या. ॥ १६४

**सु**रवरवृंदांनीं मद्धी[3] हरिली मत्सरें खरें वाटे, ।
जेणें न मानिलें मी भाषित[4] देवर्षिचें खरें वाटे[5]. ॥ १६५

**दे**वगुरूच्या मायेकरूनि मानूनि भेद[6] अज्ञानें[7], ।
नसता दुसरा शत्रू संतापें तत्समूह अज्ञानें[8]. ॥ १६६

**वा**रण भवरोगाचा वैद्य प्रभु त्यास रोगकारण जें ।
वरिलें न तें अभाग्यें, समूल रोगा करीत वारण[9] जें. ॥ १६७

**य**ज्ञेश्वरास साधुनि देतां निज राज्य, याचिलें मिषपण[10], ।
मूढ जसा राज्यांतें धनदात्यां याचि रंक शालिपण[11]. ॥ १६८

**श्रीके**शवचरणांबुजरज सेवीजे न इच्छती अन्य, ।
दास्यावांचुनि त्याच्या दैवबल प्राप्ततृष्ण ते धन्य.' ॥ १६९

**न**रपतिसुत निजहृदयीं चिंतित विक्षिप्तचित्त नर जैसा, ।
अप्रीतिमानसानें निजनगरानिकट पावला तैसा. ॥ १७०

**मो**हे नृपति ध्यातां तनयातें दिवसरात्र शोकानें, ।
पळपळ युगापरि ज्या सभेमधीं पाहिलें न लोकानें. ॥ १७१

**भ**य गेलें पत्नीचें शोकावेशें करोनि नरपतिला, ।
जें होतें पूर्वीं तें, त्यानें कांहीं पुसे न नरप तिला. ॥ १७२

**ग**जरथहयधनगृहभोजन शयन स्त्री सुसेवक प्राण, ।
विषसम सदा नृपातें भासेना त्रिजगतींत सत्राण[12]. ॥ १७३

**व**नचरतनयीं असतां नरपतिमनसक्त[13], त्यास देहाची ।
स्मृतिही न, मुखीं ज्याचे, 'हा! ध्रुव, हा! पुत्र, हा! तनय हाची.' १७४

---

१. विश्वरूपधारी, सकल जगत् आहे काय (देह) ज्याचा असा (हरि.) २. ज्याच्या स्वरूपा-असा अन्वय. ३. मत्+धी=माझी+बुद्धि. ४. नारदाचें वचन. (श्लो० ३२.) ५. मार्गांत. ६. भेददृष्टि. (श्लो० ३०.) ७. मूर्खपणानें. ८. अज्ञ जो मी त्यानें. ९. निवारण, निरसन. (श्लो० ३१.) १०. मान, अभिमान. ११. धान्यपण, सतुष तंडुलकण. १२. सवेग. १३. नरपतिमन वनचरतनयीं सक्त असतां–असा अन्वय.

ते समयीं वार्ताहर जाउनि अंतःपुरीं [1]प्रणामांनीं ।
सांगे ध्रुवागमातें, परि नृप त्याचे न भाषणा [2]मानी. ॥ १७५
वारंवार विचारी, 'दुर्घट हें मज [3]अभद्रसारातें' ।
[4]नारदवाक्यस्मरणें हर्षें दे हार [5]सांगणारातें. ॥ १७६
सुरथीं बसूनि वेगें ब्राह्मण [6]कुलवृद्धमंत्रिबंधूतें ।
घेउनि सवें निघे त्या भेटाया नृपति [7]हर्षसिंधूतें. ॥ १७७
दे[8]वांगना न ज्यांच्या उपमेतें योग्य त्या [9]नृपतिललना, ।
एक विमानीं [10]ससुता बसूनि जाती त्यजूनि [11]हृज्ज्वलना. ॥ १७८
[12]वारणवाजिशकटरथ [13]पदगश्रेणी [14]पुरांगना भारी ।
भासे धराचरासुरसंघे संसिद्ध जेवि जं[15]भारी. ॥ १७९
यश गाती बंदीजन [16]मागध [16]चारण मृदंगसंनादें ।
दुंदुभिभेरीझर्झरशंखपणवनि[17]स्वनें गगन नादे. ॥ १८०
श्री ज्याची [18]सर्वोत्तर आदि नृपतितनय तो समारंभें ।
जातां सवेद घोषें जयजय करिती समस्त संरंभें. ॥ १८१
नयनें सुता पहातां [19]उपवनसंनिध ससंभ्रमें नृपती ।
भेटे उतरुनि तत्क्षणिं सप्रेमें पाहती निजे जपती. ॥ १८२
मोहोत्कंठमना नृप आलिंगी [20]निजतनूजगंधातें ।
श्री[21]वासुदेवचरणांबुजरजसंस्पर्शनष्टबंधातें. ॥ १८३
भगवत्पादच्छाया ज्यावरि त्या मस्तकींस हुंगूनी ।
प्रेमाश्रुच्या [22]प्रवाहें करवी त्या स्नान भूप रंगूनी. ॥ १८४
गजहयरथग समस्त स्वसंभ्रमें वाहनास त्यागूनी ।
जयजयकारें नमिती [23]करशिरसंयुक्त [24]भूस लागूनी. ॥ १८५

---

१. प्रणाम=नमस्कार. २. विश्वास ठेविला नाहीं. (श्लो० ३७.) ३. अभद्रश्रेष्ठातें, अमंगलांत सार (श्रेष्ठ) असा जो मी त्या मला हें दुर्घट होय. ४. लौकर पुत्र येईल ह्या नारदवचनाच्या स्मरणानें. ५. वार्ताहरातें. ६. श्लो० ३९ पहा. ७. आनंदसागर असा जो पुत्र त्यातें. ८. अप्सरा. ९. नृपभार्या. (सुनीति आणि सुरुचि.) १०. उत्तमासह. ११. हृदयांतील अग्नीला. १२. वारण=गज, वाजि=घोडा, शकट=गाडा. १३. पादचारी जनांच्या पंक्ति. १४. नगरयोषिता. १५. इंद्र. १६. स्तुतिपाठक १७. शब्दानें. १८. सर्वोत्तम. १९. मधुवन नामक उपवनाच्या समीप. (श्लो० ४२.) २०. आपल्या मुलाच्या गंधातें. २१. विष्णुचरणस्पर्शाच्या रजःकणानें ज्याचे संसारबंध नष्ट झाले त्याला. २२. श्लो० ४४ पहा. २३. साष्टांग नमून. २४. भूमीला.

**व**दनीं वदोनि 'मी **ध्रुव**' वंदी वंदी विनम्र तातातें[1], ।
आशीर्वादेंयुक्त प्रेमें वंदी तदंति[2] मातांतें[3]. ॥ १८६

**ते**व्हां उठवुनि **सुरु**ची आलिंगी नम्रपाद[4] मूलातें ।
जेव्हां 'हो चिरजीवी' शीघ्र वदे स्नेहसिंधुकूलातें[5]. ॥ १८७

**वा**रिजनयन[6] श्रीहरि प्रसन्न ज्यावरि, समस्त अनुसरती ।
त्या मनुजातें, जैशीं लवणीं[7] नीरें[8] स्वयेंच अवतरती. ॥ १८८

**सु**रुचिसुत **ध्रुव** दोघे परस्परें भेटतां, नयनिं येती ।
वारंवार जलद्रव, अंगीं रोमांच कंचुका लेती. ॥ १८९

**दे**हद्वयें निराळे असतां ते पाहिले न लोकांनीं ।
आलिंगन प्रसंगीं म्हणती 'हें प्रेम नैकिलें कानीं.' ॥ १९०

**वा**रिदनयनजलांनीं[9] सिंचित कुंचयुग्मदुग्धधारातें[10] ।
स्रवती जननी जेव्हां आलिंगी संभ्रमें कुमारातें. ॥ १९१

**य**दवधि वनास गेला त्यापासुनि मानसीं व्यथा[11] भरली, ।
ती शीघ्र बाळकाच्या अंगस्पर्शें समस्त संहरली. ॥ १९२

'**श्री**धर समर्चिला[12] त्वां ज्याच्या ध्यानें मुनींद्र कालातें ।
जिंकिति सुदुर्जयातें, त्यायोगें पाहशी स्वबालातें. ॥ १९३

**नष्ट** तुझा हा आला दैवबळें तनय, आर्ति[13] हरणार, ।
तूं धन्य, भूमिमंडळ[14] पालनलालन समस्त करणार.' ॥ १९४

**मो**ठ्या प्रीती करुनी समस्त जन वर्णितां, महानंद ।
झाला धरावरातें[15], विधूदयीं[16] सुखित जेंवि जलकंद. ॥ १९५

**भ**व्याकरा[17] सुतातें करिणीवरि बैसवूनि संहर्षें, ।
सभ्रात्यातें[18] भूपति नगरीं प्रविशे समस्त संघर्षें. ॥ १९६

---

१. श्लो० ४५ पहा. २. त्यानंतर (तातवंदनोत्तर). ३. सुनीति आणि सुरुचि यांतें. (सुरुचीच्या ठिकाणीं ध्रुवाची भेदबुद्धि नव्हती, कारण तो आतां सज्जनाग्रणी झाला होता.) ४. पायां पडलेल्या ध्रुवातें. (श्लो० ४६.) ५. प्रेमसागरतीरातें (पुत्रातें.) ६. कमलनेत्र. (वारिज=कमल.) ७. निम्न प्रदेशावर. ८. उदकें स्वतःच खालीं उतरतात. [हाच दाखला मूळांत आहे. श्लो० ४७.] ९. मेघ-नेत्रोदकांनीं. १०. ध्रुवमातेच्या स्तनांतून दुग्ध स्रवूं लागलें. (श्लो० ५०.) ११. आधि, विरहसंताप. (श्लो० ४९.) १२. त्वां श्रीधराचें समर्चन (पूजन) केलें ज्या श्रीधराच्या ध्यानें—असा अन्वय. १३. क्लेशापह. १४. श्लो० ५१ पहा. १५. पृथ्वीपालातें. १६. चंद्रोदयीं. १७. भव्य+आकर= कल्याण+खनि. १८. भावासह. (उत्तमासह.)

**ग**जघंटा रणरणती, [1]हेषिति हय, करिति शब्द रथचक्र, ।
ध्रुवसह पुरप्रवेशीं त्रिविक्रमें जेंवि निजपुरी शक्र. ॥ १९७

**व**रगजवाजिरथस्थितकेतुपताका [2]नभांत कीं उडती, ।
चंचल छायें त्याच्या अरुणकिरणही क्वचिज्जनीं पडती. ॥ १९८

[3]**ते**थें तेथें नगरीं द्वारीं द्वारीं सुतोरणें भरित ।
[4]वस्त्रस्त्रगाम्रपल्लवमुक्तांचीं जनमनांस संहरित. ॥ १९९

**वा**रिभरित कनकाचे सदीप वस्त्रादि तोरणीं रचित ।
कुंभस्तंभें रंभांच्या सफळांच्या पदोपदीं खचित. ॥ २००

[5]**सु**रवरपुरी जशी ही गो[6]पुरप्रा[7]कारराज[8]सदनानीं ।
भासे चहूं दिशेप्रति, केला जाणो स्ववास मदनानीं. ॥ २०१

**दे**[9]वस्त्रियांपरी ज्या पुरस्त्रिया [10]दधियवादिकीं करिती, ।
चंदनसिक्त सुमार्गीं पाहुनियां वृष्टि त्या ध्रुवावरतीं. ॥ २०२

**वा**त्सल्यानें देती सत्याशीर्वाद त्या [11]नगरमहिला, ।
ऐकत त्यांतें प्रविशे क्रमेंकरुनि तो [12]नृपेंद्रगृहमहिला. ॥ २०३

**य**त्नेंकरूनि तातें [13]लालितमणिमय सुमंदिरीं निवसे, ।
देवेंद्रमंदिराची रचनाही अल्प ज्यापुढें विलसे. ॥ २०४

**श्री**ही नि[14]जस्वभावा टाकुनि निशिदिवस सेविते ज्यातें ।
मानुनि हृदयीं 'जें [15]प्रभुमंदिरमंदिर, कसें त्यजूं त्यातें?' ॥ २०५

**न**रवर निजतनयाच्या ऐकुनि पाहूनि त्या [16]प्रभावतों, ।
आविष्ट विस्मयानें चित्तीं वरि शीघ्र भक्तिभावातें. ॥ २०६

**मो**हावेशा त्यजुनी करूनि राज्याभिषेक त[17]नुजातें, ।
जाउनि [18]विपिनीं वेगें श्रीहरि आराधिलाच म[19]नुजातें. ॥ २०७

---

१. खिंकाळतात. (हय=घोडे.) २. आकाशांत. ३. त्या त्या ठिकाणीं. (श्लोक ५४.) ४. वस्त्रें, पुष्पमाला आम्रपल्लव आणि मोतीं यांचीं. (श्लोक ५५.) ५. अमरावती. ६. बहिर्द्वार. ७. तट. ८. मंदिरांनीं. ९. देवांगनांप्रमाणें. १०. श्वेतसर्षप, अक्षता आणि यव यांची वृष्टि ध्रुवावर केली. (श्लोक ५८.) ११. पुरललना. १२. नृपाच्या गृहभूमीला. १३. श्लोक ६० पहा. १४. आपला स्वभाव. (चचलपणा, अस्थिरपणा.) १५. जें विष्णूच्या मंदिरांतील उत्तर मंदिर. (जें विष्णूला अ-त्यंत प्रिय मंदिर—जें विष्णूच्या प्रेमाचें वासस्थान.) १६. भगवदुपासनादि लक्षण प्रभाव. (श्लोक ६५.) १७. पुत्रातें, ध्रुवातें. (श्लोक ६६.) १८. वनांत. १९. मनुकुलोत्पन्न उत्तानपादानें. हा स्वतः वृद्ध आणि विरक्त असा वनाला गेला. (श्लोक ६७.)

**भ**गवत्परिचर्येनें जाणुनि मायाबलास देवानें ।
तत्कृतदयालवानें क्रमें पदा प्राप्त **वा**सुदेवानें. ॥ २०८

**ग**ति[1] ऐकुनि तनयाची[2] **सु**रुचि त्यागूनि राजभवनातें[3] ।
होवुनि विरक्त, देहा त्यागी, जाऊनि शीघ्र गहनातें[4]. ॥ २०९

**व**ध ऐकुनि बंधूचा शोकक्रोधें करून संव्याप्त ।
होवुनि सज्ज रथावरि **सु**नीतिसुत यक्षभू[5] प्राप्त[6]. ॥ २१०

**ते**थें जावुनि पाहे हिमवद्द्रोणींत[7] गुह्यकीं[8] निचित ।
अलकानामपुरीतें **त्व**ष्टयानें जी **शि**वाज्ञया[9]रचित. ॥ २११

**वा**रिज[10] घेउनि हस्तीं वादेवि[11] नादें खरें गगनवलय[12], ।
जेणें रवें दिशाही, फुटती यक्षांगनासुकरवलय[13]. ॥ २१२

**सु**रवातें ऐकुनियां शंखाच्या धीर यक्षभटें[14] सर्व ।
घेउनि निजायुधातें सन्मुख धांवति जवी महागर्व. ॥ २१३

**दे**हीं कवचें लोहाचीं बलकट करपुटीं कृपाणातें ।
शतचंद्र पुष्पतारा युक्तें भेद्यें न जीं सुबाणातें. ॥ २१४

**वा**रिद[16]समूह जैसे गर्जति तैसे सुगर्जति यक्ष, ।
करधृतविकोशशस्त्रें[17] चमकति विद्युल्लता समरदक्ष. ॥ २१५

**य**ष्टी[18]परिघपरश्वधधनुष्यशूलभृशुंडिशरभाले ।
घेउनि अगणित दिसती ज्याच्या भारें वसुंधरा[19] हाले ॥ २१६

**श्री**दांचे[20] अनुचर[21] बहु गर्वबळें म्हणति, 'या धरा मारा' ।
जाणति ना **ह**रिसेवक एक पळें करिल आत्मसंहारा. ॥ २१७

**न**यनें पाहुनि त्यांचा मोठा आक्रांत उग्र धनु जोडी, ।
नेमुनि एकेकातें बाणत्रय तो **ध्रु**व त्वरें सोडी. ॥ २१८

---

१. मरणगति. २. उत्तमाची. अकृतविवाह उत्तम मृगयेसाठीं हिमालयावर गेला असतां तेथें त्याला एक बलाढ्य यक्षानें मारिलें. ३. राजगृहातें. (अ १० श्लो० ३.) ४. अरण्यातें. ५. यक्षाची भूमि (अलकापुरी.) ६. प्राप्त झाला. ७. हिमालय पर्वताच्या द्रोणींत (निम्नतटांमध्यें.) ८. गुह्यकांनीं (यक्षांनीं) निचित (भरलेली—अलका) ९. शिवाच्या आज्ञेनें रचिलेली. १०. शंख. ११. भरून टाकी (नादें.) १२. आकाशमंडळ. १३. यक्षस्त्रियांच्या उत्तम हातांतील वलयें (बांगड्या.) १४. यक्षवीर. १५. श्लो० ७ पहा. १६. मेघसमुदाय. १७. नग्न, म्यानांतून बाहेर काढलेलीं. १८. यष्टी, परिघ, परश्वध, धनुष्य, शूल, भुशुंडी, शर, भाले—हीं आयुधांचीं नांवें. १९. पृथ्वी. २०. कुबेराचे. २१. सेवक.

**मो**हिति होउनि मस्तक लग्न शरें, सर्प पादघातातें ।
साहीना, तैसे हे मारिति सा सा शरें धरायातें. ॥ २१९

**भ**ल्लप्रासपरश्वधगदापरिघखड्गशूलशक्तीनें ।
हनिती एके काळीं नृपात्मजातें स्वशक्तीनें. ॥ २२०

**ग**र्जति वर्षति शस्त्रें मेघ जसे पर्वतीं सुधारातें[1]; ।
तेरा अयुतें गुह्यक सिंचति बाणोदकें कुमारातें. ॥ २२१

**व**रशस्त्रवृष्टिपातें अदृश्य होतां रथ ध्वजासहित, ।
ध्रुव आसारें जैसा नगनभिं संप्रार्थिती सुसिद्ध हित. ॥ २२२

**ते** यातुधान[2] हर्षें नदतां स्वजनें करूनि सत्तरणी, ।
शस्त्रें विदारुनी तो निघे जसा तुहिन[3]मध्यगततरणी. ॥ १२३

**वा**रा वारी जैसा घनसमुदायास, शस्त्रवृष्टीतें ।
उडवी स्वबाणवेगें पाहति त्या यातुधान दृष्टीतें. ॥ २२४

**सुर**वर चापसुमाला योजुनि शरनिकर निजधनुष्याला ।
भेदी निमेषमात्रें नृपसुत तो किन्नरां मनुष्यांला. ॥ २२५

**दे**ह त्रीं बाणांनीं तुटूनि खणखण स्वयें रणीं पडती, ।
कीं यातुधान टाकी गर्व[4]महानग समूल ते झडती. ॥ २२६

**वारी ह**री करीतें चक्री चक्रास चक्रिवाह जसा, ।
वक्रा गुह्यकचक्रा[5] भासे उत्तानपादतनय तसा. ॥ २२७

**यक्ष** करिति यत्नानें युद्ध रणांगणिं तयास जिंकाया, ।
परि तच्छर करिती ते वेगानें छिन्नभिन्न तत्काया. ॥ २२८

**श्री**[6]जय तेथें वसती जेथें तो **पुं**डरीक[7]नयन वसे, ।
मिळती कधीं अभाग्यां सुतधनयशराज्य प्राज्य हे नवसें. ॥ २२९

**न**रवर तीक्ष्णशरांनीं छिन्न सकुंडल शिरोरुभुजनिकरीं ।
केयूरहारमुकुटोष्णीशें संछिन्न सर्व अवनि[8] करी. ॥ २३०

---

१. उदकाच्या धारातें. २. राक्षस. ३. श्लो० १५ पहा. ४. गर्वरूप मोठा पर्वत. ५. यक्षसमूहाला, यक्षमंडलाला. ६. लक्ष्मी आणि जय. ७. भगवान् विष्णु (कृष्ण) ['यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः । तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवानीतिर्मतिर्मम' (भगवद्गीता–अ० १८ श्लो० ७८.) याचें तात्पर्यः—जेथें योगेश्वर कृष्ण आणि धनुर्धारी अर्जुन असतात, तेथेंच राज्यलक्ष्मी तेथेंच विजय, तेथेंच ऐश्वर्य (अभिवृद्धि) आणि तेथेंच न्यायनीति, ही गोष्ट निश्चित होय.] पुंडरीक+नयन=कमल+नेत्र. ८. पृथ्वी.

**मो**ठें केलें त्यानें कदन[1], जसा हरि[2] करी कदंबाचें[3] ।
शेषेंहि[4] बाणीं तैसे, प्रसून[5] विकसित जसे कदंबाचे[6]. ॥ २३१
**भर**लीं समस्त गात्रें रुधिरांनीं फुल्लकिंशुकसे ।
जे शेष राहिले ते युद्धा करिती रणांगणांतकसे[7]. ॥ २३२
**ग**रुडभयानें विषधर[8] पळति जसे, यातुधान शेष भट ।
पळतां रणावनी[9] ते श्मशानतुल्या दिसे महाविकट[10]. ॥ २३३
**व**दत स्वसारथीतें पाहावें यातुधाननगर परी ।
जाणोनि मायिकांच्या कर्तव्या नर म्हणून ते न करी. ॥ २३४
**ते** पुनरपि युद्धाचा करितील उद्योग यातुधान रणीं, ।
शंकेनें बोलत निजयंत्या[11] जो सावधान भूपमणी. ॥ २३५
**वा**ताच्या वेगानें चहुं दिशे धूलवृष्टि मेघगणीं, ।
आच्छादिलें नभस्थल पडला तो अंधकार फार रणीं. ॥ २३६
**सुर**मार्गांतुनि पडती रक्तपलल[12]पूयमूत्रमलधारा ।
अगणित कबंधपर्वत[13] गदापरिघमुसलखङ्गशरगारा[14]. ॥ २३७
**दे**णार कातराला विपुल भय भुजग[15] वमत[16] नयनिं दहना ।
धांवत चहूंकडूनी पिशाचवनिताहि हस्तधृतदहना. ॥ २३८
**वा**रण[17]मत्ततरक्षु[18]श्व[19]गृध्रवाराह[20]केसरीनिकर ।
येती मायायोगें[21] ध्रुवावरि करूनियां महानिकर. ॥ २३९
**य**क्षाणीं एवंविध निर्मित माया अनेक पाहूनी ।
प्रार्थिति गदाधरातें[22] ध्रुवभद्रा[23] मुनि समीप राहूनि. ॥ २४०
'**श्री**शार्ङ्गकार्मुक[24] प्रभु ध्रुवशत्रूच्या लया[25] करो अभव[26], ।
यन्नामकीर्तनानें श्रवणें तो सर्व लोक तरति भवें[27].' ॥ २४१

---

१. मर्दन, युद्ध. २. सिंह. ३. (गज) समूहाचें. ४. अवशिष्ट राहिलेले (यक्ष). ५. पुष्प. ६. कदंबवृक्षाचे. ७. रणभूमीवरील अंतकासारखे. ८. सर्प. ९. रणभूमी. १०. भयंकर. ११. आपल्या सारथ्याला. यंता=सारथी. ['यंता हस्तिपके सूते' इत्यमरः । 'यंता सूतः क्षत्ता च सारथिः' इत्यमरः]. १२. रक्त, मांस, पू, मूत्र, विष्टा यांच्या धारा. अध्याय १० श्लो० २४ पहा. १३. धडांचे पर्वत. १४. गदा, परिघ, मुसळें, खड्ग, बाण यांची वृष्टि झाली. १५. सर्प. १६. नेत्रद्वारा अग्नि ओकणारे. (श्लो० २५.) १७. गज. (श्लो० २६). १८. तरक्षु=तरस, हुंडार, मृगादन. १९. श्व=कुत्रा. २०. वाराह=डुकर. २१. आसुरी मायेच्या योगानें. (श्लो० २८.) २२. कृष्णातें. २३. ध्रुवाचे कल्याणासाठीं. २४. श्लोक ३० पहा. २५. क्षया, नाशा. २६. अज. २७. संसार.

**न**रपति ऐकुनि वाणी मुनिची उपदेशतुल्य, वेगानें ।
[1]संधानी चापीं निज तें [2]निर्मित अस्त्र जें स्वगेशानें. ॥ २४२

**मो**ठा प्रभाव ज्याच्या संधानीं यातुधानकपटबळ ।
नासे क्षणमात्रानें ज्ञानोदयिं जेंवि सर्व [3]तमपटल. ॥ २४३

[4]**भ**गवन्मुख्यास्त्राच्या प्रयोगमात्रेंच कोटि शतलक्ष ।
निघती चापांतुनि शर [5]शत्रुकटकवटकभक्षणीं दक्ष. ॥ २४४

**ग**मनास मार्ग जेव्हां न दिसे कोठेंच [6]यातुधानाला ।
जैसे गरुडभयांधा विवरहि न दिसे [7]फणिप्रधानाला. ॥ २४५

**व**रअस्त्र बाणवेगें खवळुनि ते धांवती [8]नृपालातें, ।
घेउनि नाना शस्त्रें, क्रोधें जैसे फणी [9]विपालातें. ॥ २४६

**ते** यक्ष तीक्ष्ण बाणेंकरूनि [10]करपादबाहुशिररहित ।
नेले [11]परलोकाला, रणांगणा सोडिती न जे [12]प्रेहित. ॥ २४७

**वा**यां पाहुनि [13]गुह्यकनाश रणीं [14]मनु समस्तमुनिसहित ।
येवुनि वदे [15]पितामह कृपेकरुनि ते क्षणीं **ध्रु**वास हित. ॥ २४८

'[16]**सु**रनायका [17]समाराधुनि तूं सर्वांतरंगातें ।
झालाशि प्राप्त जें [18]पद न मिळे अन्याशि अंगातें. ॥ २४९

**दे**हातें मानुनि [19]आत्मा हिंसा समस्त [20]जन्याची ।
करणें नव्हे सुपद्धति [21]श्री**मा**धवदास धन्याची. ॥ २५०

[22]**वा**रिजनाभाचा तूं दास असुनि साधुमान्यही तात! ।
व्रत साधूचें शिकतां, केला हा निंद्य [23]पुण्यजनघात. ॥ २५१

---

१. जोडी. २. नारायणनिर्मित. ३. दुःखराशि. (अ० ११ श्लो० २.) ४. नारायणास्त्राच्या. ५. शत्रुसैन्यरूप वडे खाण्याविषयीं कुशल. (शर). ६. राक्षसांला. ७. मुख्य सापाला. (अ० ११ श्लो० ४.) ८. ध्रुवराजावर. ९. वि+पालातें=पक्षी+पालकातें=गरुडातें. (श्लो० ४.) १०. हात, पाय, भुज व मस्तक यांनीं रहित असे. (श्लो० ५). ११. उत्तम लोकातें पाठविले. [लढाईत पुढच्या बाजूला वार लागून मरण पावलेला योद्धा सूर्यमंडळाचा भेद करून वर उत्तम लोकास जातो, अशी जुनी समजूत आहे.) १२. योजिलेले, नियुक्त. १३. निरपराधी गुह्यकांचा वध. १४. स्वायंभुव मनु. (अ० ११ श्लो० ६.) १५. ध्रुवाचा आजा. १६. देवेशाला. (विष्णुला.) १७. आराधना करून. १८. ध्रुवपद. १९. देहाला आत्मा मानून प्राण्यांची हिंसा करणें हें अनुचित होय. (श्लो० १०.) २०. प्राण्यांची. २१. प्रभूच्या दासाला हें योग्य नव्हे. २२. कमलनाभ कृष्णाचा. २३. यक्षांचा वध.

**य**क्ष बहुत त्वां वधिले [1]भ्रातृवधेंकरुनि फार रोषातें ।
एकाच्या अपराधें उचित न अस्मत्कुलीं वि[2]दोषा तें. ॥ २५२
**श्री**हरि प्रसन्न होतो [3]क्षमादयामैत्रिकीसमत्वानें ।
द्वेषणनीचसमानाखिल जीवीं सर्व भूतसत्वानें. ॥ २५३
**न**रहरि प्र[5]सन्न असतां, सोडुनि [6]मायागुणा अनायासें ।
पावे निर्वा[7]णसुखा, घडे न जें अन्यथा महायासें. ॥ २५४
**मो**हबळें जरि म्हणशी यक्षांनीं मारिला मम भ्राता, ।
हरितां ईश जनाला त्रिभुवनिं होईल कोणता [8]त्राता? ॥ २५५
**भ**गवंताच्या [9]मायेकरोनि भूतक्रमें जनें [10]जनन ।
[11]पालन करी तयानें **अनंत अं**तकजनेंच [12]जनहनन. ॥ २५६
**ग**ति ऐशी ईशाची करी सकळ, भासतो न हा कर्ता, ।
त्याच्या मागें धांवति भूतें, हरितो परी न संहर्ता. ॥ २५७
**व**दती मुनिवर [13]ज्यातें स्वभावविधि कालकर्मकामरवें ।
स्वस्वमतानीं, व्हावे [14]शरणागत त्या प्रभूस हें बरवें. ॥ २५८
**ते**णें करोनि हृदयीं मोहें अज्ञानशृंखला रूढ ।
जे तीतें भेदिशि तूं आत्म्याला करित नित्य संमूढ. ॥ २५९
**वा**सुविबुधशरणागत **म**धुवनिं होवोन तूं शिशू असतां ।
पद पावलाशि तें ध्रुव मिळे न तो श्री**ह**री कधीं असतां. ॥ २६०
**सु**जन न होती ज्याच्या संगें तो क्रोध मूल मो[15]हांचा ।
नाश करी पुरुषाचा जैसा बळकट वराह डोहाचा. ॥ २६१
**दे**ती ज्याच्या मागें सकलांला दुःख जेवि सर्पखल ।
ते मूढ जाणती ना त्या योगें उच्च भूमिका सखल. ॥ २६२
**वा**यांच त्या खलाच्या वश होवुन आत्मनाश नर करती ।
जें सुख त्यांस घडेना बळेंच होते समस्त नरकरती. ॥ १६३

---

१. भ्रातृवध झाल्यामुळें संतापून. (श्लो० ९.) २. मोठ्या दोषाला. ३. तितिक्षा. ४. सर्व प्राण्यांच्या ठिकाणीं समदृष्टि. ५. श्लोक १४ पहा. ६. मायेच्या गुणापासून मुक्त होऊन. ७. परमसुखरूप ब्रह्मपदास. ८. रक्षणकर्ता. ९. परमेश्वराच्या मायेच्या योगानें. १०. रजोगुणाचें आधिक्य झालें म्हणजे जनन (सृष्टि) होतें. ११. सत्वगुणाचें आधिक्यानें पालन होतें. १२. तमोगुणाचें आधिक्य झालें असतां हनन (लय) होतो. १३. ज्या ईश्वराला मुनि 'स्वभाव,' 'विधि,' 'काल,' 'कर्म,' 'काम' असें अशीं भिन्नभिन्न नांवें देतात. १४. श्लोक ३७ पहा. १५. श्लोक ७ पहा, श्लोक ३१ पहा.

**य**क्षवधें जी केली स्वकुला नाशी जों अवज्ञा त्या ।
[१]**श्री**दा प्रसन्न करिं तूं **शिव** मित्रा तों कुलाअवज्ञाता.' ॥ २६४

**श्री**स्वायंभुववाक्यें निवृत्त जाणूनि [२]चित्रयानाला ।
मानें वदे रणांगणिं **कु**बेर येउनि अपेतमानाला. ॥ २६५

'[३]**न**रपसुता ! मी झालों प्रसन्न पाहूनि शुद्धि तव बुद्धी, ।
जो तूं पितामहाच्या आज्ञेनें वैर सोडिलें युद्धीं. ॥ २६६

**मो**क्ष न घडे तयातें मी तूं ऐशी [४]तमें करुनि [५]धिषणा ।
स्वप्नापरी विभासे ज्यां पुरुषांची वृथा विमल धिषणा. ॥ २६७

**भ**व नाशाचा तो प्रभु त्यांच्या ज्यांस 'काल' म्हणति जन, ।
यास्तव न तव भ्राता वधिला यक्षें तुवां न [६]पुण्यजन. ॥ २६८

**ग**मन करीं स्वपदातें भद्रा ! सर्वात्मभावभजनानें ।
भज [७]विश्वविग्रहातें, प्रसन्न जो शीघ्र होय नमनातें. ॥ २६९

**व**र मागें भूपाला ! [८]वराहे तूं इच्छित स्वहृदयाचा, ।
शंका सोडुनि असशी अनुकंपालेश पात्र सदयाचा.' ॥ २७०

**ते**व्हां ऐकुनि वचनां **श्री**दाच्या **ध्रु**व **र**[९]मेशपादरती ।
मागें प्रसन्न चित्तें, जी करुनि सर्व लोक [१०]तमं तरती. ॥ २७१

**वा**रंवार कृपा नर युक्त महेश्वर सखा सविनयातें ।
देउनि रति हरिचरणीं [११]अंतर्हित होय जाय [१२]निलयातें. ॥ २७२

**सु**[१३]रपुरसमनिजनगरा ध्रुवही येऊनि सर्व [१४]योगानीं ।
सर्वात्मका हरीतें संतर्पी निखिल देवभागानीं. ॥ २७३

**दे**वेशपादकमलीं तीव्र करित भक्ति पाल राजा तें ।
वर्षें सहस्र [१५]षड्गुण मानिति सुप्रजा पिता ज्यातें. ॥ २७४

**वा**यूची तनया जे इला प्रसविली सुतास नृप भार्या ।
उत्कल नामें तो श्रुत **शि**शुमाराची सुता अपर भार्या. ॥ २७५

---

१. कुबेराला. २. ध्रुवाला. ३. अध्याय १२ श्लोक २ पहा. ४. अज्ञानानें. ५. बुद्धि. 'मीं' 'तूं' ही द्वैतबुद्धि स्वप्नांतील स्थितिप्रमाणें मिथ्या होय. (श्लो० ४.) ६. यक्ष. ७. विश्वस्वरूप ईश्वरातें. ८. तूं वर देण्याला योग्य पात्र आहेस. ९. रमापतिपादभक्ति, सकल दुःखें हरण करणाऱ्या परमेश्वराचें मला सतत स्मरण असावें—असा वर मागितला. [अ० १२ श्लो० ४.) १०. अज्ञान. ११. गुप्त. १२. स्वस्थानातें. १३. अमरावतीसमान आपल्या नगराला. (श्लो० ९.) १४. ध्रुवानें यज्ञ करून यज्ञपति परमेश्वराचें संतर्पण केलें. १५. छत्तीस हजार वर्षें. (अ० १२, श्लो० १३.)

यत्सुत दोघे असती वत्सरकल्पाभिधानतत्तनय ।
सर्व सगुण बलरूप प्रतापधी शौर्य वेद शास्त्र नय. ॥ २७६

---

# भि[2]क्षुकविकृत

## १२ द्रौ[3]पदीवस्त्रहरण.

(लावणी.)

पतिव्रता द्रौपदी सती । ती सभेमाजि गुणवती ।
दुःशासन दुर्जनें गांजितां [4]आळविते श्रीपती ॥ ध्रुवपद. ॥
द्यू[5]तपणें धर्म जिंतिला । पांचाळिडाव साधिला ।
दुर्योधन विदुराप्रति बोले, 'जाउनि आणा तिला.' ॥
तंव विदुरें धिक्कारिला । करकरोनि करें वारिला ।
'निष्कलंक ते कृष्णा केंवी जिंकिलिसी हारिला ॥
त्वां डाव कसा साधिला? । म्हणसील धर्म जिंतिला? ।
कपटिकर्णशकुनीचे बुद्धि कपट खेळ मांडिला ॥
परिणाम न दिसे भला । पहा काळ कसा क्षोभला! ।
भलाभला दुर्योधन कुरुकुळ निर्मुळ करुं वांचला' ॥
चाल ॥ हें विदुरवाक्य ऐकुनी । क्षोभला सु[6]योधन मनीं ।
करकरां दांत चावुनी । ते सभेंत अवलोकुनी ।
'बरें' म्हणोनी त्वरें करूनी ऊठविला सारथी ॥ पति० ॥ १ ॥
मग तयासि आज्ञा करी, । 'त्वां जाउनियां झडकरी ।
दासि आमुची निज नि[7]र्धारीं पाचारीं सुंदरी' ॥
सारथी सूत यावरी । येऊनि गृहाभीतरी ।
जेथें द्रौपदि होती तेथें येउनि वंदन करी ॥

---

१. हें आख्यान बरेंच अपुरें असावें असें वाटतें कारण कथाभाग पुरा झाला असें दिसत नाहीं. या काव्याचा उर्वरित भाग उपलब्ध झाल्यास तोही ग्राच 'लघुकाव्यमालें'त ओंवून काढावा अशी इच्छा आहे. २. या भिक्षुकविविषयीं कांहीं एक माहीति अद्याप मिळाली नाहीं; तरी आमच्या शोधक वाचकांनीं ती मिळवून देण्याची कृपा करावी अशी सविनय विज्ञापना आहे. ३. ही सभापर्वोतील कथा इतकी सुप्रसिद्ध आहे कीं तिजविषयीं येथें कांहीं लिहिलें पाहिजे असें नाहीं. ४. प्रार्थिते. ५. द्यूतांत पण लावून. ६. दुर्योधन. ७. निश्चयें.

'तो प्रबळ माजला अरी । त्याणें धर्म नेउनी घरीं ।
सुयोधनें द्यूत खेळुनी तुम्हां हारविलें निज करीं ॥
राहतां गोष्टि नाहिं बरी' । सारथी बोले यापरी ।
हें ऐकुनि अंतरीं खोंचली चावळली सुंदरी. ॥
चाल ॥ मग बोलतसे त्याप्रती, 'त्वां जाइं सख्या! सूमती! ।
ते सभेमाजि मम पती । ते वडिल वृंद्ध असती ।
रजस्वला मी सभेसि आल्या काय मला पाहती'? ॥ पति० ॥ २ ॥
सारथी फिरुनि पातला । स्वामिसी शीघ्र भेटला ।
कर जोडुनि आर्जवेंच वडला वृत्तांत नीवेदिला. ॥
ऐकोनी मनीं क्षोभला । हा मंदबुद्धि धाडिला ।
'उठ उठ दु:शासना! त्वरें' निजबंधुसिं आज्ञापिला ॥
'हा वृतांत जो जाहला । त्वां जाउनि सांगें तिला ।
न ये म्हणे तरि बळेंकरोनी धरुनि आण वेणिला' ॥
ऐकोनी शीघ्र चालिला । तो व्याघ्र जसा खवळला ।
याज्ञसेनिनें येतां देखुनि कर जोडुनि विनविला. ॥
चाल ॥ 'भावोजी! गमन कासया । 'घ्या' पाट देति बैसाया' ॥
तो नको म्हणे कासया । तव वैभव गेलें लया ।
तुम्हां जिंतिलें द्यूत खेळतां भँग्न बैसले पती ॥ पति० ॥ ३ ॥
खळ बोलतसे निष्ठुरें, । 'उठ चाल सभे सुंदरे! ।
चाळकपणि वाचाळ बोलसी परि तें नव्हे बरें' ॥
ऐकुनी कठिन उत्तरें । तिचें चित्त झालें घाबरें ।
वृद्धस्त्रियांचे मेळिं जाउनी लपती झाली त्वरें ॥
हें पाहुनियां त्या क्रुरें । धावूनि येत निष्ठुरें ।
ताडन करुनी धँरेसि पाडिली वेणि धरिलि निजकरें ॥
तैं कांपतसे थर थरें । बोलतां शब्द चँांचरे ।
हें पाहुनि पतिव्रता क्षोभल्या 'शापूं' म्हणती त्वरें ॥
चाल ॥ त्या सकळ सत्या यापरी । तैं उमा रमा सुंदरी
घेउनी उदक निजकरीं । कुरुकुळाचि करूं बोहँरी ।
म्हणती त्यांतें वारी हातें शांतवि अरुंधती ॥ पति० ॥ ४ ॥

---

१. भीष्मद्रोणकृपादिक. २. यज्ञसेनाच्या कन्येनें (द्रौपदीनें). ३. गतश्रीक (गतमनोरथ.)
४. पृथ्वीवर. ५. अडखळे. ६ नाश, भस्म.

म्हणतसे, 'कोप आवरा । सारथी असे त्यां खरा !
द्रौपदिच्या कैवारें येणें होइल शारंगधरा[1] ॥
हा विचार न दिसे बरा । मीळणीं होइल हरिहरा ।
तेरा वरुषें होतां, कौरवविरहित होइल धरा[2] ॥
त्या शांतविल्या सुंदरा । तंव दुःशासन करि त्वरा ।
रडत पडत सति सभेसि आणली, हर्ष कौरवेश्वरा ॥
धरि कर्ण शकुनिच्या करा । 'पहा नेटकि हे सुकुमरा' ।
संकेतें अवयव तियेचे दाविति परस्परां । ॥
चाल ॥ मग कर्ण म्हणे तिजप्रती, । 'जिंकिलें तुला निश्चिती ।
हा कौरवेश भूपती । त्वां करूनि आपुला पती ।
राणिवसा[3]मधिं मुख्य होउनी भोगिं सकळ संपती' ॥ पति०
तंव धार्तराष्ट्र[4] कपटी । उघडोनि जानु[5] थापटी ।
दावि करें 'ये त्वरें सखे! अर्धांगिं बैस गोमटी ॥
भूपतीमाजि म्यां हटी । पहा पराक्रमें धूर्जटी[6] ।
फांसमिसें सहजांतहि तुम्हां जिंकियलें शेवटीं' ॥
ऐकोनि झालि मनिं खेटी[7] । करतळेंचि करतळ पिटी ।
भडकत अंतरिं सुनिळ अग्निसम धडकत क्रोधें उठी ॥
निरं[8] ढळे नेत्रसंपुटीं । कंपीत होय हनुवटी ।
कांता ते निजकांत विलोकी दीनवदन गोमटी[9]. ॥
चाल ॥ हें पाहुनियां त्या भिमें । करिं गदा सुयोजी क्रमें ।
म्हणतसे, 'आजि मज गमे । कुरुपुत्र माजले तमें[10] ।
निर्मुळ कुरुकुळ करीन आजी सकळ लोक पाहती' ॥ पति० ॥
जों भीम आवेशा चढे । अहाकार होय चहुंकडे ।
धीर न धरवे, वीर डचकले, सकळ सभा हडबडे ॥
जंव कलकल[11] ऐसा घडे । तंव धर्म पाहे तीकडे ।
म्हणे, 'भिमा! बा! क्षमा करिं तरी सत्व रक्षि धड पुढें ॥

---

१. कृष्णा. [शार्ङ्गधर=शार्ङ्गधन्वा='राहे शार्ङ्ग धनु जयापाशीं जें इंद्रियाद्यहंकार । म्हणवूनि शार्ङ्गधन्वा नाम तया सर्वदा नमस्कार.' ॥ ९६ ॥ नामार्थदीपिका–पृ० १११.] २. पृथ्वी. ३. जनानखान्यांत, राणीघरांत, अंतःपुरांत. ४. दुर्योधन. ५. गुडघा, मांडी. ६. शिव. ७. हताश, खट्टू. ८. उदक. ९. सुंदरी. १०. तमोगुणानें. ११. कोलाहल.

आकाश तुटोनी पडे । रविउदय पश्चिमेकडे ।
होय जरी मम वचन तरी हें मिथ्या कधीं ना घडे ॥
या सभानायकापुढें खेळतां द्यूत रोकडें ।
पणीं हारिलें आम्हां जिंकिलें, येथ करिसि कां कुडें[1] ? ॥
चाल ॥ तुज कोप नावरे जरी । तरिं गदा वोपिं मम शिरीं ।
अनृत कदां नाचरीं । त्वां स्वस्थ राहें यावरी ।
दुरित[2] निवारी हरि, तरि कां बा ! शिणसी त्वां महीपती. ॥ पति० ॥७॥
आइकें बंधु ! सूमती त्या सत्वधीरांच्या[3] रिती ।
पुण्यश्लोक[4] नळ अचळधैर्य ज्या कीर्ति श्रुती[5] वानिती ॥
कलि संचारे कूमती होउनी शत्रुसी प्रिती ।
लुब्ध जाहला, खेळ मांडिला, हारियला पण द्युतीं ॥
दायाद[6] त्वरिता गती 'दे जिंकियलें' बोलती ।
सत्वधीर तो उसीर न लावी अर्पि सकळ संपती ॥
काननां[7] निघे भूपती, तंव मागें धांवे ती सती ।
दमयंती पतिव्रताशिरोमणी घोरवनीं विलपती ॥
चाल ॥ तंव वसनें हरण करविलीं । स्त्रीवस्त्र उभय[8] नेसली ।
श्रमनिद्रा तिसि लागली । स्वप्रिया नळें त्यागिलीं ।
भ्रमत भ्रमत अति श्रमत उभयतां दो जागीं असती. ॥ पति० ॥८॥
त्या सत्वशिळां संकटीं हरि रक्षितसे शेवटीं. ।
हरिश्चंद्र नृप विश्वामित्रें गांजियला हरितटीं ॥
निद्रिस्त पाहुनीं मठीं स्वप्नांत विप्र धूर्जटी[9] ।
राज्यदान धनदान मागतां 'दिलें' म्हणे प्रभु हटी ॥
तंव जागृत होउनि उठी, [10]कौशिकें धरिलें मनगटीं ।
'संकल्पें मज दिधलें राज्य, दे शीघ्र बैसुंदे पटीं ॥
संकल्प करुनियां भटीं सोडिले [11]सलिल करतटीं ।
[12]नृपवधू [13]पुत्रासहीत नेली काशीच्या [14]चोहटीं ॥

---

१. वांकडें. २. पाप. ३. येथें धर्मराजा प्राचीन नल, हरिश्चंद्र व राम या सत्वशील राजांच्या आपत्तिकथा आपल्या भावाला सांगून त्याचें सांत्वन करीत आहे. ४. पुण्य (पवित्र) आहे श्लोक (यश) ज्याचा तो. ५. वेद. ६. दाईज, हिसेदार, दाय (पैतृक धन) घेणारा. ७. अरण्याला. ८. नल+दमयंती. ९. शंकर. १०. विश्वामित्रें. ११. उदक. १२. तारामती. १३. रोहिदास. १४. चव्हाट्यावर.

चाल ॥ मार्गिंचें दुःख बहुपरी । जें वदवेना वैखरी[1] ।
प्रभु विकला डोंबाघरीं । सुत कांता ते सकुमरी ।
विप्रगृहीं विकलीं स्वयंपाका करिते तारामती. ॥ पति० ॥ ९ ॥
या बहुतांपरि जाचिलें, परि सत्व नसे सांडिलें, ।
दुरित हराया हरि हर ब्रह्मा तिन्ही देव पातले ॥
असें ग्रंथकार बोलिले जें पुराणिं तुम्हीं ऐकिलें ।
दाशरथी श्रीरामपरेशें पितृवचन रक्षिलें ॥
निस्पृहें राज्य त्यागिलें, मग वनवासा चालिले. ।
सवें सिता सौमित्र नीघतां सूरें[2] सकळ तोषले ॥
ते[3] ग्रामसिमे पातले, दशरथें प्राण त्यागिले ।
मेलेपण पितयाचें ऐकुनी कदापि नाहिं परतले. ॥
चाल ॥ ऐसें मागें झाले किती । ज्यांच्या सत्वा नाहीं मिती ।
त्यां कविजन वाखाणिती । त्वां उगा बैस स्वस्थिती ।
दुरित निवारी तो सुखकारी चक्रधारी श्रीपती.' ॥ पति० ॥ १० ॥
क्षोभला वृकोदर[4] म्हणे, 'मज कोप नावरे झणें ।
महासंकटीं आम्हां घातलें, द्यूत खेळतां पणें ॥
पहिलेंच तरि मी म्हणें रिपुसभेसि ना बैसणें ।
जिणेलें[5] शकुनी कपट योजुनी हें मी कुश्चित जाणें ॥
संपती सकळ अर्पणें, हा अनर्थ काय खेळणें? ।
द्रौपदि आपदा पाहुनि मजला दुःख होतसे दुणें ॥
हें वाटे मजकारणें तव हस्तद्वय छेदणें ।
स्नेह न धरुनी त्वरेंकरोनी अग्निमाजि दाहणें' ॥

---

१. वाणी. २. देव. [सीतेसह राम वनास गेला असतां तेथें रावण संधि पाहून सीतेचें हरण करील, व तिला सोडविण्यासाठीं राम महायुद्ध करून रावणाचा व तत्पक्षीय राक्षसांचा संहार करील, म्हणून देवांना रामवनगमनानें संतोष झाला. देवांना 'सुर' असें नांव पडण्याचें कारण असें आहे. ज्यांनीं सुरेचा (मद्याचा) स्वीकार केला ते सुर आणि ज्यांनीं केला नाहीं ते असुर, असा सुर आणि असुर या शब्दांचा अर्थ रामायणांत आढळतो. 'वरुणस्य ततः कन्या वारुणी रघुनंदन । उत्पपात महाभागा मार्गमाणा परिग्रहणम् ॥ ३६ ॥ दितेः पुत्रा न तां राम जगहुर्वरुणात्मजाम् । अदितेस्तु सुता वीर जगहुस्तामनिंदिताम् ॥ ३७ ॥ असुरास्ते न दैतेयाः सुरास्ते नादिते सुताः । हृष्टाः प्रमुदिताश्चसान्वारुणीग्रहणात्सुराः ॥ ३८ ॥' [वाल्मीकिरामायण–बालकांड–सर्ग ४५.]
३. रामादिक. ४. भीम. ५. जिंकील.

चाल ॥ गर्जोनि म्हणे, सहदेवा ! । अरे ! अग्नि शीघ्र चेतवा' ।
सरसावि गदा तेधवां । अहाकार होय अघवा ।
गर्जुन अर्जुन बोले तेव्हां करिं धरि बंधुप्रति ॥ पति० ॥ ११ ॥
'बा ! कोप आवरीं भीमा ! मजकडे पाहें, करिं क्षमा ।
धर्म वधोनी अधर्म जोडिसी योग्य नव्हे उत्तमा ॥
हें कृत्य असे अधमा, तरि शिवूं नये कीं तुम्हां ।
कवण विषय हा पहा स्त्रियेचा, व्यर्थ नको पडुं भ्रमा ॥
जरि युधिष्ठिरातें नमा, तरि शौर्य चढे विक्रमा ।
जया कृपेनें अलभ्य जोडे मिळति स्त्रिया उत्तमा ॥
त्वां टाकिं झाकिं या तमा साधनें साधिं शमदमा ।
धर्म रक्षि जो तया लक्षितां तोचि हरिल या श्रमा. ॥
चाल ॥ हा धर्म तरीं ईश्वरू । जो अचल सत्वसागरू ।
जो भक्तिपरायण गुरू । याचेनि आम्हि भव तरूं ।
धर्म माउली आम्हां साउली असिच असो तुजप्रती. ॥ पति० ॥१२॥
महाफणीं डंकितां नरा शिरिं वीष चढे गरगरां ।
सुमंत्रें झाडा करितां उतरे तें जैसें झरझरां ॥
भीम तंगहिन झाला पुरा, अभिमान जाहला चुरा ।
योगिध्यानिसम आसनिं बैसे विलोकीतसे धरा ॥
क्लेशें द्रौपदि सुंदरा कर जोडुनियां पीतरां ।
'भीष्म द्रोण तुम्हि वदा वडिल हो ! सत्य कीं या उत्तरा ॥
साहिलें कसें प्रियवरा मम डाव जिंकिला खरा ।
खरें कुडें हें बोला, मग श्रीहरी करिल परिहरा' ॥
चाल ॥ तंव भीष्म द्रोण गहिंवरें । सद्गदित वदति उत्तरें ।
'जिवरहीत शव जें धरें । आम्हां अद्भुत द्वैत हें खरें ।
बुद्धि पुरेना, शब्द स्फुरेना, कुंठित झाली मती ॥ पति० ॥ १३ ॥

---

१. मोरोपंत—सभापर्व, अ० ५ आर्या ३६ पहा. (काव्यसंग्रह—पृ० ४१.) २. अवघा. ३. मोरोपंत—सभापर्व, अ० ५ आर्या ३७-४२ पहा. (काव्यसंग्रह—पृ० ४१.) ४. भीमाला. ५. संसार. ६. पुढें पृष्ठ ११८ टीप ५ पहा. ७. मोठा साप. ८. तमोगुणहीन. ९. पृथ्वी. १०. प्रेत. ११. बाहेर पडेना.

भूभार सांडि जरि फणी[1], पश्चिमे उदय दिनेमणी[2] ।
सिंधु पाणिविरहित हा, तरि असत्य धर्म ना गणी ॥
हे सभेमाजि ये क्षणीं आम्हासि जिंकिलें पणीं ।
सत्य म्हणे हें असत्य नोहे असीच बोलती वाणी ॥
हा दुर्योधन अवगुणी, न मानि आमुचि बोलणी ।
दुष्ट नष्ट पापिष्ट दुरात्मा घेत मृत्युची धणी' ॥
तैं विकर्ण[3] तो सद्गुणी कर उभारुनियां झणीं ।
'माना किं न माना परि वदतों[4] मिथ्या हे काहणी ॥
चाल ॥ पांडवांसहित यूवती । संपत्ति जिंकिली द्युतीं ।
सकळसभा अन्याइ, भीष्मही[5] नागवला स्वस्थिती. ॥ पति० ॥ १४ ॥
हे गोष्टि त्याचि ऐकिली, तुझि मंद बुद्धि जाहली ।
म्हणति शतामधिं माता तुंजला एकातें प्रसवली' ॥
तों गगनवाणि[6] जाहली हें सत्यसत्य बोलली ।
देवीं दुदुंभी वाजविल्या, शिरिं पुष्पवृष्टि पाडिली ॥
कर्णासि क्रूरता आली म्हणतसे[7], 'संबोरी[8] केली ।
दुषी[9] वडिला, पाहिजे किं याची ग्रीवां[10] हो ! छेदिली ॥
याणें मर्यादा सांडिली, जल्पना उगिच मांडिली ।
आवेश आला होता, परि वडिलांचि मर्जि रक्षिली' ॥
चाल ॥ ऐकोनि असीं उत्तरें । तो विकर्ण बोले त्वरें ।
'वदलासि करीं तें खरें । ना तरी बा ! रे ! उगि धरें ।
अरे ! राधेया[11] ! हें न घडे तरि नसे पूर्वजां गती' ॥ पति० ॥ १५ ॥
तंव कृष्णा येरीकडे परकरें पावली पिडे ।
दुर्योधनदुर्वाक्यें हृदयीं क्रोध तिचे धडधडे ॥
उज्जु पाहुनि शत्रूकडे जसि 'व्योमीहुनि[12] विजु पडे ।
तेवीं कुरुकुळ दग्ध कराया शापोक्ती कडकडे ॥

---

१. शेष. २. सूर्य. ३. विकर्ण हा धृतराष्ट्राच्या शंभर पुत्रांपैकीं एक. हा महारथी असून मोठा न्यायी होता. हा दुर्योधनादिकांस प्रिय नसून पांडवांस प्रिय होता. ४. मोरोपंत—सभापर्व, अ० ५ आर्या ४५-५३ पहा. [काव्यसंग्रह—पृ० ४२-४३.] ५. भीष्माला. ६. आकाशवाणी. ७. सभापर्व—अ० ६८ श्लो० २७-३८ पहा. [काव्यसंग्रह—मोरोपंत—सभापर्व—पृ० ४३-४४ आर्या ५६-६३ पहा.] ८. माफी. ९. विकर्ण दोष लावी. १०. गळा. ११. कर्णा ! १२. आकाशांतून.

कुरुपुत्रा ! परिसें पुढें निजवंशीं केलें कुडें ।
वर्षें त्रयोदश सरल्या कुळक्षय निश्चयें घडे ॥
भिमकरीं पाहें तीकडे नोवरीसि हळदी चडे ।
रण तळवट बोवलें करूनि स्वस्थ मांडिवरि पडे ॥
चाल ॥ मंगलाकार वोविया । त्या रडती सकळ स्त्रिया ।
ते गदा करुनियां प्रिया । निद्रिस्त स्वस्थ पापिया ।
व्हावें मागुति नोहे जागृति भोग भोगिं परगती' ॥ पति० ॥ १६ ॥
ऐकोनि शाप उत्तरें भयें कांपतसे थरथरें ।
दुर्योधन मग क्रोधेंकरुनी बंधुउजू मग फिरे ॥
म्हणे दुःशासनासी, 'अरे ! पहासी काय नीकरें ।
फेडी वसन आणि नग्न हे सभेस पाहुंदे त्वरें' ॥
असें ऐकुनियां त्या क्रूरें तैं वेणि होति वामकरें[1] ।
सत्वर निरी धरुनि आसुडी, पांचाळी[2] घाबरे ॥
आस सोडिलि आपपरें एकाग्र करुनि मन धुरें ।
त्रिभुवनचालक निजजनपालक त्या कृष्णातें स्मरे ॥
चाल ॥ 'हे नारायण[3] ! श्रीवरा[4] । हृदयस्था! विश्वंभरा! ।
गोविंदा ! मुरलीधरा ! । ब्रिद रक्षीं पतितोद्धरा ।
कानायी[5]! मम आई ! पाहिं मज वैरी हे गांजिती. ॥ पति० ॥ १७ ॥
किति अंत पाहसी हरी ! मज न दिसे आतां उरी ।
देह वोपुं पापियां किं प्राण धाडुं द्वारकापुरीं ॥
हे ! गोविंदा ! मूरारी ! म्या तुझीच रे! कूमरी।
त्वांच सुभद्रेसारिखी बहिणी म्हणविसि पाठिची[6] खरी ॥

---

१. वाम+करें=डावा+हस्तानें. २. द्रौपदी. ३. 'नारायण' या शब्दाचा अर्थ पुढील आर्यांत स्पष्ट केला आहे. "आकाशादिक तत्वें, त्यांतें जो व्यापुनी सदा राहे । यास्तव कवि म्हणती तो, नारायण नाम पावला आहे. ॥ ४५ ॥ नर आत्मा त्यापासुनि, झाले ते 'नार' जीव त्यां म्हणती । त्यांचें अयन म्हणवुनि नारायण नाम त्यास कवि देती. ॥ ४५ ॥ नर आत्मा त्यापासुनि झाल्या ज्या आप 'नार' त्या म्हणती । त्या नार अयन ज्याला नारायण नाम त्यास मुनि देती. ॥ ४५ ॥ [नामार्थदीपिका—पृ० २७।२८.] ४. मोरोपंत—सभापर्व, अ० ५ आर्या ६८-७९ पहा. [काव्य-संग्रह—पृ० ४४-९५.] ५. कान्हया! कृष्णा! कानायी शब्द स्त्रीलिंगी आहे. आराध्यदेवतेला 'माउली, आई' अशा स्त्रीवाचक शब्दांनीं संबोधन करून प्रार्थना करावी असें वर्णन जुन्या भक्तिप्रतिपादक ग्रंथांत वारंवार आढळतें. ६. धाकटी बहीण.

मज येवढी कैंची परी मी दासि तुझिच निर्धारीं ।
तेंहि भाग्य मज नसे पादुकातळीं मृत्तिका खरी ॥
चाल ॥ निजभक्तांचा कळवळा । अवतरसी नानालिळा ।
तूं आमुचा तरि जिव्हाळा । मज मांडिली हे अवकळा ।
सकळ कळा निष्कळा तुझ्या ह्या होति, राखें इजप्रती. ॥पति० ॥ १८ ॥
किति धांवा करूं मी स्तुती, वेदांचि खुंटली मती ।
माय रुक्मिणी! काय पाहसी? धाडिं आपुला पती ॥
करि संकटिं जैशारिती पावलासी कवणे गती? ।
तेच रिती हे मज आकांतीं पावावें स्वस्थिती ॥
फेडिलें वैसन दुर्मती, हें सकळ लोक पाहती ।
तरिं मग पतितपावन! तुजला कोण कसें बोलती ॥
शेवटीं हेचि वीनती, तव नामाच्या आवृती ।
प्राण पाठविन तव अभिषेका, देह ठेवुं हे क्षितीं' ॥
चाल ॥ यापरी हाक मारिली । जसि यंत्रगोळी सूटली ।
ते ध्वनी कानिं ऊठली । भेदोनि हृदयिं फूटली ॥
नुठवित उठली मूर्ति परात्पर, चरण झाडि श्रीपती. ॥ पति० ॥ १९ ॥
'त्राहिं हो! पावलों त्वरा, जिव होउं नेदिं घाबरा' ।
असा सोयरा गर्जूनि नीघे भक्तकाजकैवरा ॥
रुक्मिणी म्हणे, 'कां त्वरा'? परि दिलें नाहिं उत्तरा ।
निघे घाबरा ध्यानिं पाहुनी पतितोद्धारक खरा ॥
मन पवन, गरुड तीसरा हे लैाग करिती सत्वरा ।
परि गति हरिची अन्य परीची न लभे त्यांतें जरा ॥
चाल ॥ दे सभेमाजि दाखला । द्रौपदी पाठिं ठाकला ।
साधुनिं मनीं भाकिला । द्रौपदी म्हणे, 'पावला' ।
हर्षें निर्भर झाली मोठी पांडवांचि यूवती. ॥ पति० ॥ २० ॥
महा तेज तदां झौंळझळे, हें भीष्म द्रोणासीं कळे ।
खुणाविती इसि हरी पावला, आतां संकट टळे. ॥

---

१. निश्चयें. २. हत्ती. ३. वस्त्र. ४. जमिनीवर. ५. पाठलाग. ६. स्त्री. ७. चकाके.

हें कृत्य मांडिलें खळें, पतिव्रता गांजिली बळें ।
क्रोधाग्नीनें इच्या समुळ कुरुकूळ व्यर्थ हें जळे ॥
तंव दुर्योधन ते वेळे गरगरां फीरवी डोळे ।
'मंदा दुःशासना! अज्ञुनी कैसें तुज नाकळे?' ॥
तंव आवेशें तो खिळे, करिं धरुनि वसन आफळे ।
फेडि शीघ्रगति अंत पहाती नेसलि [1]सोनेसळे ॥
चाल ॥ ते दुष्ट महादुर्मती । अविचारें काय बोलती? ।
'स्त्रीचरित्र पहा हो! किती । नेसली दुजें आंत ती' ।
तेंही [2]हेरि, तंव निघे भरजरी कुसुंबीच पाहती. ॥ पति० ॥ २१ ॥
[3]आपाद मस्तकाहुनी नेसली बुंथि[4] घेउनी ।
केंश नखें अवलोकन करितां न देखती लोचनीं ॥
पैठणी सुरत आणि चिनी काश्मीर थेट उज्जनी ।
चित्रविचित्रें नानापरिचीं एकाएकाहुनी ॥
असि किति वर्णुं मी [5]आननीं असंख्य पेठ [6]मेदिनी ।
विश्वदेखणा क्षणांत नेसवी उत्तम तें पाहुनी ॥
मग [7]सत्यलोक भूवनीं तें वैकुंठही शोधुनी ।
कैलासीचीं वाटे अवघीं आणितलीं लुटुनी ॥
चाल ॥ दश अवतारांचे ठसे । उमटले दिव्य जसे तसे ।
अमोल्यवर्ण चिर दिसे । तो लगबग फेडीतसे ।
सभेमाजि वस्त्रांचे पर्वत । पडले नेणों किती. ॥ पति० ॥ २२ ॥
यापरी तिन्ही भूवनें धुंडाळुनि [8]मनमोहनें ।
बोळवणी बहिणीची केली पाहति कौरव दिनें ॥

---

१. भरजरी पीतांबर. २. हरण करी. ३. पायांपासून. ४. बुरखा. ५. मुखानें. ६. पृथ्वी. ८. सात लोकांपैकीं हा एक आहे. सप्तपाताल आणि सप्तलोक मिळून चवदा भुवनें:—अतल, वितल, सुतल, महातल, रसातल, तलातल आणि पाताल अशीं सात पाताळें; भूर्लोक (मृत्युलोक), भुवर्लोक (पृथ्वीपासून सूर्यापर्यंतचा भाग, येथें मुनि सिद्ध इत्यादि राहतात), स्वर्लोक (स्वर्गलोक, सूर्यमंडळापासून ध्रुवापर्यंतचा भाग; येथें देवांसह इंद्र राहतो), महर्लोक (सूर्यगोल व इतर तेजस्वी भाग), जनोलोक (येथें ब्रह्मदेवाचे पुत्र राहतात), तपोलोक (येथें तपश्चर्या करणारे राहतात), आणि सत्यलोक (येथें ब्रह्मदेव आणि ऋषिजन राहतात. ८. कृष्णें.

दोहातीं दुःशासनें किति फेडियलीं वसनें ।
अनंत[1] नेसवी अनंतहस्तें अनंत चिरें[2] जलदिनें ॥
शेवटीं पतितपावनें[3] निश्चयो करुनियां मनें, ।
नेसवि प्रावर्णिचा[4] पीतांबर दिव्य तसें जें जुनें ॥
जें श्वासयुक्त सूमनें पहातसे सभा लोचनें ।
हस्त लावितां मस्त[5] निर्दळिन समस्त सुदर्शनें[6] ॥
चाल ॥ मग चक्र उभारुनि करीं । क्षोभला किं हा नरहरी[7] ।
भासला प्रळय अंतरीं । तंव भीष्म द्रोण यावरी ।
हाक मारिती, करें वारिती, 'दुर हो रे! दुर्मती. ॥ पति० ॥ २३ ॥
अरे! पाप्या दुर्योधना! आजुनी उमज दुर्जना! ।
समज नसे तुज, सुत! अंधाच्या उघडिं शीघ्र लोचना ॥
धृतराष्ट्रा! गतलोचना[8]! अद्यापि तुला समजेना ।
प्रळयघडी हे लटकी गोष्टी आवरिं दुःशासना ॥
शकुनि करिल दहना, हें मिथ्या कधिं ना गणा ।
सकळ तुम्हीं गुंतलेति मोहें अंतकाळ पाहना.' ॥
असें ऐकुनि दचके मना धृतराष्ट्रा दुर्योधना ।
दुःशासनासि वारी हातें, करिं दाविति सूचना. ॥
चाल ॥ 'अरे! वस्त्रें अवघींच हीं । न्या रक्षा अंतर्गृहीं' ।
धांवती दूत लवलाहीं । तंव एकहि न दिसे मेहीं[9] ।
द्रौपदि दैवें दृष्टी पाहिली भिक्षूनेत्राप्रती ॥ पति० ॥ २४ ॥

---

१. कृष्ण=विष्णु. ['ज्याचा पार न लागे, जो अपरिच्छिन्न देशकालानें । यास्तव कविजन म्हणती, अनंत हें नाम घेतलें त्यानें. ॥ ५९ ॥ सर्वगत नित्य अपरिच्छिन्न असें वर्णितात वेद जया । जो शेषरूप अथवा, यास्तव देती अनंत नाम तया. ॥ ८६ ॥ [नामार्थदीपिका–पृ० ७४, पृ० ९९.] २. वस्त्र. ३. पतितांला (पातकी जनांला) पावन करणाऱ्या कृष्णानें. ४. प्रावर्ण=वसन, वस्त्र. ५. माजलेले. ६. सुदर्शन नामक चक्रानें. ७. नृसिंह. ८. गत (गेलेले आहेत) लोचन (नेत्र) ज्याचे तो. ९. भूमीवर.

# निवृत्तिनाथकृत[1]

## १३. परमप्रकाश.

(ओंव्या.)

ॐ नमो जी आद्या । वेदप्रतिपाद्या ।
जय जय स्वसंवेद्या । आत्मस्वरूपाय नमो नमः ॥ १ ॥
देवाधिदेव[2] परमहंस[3] । [4]हंसासि दीधला उपदेश ।
हंस परमहंस समरस[5] । जाहले तेथें. ॥ २ ॥

---

१. निवृत्तिनाथ यांचा जन्म आळंदी येथें शके ११९० या वर्षाचे सुमारास झाला. हे सुप्रसिद्ध ज्ञानेश्वर महाराजांचे ज्येष्ठ बंधु होत. निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव व मुक्ताबाई, हीं चारी भावंडें अवतारी होत. प्रसिद्ध कवि मोरोपंत यांणीं आपल्या 'सन्मणिमाले'त प्रथमारंभींच या चारी भावंडांचें अनुक्रमें वर्णन केलें आहे. यांच्या बापाचें नांव विठ्ठल व आईचें नांव रखमाई असें होतें. विठ्ठलाचे बापाचें नांव गोविंदपंत व आईचें नांव निराबाई. हें कुटुंब खानदेशानजीक आपेगांव येथें रहात होतें. रखमाबाईचे बापाचें नांव सिदोपंत. हा आळंदीचा राहाणारा व तेथील कुळकर्णी होता. विठ्ठल स्वभावतःच विरक्त होता; हा श्रीकाशीक्षेत्रीं जाऊन 'श्रीपादस्वामी'चा पट्टशिष्य होऊन नूतन 'चैतन्यस्वामी' हें नांव धारण करून व चतुर्थाश्रम संपादून राहिला होता. पुढें श्रीपादस्वामी तीर्थाटन करीत करीत आळंदीस आले. तेव्हां विठ्ठलाची पत्नी रखमाई पतिविरहानें विरक्त झालेली अशी अश्वत्थप्रदक्षणा करीत असतां, श्रीपादस्वामी तेथें पोंचले. रखुमाईनें त्यांचे चरणीं मस्तक ठेवतांच 'पुत्रवती भव' असा श्रीपासून आशिर्वाद झाला. पुढें आपले पट्टशिष्य चैतन्य हे रखुमाईचे यजमान असें समजून आल्यावर पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारण्याविषयीं गुरूची आज्ञा होतांच निरुपाय होऊन पुनः विठ्ठलपंतांनीं गृहस्थाश्रम स्वीकृत केला; तदनंतर हीं चार अपत्यें यांचे पोटीं जन्मास आलीं. याच कारणावरून आळंदी येथील ब्राह्मण मंडळीनें यांना जातिबहिष्कृत केलें होतें. पुढें पैठणास जाऊन तेथें यांनीं अमानुष चमत्कार केले व तेव्हांपासून हीं चारी भावंडें अवतारी देवांप्रमाणें चमकूं लागलीं. असें यांचें जन्मवृत्त चमत्कारिक आहे. निवृत्तिनाथ यांना सुप्रसिद्ध मच्छिंद्रनाथ यांचे शिष्य गोरखनाथ व त्यांचे शिष्य गैनीनाथ यांपासून ब्रह्मोपदेश झाला होता. प्रसिद्ध सोहिरोबानाथ यांनाही याच गुरुमालिकेंतील गोरखनाथ अथवा गैबनाथ नांवाच्या सिद्ध पुरुषापासून ब्रह्मोपदेश झाला होता. निवृत्तिनाथ शके १२१६ ज्येष्ठ वद्य १३ या दिवशीं त्र्यंबकेश्वरीं समाधिस्थ झाले. यांच्या समाधिकालची एक चमत्कारिक गोष्ट सांगतात ती अशी:—निवृत्तिनाथ आपल्या भावंडांसह त्र्यंबकेश्वरीं गेले होते. इहलोकाचा त्याग करावा अशी इच्छा होतांच हे तेथें तीर्थांत उतरले. जसजसे आंत जाऊं लागले तसतसा शरीराचा भाग जलमय होऊं लागला; हें पाहातांच ज्ञानोबा, सोपानदेव व मुक्ताबाई हीं तिघें धांवत जाऊन धरीत तों पावेतों यांचे देहापैकीं फक्त शिर त्यांचे हातीं सांपडलें. बाकी भाग जलमय होऊन गेलाच होता. नंतर तें शिर आणून तेथेंच यांच्या शिरास समाधि दिली. यांची पदें भक्तिपर, वैराग्यपर, अशीं आहेत. शिवाय 'वृत्तिबोध' या नांवाचा आणखी एक यांचा ग्रंथ आहे असें समजतें, पण तो अद्याप उपलब्ध नाहीं. २. देवश्रेष्ठ. ३. पंचमहाभूतांहून निराळा शिवरूप तो. ४. पंचमहाभूतात्मक जीवरूप तो. ५. एकरस, ब्रह्मानंदरूप, एकरूप.

तें सुख सांगेन तिसरें[1] । जेथें जीवें[2] शिव विरे[3] ।
तें पद निर्धारें[4] । पुसों गुरूसी ॥ ३ ॥
तंव शिष्य म्हणे, 'गुरूदेवा ! । जीव शिवाचा ठाव[5] दाखवा ।
ये विषयीं फेडावा । संदेह[6] माझा ॥ ४ ॥
जी ! तुमचा दास असें । जन्ममरणाचें फेडा पिसें[7] ।
जेणें स्वयेंस्वरूप प्रकाशे । माझिये देहीं ॥ ५ ॥
तो सांगिजे उपावो । जेणें फिटे द्वैत[8]भावो ।
करा उपदेश उपावो । ब्रह्मज्ञानाचा.' ॥ ६ ॥
तंव श्रीगुरू म्हणे शिष्यासी, । 'ब्रह्म नव्हे एकदेशी[9] ।
तें असे तुजपाशीं । परी बीज नकळे तुज ॥ ७ ॥
तें सांगेन तुजपाशीं ज्ञान । जे वस्तुकारणें ऋषीजन ।
साही[10] शास्त्रें अठरा पुराणें[11] । कष्टताती ॥ ८ ॥
चौदो[12] विद्या चारी वेद । नाना शास्त्रीं विवाद ।
परी न पवती भेद । तये वस्तूचा ॥ ९ ॥

---

१. ब्रह्मानंद सुख. २. जीवशिवाचा ऐक्यभाव, अभेदभाव, अद्वैतपणा. ३. लय पावे. ४. निश्चयानें. ५. ठिकाण. ६. संशय. ७. वेड. ८. जीवशिवाचा वेगळेपणा. ९. थोड्या ठिकाणीं असणारें, अल्पव्यापी, परिच्छिन्न, ('कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् । तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥' श्रीमद्भगवद्गीता–अ० ३ श्लो० १५.) याचा भावार्थ:—'कर्माची उत्पत्ति ब्रह्मापासून जाण. ब्रह्म हें कधींही नाश न पावणारें आहे, आणि दुसऱ्या कशापासूनही उत्पन्न झालें नाहीं.' [सुबोधचंद्रिका–टीका.] १०. सहा शास्त्रांचीं नांवें:—सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा, वेदांत. ११. पृष्ठ ५१ टीप ३ पहा. १२. चौदा विद्या. ['अङ्गानि वेद चत्वारि मीमांसा न्यायविस्तरः । पुराणं धर्मशास्त्रं च विद्या ह्येताश्चतुर्दश ॥' इति, 'पुराणन्यायमीमांसाधर्मशास्त्राणि अङ्गमिश्रिताः वेदाः । शिक्षा कल्पो व्याकरणं निरुक्तं छंदज्योतिषम् इति षडङ्गानि । एवं चतुर्दश विद्याः' इति हेमाद्रिः. चार वेद (ऋग्, साम, यजुष्, अथर्वन्)+सहा अंगें (छंद, सूत्र, ज्योतिष्, निरुक्त, शिक्षा आणि व्याकरण)+पुराणें (ब्राह्म, पद्म, वैष्णव, शैव, लिंग, गरुड, नारद, भागवत, अग्नि, स्कंद, भविष्य, ब्रह्मवैवर्त, मार्कंड, वामन, वराह, मत्स्य, कूर्म आणि ब्रह्मांड)+न्यायशास्त्र+पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा+धर्मशास्त्र (गृह्यसूत्रें व मन्वादि स्मृति). अन्य मतें (१) ब्रह्मज्ञान, रसायण, स्वरधर, वेद, ज्योतिष्, व्याकरण, धनुर्विद्या, जलतरण, न्याय, कोक, अश्वारोहण, नट, कृषी, वैद्य, (२) चार वेद (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद)+चार उपवेद+सहा शास्त्रें (धर्मशास्त्र, सांख्यशास्त्र, वेदांतशास्त्र, न्यायशास्त्र, योगशास्त्र, कामशास्त्र.)]

स्नान दान यज्ञादि तप । तीर्थ क्षेत्रें होम हवन जप ।
परी न पवती स्वरूप । आत्मयाचें[1] ॥ १० ॥
एक गोदान भूदान । स्त्रीदान कन्यादान ।
दीजे परी जन्ममरण[2] । भोगिजे मागुतीं ॥ ११ ॥
एक गिरिकंदरीं[3] ध्यानस्थ । एक नग्न मौनी तटस्थ ।
परी न पवती सद्वस्तु[4] । सद्गुरुविणें ॥ १२ ॥
एक परकायाप्रवेश[5] साधिती । एक भूत भविष्य वर्तमान सांगती[6] ।
परी निर्भ्रांत[7] वस्तू न पावती । येणें बुद्धीं ॥ १३ ॥
एक वाचासिद्ध जाहले । एक अंधा देती डोळे ।
वांझे पुत्र देऊं लागले । परी न पवती परत्र साधन ॥ १४ ॥
एक आहार तोडिती वायां । एक लटिकी शोधिती काया ।
परी न पवती शिष्यराया ! । तये वस्तूतें ॥ १५ ॥
एक उपवास पारणी लोटांगणें । एक डोळे झांकुनि करिती ध्यानें[8] ।
यापरी ब्रह्म पावणें । कैंवि घडे ? ॥ १६ ॥
एक तपाचेनि वळें । भोगिती ऋद्धि[9] सिद्धीचे सोहळे ।
ते ज्ञानाविणें आंधळे । जाहले देखा ॥ १७ ॥
एक सुवर्ण[10] सिद्धि लोकांस देती । एक मेलीं मनुष्यें उठविती ।
परी आत्मज्ञानाविण[11] अधोगती[12] । जाहली देखा. ॥ १८ ॥

---

१. हृदयांतर्गत सूक्ष्म आत्मा जो त्याचें. २. लक्ष चौऱ्याऐंशीं योनीच्या फेऱ्यांत. ३. पर्वताच्या गुहेंत. ४. परब्रह्मरूप परमेश्वर. ५. योग्यास परशरीरामध्यें प्रवेश करतां येतो. [योगसूत्र—पाद ३.] ६. योग्याला भूत, भविष्य आणि वर्तमान कळतें असें योगशास्त्रकाराचें मत आहे. [योगसूत्र—पाद ३.] ७. संशयरहित वस्तु, परब्रह्म. ८. योगाचें एक अंग. योगाचीं अंगें आठ. तीं येणेंप्रमाणें:—यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान, धारणा, समाधि. ध्यान याचें लक्षण असें आहे:—"ध्यान—सर्व विषय वर्ज्य करून परमात्म्याकडेच एकाग्रतेनें मन लावून चिंतन करणें याला ध्यान म्हणतात. पातंजलयोगसूत्रांत ध्यानाचें लक्षण असें केलें आहे:—'तत्र प्रत्ययैकतानता ध्यानम्' [पाद ३, सूत्र] याचा अर्थ इतकाच कीं नाभिचक्र, हृदयपुंडरीक, नासिकाग्र इत्यादि स्थलीं चित्तवृत्तीची जी एकाग्रता होते त्या स्थितीला ध्यान असें म्हणायाचें. प्रस्तुत सूत्रांत 'एकतानता' असा जो शब्द आहे, त्याचा अर्थ एकाग्रता आहे. ध्यान हें एक प्रस्तुत विषयाचें महत्वाचें अंग आहे. ध्यानापासून ज्या शक्ति प्राप्त होतात त्यांचें वर्णन गोरक्षनाथाचे ग्रंथांत फार केलें आहे." [सरलार्थबोधिनी गीता—पृष्ठ ३५७.] ९. ऋद्धि—समृद्धि, संपत्ति, ऐश्वर्य. अणिमादि अष्टमहासिद्धि. १०. किमयादिकेंकरून सुवर्ण उत्पन्न करणें. ११. स्वस्वरूपाचें ज्ञान झाल्यावांचून. ('अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति । नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ॥' भगवद्गीता—अ० ४ श्लो० ४०.) १२. जन्म, मरण, नरकवास.

एक स्वर्गीं करिती उड्डाण । एक पाताळीं करिती गमन ।
[1]अष्ट महासिद्धीचें लक्षण । नव्हे प्राप्ति [2]निजरूप. ॥ १९ ॥
एक सूर्यमंडळ तळीं आणिती । एक यक्षिणीहातीं सेवा घेती ।
[3]भुतें वेताळ झोटिंग खेळविती । दृष्टीपुढें ॥ २० ॥
ऐसे जे मंत्रवादी । तयांसि कैंची [4]आत्मशुद्धि ।
ते पडिले गर्भवासाचे [5]बंधीं । न सुटती देखा. ॥ २१ ॥
ऐसे जे [6]भूत संचारी । तयांसि ठाव नेदी [7]धरत्री ।
ते नागवले सर्व प्रकारीं । जाण पुत्रा ! ॥ २२ ॥
तयासि [8]वैराग्य [9]ना घर । दोहीं पदार्थी [10]नांड थोर ।
तयासि आली हार । [11]चौऱ्याऐशीं लक्ष योनींची. ॥ २३ ॥

---

१. अष्टमहासिद्धीचीं नांवें:—अणिमा (अल्पत्व), महिमा (महत्व), गरिमा (जडत्व), लघिमा (लघुत्व), ईशत्व (वर्चस्वीपणा), वशित्व (सर्व वश होणें), प्राप्ति (इच्छित लाभ), प्राकाम्य (अकुंठित गती). २. स्वस्वरूपाचे ठिकाणीं ब्रह्मसाक्षात्कार होणें, शुद्ध स्वरूपाचें ज्ञान. ३. पिशाचयोनीचे प्रकार. ४. आत्म्याची पवित्रता, उपरती. ५. बंधनांत. ६. जारणमारणादिकेंकरून पिशाचवत् संचार करणारें (परकायाप्रवेशादिक). ७. पृथ्वी. ८. विषयवैराग्य. (विषयत्याग). याचें लक्षण ज्ञानोबांनीं ज्ञानेश्वरींत सांगितलें आहे. तें असें:—'वमिलिया अन्ना । लाळ न घोंटी रसना । आंग न सूये आ-लिंगना । प्रेताचिया. ॥ ३५ ॥ विषखाणें नागवे । जळत्या घरीं न रिघवे । व्याघ्रविवरा न वचवे । वस्ती जेंवी ॥ ३६ ॥ धडाडिते लोहरासीं । उडी न घालवे जैसी । न करवे उशी । अजगराची ॥ ३७ ॥ अर्जुना! तेणें पाडें । जया विषयवार्ता नावडे । नेदी इंद्रियांचे तोंडें । कांहींचि जावो ॥ ३८ ॥ बहु योगाभ्यासीं हांव । विजनाकडे धांव । न साहे जो नाव । सांगातियाचें ॥ ३९ ॥ नाराचांचीं आंथरुणें । पूयपंकीं लोळणें । तैसें मानी भोगणें । ऐहिकींचें ॥ ४० ॥ तें हें विषय-वैराग्य । आत्मलाभाचें भाग्य । तेणें ब्रह्मानंदा योग्य । जीव होती ॥ ४१ ॥ ऐसा उभय भोगीं त्रास । देखसी जेथ बहुवस । जाण तेथें रहिवास । ज्ञानाचा तूं ॥ ४२ ॥' याप्रकारचें वैराग्यही नाहीं. ९. घर—प्रपंचही नाहीं. ना प्रपंच ना परमार्थ. ('दोहींकडे अंतरला । थोरपणें भांबावला ।' —रामदास.) १०. विपत्ति, दुःख. ११. लक्ष चौऱ्याऐशीं योनीची संख्या:—२१ लक्ष अंडज खाणींत, २१ लक्ष जारज खाणींत, २१ लक्ष उद्भिज खाणींत, २१ लक्ष स्वेदज खाणींत. दुसराही एक प्रकार आहे. तो असा:—'संकल्प विकल्पात्मक मतें । नाना दर्शनें कष्टते । जंव महावाक्य विवरणचित्तें । अनुभविलें नाहीं ॥ ५ ॥ जंव निरुपाधि स्वरूप । अनुभविलें नाहीं आपेंआप । तंव कष्टांसी माप । क-वण करी ॥ ६ ॥ व्रत तप नियमाच्या सांकडी । संदेहीं गुंतलीं बापुडीं । तीं कैंवि पावती पैल थडी । संसारसागराची ॥ ७ ॥ पूजा स्नानें तीर्थें दानें । मंत्र योग हवनें । किजे तितुकें फळ भोगणें । स्वर्गादिक सर्वथा ॥ ८ ॥ जपतप अनुष्ठान । आणिक नानापरीचीं साधनें । मोक्ष न पविजे आत्म-ज्ञानें । वांचुनियां ॥ ९ ॥' [मुकुंदराज—परमामृत.]

आतां एक सांगेन निर्धार । जेणें कष्ट न पवीजे शरीर ।
ते वस्तू सांगेन निर्धार । शिष्यराया ! ॥ २४ ॥
अखंड [1]निजरूप । तुजपुढें [2]अमूप ।
हें सांडूनि परद्वीप । लंघणें कासया ? ॥ २५ ॥
यासी आदि अंत ना मध्य । नाहीं करचरणसंबंध ।
भेद ना अभेद । वोळख पुत्रा ! ॥ २६ ॥
तुवां पुशिला हंस परमहंस । जीव शिव [3]समरस ।
तें सांगेन [4]परियस । शिष्यराया ! ॥ २७ ॥
हंस [5]पंचभूतांसहित जीव । परमहंस [6]पंचभूतांविरहित शिव ।
दोहींचा निवडूनि ऐक्यभाव । शिष्यराया ! ॥ २८ ॥
हंस जीव दोनी माया । परमहंस शिव दोनी ब्रह्म शिष्यराया ! ।
दोहींचा [7]दृष्टांतु, एकचि काया । गुरुशिष्यांची. ॥ २९ ॥
शिष्य तोचि [8]क्षर । गुरू तोचि [9]अक्षर ।
या दोहींचें [10]सार । निराकार जाण. ॥ ३० ॥
निराकार तेंचि [11]अनंत सिद्धांचा शब्द । दोनि कथा गुरू शिष्य प्रसिद्ध ।
नव्याण्णव कोटी राजे मुंडिले अभेद । वस्तु देखोनी ॥ ३१ ॥
ते वस्तू निरोपीन तुजप्रति । जेणें फिटे तुझी भ्रांति ।
तें सुख आनंद निर्गुण प्रतीति । दाखविता जाहला. ॥ ३२ ॥

---

१. स्वस्वरूप, शुद्ध स्वरुप. २. अपार. ३. एकरस, ब्रह्मानंद. ४. ऐक. ५. पंचभूतें. (भूमि, जल, तेज, वायु, आकाश,) पंचभूतात्मक जीव. ६. पंचभूतांहून निराळा. ७. दृष्टांत, उदाहरण. ८. नाशवंत. (सर्व चराचर जें जड आहे तो क्षर.) ९. अविनाशी. (सर्व चराचरांमध्यें पर्वताच्या शिखरासारखें स्थिर चैतन्य आहे त्याला अक्षर म्हणतात.) १०. याहून भिन्न असा जो उत्तम पुरुष, परमात्मा, सर्वकाळ राहाणारा, त्रैलोक्याला व्यापून त्याचें धारण पोषण करित होत्साता, ज्याला आकार नाहीं असा. ११. ज्याला आदिहि नाहीं व अंतहि नाहीं असा अपार सिद्धपुरुषांचा शब्द (सिद्धांत). 'द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च । क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥ उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः । यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥' [भगवद्गीता–अ० १५ श्लो० १६।१७.] याचा भावार्थः—'या लोकीं क्षर म्हणजे नाशवंत, आणि अक्षर म्हणजे अविनाशी, हे दोन पुरुष आहेत. सर्व चराचर जें जड आहे तो क्षर, आणि त्यामध्यें जें पर्वताच्या शिखरासारखें स्थिर चैतन्य आहे, त्याला अक्षर म्हणतात. यांहून भिन्न असा जो उत्तम पुरुष, त्याला परमात्मा म्हणतात. तोच सर्वकाळ राहणारा, सर्वश्रेष्ठ. तो त्रैलोक्याला व्यापून त्याचें धारणपोषण करितो.' [सुबोधचंद्रिका–टीका.]

तया सुखासि नाहीं दुःख । हारपली तहान भुक ।
अमृत आणि विख । एक जाहलें. ॥ ३३ ॥
ऐसें जें कां अपूर्व । तें तूं आइक भावपूर्व ।
जेणें फिटे संदेह । जन्ममरणाचा ॥ ३४ ॥
तें एकचि उघडें ध्यान । तेथें नलगे मुद्रासाधन ।
न देखतां निर्वाण । देखिजे बापा ! ॥ ३५ ॥
अगा ! दृष्टीचें अग्र[1] । तेथें दशवें[2] द्वार ।
तयावरी वस्तू[3] निर्धार । देखिजे पैं ॥ ३६ ॥
दशवे द्वाराचें अग्र[4] । तेंचि मेरू[5]शिखर ।
तेथें सत्रावी[6] सुंदर । उभी असे. ॥ ३७ ॥
तियेचें ध्यावें दर्शन । तीप्रती करावें अनुष्ठान[7] ।
तियेपासून **ब्रह्मा विष्णू रुद्र** जाण । जाहले देखा. ॥ ३८ ॥
तीपासूनि चारी[8] वाचा । **रुद्र** नातू तियेचा ।
**ब्रह्मा** नातू **रुद्रा**चा । आइकें शिष्या ! ॥ ३९ ॥
**विष्णू ब्रह्म**याचा पिता । **ईश्वर विष्णू**चा आजा सर्वथा ।
ईश्वर पुत्र तत्वता । मूळ[9] मायेचा ॥ ४० ॥
ते मूलमाया सत्रावी परंवस्तूची[10] कन्या । ते परंवस्तू[11] शुद्ध चैतन्या ।

---

१. योगरूप आसन मांडून नासाग्रदृष्टी ठेवून भृकुटिचक्राचे ठिकाणीं ब्रह्मसाक्षात्कार पाहणें. (‘समं कायं शिरो ग्रीवं धारयन्नचलं स्थिरः । संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ॥ १३ ॥ प्रशांतात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः । मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः ॥ १४ ॥ [भगवद्गीता–अ० ६ श्लो० १३।१४.] याचा भावार्थः—‘शरीर मस्तक आणि मान हीं नीट सरळ धरून, निश्चळ होऊन, इकडे तिकडे न पाहतां, स्थिर मनानें आपल्या नाकाच्या टोंकाकडे उत्तम प्रकारें दृष्टि लावून, अंतःकरण फार शांत ठेवून, निर्भय होऊन, ब्रह्मचर्यव्रतानें राहून, मनाचा संयम करून, माझ्या ठायीं चित्त ठेवून, मी हेंच सर्वस्व मानून, योगारूढानें रहावें.’ [सुबोधचंद्रिका–टीका.] २. दहावें, द्वार, ब्रह्मरंध्र (तालुस्थान). ३. परब्रह्मवस्तु. ४. टोंक (अणी). ५. ब्रह्मांडकटाहाचें आश्रयस्थान, मध्यमेरू, मध्यपर्वताचें शिखर. ६. ज्ञानशक्ति, ब्रह्मस्थान, अमृतसरोवर, स्वर्धुनी, जिला योगशास्त्रामध्यें अकुल असें नांव आहे ती जीवनकला. हिचें मुख कोयाळाचें, शरीर हंसाचें, मान घोड्याची आणि पाद गाईचे, असें स्वरूप मानतात. ७. योगयुक्त होऊन, मन आणि देह या दोहोंचा संयम करून सर्व इच्छा सोडून व सर्व गुंता सोडून मनाची समाधी करणें. ८. चार वाचांचीं नांवें. परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी. ९. मूळकारण, आदिशक्ति, आदिप्रकृति. १०. श्रेष्ठ वस्तु, आदिबीज, मूलकारण, परब्रह्म. ११. ज्ञानकळा, जीव, आत्मा.

तेथें रां[1]ते तो धन्या । परमात्मा. ॥ ४१ ॥
ऐशी विवंचना देहाची । परि संगती घडे सद्गुरूची ।
सोय दाखवी चमत्काराची । तोचि सद्गुरू. ॥ ४२ ॥
हें व्याकरण जयापासुनि । पुन्हा सांगेन निर्वाणी ।
जेणें होय धुणी । महा पापाची. ॥ ४३ ॥
क्षराक्षर दोनी । हारपलीं जिये स्थानीं ।
तें पद तुजलागूनि । निरोपीन. ॥ ४४ ॥
तयासि नाहीं मूळ । तें अमूळचि केवळ ।
सर्व घटीं तयाचा खेळ । परी न कळे सद्गुरूविणें. ॥ ४५ ॥
तयासि नाहीं माता पिता । तो समस्तांचा जाणता ।
सर्वीं पुरोनि सर्वथा । उरला असे ॥ ४६ ॥
तयासि हात ना पाय । नाहीं स्थूळ कृश देह ।
तेथें मी तूं हा ठाव । पुसियला ॥ ४७ ॥
तेथें उत्तर ना दक्षिण । पूर्व ना पश्चिम जाण ।
चतुष्कोण विलक्षण । जाण शिष्या ! ॥ ४८ ॥
सकळ सृष्टीचा कंद । निराकार हाचि प्रसिद्ध ।
अखंड आत्मबोध । जाण पुत्रा ! ॥ ४९ ॥
तेहतीस[3] कोटी देवांचा ईश । आत्मा हा परम पुरुष ।
तो स्वयंप्रकाश । जाण पुत्रा ! ॥ ५० ॥
समस्त तयाचे पोटीं । तयासि पोट ना पाठी ।
नकळे आत्मयाची गोष्टी । मूढांसि पैं ॥ ५१ ॥
तें ठेंगणें ना वांड[4] । तें स्थूळ ना रोडें[5] ।
तये वस्तूसी जन मूढ । केंवि जाणे ? ॥ ५२ ॥
जयाच्या पूर्वजांचें सुकृत । तयासीच वस्तु प्राप्त ।
मूर्खासि निभ्रांत । नकळे देखा. ॥ ५३ ॥
तें तुजपुढें सर्वथा । सांगीतलें तत्वतां ।
तुझें तूं आतां । गोप्य करीं. ॥ ५४ ॥

---

१. रममाण असतो. २. सूक्ष्म देह. ३. बारा आदित्य, आठ वसु, अकरा रुद्र, दोन आश्विन मिळून तेहतीस देव होतात. आठ वसु, बारा आदित्य, अकरा रुद्र, एक इंद्र आणि एक प्रजापति मिळून तेहतीस देव होतात. असे दोन प्रकार आहेत. ४. उंच वाढलेलें. ५. कृश, सूक्ष्म.

बाह्य आणि भीतरी । तूंचि तूं निर्धारी ।
तुजवांचुनि सर्वत्रीं । दुजे नाहीं. ॥ ९५ ॥
जैशी चंद्रीं कळा । जैशी गोडी गुळा ।
तैसा तूं ब्रह्मावेगळा । कैसा होसी? ॥ ९६ ॥
जैसी आकाशीं छाया नाहीं । तैसा तूं देहातीत विदेही, ।
ज्ञानदृष्टीं पाहातां सर्वही । तूंचि तूं आतां ॥ ९७ ॥
जैसा ब्रह्मांडापासूनि पिंड । तैसा ब्रह्मापासूनि तूं अखंड ।
अंतरीं पाहें प्रचंड । तूंचि बापा ! ॥ ९८ ॥
आतां तूं जपूं नको कांहीं । तूं अजपा जप पाहीं ।
जप नेम मिथ्या पाहीं । तुजवांचुनी. ॥ ९९ ॥
तीर्थे हिंडसी जेथें तेथें । तेथें तूंचि निरूतें[१] ।
तुजपासोनि समस्तें । शास्त्रें झालीं. ॥ ६० ॥
तूं शास्त्राचाही जाणता । तेथें वाचा खुंटल्या समस्ता ।
म्हणोनि शिष्या ! आतां । बोलों नको. ॥ ६१ ॥
बोलणें हें वेदांत । देखणें हें सिद्धांत ।
वस्तू ते एकांत । जाण पुत्रा !' ॥ ६२ ॥
तंव शिष्य म्हणे, 'एक पुसणें असे । दशनाम संन्यास हे कैसे ।
हें सांगावें समरसें । कृपानिधी !' ॥ ६३ ॥
तंव श्रीगुरू म्हणे, 'आईक । देश[२] नाम एक मुख्य ।
दावीन विशेष । तुजप्रती ॥ ६४ ॥
**तीर्थ** ब्रह्म बोलिजे । **आश्रम** विष्णू जाणिजे ।
**वन** बोळखिजे । रुद्र पैं ॥ ६५ ॥
**अरण्य** बोलिजे ॐकार । **गिरी** सदाशिव निर्धार ।
**पर्वत** पुरुष निरंतर । जाण पुत्रा ! ॥ ६६ ॥

---

१. स्पष्ट. २. संन्यासी म्हणजे कर्माच्या आसक्तीपासून दूर होऊन स्वसंकल्पाचा संन्यास करतो, व चित्त स्वाधीन ठेवून सर्व नऊ द्वारांच्या या देहरूप नगरामध्यें, सुखानें वास करतो तो. दहा प्रकारचे संन्यासी व त्यांच्या देवता. तीर्थसंन्यास—ब्रह्मदेवता, आश्रमसंन्यास—विष्णुदेवता, वनसंन्यास—रुद्रदेवता, अरण्यसंन्यास (विद्यारण्यादिकांसारखे)—ॐकारदेवता, गिरीसंन्यास—सदाशिवदेवता, सागरसंन्यास—शक्तिदेवता, पर्वतसंन्यास—परमपुरुषदेवता, सरस्वतीसंन्यास—शिवदेवता, भारतीसंन्यास—परब्रह्मदेवता, पुरीसंन्यास—अलक्षदेवता. (अशा प्रकारचे सांप्रदायाचे संन्यासी 'आल्लेख' असें पुकारतात तें याचसाठीं.)

**सा**गर शक्ति बोलिजे । **स**रस्वती शिव जाणिजे ।
**भा**रत वोळखिजे । परब्रह्म ॥ ६७ ॥
अलक्ष जाणिजे **पु**री । दशनाम व्याकरणीं यापरी ।
दश नामातीत निर्धारी । परमहंस परमपुरुष[1] ॥ ६८ ॥
अर्ध अनुविकार **पु**रींचा । अनुविकार **भा**रतीचा ।
अर्ध उल्लेख विकार **स**रस्वतीचा । जाण पुत्रा ! ॥ ६९ ॥
उल्लेख विकार **सा**गराचा । हेतू विकार **प**र्वताचा ।
अहंकार विकार **गि**रीचा । जाण पुत्रा ! ॥ ७० ॥
चित्त विकार **अ**रण्याचा । बुद्धि विकार **व**नाचा ।
मन विकार **आ**श्रमाचा । जाण पुत्रा ! ॥ ७१ ॥
**ती**र्थाचा इंद्रिय विकार । यापरी दश नाम निर्धार ।
दाविला विचार । देहामाजी. ॥ ७२ ॥
तीर्थ आश्रमीं प्रवेशे । आश्रमवनीं समरसे ।
वन अरण्यीं परियसें । एकवटे ॥ ७३ ॥
अरण्य गिरीमाजी हारपे । गिरी पर्वतीं लोपे ।
पर्वत सागरीं संपे । जाण पुत्रा ! ॥ ७४ ॥
**सा**गर मिळे **स**रस्वतीमाजी । **स**रस्वती मिळे **भा**रतीमाजी ।
**भा**रती मिळे **पु**री सहजी । जाण पुत्रा ! ॥ ७५ ॥
**पु**री परमहंसीं मिळोनि राहे । यापरी दशनाम परात्परीं लीन होय ।
परात्पर परमहंस संन्यासी पाहें । आपेंआप ॥ ७६ ॥
यापरी दश नाम टीका । देहीं देखिजे शिष्यतिळका ! ।
प्रतीति देखिजे एका । सद्गुरुसमागमें ॥ ७७ ॥
यापरी जाणिजे संन्यास । तोचि बोलिजे परमहंस ।
दशनाम स्वरूपीं समरस । तोचि झाला. ॥ ७८ ॥
जो हें ज्ञान देखे शरीरीं । तोचि संन्यासी निर्धारीं ।
सद्गुरुप्रसादें अंतरीं । प्रकाश होय. ॥ ७९ ॥
स्वयंप्रकाश[2] परमहंस । परमहंसासी ऐक्य झाला हंस ।
तोचि बोलिजे संन्यास । संपूर्ण पुत्रा ! ॥ ८० ॥

---

१. या दहा संन्याश्याहून श्रेष्ठ परमहंस (परमपुरुष) होय. २. स्वतःचेच प्रकाशानें प्रकाशित होणारा.

यापरी [1]संविद् ज्ञान । तुज दाखविलें संपूर्ण.' ।
यावरी शिष्य वचन । बोलता झाला. ॥ ८१ ॥
तंव शिष्य म्हणे, 'सद्गुरुनाथा ! । संपूर्ण संन्यास सांगतां ।
निवालों अंतःकरणीं आतां । सद्गुरुराया ! ॥ ८२ ॥
तुम्हांसारिखा गुरुदाता । न देखेंचि मी सर्वथा.' ।
म्हणोनि श्रीगुरुचरणावरी माथा । ठेविता झाला. ॥ ८३ ॥
तंव गुरुनें शिष्य आलिंगिला । शिष्य आनंदें प्रबोधिला ।
तें ज्ञान अनुवादला । **नि**वृत्ति अवधूत. ॥ ८४ ॥
सद्गुरु आनंद प्रसादें । वाचा प्रकाशे आनंदें ।
तें सुख अनुवादे । **नि**[3]वृत्तिनाथ [4]अवधूत. ॥ ८५ ॥

---

## [5]नारायणसुतकृत

## १४. शि[6]वरात्रिकथा.

### प्रसंग पहिला.

(श्लोक.)

**ग**णाधीशाभाळीं घवघवित सिंदूर मिरवे,
गभस्तीसा माथां मुकुट, सुचतुर्पाणी बरवे ।

---

१. ज्ञान, विकास, जागृति. २. बोले. ३. निवृत्तिनाथाचा गुरु, नाथ अवधूत पंथांतील होता हें सुप्रसिद्धच आहे. जसें—गोरखनाथ, मच्छिंद्रनाथ, गैनीनाथ. यासाठींच या दीक्षेचे सांकेतिक शब्द नाथ व अवधूत हे आपल्या नांवांपुढें यांनीं जोडले असावे. ४. अवधूत=विरक्त, विरागी, संन्यासी, योगी. ['यो विलंघ्याश्रयान्वर्णानात्मन्येव स्थितः पुमान् । अतिवर्णाश्रमी योगी **अवधूतः** स उच्यते ॥' किंवा 'अक्षरत्वात् वरेण्यत्वात् धूतसंसारबंधनात् । तत्त्वमस्यर्थसिद्धत्वा**दवधूतो**ऽभिधीयते ॥.'] ५. या कवीविषयीं कांहीं माहिती मिळत नाहीं. ह्या कवीनें केलेलीं कांहीं पदें मात्र आमच्या पाहण्यांत आहेत. ६. या काव्यांत (१) एका भिल्लास शिवरात्रीच्या दिवशीं कांहीं शिकार न मिळाल्यामुळें उपवास घडला; रात्रीं शिकार करण्यासाठीं तो बेलावर चढला तेव्हां त्यानें डोळ्यांपुढें आलेलीं पानें तोडून जमिनीवर टाकिलीं. तीं पानें खालीं असलेल्या महादेवाच्या पिंडीवर अनायासें पडलीं. तेव्हां महादेव संतुष्ट होऊन त्यानें भिल्लास 'पशूंची भाषा तुला समजेल' असा वर दिला; ही कथा व (२) एका राजाला हजार स्त्रिया होत्या, परंतु त्यांतील दोहोंशिवाय सर्व व्यभिचारिणी असल्यामुळें राजास मृगयोनी प्राप्त झाली. शिवरात्रीच्या दिवशीं हा मृग भक्ष शोधित अरण्यांत फिरत असतां पारध्याच्या जाळ्यांत सांपडून त्यास खाण्यास कांहीं मि-

फणी शोभे नाभी पदयुग झणत्कारिति ब्रिदें
तयाचीं मी वंदीं प्रथम संपदी पादकुमुदें. ॥ १
कशी हंसारूढा अभयवरदी हास्यवदना
विराजेंदू भाळीं विलसत सदा शुक्लवसना ।
करीं शोभे वीणा, कुशपदयुगीं नेपुर निके
नमीं मी साष्टांगें कमळजसुते स्फूर्तिकलिके. ॥ २
गुरुर्ब्रह्माविष्णू गुरु शिव परब्रह्म कळलें
दुजी कैंची गोष्टी जननमरणें दुःख टळलें ।
पदाब्जें हो! त्याचीं स्मरण करितांऽनंद हृदयीं
कृपा ऐशी त्याची अमरपुरिसे सौख्यनिलयीं. ॥ ३
नमूनी ते मूर्ती परमहरुषें संत न मिळे
जया विद्वत्संगें त्रिविध जिविंचे ताप शमले ।
कृपा केली तेहीं वद कवि कथा पुण्यसरिता
मनोत्साहें माझे परिसुनि असे शब्द त्वरिता. ॥ ४
आधीं आम्रफळें सदाशिवकृपा, साधुकृपा शर्करा,
आधीं पावन गौतमी वरि असे आली गृहामंदिरा ।
आधीं रत्न विराजमान वरि तें रुक्मेंच पैं जोडिलें
कर्ता मी कविता, अहंपण नसे, श्रोते वरी बोलिले. ॥ ५
श्रोते उत्तर बोलिती कविप्रती, संतोषले मानसीं,
'वर्णीं रे! कविता सुभक्तसरिता शंभूनिसीतें कशी ।
जेणें उद्धरिलीं भिलादिक मृगें तारापदीं बैसलीं
तें तूं वक्त्रपुटीं रहस्य वद गा!' सारोत्तरें वोपिलीं. ॥ ६

---

झालें नाहीं; तेव्हां महादेवानें, क्षानें उपवास केला असें समजून त्यास मुक्ति दिली; ही कथा व (३) एका चोरानें महादेवाच्या पिंडीवर पाय देऊन चांदवा चोरण्याचा विचार केला; तेव्हां महादेवानें भक्तानें देह समर्पिला असें समजून त्यास मुक्ति दिली; अशा तीन कथा ह्या आख्यानांत आहेत. या आख्यानांत ऱ्हस्व दीर्घ अक्षरांच्या यथायोग्य प्रयोगाकडे, संधिनियमाकडे व वृत्तांतील मात्रासंख्येकडे कवीचें कांहींसें दुर्लक्ष्य दिसतें. ७. सूर्याप्रमाणें.

१. आतां. २. पादकमळें. ३. विराजे+इंदु. असा संधि करणें अप्रशस्त आहे. ४. हा शब्द संस्कृतांत स्त्रीलिंगी आहे. ५. विधिकन्यके. ६. करितां+आनंद. ७. नदी. ८. साखर. ९. सोन्यानें.

**मु**चूकुंदें प्रति**रु**क्मिणी **शि**वकथाश्लोकार्थ सांगीतला
  **कै**लासीं **गि**रिजापती **गि**रिसुते वक्त्रांबुजें[1] बोलिला, ।
पाहा **लिं**गपुराणिंचा[2] प्रमय त्या मुक्तीपदा वर्णिला
  तोची हा इतिहास हा कवि म्हणे, ‘आनन्य साक्षेपिला.’ ॥ ७
पूर्वीं एक महीवरी नृप पहा तो **सो**मदंती असे
  त्यातें पंचशतेंच कामिनि[3] महा सुंदर्यता लालसे, ।
जारस्त्री सकळा, परंतु द्वय त्या स्वामिव्रता योषिता[3]
  त्या पापें नृप जिंतिला, मग तया बोले **य**मू शापितां. ॥ ८
‘होसी घोर वनीं हरीण’ परिसा **प्रे**ताधिपू[4] बोलिला,
  तेव्हां तो नृपती मही मृग पहा झालाचि शापाथिला, ।
हें गाऊं तर कायसें चतुर ते बोलिल्लले काव्य या
  स्त्रीपापें नृपती वनांत मृग तो झालाचि कां भक्तया? ॥ ९
वक्त्रें हस्तक जोडुनी विनवणी केलीच पैं मागुती
  राया राष्टर पापपाप विभुचें जोडे प्रधानाप्रती ।
कांता किल्मिष[5] जोडते पतिसही, शिष्य स्वपापें गुरु,
  ऐसें दुर्धर पाप तें नृपतिसी उच्छेद पुण्याकरू[6]. ॥ १०
जावा तो नरका असंख्य वरुषें स्त्रीसंग आहे असा
  पुण्यस्त्रीद्वय त्यांत त्या गुणनिधी स्वामिव्रतीं लालसा ।
त्या पुण्यें नृपती वनांत मृग तो झाला, प्रिया त्या द्वया
  नेल्या **शं**करसेवकीं निजपदीं सायुज्यठायाचि या. ॥ ११
त्या रम्या स्वपतिव्रता निरखितां नाहीं पदीं देखिती
  **गौ**रीनायक सेवकां निजमुखें प्रार्थूनियां पूसती, ।
‘कोठें प्राणपती? स्वमुक्तिपदवीं आम्हांसी कां आणिलें?
  राहों ना क्षण त्याविना निजपदीं स्वामीसि कां नाणिलें?’ ॥ १२

---

१. मुखकमलानें. २. लिंगपुराण.—यांत अग्निकल्पांतील कथा अग्निलिंग महेश्वरांनीं सांगितल्या असा योग वर्णिला असून त्यांची संख्या ११००० आहे. त्यांत असें ह्मटलें आहे:—‘यत्राग्निलिंगमध्यस्थ: प्राह देवो महेश्वर: । धर्मार्थकाममोक्षार्थमाग्नेयमधिकृत्य च ॥’. यांत शिवाचें अग्निलिंग प्रगट झालें, ब्रह्मविष्णूंचे गर्व हरण केले, वैवस्वत मन्वंतरांतील राजे, पद्मकल्पांतील कांहीं कथा व शिवमाहात्म्य अशीं लिहिलीं आहेत. [‘ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती’—भाग २, पृ० ४९.] ३. स्त्रिया. ४. यम. ५. पाप. ६. पुण्याचा उच्छेद करणारें.

शंभूचे [1]गण त्या द्वयासि समुळीं त्याची कथा सांगती,
'[2]राजा पांचशतें [3]वधू [4]तिजमुळें जावाची नर्काप्रती ।
तुम्ही पुण्यलता तयाप्रति वधू, त्या पुण्ययोगें भला
झाला तो मृग भूपती निजपदीं ठावो तुम्हा दीधला.' ॥ १३

तेव्हां त्या नृपकामिनी वदनिल्या, 'स्वामीविना कायसे
आम्हां हे पदभोग व्यर्थ, असणें जेथें प्रिया तो वसे, ।
नाहीं धर्म पतिव्रतांप्रति कदा स्वामी नसे ज्या स्थळीं
लिंपे मानस पाप तें, मिति नसे त्रैलोक्य भूमंडळीं. ॥ १४

आम्ही होउं [5]कुरंगिणी वनिं असों जेथें असे तो नृपू
धर्ता जे तनु भूपती तशिच दे आम्हां दयाळा! वपू.' ।
केल्या त्या द्वय कामिनी मृगवधू, त्रीमेळ ऐसा वनीं
होओनी विचरे वनीं, तृणचरें झालीं पहा [6]मेदिनी. ॥ १५

गंधर्वाधिप मुख्य नायक असे भूतेश [7]नामाथिला
कोणेके दिवशीं शचीपतिचि हो! सेवा असे चूकला ।
क्रोधें त्या अमराधिपें निजमुखें गंधर्व तो शापिला
जाती होउनि भिल्ल धात्रि विचरे [8]चंडाभिनामार्जिला. ॥ १६

तो क्रूरबुद्धी मग व्याघ्र झाला, पैं मांसलुब्धी [9]बहुसाल त्याला ।
खेळे वनीं अद्भुत, ख्यात त्याची झाली पहा श्वापदहिंसकाची. ॥ १७

नानापरी श्वापद नित्य मारी, बाळें वधू पोषित या प्रकारीं, ।
हातीं किती घेउनि जाळ फांसे [10]कोदंडपाणी वनिं चाललासे. ॥ १८

पक्षी तया श्वापद मात्र त्यातें पैं दृश्य नोहे. निरखी दिशांतें ।
तो काननीं पारधि दुःख पावे, अष्टा दिशा धुंडित आणि धांवे. ॥ १९

क्षूधेनें पिडिला, वनांत शिणला, चित्तें असा व्यापिला,
शक्तीनें त्यजिला, घरा मुरडला, भावी मनीं आपुला, ।
कां पां आजि मला असा उगवला हा दीन निर्फाळिला
तैं तोयें भरला तटाक वहिला देखोनियां बैसला. ॥ २०

---

१. सेवक, प्रमथादि गण. २. राजाला. ३. स्त्रिया. ४. त्या स्त्रियांमुळें. [त्या जारिणी असल्यामुळें.] ५. हरिणी. ६. पृथ्वीवर. ७. नांवाचा. ८. चंडा नांवाचा. ९. पुष्कळ. १०. भिल्ल. ज्याच्या हातांत धनुष्य तो कोदंडपाणी.

पारधी मनीं भावि[1] तो कसा? आज लाभ होईल फारसा ।
अंतरीं महा तोषला असे, पाश ते क्षणीं मांडिले दिसे. ॥ २१
सीत[2] कर्षुनी चाप सज्जुनी व्याध बैसला तो द्रुमासनीं ।
बेलवृक्ष तो पर्णि[3] दाटला, भिल्ल त्यावरी स्तब्ध राहिला, ॥ २२
चक्षुपूढिलें पर्ण तोडुनी टाकितो कसा व्याध मेदिनी[4] ।
पादपातळीं[5] लिंग हो ! असे बिल्वपत्र तें जाउनी कसें. ॥ २३
रुद्रमस्तकावरिच राहिलें व्याघ्रनायकें स्वभाव आपुले ।
पर्ण ढाळ तो महिसि टाकिला पूजिलें म्हणोनि रुद्र तोषला. ॥ २४
शंभु तुष्टला भक्त जाणुनी बेल वाहिला मैला[6]ऽजिच्या दिनीं, ।
रात्र ऊरली यीम[7] एक जे वर्तलें कसें मनासि आणिजे. ॥ २५
वाहिलें शिवें प्रेतनायका बोलिला, कसें त्यासि आयका, ।
"जाय गा ! यमा ! शीघ्र मेदिनी[8] भिल्ल जे स्थळीं बैसला वनीं. ॥ २६
'तुष्टलों' तया जाउनी वदें." काळ चालिला वंदुनी पदें. ।
येऊनि भिला काय बोलिला, 'माग रे ! वरू रुद्र तुष्टला. ॥ २७
कृत्य हें मला महिस यावया धाडिलें शिवें प्रसन्न व्हावया.' ।
व्याध ऐकतां उत्तरासि त्या क्रूरतेकरोनि बोलिला तया. ॥ २८

(सवाया.)

'भूत पिशाच किं मानव राक्षस देव किं दानव काय म्हणावा ?
व्याघ्र किं तस्कर[9] रूप भयंकर काननिं[10] तूं नर कोण गणावा ? ।
मायिक[11] भासतसे मज, अद्भुत ये निशिमाजि[12] तुझा बळ यावा.'
'नाभि[13]' म्हणे यम 'ना करिं तूं श्रम, बोलत उत्तम भैंव[14] त्यजावा. ॥ २९
जाणुनि भाव तुझा सुशिवें मनिं पाठविलें तुजपाशिं मला रे!
तुष्टुनि शंकर बोलियला वर जाय तुं सत्वर देइं भिला रे ! ।
सांग तरी तुझि आवडि काय ते?' यावरि विस्मित भिल्ल वदे तो,
'नाहीं' म्हणे, 'कधिं पूजियला शिव तो प्रभु कां पतिता वर देतो ?॥ ३०

---

१. विचार करी. २. धनुष्याची दोरी. ३. पानांनीं. ४. जमिनीवर. ५. झाडाखालीं. ६. मला+आजिच्या. ७. प्रहर. ८. पृथ्वीवर. ९. चोर. १०. अरण्यांत. ११. कपटी. १२. रात्रीस. १३. भिऊं नको. १४. भय.

(श्लोक.)

नाहीं सार विचारिलें गुरुमुखें, केलें नसे ध्यायना
नाहीं दैवत पूजिलें हरिपदीं विश्रांतिलें या मना, ।
यत्नें श्वापद मारिले कितिक म्यां पापाप्रती संचिलें
केंवी शंकर तुष्टला ?' मग तया प्रेतेश्वरें बोलिलें. ॥ ३१
'माघी कृष्ण चतुर्दशी निशि निराहारी असे आजची
केलें [1]अर्चन बेलयुक्त [2]सुमनीं पूजा महा शंभुची ।
त्या पुण्या गणना नसे, तुज विभू झाला प्रसन्न स्वयें
आतां माग वरा, तुझ्या [3]स्वमनमना येतील लोकत्रयें.' ॥ ३२
भिल्ल बोलिला तया यमासि काय उत्तरें,
'जाहला प्रसन्न देव एक दे तरी बरें, ।
स्वर्गिं सौख्य भोगणें नसे मनांत [4]चाड रे !
नित्य कर्म वाटतें, बहूत हेंचि गोड रे ! ॥ ३३
श्वापदादि पक्षियें [5]विंवादने कळो मला
बोलिजे तयासि मागणें असें प्रभू ! तुला.' ।
या परीच त्या भिलें यमासि जाण प्रार्थिलें
त्यासि काळ तो म्हणे, 'पुरेल आत्मचिंतिलें.' ॥ ३४
वदोनीयां ऐसें यम मग पहा स्वर्ग चढला
भिला [6]विस्मे वाटे तंव [7]तरणि पूर्वे उगवला, ।
तरूखालीं फासे उतरुनि तदा व्याध वहिलें
विलोकी तों कोणी मृगपति असेती पहुडले. ॥ ३५
बहु क्लेशी झाला, करित मनिं चिंता स्वसदना
क्षुधेच्या [8]उद्वेगें भ्रमित मग तो जाय भुवना, ।
पुढें कैसें झालें समइंच तया पूर्व मृग हो !
दिलें होतें शापा नृपतिस यमें तोचि मृग हो ! ॥ ३६
तृषेनें झालासे विकळ बहु तो धुंडित वनीं
त्वरें आला तेथें, गहन जळ होतें म्हणउनी ।

---

१. पूजन. २. भक्तीनें; (पक्षीं) फुलांनीं. ३. येथें द्विरुक्ति झाली आहे. ४. इच्छा. ५. बोलणें, भाषा. ६. विस्मय. ७. सूर्य. ८. त्रासानें.

न घेतां तो तोया अवचित पदीं पाश जडला
तया आली मूर्च्छा धडधडुनि [१]भूमाजि पडला. ॥ ३७
मृगी होती मागें चमकुनि तदा येत पुढती
पुढें पाहे [२]योनी अवनिं पडला देखत पती ।
पडे आक्रंदोनी मग मृग म्हणे, 'व्यर्थ हरणी!
नको देऊं प्राणा,' म्हणत 'मज दे भेटि मरणीं.' ॥ ३८
ऐकुनी वचनासि या मृगि ते करी बहु रूदना
'वंचुनी तुज स्वामिया! क्षणपाद एक मि जाइं ना, ।
क्षोभला गिरिजापती' मृगि बोलते पतिलागुनी,
व्याध ऐकत भाषणें तयांचीं ते थडि राहुनी. ॥ ३९
घेउनी करिं चाप सायक वोढि, काढुनि तिष्ठला,
हें असो मृग तो मृगीप्रति काय उत्तर बोलिला? ।
'आयकें प्रियप्राणसुंदरि! पूर्ण पाशित गुंतलों
काय तूं करिसी स्त्रिये! अव! [३]वल्लभे! [४]वपु वेंचलों. ॥ ४०
पैल पारधि देखुनी तुज बाण विंधिल तेथुनी
जाय काननिं आणि कां जळप्राशनास्तव येथुनी, ।
पाडसें गृहिं मार्ग लक्षिति अंगने! मम तान्हुलीं
घोर तें वन ते भिती, प्रियडोळसे! बहु धाकुलीं. ॥ ४१
[५]सीत दुर्घट, फूटती तनु त्यांचिया अति [६]राजसा
[७]क्षूधितें शिशु वल्लभे! वनिं जाय स्तन दे पाडसां ।
पाजुनी [८]पय त्यांसि घेउनी ये दुजी मम नायका
भेटि द्या मज मृत्युकाळिंच' बोलिला मृग आयका. ॥ ४२
[९]कुरंगवाक्य ऐकुनी, विमूर्च्छ ते कुरंगिनी
भुमीवरी पडे म्हणे, '[१०]कंटाकटा स्वकर्मणे ।
कसा त्रिभंग पाडिला, प्रियासि पाश लागला
पिलीं बहीण सुंदरी, दुराविलीं वनांतरीं.' ॥ ४३
वि[११]लाप ते बहू करी, तदा कुरंगी दूसरी ।
स्वयेंचि तेहि पातली इनें दुरोनि देखिली. ।

---

१. जमिनीवर. २. येवोनी. ३. स्त्रिये! ४. शरीर. ५. थंडी. ६. सुंदर, कोमल. ७. भुकेलेलीं. ८. दूध. ९. या श्लोकाचें वृत्त पंचचामर आहे. १०. हायहाय. ११. ह्या श्लोकाचे दोन चरण उपलब्ध नाहींत.

..............................................

.............................................. ॥ ४४

बोले ती हरिणी तियेसि वचनीं, 'हें काय केलें? अहा!
 बाळें एकलि टाकुनी वनिं कशी आलीसि? मूर्खे! महा।
माझें बाळक तें तुझेंचि म्हण तूं आतां संबंधा तुटी
 झाली, प्राणपती अपायिं पडला, पाहें महा संकटीं.' ॥ ४५
'मी जाईन पतीसवें.' पतिसि ते देखोनि आक्रंदली
 'हा हा कर्म कसें?' म्हणे 'वेडविलें,'[1] पृथ्वी तनू टाकिली;[3]।
दोघी मेळवुनी गळे वेरडती,[2] आकांत तो मांडिला.
 येरी बोलियली, 'न जाय वनिं मीं बाई! तुम्हां तें मला. ॥ ४६
जातो प्राणपती तयारहित मी राहों कशी ये क्षिती?[3]
 स्वर्गीं लाजति ते कुळद्वय[4] मला, जाणेंच नर्काप्रती।
आधीं प्राण तुम्हाहुनी त्यजिन मी' हा शब्द लागे मनीं
 खेदांकीत वदे, वडील मग ते, 'आईक वो! सोजणी![5] ॥ ४७
येसी जोंवरि पाडसाप्रति सखे! सांभाळुनी मागुती
 आम्ही तोंवरि धीर गे! धरूं म्हणे दोघेंजणें स्फुंदती,।
नाना यत्न विबोधुनी मृगिणिसी तैं पाठवीलें तिनें
 आली धांवत त्या वनीं मृगशिशू जेथेंच दोघेंजणें. ॥ ४८
श्वासोच्छ्वासहि टाकिते, तळमळी, पान्हा उरीं दाटला,
 येती धांवत पाडसें लुटु लुटू संतोष त्यां वाटला,।
कांसेशीं[6] रिघती, त्वरें पय तिचें घेताति वक्त्रापुटीं,
 नाटोपे तिजला गहींवर, म्हणे, 'झालां तुम्ही पोरटीं.' ॥ ४९
शोक हो! करी ते मृगांगना, बोलिली मुखें काय नंदना,।
'तात तूमचा पाशिं गुंतला देऊं त्यासवें प्राण आपुला.' ॥ ५०
'सोयरीं तुम्ही आपणा तरी' बोलती मुलें तें श्रमोत्तरीं।
'जोड कायसी वांचुनी पुढें? सोसि दुःख हें कोण एवढें? ॥ ५१
तातमाउली जन्म देउनी, पाळिती शिशूलागिं हो! स्तनीं,।
दुःख देखतां त्यांसि त्यागणें, लागती तरी नर्क भोगणे. ॥ ५२

---

१. ओढवलें. २. ओरडती. ३. पृथ्वीवर. ४. माहेरचें कुळ व सासरचें कुळ. ५. मैत्रिणी.
६. कांस=ओंटी.

चाललां तुम्ही स्वर्गिंच्या पदा सोडुं ना तुम्हालागुनी कदा.' ।
बोलती असें त्यागुनी स्तनां चालिलीं सवें तातदर्शना. ॥ ९३

स्वपदकथन राहो पाशबंदी मृगानें
हरिणिशिं वच तें जें बोलिला, चित्त देणें ।
'अजुनि सखइ! कां वो! तूं वृथा तिष्ठतेसी?
तृषित शिणुनि वायां वल्लभे! प्राण देशी. ॥ ९४
निढेळिं लिखित होतें, आज तें पूर्ण झालें,
म्हणुनि विघड झाला, विघ्न ठाकूनि आलें, ।
जंववरि तुज व्याधें देखिलें जाण नाहीं
तंववरि मम कांते! आश्रमा शीघ्र जाई. ॥ ९५

सुलघु असति बाळें वाढवीं तूं कुरंगे! बहुतच करिं यत्नां, निर्विलीं तूजलागें ।
क्षणभरि न विसंबें वंशवृद्धी करावी न करिं उशिर आतां खंति माझी त्यजावी.' ॥९६

'वदसि किमपि वाचा? आज तूं हे कुरंगा!
पळभरि न विसंबें सोडुनी प्राणरंगा, ।
स्वपति! सुखि असावें, दु:ख हें म्यां त्यजावें
मुखिं वदति पुराणें नर्कपंथासि जावें. ॥ ९७

आहे धर्मनिती पतीविण जगीं स्त्रीदेव नाहीं दुजा
भक्तीनंतर बैसल्या पतिव्रता लावोनि स्वर्गीं ध्वजा.' ।
ऐसें बोलुनि आदळोनि धरणी धायासी ते मोकली,
'माझ्या श्रीमृगनायका! तुजविना राहोंच ना एकली. ॥ ९८
जैं मी वांचुनि राहिलें तुज सख्या! तो भार माझा क्षिती
झालें मेरुसमान, तातजननी इंद्रालयीं लाजती, ।
जैशी ते सरिता जळाविण वृथा, प्राणाविना ते कुडी
शोभे ना जशि नांदते नगरि ते, निर्नायकी बापुडी.' ॥ ९९
ऐसी शोकबळें मृगी मग पडे, मूर्च्छीत ते मेदिनी
व्याधें देखुनि, पादपाडुनी पहा आला त्वरें धांवुनी, ।

---

१. व्यर्थ. २. दैवीं. ३. दु:ख. ४. पृथ्वीला. ५. मेरु=पर्वतविशेष. ['मेरुस्तु शुशुभे दिव्यो राजवत् समधिष्ठितः । आदित्यतरुणाभासो विधूम इव पावकः ॥ योजनानां सहस्राणि चतुरशीतिरुच्छ्रितः । प्रविष्टः षोडशाधस्तादष्टाविंशति विंशति ॥ विस्तारात् त्रिगुणस्तस्य परिणाहः समंततः ॥' इत्यादि मेरुपर्वताचें वर्णन मत्स्यपुराणांत आहे. हा पर्वत ग्रीक लोकांच्या ऑलिंपस् पर्वतासारखा होय.] ६. नदी. ७. राजाशिवाय. ८. पादपा+आडुनी.

येरी ते चमकोनि ठाकत पुढें वंदी भिलाचीं पदें,
प्रार्थी ते बहु कारुणाक्षर मुखें सज्ञान तीं श्वापदें. ॥ ६०

'श्रीव्याधा! क्रमल्या निशित्रयें वनीं, नाहीं निरा प्राशिलें
आलों हें जळ देखुनी, तंव पुढें कर्मेंचि आटोपिलें, ।
पाशीं वेष्टुनी पाडिलें महिवरी, बा! रे! मृगा श्वापदा
तान्हेल्या जळ मेळवीं, वनपती! झाली बहू आपदा.' ॥ ६१

तिच्याशिं व्याध बोलिला, 'मला कळे तुझी मती
मृगासिं नीरसेवना करीन पाश निर्गती ।
तयावरी तुम्ही मृगें कीं रान शोधुनी त्वरें
वनीं उडोनि जाल, गे! स्वधर्म सांगतें बरें.' ॥ ६२

प्रार्थि ते मृगांगना वदोनि काय उत्तरीं,
'ये विषींच घे तरी प्रमाण भाक तूं बरी, ।
साक्ष चंद्र सूर्य ते धरा हरी उमापती
शस्त्रधार तीर्थ हे मरोनि मुक्ति पावती. ॥ ६३

ये रिती अधोगती मरोनि व्यर्थ जाइजे'
हें असो, तया मृगें भिलासि काय बोलिजे, ।
'घेउनी जळासि, हो! फिरोनि येउं मागुतीं
सत्य भाव हा खरा पैरीस भाक पूढती. ॥ ६४

बत्तिसांतरीं गिरा वदोनि जाय लंघुनी
भीम दोष तो अतिश्रुणें (?) सुचित्त देउनी ।
गोत्रजांदि पूर्वजां बहूत येम गांजिती
स्वर्गिं ठाव ना मिळे, नसे तयासि निर्गती.' ॥ ६५

त्रिवाणि 'सत्य सत्य' हे कुरंग त्यासि बोलिला
'तृषें बहूत पीडिलों, जळार्थ सोडिं गा! भिला!' ।
मृगी तथा सुप्रार्थना करीत इंदुच्या मृगा
'क्षणत्रयासि हो! क्षणें जळासि घेउं तोंचि गा?' ॥ ६६

येरू बोलत उत्तरें पडिभरें, 'मी देव लोकीं असें
चंद्राचे वहनीं निशीदिनिं वसें ठावें तुम्हां संरसें ।

१. नीर=उदक. २. त्रास. ३. आण, शपथ. ४. नरकगती. ५. ऐक. [परिश्रवण=परिसरणें.]

तुम्ही तों मृग भूवरी तृणचरें[1] अत्यंतरें आपणा
वायां बोलसि वाक्य हें नव घडे हें व्यर्थ मातें म्हणा. ॥ ६७
व्याधें तें मनिं भाविलें हरिणिसी हें ज्ञान कैसें पहा
जाणें धर्मपरायणें वदतसे पुण्यादि पापें महा ।
कांहीं ईसि पुसों म्हणोन सुमनीं इत्यर्थ केला भिलें
कोण्या पापमुळें त्वें[2] कष्ट घडले पृच्छेसि[3] आरंभिलें. ॥ ६८

## उपसंहार.

(श्लोक.)

आतां कर्मविपाक ते मृगवधू सांगेल व्याधा स्वयें
त्याचें वर्णन आयका कवि नमी श्रोत्यांसि पाणिद्वयें[4] ।
नाशीते अघ[5], कोटि जन्म हरिते, ते सार[6] **शं**भूकथा
भावार्थारुढ होउनी चतुर हो! लागाच मुक्तीपथा. ॥ ६९
भावार्थें **गि**रिजापती मनिं भजा, दुर्भावना ते त्यजा
**कै**[7]लासाप्रति जावयासि समजा, तो मार्ग नाहीं दुजा, ।
आयुर्होत वजा, स्वहीत मनुजा अद्यापि कां नूमजा?
आनंदेंचि निजात्मया शरण जा, मुक्तीसि लावा ध्वजा. ॥ ७०
श्रोते हो! कविता तुम्हां विनविता, द्या चित्त या उचिता
मागें सादरता कथा नवलता हे लाविली पूर्णता; ।
भंगे हा भवताप नाशक स्वता आली कथा पूर्वता
**शं**भू संभविता कवित्व ममता **ना**रायणाच्या सुता. ॥ ७१

---

## प्रसंग दुसरा.

(श्लोक.)

**शं**भूचें नाम वाचे निशिदिनिं वदतां त्याजला क्लेश कैंचे?
भावार्थें गंड हस्तें करतळ सदनीं वाजवी **शं**कराचे ।
ऐसे हे मुक्त होती नवल म्हणुं वदों संशयो यासि आहे
भोळा तो स्वामि माझा दिनहिन न गणी, थोर नाशा न पाहे. ॥ १

---

१. गवत खाणारीं, पशू. २. तुला. ३. शंका. ४. दोन्ही हातांनीं. ५. पाप. ६. उत्तम.
७. कैलास=शिवाचें क्रीडास्थान. ['**कैलास**: कनकाद्रिश्च मंदरो गंधमादनः । क्रीडार्थे निर्मिताः शंभोर्देवैः क्रीडाद्रयोऽभवन् ॥' इति शंभुरहस्ये.]

श्रोत्याला न गमे असाक्ष म्हणती वक्ता वदे वैखरी[1],
 ‘हो ती पावन भक्त ते, परि दिनां शंभू कसा उद्धरी?’ ।
दृष्टांताप्रति एक साक्ष परिसा बोलेन त्या उत्तरा
 नोहे भक्त परंतु शंकर तया संतुष्टला [2]तस्करा. ॥ २
चोरें पिंडिवरीच देउनि [3]पदें तो चांदवा सोडिला
 भक्तें देह समर्पिला, [4]म्हणुं तया गौरीपती तुष्टला. ।
कैलासाप्रति तस्करा मग शिवें नेलेंचि, भोळा असा;
 त्याचें चिंतन हो! करा निजमुखें पाहों तरे ना कसा? ॥ ३
 ‘हर हर हर शंभो’ ज्या मुखीं नाम नाचे
  भ्रम तरि मग कैसे तूटती ना मनाचे? ।
 घण घण घण घंटा वाजवा [5]चंड टाळी
  [6]स्मररिपु वद नामा पातकें [7]चंड टाळी. ॥ ४
 परिसुनिच पुराणीं बोलिले काय वाचे
  शिवगुण अहिबुद्धी ना पुरे गाय वाचे ।
 वद वद मृगिलागीं पूसिलें हिंसकानें
  क्षुधित बहुत झालीं आइका यासि कानें. ॥ ५
 विमल वनव व्याधें प्रश्निलें त्या मृगासी
  कवण कवण पापें प्रार्थि [8]कोदंड त्यासी ।
 म्हणत मृगिणि, ‘कां हा वाद? तूं धन्य व्याधू
  पुससि तरि तुं दंडा धन्य तूं धन्य साधू.’ ॥ ६
 तदुपरि हरिणीनें बोलिलें काय वाचे
  ‘जडजिव महि झाले, स्वगृहीं दूषणाचे ।
 अमुप दुरित त्यांचीं, जाचना [9]मूप[10] आहे
  श्रवण करि सुचित्तें सांगतों तूज पाहें. ॥ ७
 कपट करुनि धात्रीसी वपू टाळिती जे
  त्रिशुधि पतन त्यातें दोष हा जाण गाजे, ।
 वधिति जरिच व्याधा निर्बळें पाशबंधें
  लघु शिशु वधु वंदे दुर्बळें आम्हि अंधें. ॥ ८

---

१. वाणी. २. चोरा. ३. पाय. ४. म्हणून. ५. मोठी. ६. शंकर. ७. उग्र, भयंकर. ८. धनुष्य. ९. पापें. १०. पुष्कळ.

द्विजजन मुनि गाई तापसी ब्रह्मचारी
इति गुरुनरसाधू स्वामि देवी पुजारी ।
वधिति जिव असे जे जाचणी भीम[1] त्यांसी
करितिल यम कोपें आयकें घोर कैसी. ॥ ९

कढत कथिलडेरा योजिती शंभराचा
पतित कुजन ऐसे घालिती त्यांत जाचा ।
दृढ वरि बसवीलें झांकणें वाट नाहीं
जळति जिव मधें गा! कुंभ[2] तो पाक पाहीं. ॥ १०

अभक्ष्यभक्षकादिही तथापि धर्म लोपिती
प्रसाद लिंग स्वर्णचोर[3] भक्तिभेद सारिती, ।
गुरू सदैव निंदिती, स्वमित्रद्रोह जो करी
परांगना पराधना सिमावृत्ता (?)दि जो हरी. ॥ ११

असीपत्रा शस्त्रावरि पतित हे दूत जेंचिती[4]
फुटोनी ते पर्णे निघती जिव तेथें वरडती ।
भुमी गा! तांब्याची करुनि अतिशें[5] तप्त निकरें
तयालागीं तेथें निजवित असे अंतक[6] करें. ॥ १२

तथा तोडीताती वपु मग बळें सांडस वरी
नहाणीती त्यातें जळत जळतें इंगळशिरीं ।
जसा वन्ही गा!. तो प्रजळत असे स्तंभ[7] निगुती
परद्वारीं त्यासी जडुनी बहु योनी भ्रमविती. ॥ १३

चित्तीं तो भिल शंकला, दचकला दंडासि देखोनियां,
ठेवोनी शरकार्मुका[8] क्षितितळीं पावे पुढें योनिया[9] ।
येवोनी स्वकरें मृगाचरणिंच्या पाशा करी निर्गती
या रीती मृग ध्यावयासि जळ हो! आली समीरस्थिती. ॥ १४

प्राशोनी उदकासि ते द्वय पहा सत्वाथिलीं सर्वदा
झालीं सावध श्वापदें उभयतां आलीं भिलासंनिधा, ।

---

१. भयंकर. २. कुंभपाक हें एक नरकाचें नांव आहे. येथें पापी मनुष्यास डेऱ्यांत घालून शिजवितात, असा समज आहे. ३. सोनें चोरणारा. ४. जाचती, त्रास देती. ५. अतिशय. ६. यम. ७. खांब. स्तंभ=Stump. ८. बाण आणि धनुष्य. ९. येवोनियां.

तेव्हां ते म्हणती भिलाप्रति मृगें, 'आतां शिरा छेदिजे
बापा! तूं बहु कष्टलासि उशिरें आम्हां क्षमा हे किजे. ॥ १५
झालासे उपकार फारचि तुझा तूं दीसतोसी भला.'
आधीं दे मृगि मस्तका, मृग तदा व्याधाप्रती बोलिला, ।
'दोघांचें बहु मांस गा शिणसि रे! नेतां गृहा एकला
पायीं चालत येउं रे! तुजसवें [1]धामासि तूझ्या भिला ! ॥ १६
कन्यासूता तुझीं ही सदनपति तुझा लक्षिती मार्ग चित्तीं
मांसावीणा उपाशीं तगमग बहु त्यां लागलीसेल खंती.' ।
बोले तो भिल्ल चित्तीं न टळति वचना साच केलें जिवित्वा
ऐसी वस्तु प्रिया हे तृणवत करुनी पातलीं सत्य सत्वा. ॥ १७
तों येरी हरिणी सवें द्वय मुलें आलीं त्वरें धांवती
झालीं एकट पंचमें वनमृगें सत्वासि ना सांडिती, ।
धारीं देउनि मान ते विनविते भिल्लाप्रती, 'भाई! या
छेदीं क्षेम असेति जों चतुर [2]हे तों माझिया मस्तका.' ॥ १८
तों बोले वडिली मृगी तियसिं हो! लाहो वृथा ना करीं
'आधीं देइन प्राण मी, तुम्हि असा चौघेंजणें तोंवरी, ।
पुत्रप्राणपतींपुढें करिन मी स्वर्गप्रयाणा गती,
येती देव समस्त पाहति तयां दावीन सत्वाप्रती. ॥ १९
**कै**लासीं **शि**व मानवी न सति या **ता**रा **श**ची पार्वती.'
ऐसें उत्तर आयकोनि मग तीं बाळें [3]द्वयीं बोलती ।
'श्रीपितृवचनार्थ [4]राघवनृपें त्या सेविलें [5]काननाा
तो **धर्मां**गद भूपति स्वजनका वाक्यार्थ दे आपणा. ॥ २०
[6]**श्री**याळें सुतमांस देउनि जगीं सत्वासि संरक्षिलें
[7]**शी**बी चक्रवर्ती स्वमांस दिधलें सत्वाप्रती पाळिलें ।

---

१. गृहाला. २. मृग, प्राणपति. [बायका आपल्या नवऱ्याचें नांव घेत नाहींत.] ३. दोन्ही. ४. रामानें दशरथाच्या आज्ञेवरून वनवास पत्करला—या कथेकडे कटाक्ष आहे. ५. अरण्या. ६. श्रियाळराजानें आपल्या आवडत्या चिलहया नामक मुलाचें मांस अतिथीस देऊन त्यास संतुष्ट केलें; अशी कथा आहे. [अनंतकविकृत काव्यें, काव्यसंग्रह—पृष्ठें ११४-११६ पहा.] ७. शिबि—हा सोमवंशीय उशीनरराजाचा ज्येष्ठ पुत्र. या राजाविषयीं दोन कथा महाभारतांत आहेत. त्यांतून पहिलीचा येथें उल्लेख आहे. ती अशी:—शिबिराजाची परीक्षा करण्याकरितां इंद्रानें श्येनाचें रूप घेतलें व अग्नीनें कपोताचें रूप घेतलें, नंतर श्येन आपले पाठीस लागला आहे अशा मिषानें क-

ऐसें जल्पुनि सांगती मग भिला सोडूनि घेती बरें,
याच्या पालट पाडसें द्वय सुखें आम्हासि घे आदरें. ॥ २१
वेगीं मस्तक संहरीं वनपती बोलेति तीं पाडसें
'राहो हें.' मग तो कुरंग वदला व्याधाप्रती तें कसें, ।
'कैसा निष्ठुर व्याध तूं बहुत गा! सोडोनि दे सर्वही
घे मातें मरणीं प्रियासुत कैसे देवोनी [1]ज्यावें मही? ॥ २२
बाळांतें प्रतिपाळिजे, वधु किजे सर्वस्व वेंचूनियां
आधीं आपण जाइजे मग घडो कैसें तरी तें तया, ।
भाळीं अक्षर जें कदापि न टळे.' माथा मृगें दीधला,
'आतां तूं [2]निवटीं, विलंब न करीं, घे शस्त्र वेगीं भिला!' ॥ २३
ऐसें तें मृगसत्व थोर नयनीं तो पारधी पाहतो
माथा [3]तूंकितसे गहींवर तया आला असंभाव्य तो, ।

---

पोत शिबि राजाजवळ आश्रयार्थ आला. त्यास आश्रय मिळाला हें पाहून 'माझा भक्ष्य मला दे' असें श्येन म्हणूं लागला. तेव्हां कपोताचे भारंभार शिबि राजानें आपल्या शरीराचें मांस श्येनास देण्याचें कबूल केलें. परंतु शरीराचा बराच भाग तोडून तराजूंत घातला तरी कपोत जडच येऊं लागला. तेव्हां शिबि स्वतःच पारड्यांत बसला. तें पाहून उभयतां संतुष्ट होऊन आपलीं रूपें प्रगट करून वर देऊन गेले. (महाभारत–वनपर्व–अध्याय १३०-१३१.) याप्रमाणें प्रथम कथा झाली. द्वितीय कथा आहे ती अशी:—या राजाचें सत्व पाहण्यासाठीं ब्रह्मदेव विप्ररूपानें आला आणि त्यानें राजाच्या पुत्राचें (बृहद्गर्भाचें) मांस खावयास मागितलें. राजानें मांस शिजवून तयार केलें, पण विप्र कोठें दिसेना, तेव्हां मांसपात्र मस्तकावर घेऊन राजा विप्राचा शोध करीत फिरूं लागला. तों तो विप्र राजमंदिरास आग लावीत आहे असें यानें पाहिलें. पण मनांत विकल्प न धरतां राजानें विप्राची प्रार्थना करून 'सिद्ध केलेलें मांस स्वीकारावें' अशी विनंति केली. 'मी तें खात नाहीं, तूंच तें खा' असें प्रत्युत्तर विप्रानें केलें. त्याप्रमाणें राजा तें मांस खाणार तों ब्रह्मदेव प्रसन्न होऊन, स्वरूप प्रकट करून, राजास आशीर्वाद देऊन त्याचा पुत्र पूर्ववत् सजीव करून अंतर्धान पावला अशी कथा आहे. (महाभारत–वनपर्व–अध्याय १९४-१९८.) ८. चक्रवर्ती पुरुषाचें लक्षण सामुद्रिक ग्रंथांत आहे तें:—'अतिरक्तः करो यस्य प्रथितांगुलिको मृदुः । चापांकुशांकितः सोऽपि **चक्रवर्ती** भवेद्ध्रुवम् ।।' (राघवभट्टकृत 'अर्थद्योतनिका' नामक अभिज्ञानशाकुंतलटीका–अंक ७ श्लोक १६ पृष्ठ २४३.) चक्रवर्ती=चक्रे भूमंडले राजमंडले वा वर्तयितुं शीलमस्य । यद्वा चक्रं सैन्यं वर्तयितुं चालयितुं शीलमस्य। अवश्यं वा चक्रं वर्तयति । असे या शब्दाचे विग्रह आढतात.

१. जीवंत राहावें. २. मारीं. ३. डोलवीतसे.

कंठीं बाष्पहि दाटला, तरतरा रोमांच ठाले उभे,
  कांहीं उत्तर तें सुचे नव मिळा, मौनत्व आलें जिभे. ॥ २४
नेत्रीं नीर झरे स्वअश्रु सुटले कर्णीं बधीरावला
  वीदेहीस्थितिनें उभा टकमका पाहेच वेडावला; ।
ऐसा तो क्षण एक सावध पुढें होऊनि बोले मुखें,
  'जा गा! मीं न मरीं तुम्हासि, सहसा राहा वनीं सत्सुखें.' ॥ २५
केलें सत्यचि बोलणें वनचरें बुद्धीसि नेलें यथा,
  भाकेलागिं उतीर्ण जालित तुम्ही श्रीश्वापदें सर्वथा, ।
याती तो तृणभक्षकें परि नसे ज्ञानासि या ऊपमा
  पूर्वीं कोण असां तुम्ही क्षितितळीं हें ज्ञान कैंचें तुम्हां ?' ॥ २६
कथावें मृगें पारध्या पूर्वपंथें तदा चोज[3] झालें असंभाव्य तेथें, ।
शिवें सैत्व देखोनि तें यान पाहें, त्वरें पाठवीलें, वरी येत आहे. ॥ २७
उदेलें नभीं तेज अद्भूत भासे विमानासि त्या दामिनीची प्रभासे ।
घणाणा किती वाजती चंडघंटा वरी शोभती त्या पताका अचाटा. ॥ २८
रवी मिरवले दूत त्या शांभवाचे वनीं पातले श्रीशिवोद्धार वाचे, ।
तया न्यावया शापदग्धांसी आले मृगें व्याधही दिव्यदेहीच झाले. ॥ २९
वरी गर्जले दूत ते दीर्घ वाणी, 'तुम्हां तुष्टला देव रे! शूळपाणी. ।
असे धाडिलें पुष्पकालागिं जाणा त्वरें घेउनी या मृगें व्याधराणा.'॥ ३०
वदोनी असें बाहिलें त्यां विमानीं तदा केलिया पुष्पवृष्टी सुरांनीं ।
सुरांच्या नभीं दाटल्या कीर्णपंक्ती तया दर्शना देव घेवोनि जाती. ॥ ३१
आनंदें भरलीं सुखें डवरलीं सत्वापदीं बैसलीं
  नक्षत्रीं ठरलीं, निकीं मिरविलीं शंभूप्रती मानिलीं, ।
सत्वें स्वर्ग भलीं अपूर्व चढलीं तारापदीं बैसलीं
  सत्वांचीं जितुलीं गुणें वदिनलीं ऐका तुम्ही चांगलीं. ॥ ३२
सत्वें धर्म जडे, अधर्म विघडे, सत्वेंचि मुक्ती घडे,
  सत्वाचा जिकडेचि धूसर उडे किल्मीष सत्वें झडे, ।

---

१. राहिले. २. बहिरा झाला. ३. आश्चर्य. ४. अढळ धैर्य. ५. आकाशांत. ६. विजेची. ७. प्रभा+असे. ८. मोठ्या घांटा. ९. विचित्र, मोठ्या. १०. विमान. ११. आकाशांत मृग नक्षत्र दिसतें, हें सर्वांस माहितच आहे. १२. पाप.

सत्वाचेचि हु[1]डे विलोकुनि दडे तो **काळ** एकीकडे,
सत्वावीण बुडे **य**मावर पडे होतीच ते बापुडे. ॥ ३३
सर्वार्थी निधडे सवें संवगडे तें सत्व मेरू गडे
सत्वाचें अंगडें करोनि झगडे **का**ळा प्रसंगीं भिडे, ।
सत्वार्थी न पडे वृथा चरफडे बैसे भवाब्धीथडे
सत्वें श्वापदडें वन्या(!) धडफुडे गेलेंचि मुक्तीकडे. ॥ ३४

## उपसंहार.

(श्लोक.)

ऐसा **शं**कर भक्ततारक प्रभु च्छेदी भवाच्यापदा[2]
जेणें उद्धरिलीं भिलादिक मृगें ध्यावें तयाच्या पदा; ।
वारी दुस्तर जो भवार्णवजळीं नेदी बुडों दास तो
नाशी किल्मिष चिंतणें लवकरी भक्तासि हो ! दास तो. ॥ १
भावें आर्जविती स[3]दाशिव तया बाधेति ना यातना,
मुक्तीदायक **वि**श्वनाथ भजतां विश्रांतवीती मना, ।
त्याचा हस्तक मस्तकीं कवि म्हणे देतोचि तो बुद्धितें,
केली पूर्ण कृपा **स**दाशिवकृपें **ना**रायणाच्या सुतें. ॥ २

---

# [4]साम्राज्यवामनकृत

## १९. राजयोग.

(श्लोक.)

विरक्ति ना प्रीति जया प्रपंचीं, [5]अहर्षमर्षी क्रम पंचपंचीं, ।
दया न दाक्षिण्य नसे जयाला, सुचिन्ह साधू [6]म्हणती तयाला. ॥ १
[7]ज्या निंदितां निंदकदोष नाहीं, ज्या वंदितां तोष नसे मनाही, ।
जो निंद्यवंद्यादिरहीत झाला, कां राजयोगी न वदा तयाला ? ॥ २

---

१. बुरूज. २. भवाच्या+आपदा=संसारांतील+विपत्ति=संसारयातना. ३. शंकर. ४. हा कवि वामनपंडितांचा शिष्य असावा. यानें केलेल्या प्रकरणांचीं नावें:—(१) सुदामचरित्र, (२) राजयोग, (३) ब्रह्मोपदेश, (४) अनुभूतिलेश (टीका). ५. आनंदक्रोधरहित. ६. 'म्हणिजे' असा अन्य पाठ. ७. 'ज्यानीं दिला निंदक रोष नाहीं' असा अन्य पाठ आहे.

जो उत्तमातें वचन स्तवीना, नीचास नीचोत्तर सूचवीना, ।
निंदास्तुती द्वैतें[1] नसे जयाला, कां राजयोगी न वदा तयाला? ॥ ३
प्रपंच जे कां न दिसेचि ठावा, तयीं तया भेद कळों उठावा, ।
त्यजूं भजूं द्वैत नसे जयाला, कां राजयोगी न वदा तयाला? ॥ ४
संसार हा चित्सुख[2] सोनियाचा, आकारमात्रें अवघा तयाचा, ।
त्यागीच भोगी गुरुराज योगी, अष्टांग[3] मूढासम तो न योगी. ॥ ५
चित्सागरीं[4] जे लहरी[5] उठावी, चैतन्यसी ते जरि होय ठावी, ।
हा चिज्जडैक्यानुभवो जयाला, कां राजयोगी[6] न वदा तयाला? ॥ ६
भासे जयाच्या जड हे मतीतें, दावा नगीं[7] त्या निज हेम[8] तीतें, ।
माया स्वयें ब्रह्म असे जयाला, कां राजयोगी न वदा तयाला? ॥ ७
जो ब्रह्म जाणे विषयादिकांही, मिथ्या भ्रमे भेद तया न कांहीं, ।
जें जें दिसे तें निजसें[9] जयाला, कां राजयोगी न वदा तयाला? ॥ ८
दृष्टांतिया दृश्य कदां न नासे, हा भेद जाणे तरि भेद नासे[10], ।
भेदीं अभेदान्वय होय ज्याला, कां राजयोगी न वदा तयाला? ॥ ९
पर्जन्य पाणी जरि भेद दावी, अद्वैतता रीति कशी वदावी? ।
ज्या गारनीरीं[11] समता जयाला, कां राजयोगी न वदा तयाला? ॥ १०
विषय सत्य असें मनिं भाविती[12], तरि मृषा[13] कवणें परि दाविती? ।
विषय नष्ट असें जरि मानिती, विषय कां त्यजणें मग वानिती? ॥ ११
सर्व ब्रह्म श्रुतीस कल्पुनि गती व्याप्यें जगा स्थापिती,
मिथ्या ही वदती स्वभेद करिती ते भ्रांतिमद्या पिती; ।

---

१. भेद, दुजाभाव. २. चैतन्य. ३. योगाची आठ अंगें आहेत:—यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधि. या आठ अंगांचें सविस्तर वर्णन 'सरलार्थबोधिनी गीता'—पृष्ठें ३५३-३६० यांत पहावें. [योगदर्शन, अ० १ पा० २ सू० २९ षड्दर्शनचिंतनिका—पृष्ठ १६५.] ४. ज्ञानसमुद्रांत. ५. लाटा. ६. योग म्हणजे चित्ताच्या वृत्तींचा निरोध. चित्ताच्या वृत्ति बाह्यपदार्थांवरून काढून त्यांचा रोंख आत्म्याकडे लावणें याचें नांव योग. चित्तवृत्तींचा निरोध अभ्यासानें आणि वैराग्यानें करितां येतो. चित्त अंतर्मुख व्हावें, त्याचा रोंख बाह्यसृष्टीकडे लागूं नये आणि आत्म्याच्या ठिकाणीं लय लागावा म्हणून जो वृत्तिशून्य चित्ताचा प्रयत्न त्याचें नांव अभ्यास होय. ७. दागिन्यांत. ८. सोनें. ९. आपलेंसें. १०. न असे. ११. गारेंत आणि पाण्यांत. १२. मानिती. १३. खोटें.

युक्तीनें मग योजिती जडमती जे व्यापकें बोलती,
अंधा हस्तिकि अंध जे रिति पथीं तैसेचि ते चालती. ॥ १२
विषय ब्रह्म असें वदतां भिती, म्हणुनि व्यापक हेंचि दिवाभिती, ।
गतिस कल्पुनियां जगिं वागती, परि तयां न चुकेचि अधोगती. ॥ १३
देखेल जो विषय ब्रह्म खरें असे रे! त्याच्या जिवासि मग बंध कधीं नसे रे! ।
तो वांचला जंव असे तंव मुक्त लोकीं, अन्योन्य शून्य विषयास्तव बोलिलों कीं.॥ १४
निर्वासना चिन्ह पुढें न जोरे, प्रपंच हस्तीं न शके भजो रे! ।
मौनें जया देखुनियां पळावें, विरक्तता चिन्ह असें कळावें. ॥ १५
कूटस्थ त्या तोच नसे प्रवृत्ती, त्या निष्क्रियासीच नसे निवृत्ती ।
वैराग्य तेथें कवणें करावें, मूढें वृथा भ्रांतिभरीं भरावें. ॥ १६

### उपसंहार.

(श्लोक.)

**साम्राज्यवामन** दिसे सुखरूप साधा, त्याच्या स्थितीस जरि साधिति चारि साधा, ।
नाहीं तयास करणेंच दुकानदारी, जो सर्वदा विचरतो गृहपुत्रदारीं. ॥ १७
**साम्राज्यवामन** दिसेचि यथार्थ वाणी, जाणेल त्या अनुभवाहि नसेचि वाणी, ।
प्रत्यक्ष जो स्थिरचरीं निज ऐक्य दावी, त्याची गुरुत्वमहिमा किति हो! वदावी ?॥ १८

---

## रामात्मजकविविरचित[6]

## १६. कृष्णदानकथा.[7]

(श्लोक.)

सोळा सहस्रीं सदनांत नांदे, स्वसौख्यतुल्य प्रमदाजनां[8] दे; ।
रुचोनि हें तोष मनीं मुनीला, 'पाहों' म्हणे मागुति मेघनीला. ॥ १
बहुतकरुनि येणें द्वारकेमाजि ज्याचें,
व्यसन परम ज्याला कृष्णपादांबुजाचें; ।

---

१. नरकवास. २. राहतो. ३. कमतरता. ४. स्थावरजंगमीं. ५. 'महिमा' हा शब्द पुल्लिंगी व स्त्रीलिंगी आहे. ६. या कवीचें नांव नारायण असल्याचा एका पदांत उल्लेख आहे. ह्या कवीनें केलेलीं कांहीं पदें, तुकाईवर्णनावरील कटिबंध व कांहीं अभंग इतकी कविता आमच्या पाहण्यांत आहे. ७. ही कथा हरिवंशांत आहे. (श्लो० ४३ पहा). ८. स्त्रीजनां.

घडि घडि मुखिं नामें सुस्वरें गाइ, वीणा[1]
करिं धरि; मधुरत्वें चित्त वेधे प्रवीणा. ॥ २

[2]सत्यागृहीं प्रविशतां [3]विधिनंदनातें, देखोनि दूर हरि ये करि वंदनातें; ।
हातीं धरूनि बसवी कनकासनीं त्या, दावी जना सुजनसंगति एक नित्या. ॥ ३
[4]पौळा ऋषींचा हरि मध्यभागीं, लक्षी तयातें नयनीं शुभांगीं, ।
संतुष्ट मोठी मनिं कृष्णसंगें, दानावली तेथ निघे प्रसंगें. ॥ ४

(ओंव्या.)

'व्हावे आकर्ण विशाल नयन । तरी दान कीजे [5]नीलनलिन ।
दीर्घ [6]नासा अपेक्षून । [7]तिळकुसुमें देइजे. ॥ ५
वदन सुंदर आणि सतेज । व्हावें, तरी देइजे [8]जलज ।
[9]पृथु वर्तुल घन [10]उरोज । इच्छितां फल देइजे. ॥ ६
[11]उद्वाहीं व्हावी शोभा । तत्सविध दान करा [12]रंभा ।
रथदानें स्थूलनितंबा । स्त्रिया होती निश्चयें. ॥ ७
इहजन्मींचें [13]संपत्तिजात । जन्मावरी असावें सतत ।
तरी आवडे जो जो अर्थ । तोचि दीजे [14]विप्रांतें.' ॥ ८

(श्लोक.)

पूर्वी ऋषी कश्यप तत्सतीनें, दिला महादेवहि पार्वतीनें. ।
इंद्रासि दे इंद्रसती, पुराणीं हे गोष्ट चित्तीं धरि [15]कृष्णराणी. ॥ ९
उठोनियां नारद कौतुकानें, सत्येसि बोले 'अजि! हे स्वकानें ।
आकर्णिली सादर दानराजी, तीमाजि तूझें मन कोठ राजी?' ॥ १०

(पद.)

हरिचा विरह नसो नसो । तो सदां जवळी वसो ॥ ध्रुवपद. ॥
[16]हरिपदपद्मीं मानस माझें [17]षट्पदावरि विलसो ।
[18]पूर्णकाम हरि मज दासीसी सहसा ही न रुसो. ॥ हरिचा० ॥ १ ॥

---

१. वीणा=वाद्यविशेष. ['विश्वावसोस्तु बृहती तुंबरोस्तु कलावती । महती नारदस्य स्यात्सरस्वत्यास्तु कच्छपी । शिवस्य वीणा नालंबी गणानां तु प्रभावती ॥' इति हेमचंद्रः.] याप्रमाणें प्रत्येकाच्या वीणेचीं निरनिराळीं नांवें आहेत. २. सत्यभामेच्या. ३. नारदातें. ४. समुदाय. ५. निळें कमळ. ६. नाक. ७. तिळाचीं फुलें. ८. कमळ. ९. मोठे. १०. स्तन. ११. लग्नांत. १२. केळ. १३. धनसमूह. १४. ब्राह्मणांतें, भट्टांतें. १५. सत्यभामा. १६. कृष्णचरणरूपी कमळीं. १७. भ्रमरापरी. १८. तृप्तेच्छ.

सुरवर[1] जिंकुनि आणिला तरुवर[2] अंगणिं तोहि वसो ।
प्रमदावर्गीं[3] सौंदर्यादिक मजवांचुनि न दिसो. ॥ हरिचा० ॥ २ ॥
मान्यपणें[4] हरि कृत्यविशषें मजलागींच पुसो ।
जन्म अनंतहि घडतां मजला अचुकपणें गिवसो.[5]' ॥ हरिचा० ॥ ३ ॥ ११

(श्लोक.)

कांता सर्वोत्तमाची बहु बहु वदली गोड हे शब्द भारी,
केला प्रेमातिरेकें अवश[6] वश जिणें सर्वदा कैठभारी;[7] ।
सांगे जाणूनि तीचें हृदय मनिं तिला दान गोविंदजीचें
भर्ता[8] हो[9] जन्मजन्मीं हरिच मज असे चित्त साक्षेप जीचें. ॥ १२

(पद.)

'दान करीं कृष्णाचें । भामे! ॥ ध्रुवपद. ॥
अनल्प फल तुज फळे सुकृत हें । नव्हे सुवच जें वाचें. ॥ भामे० ॥ १ ॥
नसे हित दुजें नको भय धरूं । संपन्न[10] जन लोकांचें. ॥ भामे० ॥ २ ॥
रामसुतप्रभुसवें[11] विरह कधीं । नव्हे; वचन हें साचे.' ॥ भामे० ॥३॥ १३

(श्लोक.)

'तुला वश हरी असा सुकृतपुंज[12] त्वां अर्जिला,[13]
म्हणे न कधिं सर्वथा न मज दे असें हो! जिला; ।
असे सुदिन आजिचा सविधि[14] दान कीजे भलें,
महोत्सवनिरीक्षणीं कुतुक[15] हें मला लाभलें.' ॥ १४

कृष्णार्पणीं महसमर्थ भल्या द्विजातें, अर्पीतसें सह सदक्षिण पारिजातें; ।
सत्या म्हणे, 'तुजचि देइन दानवारी.[16]' देवर्षि तीस वरिचेवरि[17] तो निवारी. १५

(पद.)

काय हरीतें करूं करूं? ॥ ध्रुवपद. ॥
शिष्य करूं तरि पूर्ण परात्पर । मम गुरुचाही गुरू गुरू. ॥ काय० ॥ १ ॥
वेद जयातें नेणति त्याला । कवणे स्थळिं मी धरूं धरूं? ॥ काय० ॥ २ ॥
अनंतगुणगण विवरुनि ज्याचे । जन भवसागर तरू तरू. ॥ काय० ॥३॥ १६

---

१. इंद्र. २. पारिजातक. ३. स्त्रीगणांत. ४. आदरानें, मानानें. ५. गवसो, मिळो. ६. वश न होणारा. ७. कैठभ नामक राक्षसाचा अरि (शत्रु). ८. भ्रतार, नवरा. ९. होवो. १०. सवतींचें. ११. रामसुताचा प्रभु (कृष्ण) याचा तुला कधींही विरह होणार नाहीं. १२. पुण्यसमूह. १३. वश केला, संपादिला. १४. विध्युक्त. १५. कौतुक. १६. राक्षसाचा शत्रु. १७. वारंवार.

(श्लोक.)

[1]सात्राजिती वदतसे विधिनंदनातें कीं, 'कोण घेइल दुजा भवभंजनातें ? ।
घेशील तूंचि तरि देइन दानवारी, हातीं तुझ्या सुरतरूसह [2]दानवारी.' ॥ १७
देखूनि निर्धार असा सतीचा, अंगीकरी भक्तजनास तीचा; ।
येई म्हणे घेउनि त्या हरीतें, चरित्र ज्याचें मन [3]मोहरीतें. ॥ १८

(श्लोक.)

उठुनि सत्यभामा हरिप्रिया, त्वरित घेउनी ये नि[4]जप्रिया; ।
मुनिमुखें अभिप्राय जाणवी, उचित तेथ [5]संभार आणवी. ॥ १९
मिळति सर्वही तेथ बायका, नयनिं पाहती वि[4]श्वनायका ।
म्हणति, 'धीट हे देतसे पती, सकल लोक हे ज्यास कांपती. ॥ २०
अगइ ! नवल मोठें धैर्य ईचें कळेना,
श्वशुरनणदुल्यांही सासुवां आकळेना, ।
भय न धरि पतीचें लाडकी हे बजागी,
उचित अनुचितीही केंवि होईल जागी ? ॥ २१
उगवला मनिं संशय तोडिते, मति बसे मधुसूदनिं जोडि ते, ।
म्हणति लोक इला बहु धांदली, तदपि ते अणुमात्र न मंदली.' ॥ २२
पतीसहित ते सती करुनि मंगलस्नान हो !
मनीं घडिघडी करी नवस विघ्न येथें न[6] हो. ।
अलंकृत तनूसवें कनक वस्त्र ही नेसली,
हरीजवळि येउनि त्वरित आसनीं बैसली. ॥ २३

(पद.)

मजसम कोणहि सुंदर [7]आन ? ॥ ध्रुवपद. ॥
मीच सभाग्य गुणाढ्यहि मी जगीं । मान करी भगवान ॥ मज० ॥ १ ॥
पूर्णमनोरथ मीच निरंतर । नाहिं कधीं व्यवधान ॥ मज० ॥ २ ॥
धन्य मि मजला मानवला हरि । त्रिभुवनभुवननिधान ॥ मज० ॥ ३ ॥
[8]द्व्यष्ट सहस्रहि टाकुनि भवनें । येथ धरी अभिमान ॥ मज० ॥ ४ ॥
उत्तीर्ण प्रभुला करीं होउनी । आदरिलें निजदान ॥ मज० ॥ ५ ॥

---

१. सत्यभामा, सत्राजित्-कन्या. २. दानोदक. ३. रिझवितें, भुलवितें. ४. कृष्णा. ५. साहित्य. ६. न होवो. ७. अन्य. ८. सोळासहस्र.

काय जनासी काज सद्गुरुचेंचि । असो मज ध्यान ॥ मज० ॥ ६ ॥
रामसुतप्रभु[1] भक्तजनाचें । पाहिल केंवि निदान[2] ॥ मज० ॥ ७ ॥ २४

(श्लोक.)

पुण्याहघोष करिती बरवा द्विजाती[3], सप्तस्वरें[4] विविधें[5] वाजति वाद्यजाती; ।
जाऊनि थोरपण ये लघुता तरूतें, तों तों बहू जवळि होय जगद्गुरूतें. ॥२५

(सवाई.)

तो यदुराज करावरि शोभत रोपिच भव्य जणों तुळसी
थोर न ल्हान अलौकिक कौतुक देखति लोक समस्त ऋषी ।
घालुनि माळ गळ्यांत हरीस हि गोवियलें सहसा तरुसी
वाजति टाळ मृदंग मधुर स्वर टाकिलिं दिव्य फुलें त्रिदशीं[6].॥ २६

(दिंड्या.)

बैसवीला नारद रत्नपीठीं, पुजा करी येऊनी गोरटी ।
रत्नहार घालुनी तया कंठीं, गोविताहे, देवर्षि हांसे पोटीं. ॥ २७

---

१. कृष्ण, देव. २. अंत. ३. ब्राह्मण. ४. स्वर सात आहेत:–'निषादर्षभगांधारषड्जमध्यमधैवता: । पंचमश्चेत्यमी सप्त तंत्रीकंठोत्थिता: स्वरा: ॥' (अमरकोश.) 'षडजं रौति मयूरस्तु गावो नर्दंति चर्षमत् । अजाविभे च गांधारं क्रौंचो नदति मध्यमम् । पुष्पसाधारणे काले कोकिलो रौति पंचमम् । अश्वस्तु धैवतं रौति निषादं रौति कुंजर: ॥' १ ॥ नि–निषाद–हा शब्द हत्तीचा, याचें नाभिस्थान; २ रि–ऋषभ–हा शब्द गाईचा, याचें नासिकास्थान; ३ ग–गांधार–हा शब्द शेळीचा, याचें स्थान गाल; ४ सा–षड्ज–हा शब्द मोराचा, याचें नाभिस्थान. ['नासाकंठमुरस्तालु जिव्हां दंतांश्च संस्पृशन् । षड्भ्य: संजायते यस्मात्तस्मात्षडज इति स्मृत: ॥' नाक, कंठ, ऊर, तालु, जिव्हा आणि दांत या सहा स्थानांपासून होणारा तो षड्ज.] ५ म–मध्यम–हा शब्द क्रौंच पक्ष्याचा, याचें हृदयस्थान; ६ ध–धैवत–हा अश्वाचा, याचें ललाटस्थान; प–पंचम–हा शब्द वसंतकाळांत कोकिलाचा, याचें कंठस्थान; [नाभीपासून उत्पन्न झालेला जो वायु, ऊर, हृदय, कंठ आणि मूर्धा यांमधून जातो तो पंचम.] हे सात स्वर तंत्रीपासून आणि कंठांतून उत्पन्न होतात. ५. अनेक. ६. त्रिदश–तीन आहेत दशक ज्यांच्या संख्येंत ते 'त्रिदश' या रीतीनें विग्रह केला असतां तीसपासून एकूणचाळीसपर्यंत अंकांचा बोध होतो. परंतु आठ वसु, बारा आदित्य, अकरा रुद्र, दोन आश्विन मिळून तेहतीस देव असल्यामुळें वरील विग्रहावरून तेतीस देव समजावयाचे. 'आदित्यान्जज्ञिरे देवास्त्रयस्त्रिंशदरिंदम ॥ १४ ॥ आदित्या वसवो रुद्रा अश्विनौ च परंतप ॥ १५ ॥ [वाल्मीकिरामायण–अरण्यकांड सर्ग १४; निर्णयसागर छापखान्याची आवृत्ति–पृ० ४७० पहा.]

कल्पवृक्षासहित कृष्णपूजा, सद्भावेंची सारुनी [1]कृष्णभाजा ।
करी संकल्प किं, 'हा यदूराजा, जन्मोजन्मीं हो [2]प्राणनाथ माझा.' ॥ २८
कोटि धेनू तिळराशि हेमराशी, संकलिपल्या त्या क्षणीं दक्षणेसी ।
सत्यज्ञानानंद तो जयापाशीं, [3]रिद्धिसिद्धी ही तया घरीं दासी. ॥ २९
देवऋषिच्या करिं सहपारिजात, ठेवुनीयां कृष्ण करांबुजांत ।
सोडि तयाऊपरी [4]दानवारी, संकल्प ने सिद्धीस दानवारी. ॥ ३०

(श्लोक.)

विनोद करि नारद, प्रभुस 'घे' म्हणे 'आसना
उठें त्वरित चाल ये मजसवें त्यजीं वासना.' ।
करी वचन मान्य घे हरि कमंडलू संबळी
[5]कुंडासनहि पुस्तकें मृदुल पादुका कंबळी. ॥ ३१

पुढें नारद, श्रीपती त्याच मागें, असे दोघही चालिले राजमार्गें; ।
ती गोष्ट [6]साहस्रहि बायकांला, कळे दिलें हो! [7]जगपालकाला. ॥ ३२

(ओंव्या.)

मिळोनियां अवघ्या नारी । येती भामेचिया द्वारीं ।
तियेसी म्हणती, 'तुवां हरी । काय म्हणोनी दीधला? ॥ ३३
आम्हां सर्वांचें जीवन । तुवां केलें नारदाधीन ।
तुजसारिखी विचारहीन । कोणीं नाहीं देखिली. ॥ ३४
आम्ही न हों काय [8]वनिता? । तुवांचि कैशी दाविली सत्ता?' ।
कोणी म्हणती, 'असो आतां । विचार कीजे पुढारीं.' ॥ ३५
कोणी वसुदेवदेवकीनिकट । जाऊनि वृत्तांत सांगती स्पष्ट, ।
कोणी धांवूनियां धीट । घेऊन येती हलधरा. ॥ ३६
निंदा करिती नारदाची । म्हणती, 'बुद्धि भ्रंशिली त्याची.' ।
कोणी म्हणती, 'बाइलेची । भीड पडली कृष्णातें.' ॥ ३७
ऐशीं [9]अश्राव्य ऐकूनि वचनें । सत्यभामा राहिली मौनें ।
तंव कृष्णें खुणाविलें नयनें । नारद बोले ते काळीं. ॥ ३८
'सुवर्णभार देइजे मातें । पारडीं घालूनि कृष्णातें ।
येणें उपायें सोडीन यातें । वचन नोहे अन्यथा.' ॥ ३९

---

१. सत्यभामा. २. नवरा. ३. संपत्तीच्या देवता. ४. दानोदक. ५. अजिनासन, कटासन. ६. येथें वृत्तसुखार्थ 'सहस्र' असा शब्द न लिहितां 'साहस्र' असा शब्द कवीनें लिहिला आहे. ७. कृष्णाला. ८. स्त्रिया. ['वनिता जनितात्यर्थरागयोषिति' इति विश्वप्रकाशः.] ९. कठोर.

'अवश्य' म्हणूनि चक्रधरा । पारडीं बैसवीती सुंदरा ।
सुवर्णभार अर्पूनि चतुरा । तोलिल्या झाल्या कृष्णातें. ॥ ४०
वरचेवरी घालिती हेमें । परि नुचलेचि वैकुंठधाम ।
सर्वां मनीं संकट परम । सरलें हेम म्हणउनी. ॥ ४१
तंव पातली पट्टमहिषी । जे कां रुक्मिणी लावण्यराशी ।
तिणें उपाय निज मानसीं । कृष्णसुटिके नियोजिला. ॥ ४२

(पद.)

जननी हे सर्वजनाची ॥ ध्रुवपद. ॥
जे हरिला प्रिय जीस हरि प्रिय। संतत हे धणि पुरवि मनाची ॥जन० ॥१॥
निर्गुणि निर्गुण सगुणिं सगुण जे । कृष्णवधू बहु सगुण गुणाची॥जन०॥२॥
प्रति अवतारिं आपण अवतरे । कुलदैवत जे रामसुताची ॥ जन० ॥३॥ ४३

(श्लोक.)

वृंदावनीं तुळसिला करि वंदनातें, 'तूं सोडवीं' म्हणतसे 'यदुनंदनातें.' ।
घेऊनि ये गैलित पत्र तिचें स्वहातीं, सोळा सहस्रहि सत्या तिजला पहाती॥४४
गैलित तुळशिचें ती पत्र तें त्यांत टाकी,
तंव घनवट बैसे पारडें भूतटाकीं; ।
नयनिं विधिसुताच्या पातलें प्रेमपाणी
चकित निज मनीं तो राहिला शार्ङ्गपाणी. ॥ ४५

(पद.)

'जय जय श्रीतुळसी ! जय तुळसी ! ॥ ध्रुवपद. ॥
त्वद्गंधोदक हरितीर्थानें । तनु होते शीतळशी. ॥ जय० ॥ १ ॥
अमृतत्वें मी समान होइन । जरि मज तूं आतळसी.' ॥ जय० ॥२॥ ४६

## उपसंहार.

(श्लोक.)

सिंधु 'श्रीहरिवंश' तेथिल कथा बिंदूच हे सत्कथा,
घेती कर्णपुटीं, त्रितापभय हें त्यांला नसे सर्वथा; ।
केली प्राकृतपद्यबंधरचना रामात्मजें स्वाकृती,
तीतें संतत सद्गुणप्रिय भले पाहोत जे कां कृती. ॥ ४७

---

१. सुवर्ण. २. पट्टराणी. (रुक्मिणी.) ३. गळून पडलेलें. ४. प्रेमाश्रु. ५. धन्यजीवित, कुशल.

# व्यंकटेशकविकृत[1]

## १७. शांतादुर्गास्तुति.

(श्लोक.)

नमो त्वं तद्रूपे असिपदपरब्रह्मस्वरुपे!
प्रिये! सच्चित्कंदे! सहजसुखस्वानंदअरुपे! ।
तुझ्या भक्त्युत्कर्षे निजपदिं जनानंदजनिते!
जगन्माते! **शांते**! भवभय हरीं श्री**भ**गवते! ॥ १

पहातां या विश्वीं[2] प्रकृतिपुरुषें[3] भेद गमती
अविद्या वा माया[4] जिव शिवरुपें शास्त्र प्रतिती[5] ।
परंतु स्वात्मैकें निज सुखरुपें त्या रमविते
जगन्माते! **शांते**! भवभय हरीं श्री**भ**गवते! ॥ २

प्रपंचीं दुर्वृत्ती विषय पर गंतव्य[6] करिती
म्हणोनीयां **दुर्गा** विवरुनि पहातांचि शमती ।
तईं तूतें **शांता** म्हणुनि स्तविती संतकवि ते
जगन्माते! **शांते**! भवभय हरीं श्री**भ**गवते! ॥ ३

अधिष्ठानीं तूझ्या स्थिरचर[7] जगद्भास विलसे
विवेकें जैं लक्षीं स्वरुप तव तैं सर्व निरसे, ।
असे तूं सत्यत्वें स्वसुख निज निर्लेप जनिते[8]!
जगन्माते! **शांते**! भवभय हरीं श्री**भ**गवते! ॥ ४

---

१. ह्या कवीविषयीं कांहीं माहिती मिळत नाहीं. यानें (१) म्हाळसाकांतस्तुति (ग्रंथसंख्या १०), (२) मैराळस्तुति (ग्रंथसंख्या १३), (३) मार्तंडस्तुति (ग्रंथसंख्या १०), (४) कुलदैवतस्तुति (ग्रंथसंख्या १५), (५) म्हाळसास्तुति (ग्रंथसंख्या १७), (६) वासुदेवस्तव (ग्रंथसंख्या ९) इत्यादि कविता केली आहे. २. जगांत. ३. हें सर्व जग प्रकृति+पुरुष यांच्या योगानें झालें आहे; असें सांख्यशास्त्राचें मत आहे. ४. माया=प्रकृति. [प्रकृतीचे दोन प्रकार आहेत. एक अविद्या आणि दुसरी माया. विक्षेपशक्तिरूपानें (ब्रह्मांडाचा पसारा रचणाऱ्या शक्तीच्या रूपानें) परमेश्वराच्या अधीन असणारी जी प्रकृति तिला माया म्हणतात.] ५. प्रतिपादन करिती. ६. गमन. ७. स्थावरजंगम. ८. 'पुनिते' असा अन्य पाठ.

शिवा लक्ष्मी ब्राह्मी त्रि[१]गुणमय [२]त्रीमूर्ति धरिसी
    [३]त्रैयावस्थारूपें जननि! स्थि[४]ति [५]संहार करिसी।
परां वा तूं चौथी म्हणति परि त्याहूनि परते,
    जगन्माते! **शांते**! भवभय हरीं श्री**भ**गवते! ॥ ५

स्वयें ज्योतिर्बिंदु ध्वनिरुपि कळा नादरचना
    सहस्रारी भासे दृढ धरिसि त्यामाजि सुमना।
तधीं वृत्तिस्थैर्यें सुखमय समाधीस वरिते
    जगन्माते! **शांते**! भवभय हरीं श्री**भ**गवते! ॥ ६

असें ॐकाराचें प्रणवमय पंचांग स्फुरसी
    तशा पंचावस्था तनुहि गुण सापेक्ष रमसी।
अगूणि याहूनि परंतु परमानंदस्फुरिते!
    जगन्माते! **शांते**! भवभय हरीं श्री**भ**गवते! ॥ ७

तनू वाचा चित्तें अनुदिनिं तुझी भक्ति करिती
    तयांला तूं होसी सफळ, महिमा वानुं मी किती? ।
दिनोद्धारे! नाथे! ब्रि[६]दं तव करीं साच पुरतें
    जगन्माते! **शांते**! भवभय हरीं श्री**भ**गवते! ॥ ८

महत्वातें तूझ्या न पवति **वि**धी आदि सकळ
    परी वाणी त्याची स्तवन करितां होय सफळ।
म्हणोनी हें येथें स्तुति स्फुरविसी अष्टकरिती
    अन**न्या**त्मारामीं गुरुपदिंच ने **व्यं**कटमती. ॥ ९

---

१. सत्व, रज आणि तम या तीन गुणांनीं युक्त. 'मय'प्रत्ययाचा अर्थ 'विशिष्ट' 'युक्त' 'परिपूर्ण' असा आहे. २. 'त्रीमंत्र' असा अन्य पाठ. ३. लहानपण, तरुणपण व म्हातारपण या तीन अवस्था. ४. पालन करिसी. ५. मारिसी. ६. लौकिक, बडिवार.

# खंडेरायकविविरचित

## १८. ऐकनाथचरित्र.

(साकीवृत्त.)

बरवीं संतचरित्रें हो! । पावन परमपवित्रें हो! ॥ ध्रुवपद. ॥

प्रतिष्ठानीं एकनाथ भक्तराज तुम्हि ऐका, ।
कीर्ति जयाची चराचरीं हो! अजुनि राहिली देखा. ॥ बर० ॥ १ ॥
ज्ञानदेव प्रत्यक्षमूर्ति अवतरला हे सृष्टीं ।
दीनोद्धारण करावयाला अवलोकी तद्दृष्टी. ॥ बर० ॥ २ ॥
कोणे एके दिवशीं कीर्तन करितां एकनाथ ।
जैळाची ते उपमा संता, नेला तिकडे जात. ॥ बर० ॥ ३ ॥

---

१. ह्या कविविषयीं कांहीं विशेष माहिती मिळत नाहीं, पण नाथगोपाळ हा ह्या कवीचा गुरू असावा व पद्य २३ तील 'काजी' या शब्दावरून हे गृहस्थ नागपुराकडील रहिवासी असावे असें दिसतें. ह्याची कविता (१) तुकारामचरित्र (अभंग ४०), (२) नामदेवचरित्र (अभंग २५) आमच्यापाशीं आहे. शोधकांनीं आणखी मिळविण्याचा प्रयत्न करावा. २. एकनाथ—हा साधु ब्राह्मण कवि ज्ञानदेवाचा अवतार असें समजतात. याचा जन्म शके १४७० या वर्षी झाला असें दिसतें. याचा मरणशक १५२१ फाल्गुन वद्य ६ असें आढळतें. याची कविता (१) एकनाथी भागवत, (२) भावार्थरामायण, (३) रुक्मिणीस्वयंवर, (४) स्वात्मसुख, (५) हस्तामलक, (६) आनंदलहरी, (७) चतुःश्लोकी भागवत टीका, (८) अभंग, (९) पदें—इतकीं प्रकरणें मराठी असून कांहीं कविता हिंदुस्थानी भाषेंतही आहे. याच्या गुरूचें नांव जनार्दनपंत होतें म्हणून त्यानें आपल्या कवितेंत आपलें नांव **'एका जनार्दन'** असें लिहिलेलें आढळतें. याची वाणी रसाळ आणि सरळ असून वर्णन करण्याची शैली मनोहर आहे. एकनाथानें मराठी भाषेवर केवढे उपकार केले या विषयाचें प्रतिपादन **'एकनाथाचें चरित्र'** नामक पुस्तकांत आणि 'आमची देशी भाषा विद्यापीठीं शोभण्यासारखी आहे कीं नाहीं?' या व्याख्यानांत प्रो० **रा**जाराम **रा**मकृष्ण **भा**गवत यांनीं केलें आहे तें पाहण्यासारखें आहे. महिपतीच्या 'भक्तलीलामृतां'त (अध्याय १३-२४) एकनाथाचें सविस्तर चरित्र आहे. याशिवाय रा० धोंडो बाळकृष्ण सहस्रबुद्धेकृत 'श्रीएकनाथ महाराज यांचें चरित्र' हें पुस्तकही पाहण्यालायक आहे. ३. पैठणाला 'प्रतिष्ठान' असें अन्य नांव आहे. ४. स्थावरजंगमीं. ५. एकनाथ हा ज्ञानदेवाचा अवतार असें समजतात. ६. दीनांचा उद्धार करण्यासाठीं. ७. पाणी ज्याप्रमाणें कोणत्याही वस्तूंत घातलें असतां त्या वस्तूचा रंग धारण करतें त्याप्रमाणें साधूंला जसा मनुष्य भेटेल त्याप्रमाणें ते वर्तन करितात. अशीच एक हिंदी भाषेंत म्हण आहे:—'पानीका रंग कैसा? जिसमें मिलावे वैसा.'

**वि**वेकनाक[1] महार तेथें कीर्तन ऐके भावें, ।
बोला ऐसी करणी आहे, पाहीन मीच भावें[2]. ॥ बर० ॥ ४ ॥
सूर्योदय होतांचि, स्वामी गंगास्नाना आले, ।
जाते वेळीं **वि**वेकनाका मार्गिं भेटते झाले. ॥ बर० ॥ ५ ॥
पाणी[3] जोडुनी अर्जी बोले, **वि**वेकनाकहि जाणा ।
'द्वादशी माझे घरीं यावें तुम्ही भोजन करण्या.' ॥ बर० ॥ ६ ॥
तेव्हां प्रत्युत्तर तयाला **ए**कनाथही देत ।
'अनामकाघरीं[4] कैसें यावें भोजन करण्यांत?' ॥ बर० ॥ ७ ॥
**वि**वेकनाक बोले, 'कीर्तनिं तोयचि उपमा संतीं ।
तुम्हीच देउनि, ऐसें म्हणतां?' खेद करी तो चित्तीं. ॥ बर० ॥८॥
हृदयींचा तो भाव जाणुनी 'येतों' म्हणे तयाला ।
हर्षयुक्त तेव्हां होऊनी 'येतों'[5] म्हणे **ना**थाला. ॥ बर० ॥ ९ ॥
**वि**वेकनाकें अपुले कांतेलागीं[6] आज्ञा केली ।
सर्व शुचिर्भूत होऊनि पाक लावा चौली[7] ॥ बर० ॥ १० ॥
सर्वही मात[8] सांगे अपुले कांतेलागीं ।
सव्वा प्रहर रात्रीं उठोनी पाक केला वेगीं[9]. ॥ बर० ॥ ११ ॥
तिकडे मठामध्यें अवघें कळलें वर्तमान ।
शिष्यांचा समुदाय मिळाला 'आलें' म्हणती 'विघ्न.' ॥ बर० ॥१२॥
अवघे मिळोनी त्यानीं एक मनसुबा[10] केला, ।
तो येईल तिकडे जाता धरु हेची बोला. ॥ बर० ॥ १३ ॥
अरुणोदय होतां अवघे आले **स्वा**मीपाशीं ।
'**भा**गवतग्रंथ सोडा बैसा श्रवणासी.' ॥ बर० ॥ १४ ॥
सर्वात्मक जाणोनी **स्वा**मी बैसले हो! तेथें ।
पाक होऊनि सिद्धता[11] जाहली कळलें हृतयांत. ॥ पुर० ॥ १५ ॥

---

१. महारांच्या नांवापुढें 'नाक' असा शब्द जोडण्याची कोंकण वगैरे प्रांतांत चाल आहे. जसें—रामनाक बिन गणनाक महार. २. स्वतः, खुद्द. ३. हात. ४. शूद्राच्या घरीं. हा समास चिंतनीय आहे. ५. 'येतों' या शब्दाचा उपयोग येथें 'जातों' या अर्थी केला आहे. हें विपरीतलक्षणेचें उदाहरण आहे. कुंकू वाढलें, तांदुळ वाढले, हातांतील बांगड्या वाढल्या—इत्यादि वाक्यांत विपरीतलक्षणा आहे. ६. भार्येस, बायकोस. ७. चालीस लावणें=सुरुवात करणें. ८. वर्तमान. ९. लवकर. १०. विचार. ११. जेवणाची तयारी.

सर्वांभूतीं आत्मा एकचि आहे तो हो! तेथें ।
अंतर्गतिनें गेले **स्वा**मी केलें भोजन तेथें. ॥ बर० ॥ १६ ॥
येतां योगें भोजन केलें **वि**वेकनाकाघरीं ।
ज्याचें जेवण, त्याचे ढेंकर दिधले, परोपकारी ॥ बर० ॥ १७ ॥
भोजन सारुनि बाहेर आले, आंचवले अंगणांत ।
रत्नगीता, येत काठी ठेवुनि आले तेथें. ॥ बर० ॥ १८ ॥
**वि**वेकनाक पाहे जंव तों **स्वा**मी नाहीं तेथें ।
विडा घेतला नाहीं म्हणूनि, चित्तीं हळहळित[१]. ॥ बर० ॥ १९ ॥
कांतेलागीं[२] बोलतसे, 'गे! **स्वा**मी गेले निघुनी.' ।
पुढें पाहे गीता, काठी, ठायीं गेले विसरोनी. ॥ बर० ॥ २० ॥
भार्या बोले, 'गीता, काठी, विडा, घेउनी जावें.' ।
शब्द ऐकतां कानीं **वि**वेकनाक त्वरेनें धांवे. ॥ बर० ॥ २१ ॥
जाउनि तेथें उभा ठाकला, पाहती शिष्यमंडळी ।
काय काज[३] तुज येथें धुडकावीला[४] सकळीं[५]. ॥ बर० ॥ २२ ॥
'कांजी[६]! तुम्ही रागा येतां? **स्वा**मिशिं धाडुन [७]देणें ।
गीता, काठी, विडा, घेउनी सुखी मग बैसणें.' ॥ बर० ॥ २३ ॥
पाहता सकळें गीता येथें कोठें जवळी न दिसे; ।
'भोजनास गेलों होतों तेथें वाटे राहीलीसे.' ॥ बर० ॥ २४ ॥
ऐशा बोला **स्वा**मीवचना शिष्य पाहूं गेले ।
**वि**वेकनाक उभा द्वारीं गीता, काठी, देखिले. ॥ बर० ॥ २५ ॥
पाहुनि तेव्हां आश्चर्य करिती, '**स्वा**मी केव्हां गेले? ।
प्रातःकालापासून **भा**गवत ऐकवित बैसले.' ॥ बर० ॥ २६ ॥
साधू[८]महिमा नकळे कोणा निगमां[९] अगम्यहि जेथें ।
लवण[१०]पूतळी सिंधु[११] पहातां अंतीं जीवन[१२] होते. ॥ बर० ॥ २७ ॥

---

१. दुःखित. २. भार्येस. ३. काम, कार्य. ४. दरडावला. ५. सर्वांनीं. ६. कां बरें, कोणत्या कारणामुळें. ७. द्या, द्यावें. क्रियावाचक नामें कधीं कधीं काव्यग्रंथांत क्रियापदाऐवजीं येतात. 'सारांश पाठ **करणें**' याचा अर्थ 'सारांश पाठ **करावा**' असा आहे. दुसरीं उदाहरणें—(१) सर्वज्ञाला अज्ञ मनुष्यें काय ज्ञान **शिकविणें** (शिकवावें)—मोरोपंत. (२) वरचेवर पत्र पाठवीत **जाणें** (जावें.) ८. सज्जनांची लीला. ९. वेदांना. १०. मिठाची बाहुली. ११. समुद्र पाहणें=समुद्रांत पडणें. १२. पाणी. [विरघळते—असा भाव.]

नाथगो[1]पाळें वर्णन केलें अखंड परिपूर्ण ।
खंडेराया निजध्यास गातो वहु आवडीनें. ॥ बर० ॥ २८ ॥

---

# अनामकविविरचित

## १९. श्री[2]रामदासलीला.

(लावणी.)

स[3]ज्जनगडिं रा[4]मदास सुखदायक नांदतसे तो श्रीगुरुवर ।
तत्सेवा तूं मनुजा! कर स[5]त्वरतर. ॥ ध्रुवपद. ॥

---

१. गोपाळनाथ हा खंडेरायाचा गुरु असावा व कवीनें आपली गुरुभक्ति प्रगट करण्यासाठीं येथें असा उल्लेख केला असावा. गोपाळनाथकृत कांहीं पदें आमच्या संग्रहीं आहेत; शोधकांनीं जास्ती मिळविण्याचा प्रयत्न करावा, अशी सविनय विज्ञप्ति आहे. २. ह्या लावणीचे आरंभीं उपोद्घातरूप पुढील लेख आहे. "अथ रामदासस्वामींनीं मूर्ति स्थापन केल्या. ती लीला कटावरूप प्रारंभ. प्रसादबावाकडून मठ इसलामपूर येथून झाला तो लेख. शके १७७७." ह्या लावणीचा कर्ता कोण हें कांहीं कळत नाहीं. रचनाकालही निर्णित करितां येत नाहीं. वर दिलेल्या शकावरून ही लावणी निदान ४० वर्षांची जुनी असावी. पण अंतस्थ प्रमाणांवरून ती अधिक जुनी असावी असें दिसतें. ही लावणी कदाचित् राजाराम प्रासादी ऊर्फ प्रसादबावा यांनींच केलेली असावी, असें वाटतें. ह्या बोवांनीं केलेलीं कांहीं पदें, 'काव्येतिहाससंग्रह—अनेककविकृत काव्यें, भाग ३' यांत अखेरीस छापलीं आहेत. प्रस्तुत लावणींत चांफळ येथें समर्थांनीं श्रीराममूर्ति स्थापना केली, त्या संबंधानें यांत बरीच विस्तृत हकीकत दिली आहे. विशेष हकीकत आत्मारामबावाकृत 'श्रीसमर्थरामदासचरित्र' (तेंडुलकरांची आवृत्ति) याचे अध्याय ३१,३२,३३,३४,३५ व ३६ यांत आहे; ती इष्ट असेल त्यांनीं पहावी. ३. हा डोंगरी किल्ला सातार्‍याजवळ ३ कोसांवर आहे. यालाच परळी असें दुसरें प्रसिद्ध नांव आहे. ४. शिवाजी महाराज छत्रपतींचे गुरु. 'समर्थ' असें यांसच म्हणतात. यांचें जन्म जांबगांवीं श० १५३० त चैत्र शुद्ध ९ स झालें आणि श० १६०३ मध्यें माघ वद्य ९ स सज्जनगडीं यांनीं समाधि घेतली. यांचे बापाचें नांव सूर्याजीपंत व आईचें राणूबाई. यांचें उपनांव ठोंसर. जातीचे देशस्थ आश्वलायन ब्राह्मण. हे छत्रपति शिवाजी महाराजांचे गुरु होते. यांचे 'दासबोधा'दि बरेच ग्रंथ प्रसिद्ध आहेत. विशेष माहिती भक्तविजय अ० ४७ यांत पहावी. या सुप्रसिद्ध भक्तवर्य कवीविषयीं माहिती पुढील पुस्तकांत आहे ती इष्ट तर पहावीः—रामदासाची बखर, रामदासस्वामीचे समग्र ग्रंथ, अर्वाचीन (भारतवर्षीय) कोष, जुनें नवतीत, काव्येतिहाससंग्रहांतील रामदासाचें चरित्र, चौबळकृत रामदासाचें चरित्र. ५. 'सत्वरतर'=अतिशय लवकर, किंवा तत्सेवा सत्वर कर आणि तर—असे दोन्ही अर्थ संभवतात.

सद्गुरु एके दिनिं [१]अंगापुरीं कृष्णेतटिं संध्येस बसे ।
तैं मनिं सुचलें उत्तमसें ।
स्थापुनि रघुनंदन करुं वंदन जनोद्धार करुं याहि मिसें ।
तें [२]ध्यान असो सुंदरसें ।
तंव कृष्णेंतुनि शब्द निघाला, 'दासा! तुम्हि कल्पिलें जसें ।
रूप धरियलें मीहि तसें ।
सत्वर मज बाहिर काढावें सीतेसह मी आंत असें ।
मारुति लक्ष्मण तोहि वसे.' ।
डोहांतुनि मधुर ध्वनि इतुका ऐकुनि डोलति अतिहर्षें ।
नयनीं प्रेमामृत वर्षे ।
तेचि क्षणिं उडि घालुनि काढिति [३]जगदंबेसह उत्कर्षें ।
पाहतां रूपहि हृद् हर्षे ।
अद्भुत चरित्र घडलें ऐसें जाहलिया नाहिंत [४]बहु वर्षें ।
तच्चरणांबुज [५]नमिं [६]शीर्षें ।
पद स्पर्शनीं जन पावन हें लोह जसें परिसा [७]घर्षें ।
चाल ॥ तेथें स्तविजे किति [८]आर्षें ।
व्यर्थ मनीं धरुनी ईर्षे[९] ॥
तोड ॥ विषय मनांतुनि काढीं, फाडी यम [१०]कागद मग चरचरचर ।
तत्सेवा तूं मनुजा! कर सत्वरतर. ॥ १ ॥
श्री रामचंद्रमूर्ति घेऊन 'स्थापूं' म्हणती [११]सदय मनांत ।
निघाले शिष्यांसहित वनांत ।

---

१. हें गांव सातान्याचे दक्षिणेस उंब्रज व कऱ्हाड यांचे दरम्यान कृष्णेच्या तीरीं आहे. २. मूर्ती, तिचा डौल, सुबकपणा. ३. महिषासुरमथनी देवी. 'मूर्ती दोन आणोनी । एक स्थापिली चाफळभुवनीं । श्रीराम चापपाणी । अखंडित ॥ ११ ॥ दुसरी महेशासुरी । स्थापिली परळी गडावरी । विराजमान अद्यापवरी । सदोदित ॥ १२ ॥ (आत्मारामबोवाकृत रामदासचरित्र–अ० ३४) या देवीचें नांव आंगलाई असें आहे. ४. यावरून ही लावणी मूळ कथानकानंतर लवकरच लिहिली असावी. ५. नमन करितों. ६. मस्तकानें. ७. घर्षणानें. ८. अयोग्य, अचरट, आपल्याला न झेंपेल असें काम करणारा. मूळचा अर्थ जाऊन हा अर्थ कसा आला आहे ही गोष्ट लक्षांत घेण्याजोगी आहे. ९. हाव. १०. प्रत्येक व्यक्तीच्या पापपुण्याची खातेवही यम ठेवीत असतो अशी समज आहे त्या खात्याचे कागद. ११. रामदास.

'रामकृष्ण शिव शंकर' सुंदर मंद होतसे ध्वनि वदनांत[1] ।
चरित्र जाहलें नवल तशांत ।
पशुरक्षकशिशुंनीं[2] पाहुनि धाउनि जाउनि कथिति ग्रामांत ।
म्हणति 'श्रवण करा ही मात[3] ।
युग्म[4] तपस्वी येउनि कृष्णेंतुनि काढिला जनकजामात[5] ।
वृत्त कळविलें आम्ही तुम्हांत ।
जा सत्वर ते मार्ग चालती आम्ही जातों अपुल्या धामांत'. ।
मिळवुनि म्हणती 'चला' जमात[6] ।
भाविक जन 'जाउं नका' म्हणती परि ते सकळहि ऐकेनात ।
म्हणती 'होइल हांसें जनांत' ।
मूर्खा[7] बहु संतछळण अवडे वनितागण सुतकन्या नात ।
चरयामिचे[8] मग रानांत ।
जाउनि दासा हांका मारिती कितिक जन करिती प्रणिपात[9] ।
तंव देखियला सद्गुरुनाथ ।
त्यांतुनि[10] एक द्विज आग्रही तो बोले सद्गुरु संनिध जात ।
चाल ॥ 'शिवे[11] आंतिल अधिकार आम्हांत ।
नेतां न कळवितां सदनांत'. ॥
तोड ॥ दास दयाघन म्हणती, 'तुझी तर अपली मूर्ती धर धर धर'. ।
तत्सेवा तूं मनुजा! कर सत्वरतर ॥ २ ॥
सद्गुरुचरणां वंदुनि रचिलें चरित्र सुखद श्रवण करा ।
संतकथा मानसीं भरा ।
दासें ज्या स्थलिं राम ठेविला रामें धरिली दृढ ती धरा[12] ।
मूर्ति उचलती सौख्यकरा ।
निज सुखदाती[13] येउनि दांतीं[14] परि हि कदा ती ये न करा ।
मग म्हणती गुरु 'यत्न करा'. ।

---

१. रामदासाच्या तोंडीं. २. गवळ्यांचीं किंवा गुराख्यांचीं पोरें. येथें 'कारकदीपक' अलंकार आहे. ३. हकिकत, वर्तमान. ४. रामदास व कल्याण. ५. जनकराजाचा जांवई. (राम.) ६. जमाव, मंडळी. ७. मूर्खाला साधूंचा छळ करणें, बायको, मुलगा, मुलगी इत्यादि आवडतात. ८. अंगापूर व चाफळ यांचे दरम्यानचें जंगल. पण हें नांव नीट समजत नाहीं. ९. वंदन. १०. मंडळींपैकीं, जमालीपैकीं. ११. सीमा. १२. जमीन. १३. सुख देणारी. दात्री असा शुद्ध शब्द आहे. पण अनुप्रासार्थ 'दाती' अशी शब्दयोजना केली असावी असें दिसतें. १४. दांत ओठ खाऊन.

तारुण्यहीन वृद्ध पुरुष जे सर्वांलागीं अशक्त नरा ।
वदती 'पृष्ठीं'[१] कितीक 'सरा' ।
ते केसरा[२] अंगिं न ठेवितां ऊचलती मग एकसरा[३] ।
तंव किंचित् हलविलें सुरा[४] ।
तैं कुशलें[५] मग युक्ति कल्पुनी शकट[६] अणविलें करुनि त्वरा ।
ठेविति वरि जगदीश्वरा[७] ।
विधिदत्त[८] शक्ति खर्चुनि, परि त्या गाड्याचा जाहला चुरा ।
मग म्हणती 'तच्चरण धरा.'
धांवत जाउनि सर्व समर्था म्हणाति 'देव न्या स्वसुखें घरा' ।
चाल ॥ द्यावा कांहीं मान बरा ।
दिधला निश्चय करुनी खरा ॥
तोड ॥ एका मागुनि एक जाउनी नमिती चरण मग झर झर झर ।
तत्सेवा तूं मनुजा! कर सत्वरतर ॥ ३ ॥
स्वामी तंव हास्य करुनि म्हणती 'ही हि गोष्ट जगदीश! बरी ।
प्रार्थुनि मग ज्या प्रियशबरी[९] ।
पुष्पतुल्य घेउनि जातांना देखियली [१०]चंपकनगरी ।
मनिं आणिलें या भूमिवरी ।
संस्थापना करावी यास्तव स्थल मागितलें ते वसरीं[११] ।
ग्रामस्थें ऐकुनि कुसरी ।
तंव ते स्मशानभूमी दावियली [१२]मांडनदीच्या पैलतिरीं ।
पाहुनि जागा म्हणति बरी ।

---

१. मागें. २. कमताई, कुचराई. ३. एकदम, एकजुटीनें. ४. देवाला, रामाला. ५. शाहण्या, हुशार माणसानें. ६. गाडी. ७. रामाला. ८. ब्रह्मदेवानें दिलेलें बळ. ९. श्रमणा नांवाची भिल्लीण ज्या रामास फार आवडली होती. १०. चांफळ. हें गांव सातारच्या दक्षिणेस १०।१२ कोसांवर आहे. येथें अद्यापि समर्थांचे वंशज राहतात व जहागिरीचें मुख्य गांव हेंच आहे. ११. त्या वेळीं. १२. ही लहानशी नदी चांफळखोऱ्यांतून येऊन उंब्रजेजवळ कृष्णेस मिळते. चाफळगांवालाही हीच नदी आहे. तिच्या दुसऱ्या बाजूला देवळाकरितां ग्रामस्थांनीं समर्थांस जागा दिली. अद्यापि देवालय तेथेंच आहे. येथें जो म्हसोबाबद्दल कथाभाग वर्णिला आहे त्याचा विस्तार पाहणें असल्यास आत्मारामबुवाकृत रामदासचरित–अध्याय ३१ पाहावा.

त्या स्थानीं बहु पिशाच संमध झोटिंग दारुण वास करी ।
परि हरि पाहतां जाति दुरी ।
तैसें सर्व पळुनियां गेले स्वामी पाहुनि नयनभरी ।
आणि अद्भुत ऐका चतुरीं ।
दैवें एक म्हसोबा बोले, 'शरण अलों मी चरण धरीं ।
कोणाला पीडा न करीं ।
द्याल कांहिं तें भक्षुनि राहिन दीन आतां हा घ्या पदरीं' ।
कृपा आली दासाअंतरीं ।
तंडुल दधि चरु नारळ नेमुनि जंबुतरुतळीं ठेविं हरी ।
चाल ॥ ऐशातें भजशील जरी ।
पावशील सुखधाम तरी ॥
तोड ॥ सिंदूरर्चित[1] अन्य दगड मग उदकिं फेंकियले भर भर भर ।
तत्सेवा तूं मनुजा! कर सत्वरतर. ॥ ४ ॥
त्या नंतर सुंदर देवालय रचुनि स्थापियलें भगवान् ।
सन्मुख[2] हि पृष्ठीं हनुमान् ।
तें स्थल शेषाकृति विलसतसे पाहतां होतेंच समाधान ।
सवें मधुमास[3] आला तंव जाण ।
आरंभिली मग रामजयंती अवलोकिति जन संत निधान ।
ठायीं ठायीं कथापुराण ।
साधुजना हें वृत्त समजतां करित अले पथिं हरिगुणगान ।
ध्याति सतत जे हनुमत्प्राण[4] ।
रं[5]गनाथ[6] शि[7]वराम नि[8]रंजन के[9]शव आ[10]नंदमूर्ति महान ।

---

१. शेंदूर लावलेले. २. या देवालयांत दोन मारुतीच्या मूर्ति आहेत. रामाच्या मूर्तींबरोबर जी मारुतीची मूर्ति डोहांतून निघाली ती रामाच्या समोर स्थापिली आहे. पण समर्थांनीं जी शेणाची मूर्ति स्थापिली आहे ती या देवळाचे मागचे बाजूस आहे. ही दोन मूर्तींची बाब लक्षांत ठेवण्याजोगी आहे. ३. चैत्रमहिना. ४. हनुमान् आहे प्राणसम ज्याला तो राम. ५. ही बहुतेक मंडळी समर्थांचे समकालीन आहे. यांपैकीं बहुतेकांच्या व समर्थांच्या भेटी झाल्या होत्या. पण प्रस्तुत प्रसंगीं ही इतकी मंडळी जमली होती अशाबद्दल आत्मारामबोवाकृत चरित्रांत उल्लेख नाहीं. ६. पंढरपुराजवळ नाझरें गांवचा हा राहणारा. याचे बापाचें नांव गोपाळपंत (निजानंदस्वामी) व आईचें बयाबाई जातीचा वाजसनेयी ब्राह्मण. हा ब्रह्मचारी होता. याची समाधि श० १६०६ मध्यें निगडी येथें झाली. याचीं

[1]तुकाराम [2]जयराम हि मान ।
[3]शेखमहंमद [4]वामनपंडित [5]शिवदिन साधू सूर्यसमान ।
किति गायक पंडित विद्वान् ।

---

पदें वगैरे बरींच असून 'बृहद्वाक्यवृत्ति,' व 'योगवासिष्ठ' यांवर ओवीबद्ध टीका आहे. ७. पुढें 'गंडिकाख्याना'वरील टीप पहा. ८. या कवीस सुमारें २५० वर्षें होऊन गेलीं. हा जातीचा गौड ब्राह्मण. दौलताबाद येथील राहणारा. याची कविता हिंदुस्थानी भाषेंत आहे. ९. हा कवि रामदासपंचायतनांतील प्रख्यात साधु होय. हा भागानगर (निजाम हैद्राबाद) येथील राहणारा. याच्या गुरूचें नांव काशीराजस्वामी. यानें 'एकादशीचरित्र' हा ओंवीबद्ध ग्रंथ केला आहे व कांहीं पदें व अभंगही केले आहेत- हा जातीचा महाराष्ट्र ब्राह्मण. हा शके १५५० मध्यें होता. हा समाधिस्थ कधीं झाला हें समजत नाहीं. ह्याची समाधी कलबुर्गा येथें आहे. मोरोपंतानें ह्या कवीविषयीं उल्लेख 'सन्मणिमालें'त केला आहे. तो असा:—'मजवरि दया करो तो ब्रह्मज्ञ, ख्यात, केशवस्वामी । मागतसें हरिचरणस्मृतिवर या नमुनि केशवस्वामी ॥ ९ ॥' ह्या कविविषयीं जास्ती माहिती 'रामदासचरित्र,' 'भरतखंडाचा अर्वाचीन कोश,' 'केशवस्वामीकृत पदें व अभंग' इत्यादि पुस्तकांत पहावी. १०. हा भालगांव येथील राहणारा. याची समाधि श० १६१८ चे कार्तिक शुद्ध १४ चे दिवशीं ब्रह्मनाळीं झाली.

१. हा पंढरपुरच्या पांडुरंगाचा एक भक्त होता. हा शालिवाहन शके १५३० मध्यें देहूस जन्मला. हा जातीचा वाणी होता. ह्याला दोन बायका होत्या. पहिली बायको दमेकरीण होती ती लवकरच वारली. दुसरी बायको जिजाबाई मोठी कर्कशा होती. ह्याच्या सत्राव्या वर्षीं त्याचीं आईबापें वारलीं. ह्याचा मृत्यु शके १५७१ त झाला. ह्याचे अभंग पुष्कळ आहेत. विशेष माहिती भक्तविजय–अध्याय ४८ व ४९ यांत पहावी. या कवीविषयीं आणखी माहिती कै० हंस यांच्या निबंधांत व रा० रा० **रा० वि० माडगांवकर** यांच्या पुस्तकांतही आहे. ती जिज्ञासु वाचकांनीं पहावी. २. हा जातीचा देशस्थ आश्वलायन ब्राह्मण. याचें उपनांव केसर. याच्या बापाचें नांव भिकाजीपंत व आईचें कृष्णाबाई. (भिकाजीपंत कात्राबाद व मांडवगण येथील देशपांड्या होता.) याची समाधि श० १५९४ त भाद्रपद वद्य ११ रोजीं वडगांव येथें झाली. यानें 'सीतास्वयंवर' 'रुक्मिणीस्वयंवर' व 'अपरोक्षानुभूति,' हे तीन ओंवीबद्ध ग्रंथ व कांहीं पदें इतकी कविता केली आहे. ३. हा कबीरपंथी अवलिया चांभारगोंदें येथें राहत होता. हा तुकारामाच्या वेळेस होता. याचे अभंग व 'योगसंग्राम' नांवाचा ८ प्रकरणात्मक ओवीबद्ध एक ग्रंथही आहे. ४. सातारा जिल्ह्यांतील कोरेगांव येथील हा वडिलार्जित वतनदार जोशी, हा मोठा विद्वान् होता. हा श० १५९५ मध्यें वैशाख शुद्ध ६ स पांडववाडी येथें समाधिस्थ झाला. याचे 'यथार्थदीपिका' वगैरे अनेक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. ५. हा शिवदिनकेसरी या नांवानें प्रसिद्ध असलेला साधु पैठणचा राहणारा, जातीचा वाजसनेयी ब्राह्मण होता. हा केसरीनाथाचा शिष्य. यास होऊन गेल्यास सुमारें १२५ वर्षें झालीं. याचीं पदें वगैरे बरींच आढळतात.

ऐसे अनंत संतहि दासा भेटुनि पाहती भगवद्ध्यान ।
जीवातें बहुत अन्नदान ।
सनकादिक तत्प्रसाद वांछिति येती सिद्ध करुनी विमान ।
बहुत द्विजयतिचा[1] सन्मान ।
शिष्यहि करिती एक एक दिन संतर्पण हें पुण्य निदान ।
सतत योजना आणि बहु मान ।[2]
रथोत्साह ऐशा रिति जाला वर्णन करितां फणी[3] लहान ।
चाल ॥ स्तविलें लघुमति न कळे मान ।
नंतर सज्जनगडिं संस्थान ॥
तोड ॥ श्रीराम..................भज यम कांपे थर थर थर ।
तत्सेवा तूं मनुजा! कर सत्वरतर. ॥ ९ ॥

---

## सदाशिवकविविरचित[4]

## २०. उमाविलास.[5]

अंकावरी[6] धरुनि शंकर पार्वतीसी, नाना विलास करि वीसरहीत[7] तीशीं; ।
तों पातले सुरमुनी नमुं[8] त्र्यंबकातें[9], त्या देखुनी परम लज्जित अंबिका ते. १
तेव्हां उठोनि गिरीजा सदनांत[10] गेली, ऐसें विलोकुनि वदे तिसि चंद्रमौळी, ।
शंका मनांत न धरीं उघडीं कवाड.' दाक्षायणी[11] वदेत[12], 'लागलें काय वेड?॥
आले बहू सुरमुनी तव पाद सेवूं, त्यां देखतां कशि मि बाहिर नग्न येऊं?' ।
'त्यांचें मला भय नसे' शिव वाक्य बोले 'जा जा' वधू म्हणत 'शाहणे फार झाले.'
'माझें शहाणपण पाहसि काय आतां गेला असे कथुनि पूर्विंच गे! विधाता.'
ऐसें वदे शिव तितें परि ते न मानी, तों पातले समयिं नारद त्यां[13] सुठाणीं. ४

---

१. ब्राह्मण व संन्यासी, वैरागी, गोसावी. २. सदर चरित्राचे ३५ व ३६ अध्यायांत चाफळ येथील रामनवमीचे उत्सवाची व्यवस्था व्यवस्थापकांचे नांवनिशीवार दिली आहे. ती पाहण्याजोगी आहे. ती व्यवस्था समर्थांनीं लावून दिली होती तशी अद्यापि चालली आहे. ३. शेष. ४. ह्या कवीविषयीं कांहीं माहिती उपलब्ध नाहीं. सदाशिवपंत म्हणून उद्धव गोंसावी यांचे वडील होते तेच कदाचित् हे असतील. ५. हें आख्यान बरेंच सरळ व रसाळ आहे. यांतील शंकरपार्वतीसंवाद, नारदाची लावालावी इत्यादि प्रसंग वाचण्यालायक आहेत. ६. मांडीवर. ७, वस्त्ररहित, नग्न. ८. 'शिवदर्शनातें' असाही पाठ आहे. ९. त्रि+अंबक=तीन ज्याला नेत्र आहेत त्यातें, शिवातें. १०. गृहांत. ११. पार्वती. १२. 'म्हणत' असा अन्य पाठ आहे. १३. 'विप्रमुनी' असाही पाठ आहे.

बोले **नारद**, ‘**शां**भवा! वधु बहू टाकोनि बोले केशी[1]
नाहीं रे! तुजलागिं वैभव गमे यासाठिं तूं सोसिशी. ।
कांतेला पति तोचि प्रीय हृदयीं जो कां असे जोडेका[2]
संपत्तीविण कांत[3] तो वधु गणी जैसा कडू दोडका. ॥ ५
तूं तीतें अतिआदरें करुनियां बाह्यांगणीं[4] बोहसी[5]
ते तूझे वचनासि तुच्छ करिते हें तूं कैसें[6] सोसिशी? ।
जेथें कामिनिचें असें बळ बहू निर्माल्य[7] तेथें पती
तेणें[8] कानन सेवणें परि न त्यां यावें सुधामाप्रती[9].’ ॥ ६
आधीं कामिनिचे[10] कठोर वचनें क्रोधाग्नि तो चेतला
आज्याचा[11] मगे[12] हो! प्रजन्य[13] वरुता श्री**नार**दें सिंचिला ।
तेव्हां स्त्रीगृह सोडुनी[14] **प**शुपती[15] कोपोनि गेला वना[16]
ऐसें[17] जाउनि **अं**बिकेप्रति मुखें त्या सांगती [18]अंगना. ॥ ७
‘**शि**वें तुला बाहिलें रम्य वाचे न मानिलें[19] तूं निज वाक्य त्याचें ।
‘म्हणोनियां टाकुनि तूज गेला! ऐकोनि तीतें बहु कोपें[20] आला. ॥ ८
‘ऐशी सख्यांची परिसोनि वाणी सखेद चित्तीं वदली **भ**वानी ।
‘हा तो अकर्मीक[21] असाचि आहे मी सांगतें लक्षण[22] तेंचि पाहें. ॥ ९
‘मला पूर्वींहूनी मदनअरि[23] हा ठाउक असे
‘नसे पोटींपोटीं[24] सकळहि कुळीं शून्यचि असे ।

---

१. ‘तुशीं’ असाही पाठ आहे. २. मिळविणारा. ३. ‘त्या वधू गणितसे’ असाही पाठ आहे. ४. बाहेर. ५. बोलविसी. ६. ‘किती साहसी’ असाही पाठ आहे. ७. ‘निर्मोल’ असाही पाठ आहे. ८. ‘जीर्णे काय तथा सुधाम असुनी जावें अरण्याप्रती’ असाही पाठ आहे. ९. उत्तम घराप्रती. १०. स्त्रियेचे. (पार्वतीचे.) ११. तुपाचा. १२. ‘बरवा’ असाही पाठभेद आहे. १३. पर्जन्य, प्रवाह. १४. ‘टाकुनी’ असाही पाठ आहे. १५. पशूनां (जीवानां) पतिः=शिवः. [‘अयं च सर्वविद्यानां पतिराद्यः सनातनः । अहं वै पतितो येन पशुमध्ये (जीवमध्ये) व्यवस्थितः ।। अतः पशुपतिर्नाम त्वं लोके ख्यातिमेष्यसि’ (वराहपुराण), ‘पशुपतिराणवमायीवकार्माख्यपाशत्रयबद्धाः पंचकलाकलिता जनाः पशवस्तेषामीशः’ (स्तुतिकुसुमांजलि—स्तोत्र ११ श्लोक ९७ टीका.)]. १६. ‘वनीं’ असाही पाठ आहे. १७. ‘ऐसें देखुनि पार्वतीप्रति दुती त्या सांगती येउनी’ असाही पाठ आहे. १८. स्त्रिया, अबला. १९. ‘मानुनी त्वां’ असा अन्य पाठ आहे. २०. ‘क्रोध’ असा पाठ आहे. २१. दुर्दैवी, हतदैव. २२. ‘लक्षणें याचिं’ असा अन्य पाठ आहे. २३. मदन+अरि=शंकर. ‘मदनहर’ असा अन्य पाठ आहे. २४. मागें पुढें. ना लेंकरूं ना बाळ.

‘पिता माता बंधू भगिनि चुलता [1]मातुळ नसे
‘[2]अकूळी[3] हा आहे [4]म्हणुनि नृकपाळा धरितसे. ॥ १०
‘[5]करी, [6]वारू, [7]यानें, रथ त्यजुनि बैलावरि बसे
‘सुवस्त्रें सांडूनी गज[8]अजिन [9]प्रावर्ण [10]विलसे ।
‘त्यजोनी [11]कैलासा[12]समे स्थळ स्मशानीं च वसतो
‘पिशाच्यांचे [13]संगें अनुदिनि [14]महा नृत्य करितो. ॥ ११
‘सुरत्नें सूमुक्तें कनकमणिमाळांसि [15]नें धरी
‘मनुष्यांचीं डोकीं रुधिरसहितें [16]कंठि च धरी ।
‘सुगंधादि द्रव्यें त्यजुनि उधळी भस्म शरिरीं
‘सुवर्णाचीं पात्रें न धरुनि करीं [17]खर्पर धरी. ॥ १२
‘तिरस्कारोनीयां [18]सुरतरुचि पुष्पादि कमळें
‘अतिप्रीतीनें जो निजशिरिं धरी [19]धत्तुरफुलें ।
‘सुधा अव्हेरूनी विषघटचि [20]प्यांला पशुपती
‘सदा मागे भिक्षा [21]अभिनव असा [22]गे! मम पती. ॥ १३
‘मृदंगादी वाद्यें न धरुनि, करी शंखस्फुरणा
‘अभावें ही ध्यातां त्वरित चुकवी जन्ममरणा ।
‘अनेकां भोगांतें अवगणुनियां योग करणें
‘असा भंगी चंगी [23]कुळवधु तया काय करणें? ॥ १४

---

१. मामा. २. ‘अकाळीं’ असा अन्य पाठ आहे. ३. अकुलीन, ज्याला कूळ नाहीं असा. ४. ‘म्हणवुनि कपाळा’ असा अन्य पाठ आहे. ५. हत्ती. ६. घोडे. ७. वाहनें. ८. अजिन=कातडें. येथें संधि कर्तव्य असून केला नाहीं. ९. वस्त्र. १०. शोभे, विराजे. ११. कैलास=शिवाचें क्रीडास्थान. [‘**कैलासः** कनकाद्रिश्च मंदरो गंधमादनः। क्रीडार्थे निर्मिताः शंभोर्देवैः क्रीडाद्रयोऽभवन् ॥’ इति शंभुरहस्ये. ‘**कैलासो** हिमवांश्चैव उत्तरे वर्षपर्वतौ । पूर्वपश्चायतावेतौ अर्णवान्तरुपस्थितौ ॥’ इति ब्रह्मांडपुराणे.] १२. ‘स्थळ मग’ असा अन्य पाठ आहे. १३. ‘सांगातें’ असा अन्य पाठ आहे. १४. ‘पहा’ असा अन्य पाठ आहे. १५. ‘कंठीं न घली’ असा अन्य पाठ. घली=घाली. १६. ‘कंठिं धरिलीं’ असा अन्य पाठ. १७. खापर. ‘खप्पर’ असा पाठ. १८. ‘बकुलतरुपुष्पादि कमळें’ असा अन्य पाठ आहे. १९. धोतऱ्याचें फुल शंकरास फार प्रिय आहे अशी प्रसिद्धि आहे. या धत्तूराविषयीं ‘धत्तूर धूर्त तरुणेंदुनिवासयोग्ये स्थाने पिशाचपतिना विनिवेशितोऽसि’ अथवा ‘महेशस्त्वां धत्ते शिरसि’ इत्यादि सुभाषितें सुप्रसिद्ध आहेत. २०. ‘प्राशी’ असा अन्य पाठ. २१. चमत्कारिक, विलक्षण. २२. ‘पार्वतिपती’ असाही पाठ आहे. २३. ‘गृहवधु’ असा अन्य पाठ.

'मला पैणूं[1] आला तधिं जननि तातासि वदली
'असे हा म्हातारा, नृपति ! न दिजे यासि अबळीं ।
'विरागी हा आहे निपट[2], नर संसारिक नसे
'अशाला हे देतां, तरि इस पुन्हा हा[3] भव नसे.' ॥ १५
'असें वर्जी[4] माता परि मम पित्यानें न मानिलें[5]
'विधात्यानें माझ्या निढळीं[6] लिहिलें तेंच घडलें ।
'मुखें जें मातेनें कथिलें[7] दिसतें[8] त्याहुनि दुणें
'असो आतां कोठें पशुपति असे शोध करणें. ॥ १६
'सख्या ! हो ! जा वेगीं त्रिपुरहर[9] शोधा [10]महिवरी
'असे कोणे स्थानीं श्रुत मज करा या लवकरी.' ।
असें ऐकोनीयां भ्रमण करिती त्या पिकरवा[11]
सख्या[12] जावोनीयां हिमगिरिवरी[13] देखति शिवा. ॥ १७
दुरोनी देखोनी फिरुनि मग येती निज स्थळा
कथीती अंबेतें, 'हिमगिरिशिरीं तो निरखिला[14].' ।
'धरोनी रुद्राक्षा जपत वदनीं श्रीरघुविरा
'विराजे तो भूतावळिसहित ऐसा न दुसरा. ॥ १८
'उदास तूझा दिसतो पती गे ! कैसा तुतें वरिल तो नकळे गिरीजे !' ।
त्यों[15] दूतिका कथिति या परि रम्य वाणी येरीकडे[16] विकळ शंकर कामबाणीं[17]॥ १९
कामानळें व्याकुळ होउनीयां तटस्थवृत्ती मग बैसुनीयां. ।
'आलों' म्हणे 'मी त्यजुनि प्रियेसी त्या नारदें ठकविलें मज निश्चयेसी ॥ २०
या पर्वतावरि स्त्रिया तरि कोण आल्या ? दृष्टी पडोनि पवनापरि शीघ्र गेल्या ? ।

---

१. वरूं, वरावयास. २. पक्का, अगदीं. निखुक, केवळ, अशा अर्थीं या शब्दाची योजना पंतांनीं सुद्धां अनेकदां केली आहे. (अहा निपट धृष्ट मीं प्रभुवरासि कां लाजसी—केकावलि १६.) ३. हा भव नसे=संसारास आंचवली; (पक्षीं) संसारसागरांतून पार झाली. ४. निषेध करी. ५. ऐकिलें नाहीं, मानिलें नाहीं. ६. दैवीं. ७. 'पहिलें त्याहुनि' असें पाठांतर आहे. ८. 'बरें आहे' असें पाठांतर आहे. ९. त्रिपुरासुरास मारणारा. (शंकर.) १०. पृथ्वीवर. ११. कोकिळेसारखा गोड आहे शब्द ज्यांचा अशा, मंजुळा. १२. 'विलोकोनी येती' असा अन्य पाठ. १३. 'हिमगिरिशिरीं' असा अन्य पाठ आहे. १४. पाहिला. १५. 'ऐशी दुती' असें पाठांतर आहे. १६. हिकडे, दुसरीकडे. १७. 'पंचबाणीं' असा अन्य पाठ.

त्यांचे कटाक्ष नयनीं निरखोनि मातें या [१]काननीं न करवे तपसाधनातें. ॥ २१
'[२]विचार कांहीं बरवा न केला संसार हा स्त्रीविण व्यर्थ गेला.' ।
पुनः पुन्हा बोलत **शं**भु भोळा, 'उगाच मीं लागलों″ विप्रबोला. ॥ २२
'आतां करावें तरि काय येथें?' तों पातला **ना**रद शीघ्र तेथें ।
मुनी म्हणे, 'कां मन [३]भंग केलें?' [४]तो बोलिला 'कां घर बूडविलें? ॥ २३
'स्त्रीवांचुनी तों मज राहवेना काकुळतीही तिज जाववेना ।
ते[५]व्हां वदे **ना**रद, 'सांडि चिंता [६]**मं**दाकिनी तूं करिं [७]शीघ्र कांता. ॥ २४
शरीर तीचें [८]शुभ हेमवर्णी स्वरूप तीचें तरि कोण वर्णी? ।
'[९]याऊपरी ते [१०]असे″ हो! [११]अपर्णा' जाणोनियां **शं**कर तीस [१२]पर्णी. ॥ २५

**गं**गेशीं करितां विलास विसरे **कै**[१३]लासभू **पा**र्वती
नाना नर्तन गायना [१४]करि तदां बैसोनियां पर्वतीं ।
वस्त्रें सुंदर भूषणें उभयतां [१५]लेती नवीं नित्य हो!
घेती सौख्य असें परंतु न विटे त्यांचें कदा चित्त हो! ॥ २६
हे [१६]चर्या नयनीं विलोकुनि मुनी आला **उ**माभूवनीं
[१७]बोले हा 'जननी! **शि**[१८]वें तुं त्यजुनी केली दुजी कामिनी ।
क्रीडों[१९] रम्यवनीं [२०]असंख्य करुनि भोगी सु**मं**दाकिनी
'हें तूतें कळुनी जीवंत [२१]अवनीं आहेसि तूं आझुनी.' ॥ २७

---

१. अरण्यांत. २. विचार, म्यां कांहीं बरा' असा अन्य पाठ. ३. 'व्यग्र' असें पाठांतर आहे. ४. 'शंभू म्हणे त्वां' असें पाठांतर आहे. ५. 'पुन्हा' असाही पाठ आहे. ६. भागीरथी. ७. 'नीज' असें पाठांतर आहे. ८. 'शुचि' पाठ. ९. इतकें असून आणखी. १०. 'असूनी' असा अन्य पाठ आहे. ११. कुमारी, अविवाहित. १२. लग्न करी. १३. 'कैलाशिंची' असा अन्य पाठ आहे. १४. 'करितसे' असा अन्य पाठ आहे. १५. घालिती, वापरिती. १६. राहाणी, वागणूक. १७. 'शीवें हो जननी तुतें त्यजुनियां' असा अन्य पाठ आहे. १८. 'शिवें तु (तुला) त्यजुनी दुजी कामिनी केली' हा प्रयोग चिंतनीय आहे. अशा प्रकारचे कर्मणि प्रयोग **मो**रोपंतादिकांचे काव्यांत बरेच आढळतात. ते 'निरंकुशाः कवयः' या न्यायानें आदरणीय होत. या संबंधानें पुढील पंतांचीं पद्येंही चिंतनीय आहेत:—**वारलासि** मत्सखीनें; म्यांही **वरिलासि** तूं मनें; मातें । पापापासुनि रक्षीं या माझ्या चालवूनि नेमातें. ॥ १ ॥ जाऊनि तो सुत म्हणे, 'कृष्णे! द्यूतांत तूं स्वयें धर्में । **हारविलीस** सुयोधनसदनाप्रति ये करावया कर्में. ॥ २ ॥.' १९. 'क्रीडे' असा अन्य पाठ आहे. २०. 'सुसौख्य' असा अन्य पाठ आहे. २१. जगांत.

तेव्हां ते सति आननें तव म्हणे, 'कर्तृत्व हें नारदा!
मी त्यातें वदतें अखंड परि तो चित्तासि नाणी कदा।
हें तों त्याप्रति त्वांच रे! शिकविलें तो तों असे [1]साबडा.
नाहीं या उदमांत मी' मुनि म्हणे 'तो ठाइंचा जोगडा.' ॥ २८
[2]ऐसें ऐकुनि त्या हिमाद्रितनया बोले सख्यांसी मुखें,
'आतां येइल गे! सदाशिव तरी वर्जा तुम्ही त्या सखे!।
जो मातें त्यजुनी रमे सवतिशीं तो काय आतां किजे?
गेल्या प्राणहि गे! परी [3]शवहि त्या दृष्टीसि ना घालिजे. ॥ २९
[4]जात होति विनवूं सुमतीनें घेतलें [5]घर कसें सवतीनें?।
काय सार्थकचि [6]यावरि वांचुनी [7]वक्त्र त्यासि नच दाखविं लोचनीं.'३०
झाली व्याकुळ अंतरीं महिवरी लोळे रडे नेटकी
[8]पीटी मस्तक, हस्तकीं करुनियां काढी चिरी [9]कंचुकी।
ऐसें तें गिरिजेस दुःख असतां झाली मदें विव्हळा
बोले, 'हा भुलवूनियां सवतिनें केला अम्हांवेगळा.' ॥ ३१
व्याकुळा मग वदे शिवदारा, 'ना रुचेचि मज [10]विंझणवारा,।
'होतसे बहुत देहिं [11]उबारा चंद्रकीर्ण दिसती रवि [12]बारा. ॥ ३२
कोकिळांसि उडवा पळवा गे! कृष्णपुत्र मदना पळवा गे!।
रतिनाथ तरि हा [13]पळे वागे होतसे शरिर हें [14]पळवा गे! ॥ ३३
लौकिकीं म्हणति शीतळ इंदू हा तरी मज गमे विषबिंदू।
[15]हार वाटति [16]विखारचि जैसे स्वामि आजुनि न येतिच कैसे? ॥ ३४

---

१. भोळा. २. यासीं समानार्थक दुसरा श्लोकः—सख्या! हो! मेल्याही शवहि न शिवो हें यदुपती, पती नानास्त्रींचा पतितजनही ज्यासि जपती, । नका येऊं देऊं सदनिं सवतीच्या प्रियकरा, करातें लावीना मज कपटि ऐसें तुम्हि करा. ॥११॥ [वामनपंडितकृत काव्यें—भाग २, पृष्ठ २३.] ३. प्रेत. ४. 'ज्यासि वेद विनवी सुप्रितीनें' असा अन्य पाठ. ५. घर घेणें—घर बुडविणें. ६. या पुढें, आतां. ७. तोंड. ८. हापटी. ९. चोळी. १०. पंख्याचा वारा. ११. संताप. १२. द्वादश आदित्यांचीं नांवें:—शुक्र, विष्णु, अर्यमा, धाता, त्वष्टा, पूषा, विश्वावसु, मित्र, वरुण, अंशु, भग, अतितेज. (सूर्यवंशावळी.) (२) विवस्वान्, अर्यमा, पूषा, त्वष्टा, सविता, भग, धाता, विधाता, वरुण, मित्र. शक्र, उरुक्रम. (भागवत.) (३) मित्र, रवि, सूर्य, खग, भानु, पूषा, हिरण्यगर्भ, मरीचि, आदित्य, सविता, अर्क, भास्कर. [संख्यावाचक कोश.] १३. क्षणभर त्रास देईल. १४. पळवा=म्लान. १५. कुसुमदाम. १६. सर्प.

बोलती जन **स**दाशिव भोळा त्याचि तों दिसे˘ अगाधचि लीला ।
तापसांत म्हणवी ‘मुनियोगी’ केंवि [1]हा [2]सुरनदी [3]तरि भोगी?’ ॥ ३५
यापरी वदुनि [4]मूर्च्छित ते पडे [5]वक्षभाळ [6]पिटुनी [7]वदनीं रडे ।
प्राण तो नयनिं येउनि राहिला देखुनी त्वरित **ना**रद चालिला. ॥ ३६
जाउनी मुनि म्हणे मग **शां**भवा, ‘तुजविना बहुत व्याकुळ ते [8]**भ**वा ।
‘[9]प्राण सांडिल गमे हृदयीं मला’ ऐकुनी मग **स**दाशिव चालिला. ॥ ३७
जाउनी मुनि म्हणे ‘विरुपाक्षा! [10]फार व्याकुळ असे [11]हरिणाक्षा ।
वाक्य ऐकुनि उठे [12]**द**शपाणी **जा**न्हवी नयनिं [13]ढाळित पाणी. ॥ ३८
**जा**न्हवी वदतसे मग त्यातें, ‘काय तूं त्यजुनि जासिल मातें?’ ।
**शं**भु बोलत असे, ‘[14]श्रृणु **गं**गे! चाल तूं श्रमहरे मजसंगें. ॥ ३९
‘नेसि ते स्थळिंच रे! जरि तूं मला क्रोध येइल बहू **गि**रिजा इला’ ।
‘गुप्त ठेविन’ म्हणे ‘तुज सुंदरी! दृष्टिही न पडुं दे तिचि तूवरी.’ ॥ ४०
ते म्हणे ‘वचन द्या मज हस्तकीं’ ठेविली मग **शि**वें निज मस्तकीं ।
यापरी करुनि अदृश्य **गौ**तमी पातला **शि**व त्वरें **गि**रिजाश्रमीं. ॥ ४१
आला उलंघोनि गिरीकपाटें तों **पा**र्वतीनें दिधलीं कपाटें ।
[15]तो पातला **शं**कर शीघ्र तेथें [16]**द**क्षात्मजा बोलत कोण येथें. ॥ ४२
[17]बोले श्री**हर** ‘[18]नीलकंठ मि असें कां ओळखी सांडिसी?’
‘आहे ठाउक तूं मयूर मजला टाहो किति फोडिसी?’ ।

---

१. ‘हा तरी’ असा अन्य पाठ आहे. २. कसा मनुष्याचा स्वभाव आहे पहा! जोंपर्यंत शंकर पार्वतीशीं नीट रीतीनें वागत होता तोंपर्यंत शंकराला तापसी, मुनि, योगी, अशीं विशेषणें दिलीं तरी चालत असे. मग त्यानें गंगेला वरितांच उलट प्रकार भासूं लागला. ३.‘कशि’ असा अन्य पाठ आहे. ४. ‘व्याकुळ’ असा अन्य पाठ आहे. ५. ऊर+कपाळ. ६. हापटुनी. ७. ‘मग ते’ असा अन्य पाठ आहे. ८. भवानी, पार्वती. ९. प्राण सांडणें=मरणें. १०. ‘स्थीर’ असा अन्य पाठ आहे. ११. एणाक्षी. १२. कार्तिकस्वामी. १३. नयनीं पाणी ढाळणें=अश्रुपात करणें, रडणें. १४. ऐक. १५. ‘येऊनि शंभू मग हाक मारी’ असा अन्य पाठ आहे. १६. ‘ती बोलली हा असे कोण दारीं’ असा अन्य पाठ आहे. दाक्षायणी, पार्वती. १७. हा व पुढील दोन श्लोक पुढील संस्कृत श्लोकाच्या आधारानें लिहिले असावेत:–‘कस्त्वं शूली मृगय भिषजं नीलकंठः प्रियेऽहं केकामेकां कुरु पशुपतिर्नैव दृष्टे विषाणे । स्थाणुर्मुग्धे न वदति तरुर्जीवितेशः शिवाया गच्छारण्यं प्रतिवचनजडः पातु वश्चंद्रचूडः ॥,’ १८. शंकरानें हालाहल विष प्राशन केल्यामुळें त्याचा कंठ काळा झाला म्हणून त्यास ‘नीलकंठ’ असें नांव पडलें; (पक्षी) मोर.

'नोहें मोर मि [१]काळकूटधर गे! प्रार्थी सुबद्धांजळी.'
'येथें कां तरि पातलासि [२]भुजगा? जावें तुवां भूतळीं.' ॥ ४३
'नोहें पन्नग मी, शशांकवदने! मी ऐक [३]शूळी असें'
'जावें वैद्यगृहासि औषधगुणें तो शूळ नाशीतसे' ।
'मी तों शूळि नसें, मला बहु [४]रसें [५]स्थाणु असें बोलती'
'हें तों नाम वदे तरू तरि किजे वस्ती वनीं पर्वतीं.' ॥ ४४
'मी तों स्थाणु नसें, असें [६]पशुपती तूं [७]कां मला नेणसी?'
'बैलाचें तरि काय काम मजला? शृंगें झणी रोंविसी. ।
'जें जें [८]नाम वदे तया उडविसी मी [९]रुद्र आतां प्रिये!'
'रामाचें करिं दास्य [१०]वांनरपती! मी वश्य ना निश्चयें.' ॥ ४५
हें व्यंगोत्तर ऐकतां पशुपती विस्मीत झाला मनीं,
'आहे कामिनि हे परी मजहुनी भासे बहू शाहणी.' ।
आतां [११]हे करणेंचि वश्य म्हणुनी तोडोनि [१२]टोंकी कड्या
जाऊनी धरितांचि ते वदतसे, 'सोडीं मला जोगड्या!' ॥ ४६
तीतें शंभु पुसे, 'कथीं [१३]बहु रसें कां रूसलीसी तरी?'
बोले ती, 'मजला त्यजोनि दुसरी केली कशी सुंदरी?' ।
'[१४]नोहीं जाणत मी सखे! तुजविना गेलों तपासी वनीं'
[१५]आलों मी तुझिया भयें परि नये कां येश या [१६]प्राक्तनीं. ॥ ४७
ऐकें गे! सखये! तुतें त्यजुनियां गेलों तपातें वनीं
तूं मातें नसतेंच दूषण कसें तें लाविसी या जनीं ।
मी तैसा व्यभिचार कर्म न करीं योगास तों आचरें
देवद्वीज विधीविधान करुनी आलों विचारीं बरें.' ॥ ४८
'तुझें [१७]वक्र कां शंकरा! [१८]म्लान झालें?' 'अनुष्टान गे! म्यां [१९]निराहार केलें.' ।

---

१. विषधर शंकर; (पक्षीं) साप. २. सर्पा. ३. रोगी; (पक्षीं) त्रिशूळ धरणारा. ४. प्रीतीनें, आवडीनें. ५. शिव; (पक्षीं) स्तंभ. ६. शिव; (पक्षीं) बैल. ७. 'कांते' असा अन्य पाठ. ८. 'वाक्य' असा अन्य पाठ. ९. मारुति; (पक्षीं) शिव. १०. 'वानरपणें' असा अन्य पाठ आहे. ११. 'ईस करीन' असा अन्य पाठ आहे. १२. 'गेला' असा अन्य पाठ आहे. १३. 'मज सखे' असा अन्य पाठ आढळतो. १४. 'आतां घेउनि तीजला निशिदिनीं क्रीडा तुम्हीं जा वनीं' असा अन्य पाठ आढळतो. १५. 'एथें कांहिं तुम्हांसि कारण नसे भोगा नवी कामिनी' असा अन्य पाठ आढळतो. १६. दैवीं. १७. तोंड. १८. फिकट. १९. निरशन.

‘तुझे लोचनीं[1] रक्तता[2] केंवि[3] आली’ म्हणे[4] ‘भक्षिली वेल्हि[5] तीचीच लाली.’ ॥ ४९
‘तनू कां[6] तुझी व्यापिली जीवनानें[7]?’ ‘पथीं चालतां घाम आला उन्हानें.’ ।
‘वधूचे दाचा[8] दिसे दंश ओष्टीं’ ‘उंते[9] शंख ओंठीं नसे मिथ्य गोष्टी.’ ॥ ५०
‘नखांचीं क्षतें दीसती ठाइं ठाईं’ म्हणे ‘खेळलों फार भूताशिं पाहीं.’ ।
‘बहू येतसे वास तूझे शरीरीं’ ‘पुंजा[10] भक्ति केली सुगंधोपचारीं.’ ॥ ५१
‘कटीं कंकणाचें कसें चिन्ह झालें’ ‘सखे! हें तरी मारिलें शृंग बैलें.’ ।
अशी सर्व संपादणी तेहि केली तदा **पा**र्वतीची दिठी[11] उर्ध्व[12] गेली. ॥ ५२

पृच्छा[13] **पा**र्वति **शं**कराप्रति करी ‘हें[14] काय आहे शिरीं?’
‘प्यालों मी विष तें दाहा[15] बहु करी स्वर्गांबु[16] माथां धरीं.’ ।
‘स्वर्गांबू वदसी तरी वदन कां त्या चंद्रचूडामणी!’
‘नोहे आनन तें[17] सुपंकज[18] असे हें सत्य मानी मनीं.’ ॥ ५३
‘केलें हें प्रभु! मान्य म्यां, परि तया कां नेत्र हो! दीसती?’
नोहे लोचन मीन[19] ते तळपती, पृच्छा करीसी किति?’ ।
‘कैशा शोभति भ्रूलता कथिं मुखें हें तूं मला **त्र्यं**बका’
‘ते कांते[20]! अतिवक्रता सुउदकीं हेलावती[21] वीचिको[22].’ ॥ ५४
‘कां[23] कृष्णालया वेणिका विलसते हें सांग शृंगीपते!’
‘हे[24] तों पद्मपराग सेवन कराया बैसले भृंगपती[25]’ ।
‘श्रीमुक्ताफळमाळ[26] शोभत गळां कैशी? कथीं ये क्षणें.’
‘हे तों सान तरंग त्यांत उठती ऐकें कुरंगेक्षणे!’ ॥ ५५

---

१. डोळ्यांत. २. रक्तिमा, लाली. ३. ‘फार’ असा अन्य पाठ आढळतो. ४. ‘वनीं’ असा अन्य पाठ आढळतो. ५. भांग. ६. ‘ही दिसे भीजली’ असा अन्य पाठ आढळतो. ७. घामानें, उदकानें. ८. दांताचा. ९. ‘उठे शंखनादें’ व ‘उठे शंखवाद्यें’ असा अन्य पाठ आढळतो. १०. ‘पुजा भक्तिनें केलि गंधोपचारीं’ असा अन्य पाठ. ११. दृष्टी. १२. वर. १३. शंका, प्रश्न. १४. ‘ही कोण नारी’ असा अन्य पाठ आढळतो. १५. आग, संताप. १६. पाणी. १७. ‘चंद्रबिंब दिसतें तूं’ असा अन्य पाठ आढळतो. १८. कमल. १९. मासे. २०. ‘कांते अवद्रुम गे! तशास उदकीं हेलावती वीचिका’ असा अन्य पाठ आहे. २१. हालती. २२. लाटा. २३. ‘कर्णीं लोलक’ अन्य पाठ. २४. ‘ऐकें’ व ‘कांते’ असे पाठभेद. २५. भुंगे, भ्रमर. २६. हत्तीच्या गंडस्थळांत मौक्तिक आढळतें असा कविसमय आहे. यास आधारः—‘करींद्रजीमूतवराहशंखमत्स्यादिशक्त्युद्भववेणुजानि। मुक्ताफलानि प्रथितानि लोके तेषां तु शुक्त्युद्भवमेव भूरि॥’ [कुमारसंभव—सर्ग १ श्लोक ६ टीका पहा.] याचा भावार्थः—करींद्र=गजश्रेष्ठ, जीमूत=मेघ, वराह, शंख,

'कां वक्षीं दिसती? कुचद्वय शिवा! हें सांग आतां मला.'
'ते अंबूतिरिं चक्रवाक[1] मिनेले[2] तें अन्य भासे तुला.'।
'मी तों सत्य समस्त सांगत तुला भासे जरी अन्यथा
'देतों मी तुज दिव्य[3] आज ललने! हा शोध[4] सांडीं वृथा.'॥ ९६
वदे पार्वती 'दिव्य देईं पिनाकी' म्हणे शंभु 'डोहांत बांधोनि टाकीं'।
'न माने तरी स्नेह[6] तावीं भवानी! तयामाजि घालीन मी शीघ्र पाणी.॥ ९७
असो हेंहि[8] कुंभांत घालीं भुजंगा धरोनी करीं काढितों मी निसंगा।
जरी दक्षकन्ये! नये हेंचि चित्ता तरी दैव तें दाखवीं उग्र आतां.॥ ९८
तयांचे पदीं ठेवितों हस्त मी गे! जरी सत्य आहे तरी काय भी गे!'।
वदे पार्वती, 'बोलतां फार वाचे परी मूळ शोधा तुम्ही बोलण्याचें.'॥ ९९
घालोनी[13] कटिं सर्प काढवुं[14] तरी कर्णीं गळां हस्तकीं
'[15]बांधोनी जळिं टाकुं मीं, तरि तुझ्या गंगा[16] असे मस्तकीं।

---

मत्स्य, अहि=सर्प, शुक्ति (शिंपा) आणि वेणु—वंश यांपासून उत्पन्न होणारीं मोत्यें लोकांत प्रसिद्ध आहेत. त्यांत शुक्तिजात मुक्ताफळें पुष्कळ उत्पन्न होतात. [या श्लोकांचें साकीबद्ध भाषांतर येथें देतों:—'वारणिं, शंखीं, जलदीं, वंशीं, सर्पाच्या शीर्षांत, । वराहिं, मत्स्यीं, शुक्तीमाजी मुक्ता उद्भवतात ॥१॥ सर्वांमाजी शुक्तिज मुक्ता प्रसिद्ध लोकीं फार । कविसमयां या योजुनि कविते शोभविती कवि थोर ॥ २ ॥.'

१. चक्रवाक—या नांवाचा एक पक्षी आहे. यासच 'कोक' असें म्हणतात. हे पक्षी नदी, तळीं इत्यादि जलशयांच्या सन्निध राहतात. त्यांत पुरुष नर आणि स्त्री मादी असून यांचा रात्रीं ऋषिशापामुळें नित्य वियोग होतो. त्यांचा परस्परांवर अनुराग फार असल्यामुळें त्यांना वियोगाचें दुःख अत्यंत असह्य होतें पण रात्र सरून सूर्योदय झाला म्हणजे त्यांची पुनः परस्पर भेट होते व तीं सारा दिवस एक ठिकाणीं जोड्यानें राहून घालवितात—अशी कविप्रसिद्धि आहे. 'त्यज चक्रवाकि शोकं बधान धैर्यं सहस्व समयममुम् । अयमेव वासरमणिर्हरिष्यते शापमूर्छां ते ॥' इत्यादि सुभाषितांवरून चक्रवाकपक्ष्याची स्थिति सुव्यक्त होते. २. 'अबले' व 'वसले' असाही पाठ आहे. ३. दिव्य देणें—दिव्यास उतरणें, अग्नींतून बाहेर येणें. To come safe out of an ordeal. ४. 'वेइं' असाही पाठ आहे. ५. संशय. ६. तेल. ७. तापव. ८. हात. ९. मडक्यांत. ['कुंभस्तु कुंभकर्णस्य सुते वैश्यासुते घटे । राशिभेदे द्विपाङ्गे च कुंभस्त्रिवृत्तिगुग्गुलौ ॥' इति विश्वः.] १०. साप. ११. हेंही आवडत नसेल तर. १२. भय. १३. 'घालूं मी' असाही पाठ आहे. १४. 'दाखवुं' असा अन्य पाठ. १५. 'टाकूं मी उदकांत या तरि वसे मंदाकिनी' असाही पाठ आहे. १६. 'मंदाकिनीं' असा पाठभेद.

आणूं तावुनि स्नेहं[1] मी तरि तुझ्या नेत्रांत वन्ही[2] सदा
दावूं देव तरी समस्त हृदयीं[3] ते वंदिती त्वत्पदा.[4]' ॥

### उपसंहार.

(श्लोक.)

ऐसें ऐकुनियां सदाशिव बहू संतोषला अंतरा[5]
मीठी घालुनियां[6] कुचांसि रगडी तो शांभवा सुंदरा[7] ।
झालीं तीं शिवशक्ति एकचि तदा ना भाव रे! दूसरा
यासाठीं पुजितो सदाशिवकवी श्रीपार्वतीशंकरा. ॥ १
'[8]ब्रह्मेंद्रादिकविष्णुयोगि तुजला ध्याती मुनी मानसीं
तो तूं कामिनिशीं विलास करितां[9] ग्लानोत्तरें बोलसी. ।
शंभो! पार तुझा अपार न कळे तूं शर्व सर्वांतरीं
सद्भावें[10] विनवी सदाशिवकवी त्यातें प्रभू! उद्धरीं.' ॥ २

---

## मृत्युंजयस्वामिकृत[11]

## २१. अमृतसार.

(ओंव्या.)

कूर्मावतारीं अठ्यायशीं सहस्र ऋषी । जाऊनि पुसती ईश्वरासी ।

---

१. तेल. २. अग्नी. ३. 'अवनी वंदीतसे सर्वदा' असाही पाठ आहे. ४. तुझ्या पायांना. ५. 'अंतरीं' असाही पाठ आहे. ६. मिठी घालुनियां तो शांभवा सुंदरा कुचांसि रगडी—असा अन्वय. ७. 'कंठीं घालुनियां मिठी कवळितो ते शांभवा सुंदरी' असा अन्य पाठ आहे. ८. दोन पोथ्यांत हा श्लोक आढळत नाहीं. ९. 'करुनी' असाही पाठ आहे. १०. 'यासाठीं विनवी अनंतकवि तो त्यातें विभू उद्धरीं' असाही एका पोथींत पाठ आढळतो. हा पाठ खरा मानल्यास हें काव्य अनंतकृत आहे असें मानावें; लागेल परंतु तीन चार पोथ्यांत सदरील पाठ आढळत नाहीं तेव्हां हें काव्य सदाशिवकृतच समजलें पाहिजे. ११. मृत्युंजयस्वामी हा साधुपुरुष सातार प्रांतांत शालिवाहनाचे १५०० शतकाचे सुमारास प्रसिद्धीस आला. याबद्दल चांगलासा शोध नाहीं. प्रसिद्ध साधुवर्य श्रीरंगनाथस्वामी निगडीकर यांणीं आपल्या 'संतमालिका' (ओवी ३५ वी) नामक काव्यांत या साधुपुरुषाचें वर्णन केलें आहे. याची आणखीही कविता आहे असें समजतें. रसिक वाचकांनीं ती मिळविण्याच्या प्रयत्न करावा अशी सविनय विज्ञप्ति आहे.

'आत्मा कोण? कर्ता सृष्टीसी? । तो कैसा जाणिजे?' ॥ १
तयांप्रति ईश्वर सांगत, । 'आत्मा चिन्मात्र[१] अव्यक्त[२] ।
मन करुनी निश्चित । परतोनि पाहिंजे. ॥ २
या देहा सबाह्यांतरीं । तो आत्मा तूंचि निर्धारी ।
देही असोनि निर्विकारी[३] । या देहावेगळा. ॥ ३
या देहांत प्राणवायू असे । तो नासामार्गें[४] येत जातसे ।
त्यासि जाणता जो असे । तो निराकार आत्मा तूं. ॥ ४
दशेंद्रियें[५] शरीर । त्यांच्या वेगळलिया व्यापार ।
जाणता जो चतुर । आत्मा तोचि तूं. ॥ ५
या इंद्रियांत कल्पित मन । त्याचें असे तुज ज्ञान ।
तूं सर्वहि चैतन्यघन । चैतन्यरूपा! ॥ ६
आपुलिये बुद्धिचा साक्षि होसी । स्फुरतें करिसी आणि रक्षिसी ।
तो ज्ञानरूप परियेसी । शेखीं[६] सर्व अससी तो तूंची. ॥ ७
या चित्ताचें चंचळपण । तूंचि जाणसी आपण ।
निश्चळ हेही खुण । तुजचि येतसे. ॥ ८
हृदयीं मी ऐसा भाव कल्पें । तो त्वांचि जाणिजे आत्मरूपें, ।
तो तूं निरालंब[७] आपापें । जाणोनि राहीं निश्चळ ॥ ९
नव्हे पृथ्वी आप[८] तेज[९] वायु आकाश । नव्हे पांचांचे पंचवीस[१०] अंश ।
यासी जाणे स्वयंप्रकाश । आत्मा तोचि तूं. ॥ १०

---

१. ज्ञानरूप. २. सूक्ष्म, अदृश्य. ३. जायति (उत्पन्न होणें), अस्ति (राहणें), वर्धते (वाढणें), विपरिणमते (तारुण्याचा भर येणें), अपक्षीयते (वृद्धावस्था येणें), विनश्यति (मृत्यु येणें), ह्या सहा विकारांतून कोणताही विकार देवाला नाहीं. ४. नाकाच्या वाटेनें. ५. मुख, ब्रह्मरंध्र, दोन नाकपुड्या, दोन कान, दोन डोळे, शिश्न आणि गुद हीं दशेंद्रियें. (ओवी २१ पहा.) ६. शेवटीं. ७. निराश्रय, शून्य. ८. उदक. ९. अग्नि. १०. पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश या पंचमहाभूतांचे स्थूल, लिंग आणि कारण हे तीन देह बनले आहेत. प्रत्येक भूताच्या पांच भागांनीं म्हणजे एकंदर पंचवीस भागांनीं लिंगदेह (सूक्ष्मदेह) झालेला आहे. पुढील कोष्टकावरून प्रत्येक भूताचे कोणकोणते भाग आहेत हें कळून येईल:—

शब्द स्पर्श रूप रस गंध । या विषयांचा मनीं आनंद ।
तेथें साक्षी परमानंद । स्वयंज्योती[1]. ॥ ११
या सर्वांसीं तूं वेगळा । हें दृश्य[2] आत्मा तूं निराळा ।
विश्वव्यापक तूं वेगळा । सर्वां[3] घटीं. ॥ १२
नव्हेसी तूं नरनारी ! साक्षी तूं दोहींचा अंतरीं[4] ।
तुज जन्ममरणाची भरोवरी[5] । नाहींच जाण. ॥ १३
तूं कर्म ना कर्ता । भोग्य ना भोक्ता ।
होईं अज्ञानाविरहिता । तूं मुक्तता आपेंआप ॥ १४
हें ‘त्वंपद’[6] जीवांचें शोधन । आतां ‘तत्पदीं’ परमात्मा तो कवण ? ।
जो ब्रह्मांडीं व्यापक जाण । तोचि व्यापक पिंडीं[7]. ॥ १५
प्रथम कांहींच नव्हतें शून्य । शून्य नव्हे चैतन्यघन[8] ।
तेथें नसतेंचि झालें चेतन[9] । आदि[10] स्फूर्ति त्या नांव. ॥ १६
‘मी ब्रह्म’ ऐसी ब्रह्मीं भावना[11] । उठली जाणीवेचि[12] कल्पना ।
ते मूळ प्रकृति साक्षीलक्षणा । स्वयंज्योतिपासाव. ॥ १७
तीयेसी सृष्टि इच्छा झाली । इच्छा शक्तिपासाव सृष्टि रचिली ।
तेचि ‘महत्तत्व’ ऐसी बोली । तियेचा साक्षी तो आत्मा तूं. ॥ १८
तेथें झाले त्रिविध[13] अहंकार । ब्रह्मा[14] विष्णु महेश्वर ।

| पृथ्वीचे भाग. | आपाचे भाग. | तेजाचे भाग. | वायूचे भाग. | आकाशाचे भाग. |
|---|---|---|---|---|
| १ शब्द | १ वाचा | १ श्रोत्र | १ व्यान | १ अंत:करण |
| २ स्पर्श | २ हस्त | २ त्वचा | २ समान | २ मन |
| ३ रूप | ३ पाद | ३ चक्षु | ३ उदान | ३ बुद्धि |
| ४ रस | ४ उपस्थ | ४ जिव्हा | ४ प्राण | ४ चित्त |
| ५ गंध | ५ गुद | ५ घ्राण | ५ अपान | ५ अहंकार |

१. स्वयंप्रकाश. २. दिसणारें. ३. सर्व लिंगदेहांत. ४. मनांत. ५. सामग्री, साहित्य. ६. ‘तत्त्वमसि’=तें ब्रह्म तूं आहेस–हें उपनिषद्ग्रंथांतील महावाक्य आहे. ७. देहीं. ८. ज्ञान, आत्मा. ९. चलनवलन, हालचाल. १०. मूळमाया, आदिशक्ति. ११. भक्ति, विचार. १२. ज्ञानाची. १३. सात्विक, राजस, तामस. १४. रजोगुणानें ब्रह्मदेव उत्पन्न करतो, सत्वगुणानें विष्णु पालन करतो आणि तमोगुणानें शंकर संहार करतो असें समजावें.

तेचि त्रिगुण[1] निरंतर । सत्वरजतमात्मक ॥ १९
सत्वगुणीं ज्ञानशक्ति । अंतःकरण मन बुद्धि वृत्ति ।
चित्त अहंकार स्फूर्ति । यांचा स्वयंज्योति परमपुरुष. ॥ २०
रजोगुण क्रिया शक्ति । व्यान उदान समान प्राण अपान स्फूर्ति ।
श्रोतृ त्वचा चक्षु जिव्हा घ्राण उत्पत्ति । वाचा पाणि पाद शिश्न गुद॥ २१
यांचा ठाव जो पारखी[2] । या सकळांची ओळखी ।
तोचि परमात्मा ऐसी ऊखी-[3] । विखी करीं तें तूं निजरूप. ॥ २२
पृथ्वी आप तेज वायु आकाश । शब्द स्पर्श रूप रस गंध यांस ।
हा जाणे जो दृश्यभास । तो साक्षी परमात्मा तूं. ॥ २३
जो ब्रह्मांडाचा साक्षी । हिरण्यदेवतांचा पारखी ।
माया महत्तत्वाची ओळखी । तोचि जाणे मूळ प्रकृतीतें. ॥ २४
ब्रह्मा विष्णु हरू । चित्ताभिमानी सर्वेश्वरू ।
यांचा जाणे व्यापारू[4] । तो साक्षी परमात्मा तूं. ॥ २५
उत्पत्ति स्थिति संहारू । आणि सर्वसाक्षी व्यवहारू ।
या सकळांचें ज्ञान तो ईश्वरू । पूर्णब्रह्म. ॥ २६
तैसेंचि जीवांचे देह चारी । स्थूल सूक्ष्मकारण महाकारण वरी ।
विश्व तैजस[5] सुप्रत्यगात्मा[6] निर्धारी[7] । हे अभिमानी जाण ॥ २७
जागृति[8] स्वप्न सुषुप्ति । यावरी तूर्या जाण साक्षी अर्थी ।
या सर्वांसी जाणे स्वयंज्योति[9] । तोचि ज्ञानरूप तूं ॥ २८
ऐसा पिंड ब्रह्मांडाचा व्यापकु । साक्षीरूप परमात्मा एकु ।
हें जाणतां तुटे कलंकु[10] । सर्व पापाचा ॥ २९
करुनि सर्व दृश्याचा निरासु[11] । उरिजे द्रष्टा आत्मा स्वयंप्रकाशु ।
अखंड परम ईशु । अभिन्न जाण ॥ ३०
जन्मा येतां जातां पाहीं । लक्ष चौऱ्याऐंशीं योनिप्रवाहीं ।
दुःख जाणुनि जिहीं । त्रासु घेतला ॥ ३१
जो आपण मोक्षभूत मुक्त । दृश्य प्रपंचाविरहित ।
ऐसा निश्चय प्रमाणां येत । तोचि उद्धरला[12] ॥ ३२

---

१. सत्व, रज, तम. २. परीक्षा करणारा. ३. वादविवाद, तर्कवितर्क. ४. पालन करणें. ५. तेजाळ, तेजस्वी. ६. व्यापक. ७. निश्चयेंकरून, खात्रीनें. ८. या देहाच्या चार अवस्था आहेत. ९. स्वयंप्रकाश. १०. दोष. ११. त्याग. १२. जीवन्मुक्त झाला.

जंव विपरीत ज्ञान न सुटे । अज्ञानें नेणीव न तुटे ।
ज्ञानरूप अंदटे[1] । उरतें आपण आपें ॥ ३३
तें कळोनि स्वयें झाला । संकल्प विकल्प तुटला ।
तोचि मुक्तत्व पावला । येरां[2] वाउगा[3] शीण ॥ ३४
या वेगळीं क्रियेचीं फळें । पुण्यें होती स्वर्ग सोहळे ।
पापें[4] यम कंटाळे । जाचु करितां ॥ ३५
पावला जरी कर्मभूमीच्या दैवतांस । आणि अष्टौदेवयोन्युद्भवां[5] फळांस ।
अंतराळ[6] स्वर्ग सत्य वैकुंठ कैलास । तरी यां पदांस नाश होय जाण॥३६
क्षीराब्धि भैरव विश्वरूप चैतन्य । हें इतुकें मायेचें स्वरूप जाण ।
माया मिथ्या म्हणून । जाणावें स्वानुभवें ॥ ३७
म्हणोनि अविनाश ब्रह्म । पाववी कृपा निजधाम ।
तेंचि बोलिजे परम । निजानंदपद. ॥ ३८
हें सकळ गतीची परमगति । सकळ पदांसी निजपदस्थिति ।
होईजे आदिमूर्ति । कैवल्य जें गा! ॥ ३९
ऐसें हें आत्मज्ञान । याचें कीजे साधन ।
सदा लयलक्षध्यान । आसन असिजे. ॥ ४०
जेव्हां प्रवृत्ति निरसे । तेव्हां निवृत्ति आत्मा प्रकाशे, ।
मग निश्चळ मनिषें । आपेंआप. ॥ ४१
भक्ति ज्ञान विरक्ति । तनुमन प्राणें श्रीगुरुप्रीति ।
तयासीच असे प्राप्ति । येरां दुर्लभ सर्वथा. ॥ ४२

## उपसंहार.

(ओंवी.)

या बेचाळिस ओंविया । **'अमृतसार'** मृत्युंजया ।
भावें वाची तो होय विजया । भगवत्कृपें त्रैलोकीं. ॥ १

---

१. असमर्थ होतें. २. दुसऱ्यांना. ३. व्यर्थ. ४. पाप केलें तर यम जाचण्यास कां टाळील? ५. अष्टदिक्पालादिकयोनीच्या अधिकारास अनुकूल असणारीं फळें. ६. अंतरिक्ष (आकाश).

# शिवरामस्वामिविरचित

## २२. गंडिकाख्यान.

(श्लोक.)

हेरंबें चिंतोनि आरंभ केला, कीं कृष्णनामा जिव हा भुकेला, ।
जें वर्णिलें सद्गुरु श्रीशुकानें तें सज्जनीं आइकिजे सुकानें. ॥ १
यत्किंचिताश्रय श्रिभागवतीं जयाचा गाऊं सुप्रेमरस आजि मुखें तयाचा ।
जो 'कृष्ण कृष्ण' स्मरतां स्वस्वरूप देतो माझ्या मुखें सुरस श्रीगुरुजी वदे तो.२
धरी गंडिकेमाजि हस्तीसि नक्र, हरी त्या करी मुक्त घालूनि चक्र ।
बऱ्या विष्णुमूर्ती शिळा गंडिकेच्या करी त्याचि गोष्टी शुकाच्या मुखींच्या.॥३
सुगुणसुरुपखाणी गंडिका नाम वेश्या अनुदिनिं परदेहा दे प्रिती कामतोषा ।
परि अटक स्वधर्माचार ते एक पाळी, पतिव्रत परदेहा नित्य एकासि पाळी.॥४

---

१. हा साधु पुरुष शालिवाहनाच्या १६ व्या शतकांत होता. हा कलबुर्ग्यास राहत असे. याचे बापाचें नांव बाबूराव. हा पूर्वी मामलतदार होता पण पुढें वैराग्य पावून पूर्णानंदस्वामीचा शिष्य झाला. रंगनाथस्वामींचे वडील निजानंदस्वामी व हे गुरुबंधु होते. यांची समाधि कल्याण येथें आहे. यांचीं पदें पुष्कळ आहेत. या साधूविषयीं मोरोपंतानें 'सन्मणिमालें'त असा उल्लेख केला आहे:—'शंभुसखीं धनदींहि न तें, जें निजवित्तज यश शिवरामीं । भुललों यातें जाणुनि निर्मळता, चित्तजय, शशिवरा मी. ॥ १०२ ॥' यानें केलेल्या ग्रंथांचीं नांवें:—(१) श्रीमंत नानासाहेब पेशवे यांस उपदेश, (२) गंडिकाख्यान, (३) अपराधस्तोत्र (समश्लोकी टीका), (४) मुद्रिकाख्यान (कटाव), (५) रामजन्माख्यान (कटाव), (६) शुकाष्टक (टीका), (७) मनीषापंचक (टीका), (८) आत्मबोध, (९) रामतुळसी (अभंग ११०), (१०) पदें. इतके ग्रंथ यानें केले आहेत. २. या आख्यानांत गंडिकानदीची उत्पत्ति कशी झाली हें सांगितलें आहे; म्हणून या काव्यास 'गंडिकाख्यान' असें नांव दिलें आहे तें यथार्थ आहे. आख्यान=चरित्र, कथा. ३. गजानन. ४. कारण. ५. 'सद्गुणीं' असा अन्य पाठ आहे. ६. येथें वृत्तसुखार्थ 'श्री' वर्ण ऱ्हस्व केला आहे. ७. मुक्ति, मोक्ष. ८. मागें पृष्ठ १७ टीप ५ पहा. [काव्यसंग्रहग्रंथमाला—वामनकृत कवितासंग्रह—भाग १—पृष्ठ २६३-२६६.] ९. गंडकी शिला=गंडकी नदींतील शिला. या नदीचा उगम हिमालय पर्वतांतून आहे. हिला 'शालिग्रामी' नदी असें नांव आहे; कारण हींत शालिग्रामशिला सांपडतात. तुळजापुरच्या देवीची जी सुप्रसिद्ध मूर्ति आहे ती गंडकीच्या काळ्या दगडाची असून फार मनोवेधक आहे. १०. जींचे गुण चांगले होते व स्वरूपही चांगलें होतें अशी (गंडिका नामक वेश्या). ११. वारांगना, जारिणी. १२. नियम, नेम, व्रत.

(घनाक्षरी.)

एकदिन एक रात । पाळी पतीसा घरांत ।
[१]दिनोदयीं त्या दारांत । नेउनियां घालवी. ॥
दृष्टी दुजा नरदेह । पहातां अर्पि त्यासि देह ।
मनीं नाणोनी [२]संदेह । धरी [३]प्रीति पालवीं. ॥
न्हाणी लावोनियां तेल । चंपा सुगंध चमेल ।
[४]शाल्योदन [५]नागवेल । विड्या देत हालवी. ॥
करी नाना उपचार । नेणोनियां [६]द्वैताचार ।
[७]दुजा द्रव्य लक्ष चार । देतां त्या न बोलवी. ॥ ५
असो [८]सधन [९]अधन । त्याचें न इच्छी ती धन ।
पतिभावीं त्याचि [१०]धंन । पूर्ण करी भक्तिनें. ॥
त्याचा सरतां रात्र दीन । मनीं [११]भावोनी सुदीन ।
कोणी सधन बा! दीन । त्यासी प्रार्थी युक्तीनें. ॥
रंक असतां येतां राव । त्यासीं द्वारीं [१२]नेदी ठाव, ।
लहान थोर नेणे भाव । भजे यथाशक्तिनें. ॥
कांहींकाळ नेम धर्म । ऐसा चालतां स्वधर्म, ।
करी परा देहधर्म । [१३]धनाशाविरक्तीनें. ॥ ६

(श्लोक.)

श्रीविष्णुसीं हें व्रत नारदानें, सांगीतलें [१४]ज्ञानविशारदानें ।
हरी म्हणे, 'जाउं तिच्या घरासी, पाहोनि नाशूं [१५]सकलाघरासी.' ॥ ७

(घनाक्षरी.)

देव [१६]स्वदासवत्सल । धरी स्वरूप [१७]कुत्सल ।
द्विज वृद्धरूप, च्छळ । करी तीसी येउनी. ॥

---

१. सूर्योदयीं. २. संशय. ३. प्रीतीनें त्याचा पदर धरी. ४. साळीचा भात. ५. पानवेल. ६. भेदबुद्धी. ७. दुसरा, अन्य. ८. श्रीमंत, धनवान्. ९. गरीब, कंगाल. १०. उत्कर्ष. ११. मानून, समजून. १२. न देई. १३. वित्ताची इच्छा त्यजून. १४. आत्मतत्वज्ञाननिपुणानें. [विशारद=पंडित, विद्वान्. 'विद्वत्सुप्रगल्भौ विशारदौ' इत्यमरः । विशारदः पंडिते च धृष्टे इति मेदिनी.] १५. सर्व पापांच्या राशी. १६. आपल्या भक्तांवर दया करणारा. १७. घाणेरडें, अस्वच्छ.

आंगीं दिसे शुभ्र कोड । गात्रें[१] शक्तिहीन रोड ।
कफ दाटे उरीं वोड । उभा ठाके येउनी. ॥
येतां उदयासी मित्रें[२] । येरी हातीं धरुनि मित्र ।
द्वारीं येउनी पवित्र । त्यासीं देत लाउनी. ॥
नेत्रीं विप्र जों पहात । येरी प्रीतीं धरी हात ।
म्हणे, ‘चालणें गृहांत । प्राणनाथ! येक्षणीं.’ ॥ ८
म्हणे, ‘मी तों तुमची दास[३] । मन न करा उदास.’ ।
येरी वंदोनी पादास, । ‘करा पावन[४] आतां.’ ॥
विप्रें सुजवीले पाय । म्हणे, ‘न चले उपाय ।
देवा! आतां करुं काय?’ । बैसे धरुनी माथां. ॥
येरी बोले, ‘आजी कांत! । सेजे संपादूं एकांत.’ ।
विप्र म्हणे, ‘प्राणांत । देवें मांडिलें घाता.’ ॥
वधु बोले, ‘द्विजवर! । बैसूं चेला[५] सेजेवर.’ ।
येरु म्हणे, ‘तूं आवर । पडें भूमी उठतां.’ ॥ ९
पुन्हा कवळूनि आंग । करी सुगंध अभ्यंग ।
स्नान घालुनियां सांग । पलंग शेज सांवरी. ॥
विप्रा चढलासे ज्वर[६] । अंग कांपे थर थर ।
गात्रें वाजति भर भर । मळ[७] सांडी त्यावरी. ॥
मुक्त झाला मूत्रनळ । वांती करी अमंगळ ।
खोंकी बेडकीं तुंबळ । लाळ मज्जा शरीरीं. ॥
पोटीं तिडकेचा लोळ । आक्रंदोनियां कल्लोळ ।
रात्रंदिवस तीचा घोळ । अष्टौप्रहर तो करी. ॥ १०
कैंचें सुख संभाषण । कैंचा संगम शयन? ।
कैंचीं सुवस्त्रें भूषण । लेणें तेथें ऊरलें. ॥
नाहीं घडलें अन्नपान । नाहीं तांबूलाचें पान ।
झाली चिंतेची झडपण । म्हणे, ‘भाग्य सरलें.’ ॥

---

१. इंद्रियें. २. सूर्य. ३. येथें ‘दासी’ असा शब्द असला पाहिजे. ४. पूत, पवित्र. ५. ‘येतां’ असा अन्य पाठ. ६. ताप. ७. विष्टा सांडणें=दीर्घ शंका करणें.

नये बोलवितां बोल । [१]वाचा शब्द गेला खोल ।
सुकली [२]सत्रावीची ओल । नेत्र वरी फिरले. ॥
पसरूनि पाय हात । मारी उचक्या देहांत, ।
ऐसा वेश्येच्या गृहांत । [३]पंचप्राण हारले. ॥ ११

(श्लोक.)

गेला जिवें[४] विप्र असें पहातां, [५]ग्रीवे बसे देउनियां स्वहाता, ।
जें जाहलें तेंचि निकें मनाशी, भावोनि शोकासि समग्र नाशी. ॥ १२ ॥

(घनाक्षरी.)

म्हणे, 'अहा ! प्राणनाथ ! । मजसारिखें अनाथ ।
कैसें सांडुनी वनांत । पुढें तुम्हीं चालिलां ? ॥
कधीं न केलें भोजन । सुखीं पलंगीं शयन ।
कधीं [६]सुखसंभाषण । शब्द नाहीं बोलिलां'. ॥
काकुळती [७]वल्लभास । म्हणे, 'जातां जी ! [८]नभास ।
अन्न भक्षों आरंभास'. । तंव देह लाविला. ॥ १३

---

१. डोळे फिरविणें व शब्द खोल जाणें हीं मृत्युसमयींचीं सूचक आहेत. २. जीवनकलेची. सत्रावी="इलाच साधु जीवनकला, अमृताचा झरा, कामधेनूचा पान्हा म्हणतात. स्वर्धुनी, स्वर्गतरंगिणी, हठयोगांत म्हणतात. अशीं अनेक प्रकारचीं नामें देतात. परंतु प्राकृतांत पढजीभ असें कथाकल्पतरूंत सांगितलें आहे." [संख्यावाचक दुर्बोधशब्दार्थकोश—पृष्ठ १०८.] ३. 'वायूचे प्राण, उदान, व्यान, समान व अपान असे पांच भेद आहेत. त्यांपैकीं प्राणवायु डोक्यांत वास करून ऊर व कंठ ह्या स्थानांत संचार करितो. तो बुद्धि, हृदय, इंद्रियें व चित्त यांना धारण करितो व थुंकणें, शिंकणें, ढेंकर देणें, श्वास घेणें व अन्न गिळणें इत्यादि क्रिया चालवितो. उदान वायूचें स्थान ऊर असून तो नाभि, गळा व नासिका ह्या स्थानांतून संचार करितो; व वाचा, ऐच्छिक क्रिया, उत्साह, बल, वर्ण, स्मृति इत्यादि गोष्टी उत्पन्न करितो. व्यान वायु हृदयांत राहून सर्व शरीरांत संचार करितो. त्याचा वेग फार तीव्र असून चालणें, हस्तादिकांचें आकुंचन व प्रसारण, पापण्या उघडणें, व मिटणें इत्यादि सर्व शारीर क्रिया प्रायः त्याजवर अवलंबून आहेत. समान वायु पाचकाग्निजवळ राहून सर्व कोठ्यांत संचार करितो. अन्नाचें ग्रहण व पचन करितो व त्याचा सत्वांश मलापासून पृथक् करून मलाचें विसर्जन करितो. अपानवायु गुदस्थानीं राहत असून कुल्ले, बस्ति, शिश्न व मांड्या ह्या स्थानांत संचार करितो. व शुक्र, आर्तव, मल व गर्भ यांना बाहेर काढितो.' (गर्देकृत वाग्भट—अष्टांगहृदय, सूत्रस्थान, अध्याय १२ वा, श्लो० ४-९ पृ० १४८-१४९.) ४. जीवें गेला=मेला, वारला, देवाज्ञा झाली. ५. मानेला. ६. आनंदानें बोलणें. ७. नवऱ्यास (मृतविप्रास). ८. प्राणी मृत्यु पावला असतां त्याचा जीव आकाशांत जातो, फक्त शरीर मृत्युलोकीं राहतें—अशी समजूत आहे.

(श्लोक.)

'म्यां नेमिला निश्चय जीवनाशा, काय मृषा[१] पाळुनि [२]जीवनाशा ? ।
विलंब झाला पति ! याचि ठाया, करा त्वरा सर्वहि जी ! उठाया.' ॥ १४

(घनाक्षरी.)

स्नान पतीचें पूजन । तनुप्राणेंसीं भजन ।
प्रजा गांवींचे [३]महाजन । बोलावया पातले. ॥
दिला [४]पैतिउसां हात, । 'जय राम कृष्ण' बाहात, ।
सुर विमानीं पाहात । जयजयकार मातले, ॥
[५]बिल्व तुळसी चंदन । अग्निकुंडीं हें [६]इंधन ।
करुनि विप्रांसीं वंदन । [७]सव्य त्यांसि घातलें. ॥
थोर प्रज्वळला [८]अग्न । येरी धैर्यासी निमग्न ।
जाहाली विप्रासी संलग्न । मन दृढ [९]रातलें. ॥ १५

(श्लोक.)

म्हणे, 'माझ्या नेत्रीं पतिदहन म्यां पाहुंचि नये
पुढें जातें, पाठीं गति घडल तैसी, घडुन [१०]ये.' ।
वदोनी [११]प्रदक्षी [१२]हुतवह, मनें वंदन करी,
उडी जों घालावी, नवल [१३]वितलें तें झडकरी. ॥ १६

चतुर्बाहु श्रीविष्णु [१४]व्यक्तीसि दावी, शुकाच्या मुखींची लिला ते वदावी, ।
म्हणे विष्णु तीसीं, 'न प्राणासि त्यागें; करूं [१५]तूंज वंदीति व्योमीं सत्या गे ! १७
[१६]कैवल्य देतों तुज भोग दे हा, ओपूं नको अग्निसि या स्वदेहा, ।
मी देव, कैंचा द्विज हा वृथा गे ! नाहीं पती काय [१७]मृषा कथा गे !' ॥ १८
'तूं विष्णु माझा पति मी सती हो ! मी वांचल्या देवहि हांसती हो ! ।
[१८]ज्या देवदेवा पति भाविला हो ! तत्कारणें देहहि लाविला हो !' ॥ १९

---

१. खोटी. २. जगण्याची इच्छा. ३. शिष्ट, संभावित लोक. ४. पतीच्या उशाला. ५. बेल. ६. जळवण. ७. जनरूढींत 'सव्य' ह्या शब्दाचा अर्थ 'उजवा' असा घेतात, आणि एथेंही तसाच घेतला आहेसें दिसतें; परंतु कोशांतरीं ह्या शब्दाचा अर्थ 'डावा' असा घेतला आहे. ८. अग्नि; विस्तव. ९. रमलें, रतलें, रममाण झालें. १०. येवो. ११. प्रदक्षिणा करी. १२. प्रदीप्त अग्नि. १३. घडलें, वर्तलें. १४. देहासी. १५. व्योमीं तुज सत्या वंदिती [असें] करूं—असा अन्वय. १६. मोक्ष, मुक्ति. १७. असत्य, मायिक. १८. 'जो देह देहा' असा अन्य पाठ आढळतो.

गर्जोनियां मग असें तनु [1]अग्नितोंडीं
टाकी, हरी स्मरुनियां; तनुची [2]भुतोंडीं ।
साश्चर्य पुष्प सुर वर्षुनियां नभीं ते
ठोकी प्रमोद भरिं शक्रहि दुंदुभीतें. ॥ २०

जेथें तिचा देह हुतें जळाला, तेथें बरें विष्णु करी [3]जळाला ।
तो 'गंडिका'नाम प्रवाह झाला तेथें शिळारूप घडे अजाला. ॥ २१
नक्रा गजालागुनि मुक्त केलें, तें श्रीवरें तोय बरेंचि केलें ।
त्यांतील पाषाण श्रिविष्णुमूर्ती घेणें घडे व्यक्ति बरें अमूर्ती. ॥ २२
ऐशा लिला [4]नाथगणेश कर्ता, जो नाममात्रें जिवें[5]क्लेशहर्ता ।
तो शीवरामा स्मरणीं रिघोनी, भरी स्वनामामृत नित्य गोणी. ॥ २३

---

## [6]राघवकविकृत

### २३. वी[7]रमणिकथा.

(घनाक्षरी.)

नमन मेरा गनराज । सब सुरनके सिंरताज ।
[9]दौडे [10]भंक्तनके काज । सज्जिपास फरससे ॥
बनी [11]खुंप्सुरत [12]बनोठ् । आगे देव तेतिसकोट ।
कर्ता दुष्टन [13]परें चोट । नही खोटें[14] परेगी ॥ १

---

१. प्राकृत संस्कृत शब्दांचा समास करणें अप्रशस्त होय. २. भूतबळी. ३. उदकाला. ४. गणेशनाथ व शिवरामस्वामी यांचा कांहीं संबंध असावा. गणेशनाथकृत कांहीं अभंग आमच्या संग्रहीं आहेत. शोधकांनीं तपास करावा. ५. प्राण्यांचीं दुःखें हरण करणारा. ६. ह्या कवीचा राहण्याचा गांव पथरिया. हा जवलपुर जिल्ह्यांत आहे. ह्याचें मूळचें नांव पांडोबा, बापाचें नांव व्यंकटेश, आईचें नांव रमाबाई, उपनाम करकरे. हा आपल्या आईबापांचा मधला मुलगा होय. याचे बल्लाळ (बाळाजीपंत?) या नांवाचे गुरू होते. या कवीनें सुरथसुधन्वाख्यान, शिबिचक्रवर्त्याख्यान, गजगौरीव्रत हीं आख्यानें केलीं आहेत. हा कवि ४०।५० वर्षांपूर्वीं होऊन गेला. ७. हें आख्यान पद्मपुराणांतर्गत पाताळखंडांत आहे, असें हा कवि म्हणतो. ८. देवश्रेष्ठ. ९. धांवे. १०. 'मुक्तनके' असा अन्य पाठ आहे. ११. सुंदर. १२. मूर्ति, मुखवटा. १३. दुखापत. १४. असें करण्यांत चूक होणार नाहीं.

(पृथ्वीवृत्त.)

कुशेशयपुराणतो[१] रघुवराश्वमेधे कथां
नृपस्य मणिनो नतिर्नयतु वीरपूर्वस्य हि ।
पदेषु सह राधिकानलिननेत्रकृष्णस्य वै
समाप्तिमिति चार्थये मम तु विघ्नहेतुं विना ॥ २

(साक्या.)

साकेतीं[२] श्रीरामचंद्र राजाधीराज विराजे ।
अश्वमेध यज्ञाची दीक्षा घेउनि दीक्षित साजे ॥
श्यामकर्ण सोडिला वसिष्ठें सैन्य भोवतें गाजे ।
शूर सर्वे नृपवीर हयाचे,[३] घनरण दुंदुभि वाजे ॥
रक्षी शत्रुघ्नानुज[४] हो ! । पाठी पुष्कल भरतज[५] हो ! ॥ ३
[६]अंकीं शत्रुघ्नासि घेउनी रमण[७] सितेचा[८] सांगे, ।
'पुरुषार्थें हय रक्षीं जेणें कीर्ति[९] आपुली वागे ॥
संता नम्र, वैऱ्यासि दंडें,[१०] दे [११]जो याचक जें मागे ।
शरण, भयातुर,[१२] अशस्त्रि पळतां तव[१३] शर त्यासि न लागे ॥
ऐसें करिं बापा समरीं[१४] । म्हणिजे धन्य तुतें अमरीं.[१५]' ॥ ४

(श्लोक.)

फिरत फिरत आला देवपूरासि घोडा
विहरत स्वगतीनें थांबला तत्र थोडा ।

---

१. हा संस्कृत श्लोक बराच अशुद्ध आहे, परंतु तो तीन हस्तलिखित पुस्तकांत जसा आढळला तसाच येथें दिला आहे. २. अयोध्येंत. ३. घोड्याच्या (श्यामकर्णाच्या). ४. शत्रुघ्न हा रामाचा धाकटा भाऊ. ५. पुष्कल किंवा पुष्कर हा भरताला मांडवीपासून झालेला मुलगा. याची राजधानी गांधारदेशांत पुष्कलावत अथवा पुष्करावती या नांवाची होती. [वाल्मीकि-रामायण—उत्तरकांड—सर्ग १०१.] ६. मांडीवर. ७. राम. ८. 'सिता' असा शब्द लिहिणें अगदीं चूक आहे. कवीला वृत्तसुखार्थ 'सीता' ह्या शब्दाबद्दल 'सिता' असा शब्द लिहिणें भाग पडलें. 'सिता' ह्या शब्दाबद्दल 'कुजा' असें लिहिलें असतें तर ठीक झालें असतें. ९. कीर्ति वागणें=दुष्कीर्ति न होणें, आब राहणें, लौकिक राहणें. हा शब्दसमूह कोशकारांनीं टिपून ठेवण्यालायक आहे. १०. शिक्षा कर. ११. 'दीजे' असा अन्य पाठ आहे. १२. भयभीत. 'भयार्त' असा अन्य पाठ आहे. १३. तुझा. १४. युद्धांत. १५. देवांनीं.

वन फळित सदा जे दिव्य आभा[1] तयाची
शम करि मग क्षुत्तृट्[2] कोण आभा तयाची? ॥ ५

(सवाई.)

केतकिकानन केशर कुंद कदंब कपित्थ कण्हेरकली
कैरविणी कमळें कनकादिक कर्णि कुसुंब कुटीकदली ।
चंपक चूत[3] चमेलि सुचंदन ताल तमाल विशाल इती
सारस हंस मयूर मधुव्रत[4] कोकिल शब्द सुखें करिती. ॥ ६

(श्लोक.)

राजा वीरमणी सुधार्मिकपणीं ऐसा न कोणी जनीं[5]
त्याचा पुत्र रणीं प्रतापतरणी[6] जो वीरशूराग्रणी ।
तो रुक्मांगद सद्गुणी मिरवणी ज्याची सभारंगणीं
दिव्या[7] आभरणीं अनेक रमणी[8] घेऊनी क्रीडे वनीं[9]. ॥ ७

(दोहा[10].)

बिहरत पतसह कामिनी ज्यों गंजनी[11] गजसंग ।
त्यो उपबन आवत तुरत देख्यो राम तुरंग. ॥ ८

(दिंड्या.)

स्त्रिया म्हणती 'हो! कांत! पहा वाजी[12] । असा हयशाळे[13]माजि असावा जी! ।
पत्र भाळावरि[14] हाटकी[15] विराजे[16] । धरा स्वबळानें क्षत्र[17] तुम्हीं राजे.' ॥ ९
राजपुत्रें ऐकोनि असी वाणी । अश्व धरिला घालोनि गळां पाणी[18] ।
पत्र भाळींचें वाचितां सुखेला[19] । स्त्रियांमध्यें गदगदां[20] हांसियेला. ॥ १०

---

१. कांति. २. भूक आणि तहान. ३. आम्र. ४. भ्रमर, भुंगा. ५. 'झणीं' असा अन्य पाठ आहे. ६. प्रतापसूर्य, महापराक्रमी. ७. सुंदर दागिने वगैरेनीं विभूषित. ८. स्त्रिया. ९. या पद्यांत 'अनुप्रास'अलंकार आहे. १०. या वृत्ताच्या प्रत्येक अर्धात २४ मात्रा असतात; प्रथम व तृतीय चरणांत तेरा आणि द्वितीय चतुर्थ चरणांत अकरा मात्रा असल्या पाहिजेत असा नियम आहे. या वृत्ताचें लक्षण चिंतामणिकविकृत 'छंदोविचार' ग्रंथांतून पुढें देतों:—'तेरह कल पहिले चरन दूजे ग्यारह जानि । याही विधि उत्तर अरध यों दोहा पहिचानि ॥' याचा भावार्थः—दोहावृताच्या पहिल्या पादांत तेरा कला म्हणजे मात्रा असतात व दुसऱ्यांत अकरा असतात. हाच प्रकार उत्तरार्धांत असतो. ११. हत्तीण. १२. घोडा. १३. पागेमध्यें. १४. डोक्यावर. १५. सोन्याचें. १६. शोभे. १७. क्षत्रिय. १८. हात. १९. सुखावला; सुख झालें. २०. खदखदां.

(साक्या.)

रुक्मांगद कहे, 'मेरे पितासे और बडा नहिं कोई ।
सब देवनका देव सदाशिव जिसका र[1]च्छक होई ॥
वहां क्या राम करे रे! । [2]नाहक गर्व भरे रे! ॥ ११
प[3]तकी बातें सुनकर अबला लपट कंठ ह[4]रखानी ।
ले घोडा पुर आके नृप सो सुतने बात ब[5]खानी ॥
करने [6]जंग तुं[7]जे रे! । इहकर आइ मुजे रे! ॥ १२
रामचंद्रका घो[8]टक सुनकर राजा मन पछतायो ।
जाय चंदशेखरसे अपने सुतको हा[9]ल जतायो ॥
खोटी करनी करी रे! । क्या करुं त्रिपुर अरी रे! ॥ १३

(पद.)

पशुपति मग बोले 'नृपाळा! । अद्भुत कर्म सुतें तव केलें. ॥ ध्रुवपद.॥
अश्व असे हा अयोध्यापतिचा । ध्यात असें मी हृदयांत तयाला ॥ १ ॥
होइल कीं संग्राम अतुल बहु । येइल तो शत्रुघ्न हयाला ॥ २ ॥
अर्पि ययासह राष्ट्र तया पादिं । भेटला राघव प्रेम जयाला. ॥ ३ ॥ १४

(घनाक्षरी.)

राजा कहे भोलानाथ । मुजे हय तुम्हारा साथ ।
ऐसि कैसी कहते तात! । बात तुरग देनेकी ॥
[10]छत्रधर्म किये छाप । रखना अपना प[11]रताप ।
जो भी सा[12]मनें आवे बाप । तो भी चाप खेंचना ॥
गये शत्रुको शरण । होवे किरतका हरन ।
आखर होयगा मरन । जिये भरन बृथा है ॥
वाहति गर्व मनुज जीव । तूं तो देव मोठा शिव ।
भक्तरक्षणाची नीव[13] । कैसि कीव[14] येईना ॥
घडुनि आला अविचार । राम कोपला वि[15]खार ।
यासि हाच कीं उतार । समर फार माजवी ॥ १५

---

१. रक्षक. २. व्यर्थ. ३. पतीची, नवऱ्याची. ४. हर्षित झाली. ५. वर्णन केली, सांगितलीं. ६. लढाई, युद्ध. ७. तुला. ८. घोडा. ९. हकिकत, बातमी. १०. क्षात्रधर्म ११. प्रताप. १२. भगवद्गीता—अध्याय पहिला पहा. १३. पाया. १४. दया. १५. सर्प.

(अभंग.)

रायासि **म**हेश म्हणे ठेवि वाजी । करीन मी आजी साह्य तूतें ॥ १ ॥
परि येतां **राम** धरिन मी पाय । स्वामिसि अनय करूं नये ॥ २ ॥
एका **रा**मावीण त्रैलोक्यहि आलें । तयाचें न चाले माझ्यापुढें ॥ ३ ॥
ऐकितांचि राजा आनंदला मनीं । हयातें नेवोनी रक्षियेलें ॥ ४ ॥ १६

(साक्या.)

**शे**प म्हणे, 'ऋषि ! ऐकें कैसी कथा वर्तली इकडे ।
दूत म्हणति **श**त्रुघ्ना न मिळे बा ! हा[1] आम्हा कोणिकडे ॥
रोषे[2]भरित **नृ**प वदती विस्मय जाहला जिकडे तिकडे ।
**राम**अश्व ने त्यासि वधुनि करुं समरीं तुकडे तुकडे ॥
अवघी खळबळली सेना । हयोत्तम[3] कोठें गवसेना[4]. ॥ १७
पुसे वीर **श**त्रुघ्न **सु**मति[5] सचिवाप्रति तेथिल वार्ता ।
'कवण साह्य ? पुर ? कितिक सैन्य धन ? कवण नृपति हयहर्ता[6] ? ॥
**सु**मति वदे, 'अतिकठिण **दे**वपुर **वी**रमणी शककर्ता ।
तुमुल युद्ध होईल ते असल्या साह्य **पा**र्वतीभर्ता[7] ॥
अनुदिनिं वसतो सहशक्ती[8] । पाहुनी भूप तिची भक्ती.' ॥ १८
तंव ये **ना**रद गात **राम**गुण ब्रह्मविणा वाजवुनी ।
उठुनि त्वरित **श**त्रुघ्नें पूजिला उच्चासनिं[9] बैसवुनी ॥
म्हणे, 'अश्व नेलासे कवणें तो आजी द्या दाखवुनी.' ।
पूर्व कथन **मु**नि कथुनि म्हणे, 'हय नृपजें नेला हरुनी ॥
**रु**क्मांगद नामें ख्याती । ज्याची क्षितिमंडळिं गाती. ॥ १९
अत्यद्भुत संग्राम देवदानववत् घडणें आहे ।
मरति वीर बहु धीर न सोडी व्यूह रचुनि रणिं राहे ॥

---

१. घोडा, हय. 'वाह' असा अन्य पाठ आहे. २. क्रोधयुक्त. ३. चांगला घोडा. ४. सांपडेना. ५. हा विशालानगरीचा राजा. यास जनमेजय नांवाचा एक पुत्र होता. हा द्विष्टकुलोत्पन्न विशालवंशीय सोमदत्त नामक राजाचा पुत्र. हा सूर्यवंशोत्पन्न होता. अश्वमेधयज्ञाच्या वेळेस कदाचित् रामानें ह्यास आपलें सचिवत्व दिलें असेल. 'सुमंता' असा अन्य पाठ आहे. सुमंत हा दशरथाचा प्रधान होता. ६. घोड्याचें हरण करणारा. ७. शंकर. ८. पार्वतीसह. ९. 'अर्धासनिं' असा अन्य पाठ आढळतो.

अतिकष्टें जयलक्ष्मी तुजला [1]कवळिल दोन्ही बाहें. ’ ।
वदुनि गुप्त झाला मुनि स्वस्थित राहुनि कौतुक पाहे. ॥
गिरक्या देउनिया नाचे । गाई रघुविरगुण वाचे. ॥ २०

(ओव्या.)

इकडे **वीर**मणी नृपती । **रि**पुवारनामें सेनापती ।
बाहोनि सांगे तयाप्रती, । ‘[2]पटह पीटिजे पुरींत ॥
श्री**राम**ाचा यज्ञाश्व आला । त्यातें **श**त्रुघ्न रक्षावयाला ।
असे घेउनी बहु नृपांला । तो हय धरिला [3]ममांगजें ॥
तरि त्या वीरा शत्रुघ्नासी । सिद्ध होवोनि शस्त्रास्त्रांसी ।
सर्व यावे [4]झुंझावयासी । भय मानसीं न धरितां ॥
पुत्र बंधु वा असो कोणी । जो हे माझी आज्ञा न [5]गणी ।
त्यातें वधीन [6]तयेक्षणीं । ऐसी [7]वाणी सांगिजे.’ ॥ २१

(साक्या.)

**सुन** राजाकी [8]अग्या सेनापतने डौंड पिटाई ।
[9]तज स्त्रीधनसुत रिपुसूदनसे करने आज लढाई ॥
भाई! [10]जलद चलो रे! । चाहो आप भलो रे! ॥ २२
[11]पहिर कवच ले [12]तेग [13]धनुक [14]सर सिद्ध [15]भये सब जोधा ।
हयगजरथ [16]पैदल सो निकले राजभवन अवरोधा ॥
उमग लढनेकी है रे! । हरखता दिलकी है रे! ॥ २३
**रुक्मांगद**सह अनुज **शुभांगद** सेनापति [17]दल भारी ।
**वीर**सिंह नृप भ्राता भगिनी सुतबल मित्र [18]इभारी ।
जे रणपंडित सारे । ज्याचे कीर्ति पसारे. ॥ २४
बीनारब [19]और [20]संख दुंदुभी कडकड बाजे बाजा ।
भू नभ दिसदस गुंफा गिरनकी नाद [21]सबत्तर गाजा ॥
राजा आन खडा रे । रनमे बीर बडा रे! ॥ २५

---

१. ‘कवळित’ असा अन्य पाठ आहे. २. दंवडी. ३. मम+अंग+ज=माझ्या+आंगापासून+जन्मलेला=ममात्मज. ४. लढण्यास, युद्धास. ५. मानी. ६. ‘तत्क्षणीं’ असा अन्य पाठ आहे. ७. आज्ञा. ८. आज्ञा. ९. त्यजून, टाकून. १०. लवकर. ११. घालून, पहिरून. १२. खड्ग. १३. धनुष्य. १४. बाण. १५. झाले. १६. पायदळ. १७. फौज, सैन्य. १८. हत्तीचा शत्रु. १९. ‘अरु’ असा अन्य पाठ आहे. २०. शंख. २१. सर्वत्र, चोंहीकडे.

(पद.)

पाहुनि सैन्य विशाळ अती । तो **शत्रुघ्न** म्हणे, '**सुमती**! ।
कैसें याशीं युद्ध करुनि जयप्राप्ती होइल योज मती. ॥
सचिव वदे परसैन्यातें । पुष्कळ वीर भिडो त्यातें ।
**नील**रत्न नृप आदि करूनी दावितील पुरुषार्थातें ॥
**शिव**सह **वीर**मणीसि तरी । तूंचि स्वतां झुंजें समरीं ।
**शेष** म्हणे **वात्स्यायन**मुनिप्रति कथिली कैसी युक्ति बरी. ॥ २६

(चौपाई.)

सिद्ध भये दोउदल[1] संग्रामा । थरथर कांपत भूपुर ग्रामा ।
वीर उठे अरिसूदनके[2] रे! । मारे पैदलके[3] बहुतेरे[4] ॥ २७
हयगज भंग भये रथ जानी । देख उठा कनकांगद[5] मानी ।
अखय[6] भात दोउ चाप सुहावे[7] । जाको कोप गगन न समावे ॥ २८
सायक छोड हजारन[8] मारे । **पुष्कल** अरु[9] **शत्रुघ्न** पुकारे ।
आव करो संगर ममसंगा । नाहक और करत क्यंव भंगा ॥ २९

(सोरट.)

पुष्कल धांयो[10] वीर । राजपुत्रकी हाक सुन तिच्छन[11] मारे तीर । हंस हिरदे नृप[12] सबनको. ॥ ३०

(कामदा.)

भूपजें दहा बाण सोडिले । पुष्कळांचिया हृदयिं ताडिले ।
वीरयुग्म[13] तें दक्ष संगरीं । [14]शोभती **गुहा**[15]**तार**[16]कापरी. ॥ ३१

(चामर.)

**पुष्करें** दहा शरीं तयासि भूमि आणिला
[17]चौंनि चारि अश्व वधुनि दोहिं सूत विंधिला ।

---

१. दोन्हीकडील सैन्यें. २. शत्रूला मारणारे वीर उठले, तयार झाले. 'के' हा षष्ठीविभक्तीचा अनेकवचनी प्रत्यय होय. ३. शत्रूच्या सैन्यांतील. ४. पुष्कळ. ५. रुक्मांगद. ६. आणि. ७. सुहाना=शोभणें, विराजणें. 'चढावे' असा अन्य पाठ आहे. ८. हजारों. ९. आणखी. १०. धांवले. ११. तीक्ष्ण. १२. 'नृपसुतनके' असा अन्य पाठ आहे. १३. 'उभय वीरही बलाढ्य' असा अन्य पाठ आहे. १४. 'शोभती कुमार तारकापरी' असा अन्य पाठ आहे. १५ कार्तिकस्वामी. १६. तारकासुर. १७. चार बाण मारून.

उभय चक्ररक्षकासि सायकद्वयें[1] खिळी
ध्वजावरीच एक, एक टाकिला उरस्थळीं. ॥ ३२

(साक्या.)

बिरथ भयो नृपसुत संतापत जैसो भुजग[2] सतायो ।
बैठ और रथ कहे **पुष्कल**सो अद्भुत ख्याल[3] बतायो ॥
देख मेरा पुरुखारथ[4] जो तूं हिरदे[5] मुझे जलायो ।
कह ऐसी पुन भ्रामकास्त्रसे मंत्र कलंब चलायो ॥
जोजन[6] उड गयो रथ छिनमें[7] । गरगर फिरत गिरो रनमें. ॥ ३३
कहे **भरत**सुत सुन **रुक्मांगद** उर्ध्व[8] पठाऊं सेसें[9] ।
सुकृती[10] तूं जा सरगे[11] सबके देखत येहि कंदरसे[12] ॥
मंत्र अजिह्मग छोड उडाया रथ हयसह भूपरसे[13] ।
रवमंडलकों[14] पहुंचो स्यंदन[15] भस्म भयो दिनकरसे ॥
जल गइ तन[16] **रुक्मांगद**की । जीत[17] भई **भरत**जसत्रुनकी. ॥ ३४
गिरो बीर धरनीपर सुमरो हरहर दुःख जनायो ।
पुत्र देख मूर्छित रन दौडत **वीरमणी** नृप आयो ॥
रोखभरित[18] अंत[19] कठिन धनुकपर[20] सायक[21] खेंच लगायो ।
[22]कंपत भये तब जल थल नग नभ बैरी ठेर बलायो ॥
सूरन हाक सुनी ठानी । मुनिसो **सेसे**[23] कहत बानी. ॥ ३५

(पद.)

हनुमान चला राजपर उडत । ताहे **पुष्कल** कहे 'मैं हों लढत ।

---

१. दोन बाण मारून. २. सर्प. ३. हालहवाल, वर्तमान. ४. पुरुखारथ=पुरुषार्थ. [उत्तरहिंदुस्थानांतील लोक 'ष'चा उच्चार 'ख'सारखा करितात; जसें; भाषा—भाखा. कधीं कधीं मराठींतही 'ष'चा उच्चार 'ख'सारखा करितात; जसें:—पुरुष=पुरुख. मोरोपंत—मंत्रभागवत—द्वितीयस्कंध गीति २८.] ५. हृदय. ६. योजन. [संस्कृतांतील 'य'च्या जागीं 'ज'कार होतो, जसें:—यमुना—जमुना, सूर्य—सूरज, यशोदा—जशोदा, कारज—कार्य, यात्रा—जात्रा इत्यादि.] ७. क्षणांत. ८. उर्ध्व पाठविणें=वरतीं पाठविणें, स्वर्गास पाठविणें, मारणें. ९. शिरानें, डोकें उडवून किंवा एकदम. १०. सध्यां, सांप्रत. ११. स्वर्गांत. १२. भयानें. १३. जमिनीवरून. १४. रविमंडळ, सूर्यमंडळ. १५. रथ. 'शतांगः स्यंदनो रथः' इत्यमरः. १६. तनु. १७. जय मिळाला. १८. रोषभरित, क्रोधयुक्त. १९. अति. २०. धनुष्यावर. २१. बाण. २२. कंपित, कंपायमान, चलित. २३. शेष. 'सेस भनत बानी' असा अन्य पाठ आहे.

अपरमित बल तुंव[1] है । नहि यो राछसदल है । मुझे **राम**कृपा न बिकल है'. ॥३५॥
**मा**रुति कहे एक बीर तु छोटा । **बिर**मन सूर बिकट है खोटा ।
**म**हादेवपुर उसके । रहत गण है जिसके । क्यों फांद[2] परत साहसके ॥ २ ॥
**भ**रतसुत कहे गावे **सि**वजीसे । वोही **राम** मेरे हिरदबीच[3] बसे ।
जहां **राम** बसत बडा । तहां सब खेलक[4] खेडा[5] । तूं जाय[6] और नृप देख जडा[7] ॥ ३६

(ओंव्या.)

ऐकतां **ह**नुमंत परतला । **वी**रसिंहावरी धांवला ।
**ल**क्ष्मीनिधी सरसावला । आला **शु**भांगदावरी ॥ ३७
सुदम बल मित्रासी भिडे । द्वैरथ युद्धीं वीर निधडे ।
**पुष्कल वी**रमणीकडे । मुरडे रथ चालवोनी ॥ ३८
राजा म्हणे, '**पु**ष्कला ! बाला ! । मज प्रचंड कोप असे आला ।
तूं रक्षोनी निज प्राणाला । गेंच्छ वैंहिला मजपुढोनी ॥ ३९
तुजतुल्य बालकाप्रति । मत्तुल्य राजे दया करिती ।
त्वां मत्सुत मूर्च्छित केला निगुती । ते बालबुद्धी म्यां केली क्षमा.' ॥ ४०

(साक्या.)

**पु**ष्कल कहे, 'बल ज्या[8] है अधिक है सोइ बडा सब भावे ।
छेत्रिनको[9] मत उमर अधिकसे बडा न कोइ कहावे ॥
तेरा पुत्र गिरांया[10] रे । गिराऊं तेरी कांया[11] रे !' ॥ ४१
केंह[12] ऐसी दस बान छोडके नृपका हृदय बिदांरा[13] ।

---

१. तुझें. २. पाशांत; तूं साहस करण्याच्या पंचायतींत कशाला पडतोस? ३. हृदयामध्यें. ४. जग. ५. उभें. ६. जा, चालता हो. ७. लौकर, शीघ्र. ८. तेजस्विजनांत वय प्रमाण धरीत नाहींत, तेजस्विजनाचे बाल्यादि वयाकडे दृष्टि कोणी देत नाहींत, तर गुणांवर नजर असते. असाच अभिप्राय रघुवंश—सर्ग ११ श्लोक १ यांत आहे:— 'तेजसां हि न वयः समीक्ष्यते.' तसेंच कुमारसंभवांत (सर्ग ६ श्लोक १२) असाच अभिप्राय अन्यप्रकारें दर्शविला आहे. 'स्त्रीपुमानित्यनास्थैषा वृत्तं हि महितं सताम्.' उत्तररामचरित्रांत (अंक ४) समानार्थ श्लोकांश आहे तो सुप्रसिद्ध आहे. 'गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः;' 'गुणाः प्रियत्वेऽधिकृता न संस्तवः' इति किरातार्जुनीये, 'पदं हि सर्वत्र गुणैर्निधीयते' इति रघुवंशे (सर्ग ३ श्लोक ६२). रघुवंशांतील श्लोकाचें पद्यात्मक भाषांतर असें:—'तेजस्विता बहुत ज्या वसते नरांत, त्यालाचि थोर म्हणुनी गणिती जनांत; तो लेंकरूं जरि असे तरि लोक त्यास संमानिती, नचि मनीं गणिती वयास.' [लेलेकृत रघुवंश.] ९. क्षत्रियांला. १०. पाडविला. ११. शरीर. १२. असें सांगून. १३. विदारण केलें.

तीन भाल बिच ठठे मनो गिरि तीन सिखरका [1]न्यारा ॥
राजा [2]थकित कियो रे! । अत संताप दियो रे! ॥ ४२
राजाने नव [3]बिसिख चला कर पुष्कलका उर फोडा ।
[4]अहिबिल पय पावत त्यों [5]सरने [6]रुधिर पिया नहि थोडा ॥
हरखित [7]श्वान [8]खगें रे! । डरकेही न भगे रे! ॥ ४३
परम कोपसे भरतांगजने नृपपर [9]सौ सर मारे ।
कवच किरिट [10]सिरअस्त्रक रथ धनु छिन्न भिन्न कर डारे ॥
रकतमें डूब रहा रे! । वाव्हा करत अहा रे! ॥ ४४
धन्न बीर तू रामपदांबुज [11]मधुकर रनअधिकारी ।
[12]टलजा अब सन्मुखसे मेरे कालरूप मैं भारी ॥
अपने प्राण [13]बचा रे! । रोवे तेरो [14]चचा रे! ॥ ४५

(चूर्णिका.)

अन्य रथीं बैसोनि नृपती । असंख्य शर सोडीत दशदिशा क्षिती । [15]अंबरें व्याप्त बाण दीसती । अने[16]कार्धदंती रथ जवन सूतसह संहार गजस्थ हयस्थ रथस्थ अपार वीरशिरें तटतटा तूटती । रक्तसरिता लोट वाहती । मांसकर्दम [17]इभकलेवर गिरिकूटवत्केशशैवाल उष्ट्रमकरकरचंदनविलिप्त मुद्रिकायुक्त मणी भोगीव [18]तळपती । आजानुपदशिरें मच्छकच्छपतुल्य चमकती । [19]शिवादि मांस भक्षोनि अति भयप्रद शब्द करिती । सहस्रावधि [20]योगिनीकृत मांसाहार पीत रक्त हर्षोनि गर्जती गाती [21]नर्तती । तत्र पिशाचादि प्राणी मस्तकीं धरोनी ताल मृदंगवत् वाजविती । कितेक भयभीत पळोनि [22]कुंजरोदरीं लपती । ते प्रधान पापी समजोनि तयांतें योगिनीगण भक्षिती । ऐसी वीरमणीची ख्याती विलोकोनि उभय दळीं वीर शीर्षें डोलविती. ॥ ४६

---

१. निराळा. २. विस्मययुक्त, अचंबित. ‘व्यथित’ असा अन्य पाठ. ३. बाण. ‘विशिखा खनित्रिकायां रथ्यायां विशिखः शरे’ इति हैमः.] ४. बिळांतील सर्प. ५. शरानें, बाणानें. ६. रक्त. ७. कुत्रीं. ८. पक्षी. ९. शंभर बाण. १०. शिरस्त्राण, टोप. ११. भ्रमर. १२. निघून जा, काळें तोंड कर, १३. बचाव, वांचव. १४. काका, चुलता. १५. आकाश [‘अंबरं वाससि व्योम्नि कार्पासे च सुगंधके’ इति विश्वः.] १६. दंती=हत्ती. १७. हत्तीचें प्रेत. १८. शोभती. [मकरकुंडलें तळपती श्रवणीं—तुकाराम.] १९. कोल्ह्या वगैरे. २०. प्रेताक्षी, डाकिणी. २१. नाचती. २२. हत्तीच्या पोटांत.

(कामदा.)

वीर पुष्कलें याच पद्धती । कदन[1] मांडिलें संगराप्रती ।
शोणितें चमू[2] सर्व न्हाणिली । फुल्ल[3] किंशुकातुल्य[4] भासली. ॥ ४७
नृपतिचें पुन्हा कवच दशशरें । छेदितां नृपेंद्र त्रासला[5] त्वरें ।
सोडितां बहु मार्गणाप्रती[6] । होय घाबरा वीर भारती. ॥ ४८

(घनाक्षरी.)

तनका कवच पडा टूट । करका धनुक गया छूट ।
अंगसे रकत[7] कढा फूट । भई[8] लूट अकलकी ॥
पडा सरपंजर[9] बीर । रहांतनक[10] नही धीर ।
हिरदे[11] सुमरे रघुबीर । अतुल पीर[12] हरनको[13] ॥
पिठा भूजोपर हस्त । मारे तीर जबरदस्त ।
बिसिखजाल[14] महामस्त । किया पस्त[15] टोरके ॥
कहे राजासो दर्दार । हो जा अब तु खबरदार[16] ।
बडे फौजका सर्दार । न मुरदार सुरनमें[17] ॥
कियो पुरुखारथ[18] खूब । अभी देख मेरा रूप ।
करों मूर्छित तुझे भूप । सर अनूप[19] तीनसें[20]. ॥ ४९

(श्लोक.)

यदा मीनां ऐसें करिं मज घडो पातक तदा
सदा निंदी गंगा अणि न संपरे[21] जो खळ कदा ।
पदां मी त्या भोगीं वदुनि शर घेत प्रतिगदा
नदावाणी गर्जे सुभट चढला जो रणमदा. ॥ ५०

ऐकोनियां मग नृपें शर सोडियेले ते पुष्कलोदरचि[22] भेदुनि पार गेले ।
भूमी अधोगति पडोनि तळीं जिराले कीं रामभक्तिसि पराङ्मुख काय जाले. ५१

---

१. युद्ध. २. सैन्य. ३. फुललेल्या, बहार आलेल्या. ४. पळसाप्रमाणें. ५. 'तापला' असा अन्य पाठ आहे. ६. बाणाप्रति. ७. रक्त, रुधिर. ८. झाली. ९. शरपंजर. [आंगावर पुष्कळ बाण पडल्यामुळें शरीराभोंवती पिंजन्याप्रमाणें वेष्टण होतें त्यास 'शरपंजर' म्हणतात.] १०. थोडासुद्धां, किंचित. ११. हृदयांत. १२. पीडा, क्लेश. १३. टळण्यासाठीं. १४. बाणांचें जाळें. १५. तोडून. १६. सावध. १७. उत्तम रणांत. १८. पुरुषार्थ. १९. ज्याला उपमा नाहीं असे. २०. तीनशें. २१. स्नान न करी. २२. भरताचा पुत्र जो पुष्कल त्याच्या पोटांत बाण शिरला.

(दिंड्या.)

बाण पहिला **पु**ष्कलें सोडियेला, नृपें स्वशरें तत्काळ तोडियेला ।
मातृभक्ती पुण्य स्थापुनी शरातें; मोचितांची नृप मोडि कीं तयातें. ॥ ९२.
दुजा गेला जाणोनि व्यर्थ घाला, म्हणे करुं काई वीर कष्टि जाला ।
स्मरुनि **रा**मासी तिजा[1] मोकळीला[2], नृपाह्रदयीं तो बाण आदळीला. ॥ ९३

(साक्या.)

मूर्छित भयो नृप जैसा नभसे[3] टूट पडा रवि खेटा ।
हा हा कर सेना सब भागी जीत **भ**रतका बेटा ॥
दुंदुभि ठोक रहे रे ! । मुनिसो सेस कहे रे ! ॥ ९४

(चौपाई.)

इधर लढे **ह**नुमत नृपभाई । बहु शर छोड करे चपलाई ।
बरख असाढढरे[4] जलधारा । कपिनें त्यौं सरजुक्त निहारा ॥ ९५
कोप **क**पीश मुष्टि[5] वह मारी । लागी ह्रदय बज्रसम भारी[6] ।
**बी**रसिंह मूर्छा तब पायो । ऐसी देख **सु**भांगद धायो. ॥ ९६
हो सावध **रु**क्मांगद दौरे । दोउ[7]मार चले रन औरे ।
**मा**रुति पैं दो उभाय चपेटे[8] । कपिनें पूछ पसार लपेटे[9]. ॥ ९७
रथसह भूप उठाके पठके[10] । भये अचत[11] फकत[12] असु[13] अटके ।
**सु**दमहुको बल मित्र गिरवि[14] । **पु**ष्कल ताहे कटक पठवावे[15]. ॥ ९८

(कबित्त.)

ऐसा देख वक्त[16] । धायो **शं**कर बिरक्त ।
येक छोड गिरितख्त । फक्त आस निज भक्तकी ॥
रथ हो आसक्त । किये नयन आरक्त ।
लिये सात गण[17] सक्त[18] । घटि कर बे कंबख्तकी ॥
जटाजूटजुक्त । दढ हलाहल भुक्त ।
जाके देनेको मुक्त । सरहघनासक्तकी ॥

---

१. तिसरा. २. मोकळिक दिली, सोडला. ३. आकाशांतून. ४. आषाढ महिन्यांतील पर्जन्याप्रमाणें. ५. मुटका. ६. पुष्कळ, जोरानें. ७. दोहोंकडून मारा सुरू झाला. ८. बाळक. ९. गुंडाळून घेतलें. १०. मारी. ११. अचेत, चलनवलनादि व्यापाररहित. १२. केवळ. १३. प्राण. १४. पाडवी. १५. हापटी, आदळी. १६. वळे, समय. १७. सशक्त गण नौकर. १८. 'पुख्त' असाही पाठ आहे. पुख्त=सशक्त, पोक्त.

क्रोधकी सक्त । देख बिधकी न चले उक्त ।
जाकी छुधा अमित । [1]पयास बैरीवृंदरक्तकी. ॥ ५९

(साक्या.)

ते अजगव धनु विस्फरुनि सांब रणांगणिं आला ।
तों शत्रुघ्न पुढें ये त्यातें शंभु बोलता जाला ॥
म्हणे, 'तुझा पुष्कल रे! कोठें मारुनि सैन्य पळाला ।
दुष्ट नष्ट मद्भक्तछळक जो मारिन आजि तयाला ॥
होइल सुख माझ्या हृदयीं । [2]मन्युप्रशमन ते समयीं. ॥ ६०
वदुनि असें पुष्कलावरि गण वीरभद्र पाठविला ।
[3]नंदीगण हनुमंतावरि सुदमावरि चंड [4]सुकटिला ॥
कुशध्वजावरि अचंड भृंगी सुबाहुकावरि झठिला ।
महारुद्रसम वीरभद्र पाहुनियां पुष्कल उठिला ॥
ताडित पंचशरें समरीं । तेणें धरिला शूल करीं. ॥ ६१
शूल छेदितां [5]खट्वांगें भरतां गज मूर्छित केला ।
सावध होउनि खट्वांगाप्रति तोडुनि निर्भय ठेला ॥
गणें तोडिता स्यंदन भिडला बाहुयुद्धिं भुमिकेला ।
उरुजानुपदमुष्टि परस्पर हणिति न करुनि क्षमेला ॥
दिवस चतुष्टय आणि निशी । झुंजतां पहाती सूर्यशशी. ॥ ६२

(छंद.)

दिन पांच बे भरतांगज गण भद्र अंबर ले उडो ।
वह जुंझ दानव देव मोहन दुनन अद्भुत लढो ॥
पद खेंच पुष्कल कोतबे गरगर फिरा पटको मही ।
अतकोप करहु त्रिशूलसे सिर काटके गरजोसही ॥ ६३
सिरपेच मुकुट बिराजहिलकलकीत कुंडल कानमें ।
सुंदर [6]सुहावन मुख गिरोल खबीर रनमैदानमें ॥

१. तहान, तृषा. २. रागाची शांति. ३. नंदी हा शंकराचे गणांपैकीं एका गणाचा नायक म्हणजे जमादार आहे. हा शंकराच्या प्रीतींतला असल्यामुळें व सदा त्याची नोकरी हुजुरांत असल्यामुळें त्याचें नांव वारंवार पुढें येते. ४. 'झुकविला' असा अन्य पाठ आहे. ५. खट्वांग नामक शिवाचा एक दंड होता. ६. शोभत.

हा हा करत सेना भगी मन छूट सब धीरज गयो ।
सिर अंकधर सत्रुघ्न वनर अतसोक कर रोवत भयो ॥ ६४

(पद.)

बाळा ! काय गती तुज जाली । कैंवि उपेक्षा केली ।
तुजविण माजी तनू उदेली[1] । वांचुनि काय[2] असेली ॥ ध्रुवपद. ॥
सखया ! जन्म तुझा जैं जाला । हर्षविलें जननीला[3] ।
संभ्रम अवधपुरीं लोकांला । उत्सव[4] रघुनाथाला ।
याचक[5] तृप्त तया समयाला । ये समयीं हा घाला[6] ॥ १ ॥
बापा ! तुज रामें निरवियलें । मज स्वाधिन केलें ।
तुज म्यां समरपटीं झुंजविलें । परि नाहीं रक्षियलें ।
म्हणउनि मानस कीं कोपविलें । मौनचि कां धरियेलें ॥ २ ॥
वदली मम माता सुमित्रा, । 'विजयी हो पुत्रा ! ।
पुष्कल बाल रणीं नवगात्रा । न विसंबें क्षणमात्रा ।
त्यासह येईं गृहा गुणपात्रा[7] ! । तरिच सुफळ तव यात्रा ॥ ३ ॥
वत्सा ! बोल मशी कांहींतरि । कां हर्षविला वैरी ।
सांगू काय तुझ्या मातृघरीं[8] । पुत्र निमाला[9] समरीं ।
धिगधिग माझें जिणें ये अवसरीं[10] । 'दृगीं[11] वाहे वारी[12].' ।
ऐसा दाशरथी शोक करी । राघव गहिंवर भारी ॥ ४ ॥ ६५

(साक्या.)

कहे महादेव, 'सुन् अरिसूदन रनमे सूर नसोके[13] ।
लढत मरे सो धन्न[14] कहावे पूत[15] बाप ठोके[16] ॥
ऐसी रीत यही रे ! । जो धन नीत[17] कहीरे ! ॥ ६६
दच्छजग्यबिधवंसो[18] जीने त्रिपुरकि चमू भगाई[19] ।
दीन पांचतंक[20] बीरभद्रसो कीन्ही खूप लढाई ॥
पुष्कल बीर बडा रे ! धन तुव भाग खडा रे ! ॥ ६७

---

१. उद्विग्न झाली. २. जीवंत असली तरी तिचा काय उपयोग. ३. मातेला, जन्म देणारी ती जननी. ४. आनंद, उत्साह. ५. भिक्षुक. ६. संकट. ७. गुणग्रामा, गुणसमूहा. ८. मातेला. ९. पडला, मेला. १०. समयीं. ११. नयनीं. १२. अश्रू. १३. शोक न करी. १४. धन्य. १५. पुत्र. १६. मारी. १७. नीति. १८. दक्षयज्ञाचा विध्वंस केला. १९. हांकलून लावली. २०. पांच दिवसपर्यंत.

सुन ऐसी **श**त्रुघ्न सकोपित **सं**करको सर मारे ।
**शि**वने सर छोडे दोंनोके बान [1]अकास पसारे ॥
सरसो सर झगरे रे! । सुरमुन देख [2]थिरे रे! ॥ ६८
जुद्ध करत [3]ग्यारा दिन बीते कोउ न जीता हारा ।
तब अरिसूदनने **सं**करपे ब्रह्मअस्त्रको [4]डारा ॥
[5]हरने मुख उकलो रे! । हसके अस्त्र गिलो रे! ॥ ६९
**भ**रतानुजके [6]हिरदेपर सर मारे **गि**[7]रजानाहा ।
कर मूर्छित **श**त्रुघ्न गिरायो फौज करे सब 'हा हा' ॥
गनने घाव दिये रे! । मूर्छित बीर किये रे! ॥ ७०

(अभंग.)

**शे**ष बोले, '**वा**त्स्यायना! । पुढें आणीं वार्ता मना.' ॥ १ ॥
आला धांवोनी **ह**नुमंत । म्हणे **रु**द्रासी गुणवंत, ॥ २ ॥
'पूर्वीं ऐकिली म्यां [8]मात । कीं तूं होसी **रा**मभक्त ॥ ३ ॥
तें तों सर्व [9]मिथ्या झालें । **रा**मदासाला गांजिलें ॥ ४ ॥
तरी तूतें शिक्षुनि गर्व । हरिन, होईं सावध **श**र्व.' ॥ ५ ॥ ७१

(श्लोक.)

ऐसें बोलुनि **मा**रुती [10]अतिगती हातीं शिला घेउनी
दांतीं चावुनि ओष्ठ ते **शि**वरथीं टाकी बळा सेवुनी ।
जाला सूत चुरा [11]रहंवर बरा केतू पताका तुरा
अश्वाचाहि खरा उरे न नखरा आश्चर्य जालें सुरा. ॥ ७२

(गीति.)

विरथ **स**दाशिव पाहुनि **नं**दी ये त्यावरी बसे [12]शर्वे ।
**मा**रुति शिला विमोची शूली [13]शूलासि पाहती सर्व. ॥ ७३
तो तोडितां **क**पीशें, शक्ति **ह**रें सोडुनी विकळ केला ।
[14]हरि ताडि [15]द्रुमें हृदयीं ज्याच्या [16]असुरेंद्र भीति [17]हाकेला. ॥ ७४

---

१. आकाशांत. २. 'थरे' असा अन्य पाठ आहे. ३. अकरा. ४. सोडलें. ५. शत्रुघ्न. ६. हृदयावर, छातीवर. ७. पार्वतीपती. (शंकर.) ८. हकिकत. ९. खोटें. १०. लवकर. ११. रथ. १२. शंकर, महादेव. १३. महादेवाच्या हातांतील शूलास. १४. वानर. ['हरि-श्चंद्रार्कवाताश्वशुकभेकयमाहिषु । कपौ सिंहे हरेऽजेंऽशौ शक्रे लोकांतरे पुमान् ॥' इति मेदिनी.] १५. वृक्ष, झाड. १६. दानवश्रेष्ठ. १७. ओरडण्याला.

(ओंव्या.)

मूषल घेओनी **उ**मापती । गर्जोनि म्हणे **मा**रुतिप्रती, ।
'पळ मर्कटा! [1]अधम जाती । प्राण जातील आतां तुझे.' ॥ ७५
ऐसें वदोनि मूषल टाकिलें । **ह**नुमंतें तत्काळ चुकविलें ।
शस्त्र [2]रसातळीं गेलें । व्यर्थ जालें प्रेरण. ॥ ७६
**म**रुत्सुत कोपला भारी । पर्वत टाकिला **शि**वावरी ।
तो छेदावा जों झडकरी । तरु झुगारी **ह**नुमंत. ॥ ७७
[3]ते **भ**व छेदूं पाहे । तों शिलावृष्टी करिताहे ।
[4]पुंच्छें **शि**वासी [5]लेवलाहें । वेष्टोनियां ताडित. ॥ ७८
ऐसें **मृ**डासी घाबरें केलें । शशांकाचीं जालीं शकलें ।
**नं**दीचें मानस [6]त्रासिलें । पळों इच्छिलें भुजंगीं. ॥ ७९

(गीति.)

पाताळीं वास अही गेले **शे**षासकट करायाला ।
कीं जाय [7]कृच्छ्र पडतां, [8]सपदि विदेशास कटक राह्याला. ॥ ८०
**शं**भु म्हणे, 'उचित कसें मुनितें प्रहरण मला असे व्यरणी ।
स्पर्शार्हनिकर्मी जो यज्ञी कैं मान्य तो असेव्य रणी. ॥ ८१

(छंद.)

कहे **रु**द्र **म**रुतपुत्रसो तुव देख विक्रम अत घनो
संतुष्टमे नहि रुष्ट **तुं**बर पुष्ट जाच सुभावनो ।
**ह**नुमत् भने मोहे **रा**मके परतापसे है कुल भऱ्यो
पर देत है बर, दे यही 'नर रच्छ **भ**रतज है मऱ्यो.' ॥ ८२
जे बीर पाये पतन ते कर जतन गनसे रतनसे
तन गत न होय न हतनभखपस भुतनसे रखसुतनसे ।
मैं **द्रो**नगिरी ल्याऊं झपट तबलो करो **ह**र **बि**ध यही
जा तूर्त सबकी अर्त हरकर नर्त यह **सं**कर कही. ॥ ८३

(घनाक्षरी.)

सेना राखे **सि**व गंभीर । वहांसे उडा माहाबीर ।
[9]सातों दीपनका तीर । गयी [10]**छी**रसिंधके ॥

---

१. नीचा. २. धरातळीं, पृथ्वीतळीं. ३. वृक्ष. ४. शेंपटीनें. ५. सत्वर. ६. भय पावलें. ७. संकट. ८. तत्काल, लगेच. ९. सप्तद्वीपांच्या. १०. क्षीरसिंधूच्या.

आया **द्रोना**चलके पास । लपटि पूछ आसपास ।
किया [1]हलाके [2]कपास । गले फांस पडे ज्यों. ॥
ऐसि देखके [3]करतूत । उठे [4]रच्छक देवदूत ।
सबने घेरा **पवन**पूत । बडा [5]तूंत बताया. ॥
मारे शस्त्रनके घाव । कोपा [6]बंदरका राव ।
ठोके दूत चला दाव । हातपावसे सबै. ॥
कैक दूत डारे मार । [7]भागे [8]छोडके [9]हतयार ।
आये **इंद्र**के दरबार । समाचार कहनेको. ॥ ८४

(पद.)

**इंद्रा**! अनुभवलें अनुभवलें । महद्भूत उद्भवलें ॥ ध्रुवपद. ॥
कपीरूप एक आला । 'नेऊं' म्हणतो **द्रोण**नगाला. ॥ **इंद्रा**!० ॥ १ ॥
त्रास आम्हां बहु जाले । युद्धीं कितिकहि दूत [10]निमाले. ॥ **इंद्रा**!० ॥ २ ॥
पूर्वपुण्य कीं आमुचें । म्हणउनि दर्शन जालें तुमचें. ॥ **इंद्रा**!० ॥३॥ ८५

(साक्या.)

दूतवाक्य ऐकुनियां **शक्रें** सुराप्रति पाठविलें ।
'बांधुनि आणा कपि तो.' आज्ञावाक्य येरिती कथिलें ॥
सुरें येउनी [11]हरिवरि शस्त्रप्रहरण अति मोकळिलें ।
**पवनसुतें** करपदनखघातें अमरां फार विकळिलें ॥
गेले **शचिरमणा**पाशीं । पावुनि बहु [12]संतापाशीं ॥ ८६
मग **शक्रें** सक्रोधें कपिवरि सर्व धाडिले सुर हो! ।
त्यातें पाहातां वदे [13]प्लवंगम जो युद्धा आतुर हो! ॥
'कां तुम्हि वारंवार मराया येतां [14]मूर्खाऽमर हो!' ।
तव पट्टीश शूल खड्गादिक वर्षति ते [15]निर्जर हो! ॥
कपिनें टाकुनि [16]दीर्घशिला । सुरसमुदाय बळें चुरिला. ॥ ८७

---

१. हालवून. २. कापसाप्रमाणें हलका. ३. कर्तृत्व, करण्याची शक्ति. ४. रक्षक. ५. 'तूर्त' असें पाठांतर. ६. वानरश्रेष्ठ. ७. पळाले. ८. टाकून. ९. हत्यारें, शस्त्रें. १०. मेले, पतन पावले. ११. वानरावर. १२. संताप=राग, क्रोध. १३. वानर, मारुति. १४. मूर्खाऽमर हो!=हे मूर्ख अमर हो!. असा संधि करणें अप्रशस्त आहे. १५. देव. १६. मोठे दगड.

(पद.)

भाग आये कोउ लँहुसे[1] भिगे[2] सारे । बोले हमारा नहि दाव राजा रे! ।
देख उन्हे भय मान सुराधिप[3] । सुरगुरुसे[4] पुछे भाव राजा रे! ॥ १ ॥
कोन कहाको आयो बांदरयो बली[5] । जिने हमारे मारे देव हो गुरुजी[6]! ।
द्रोनागिरिको बांधे पुच्छसे लेजाता । ये सब मोहे सुनादेव हो गुरुजी ॥ २ ॥ ८८

(साक्या.)

कहे बिरसपत, 'सुन सुरराजा! जिसने रावन मारा ।
तिसँका[7] है सेवक यह जिसने लंकनगर सब बारा ॥
वो हनुमान बली रे! । नहि वासो[8] जुंझ[9] भली रे! ॥ ८९
राममखाचा हय धरिला नृप वीरमणीनें पाहें ।
युद्ध तुंमुल[10] जालें रणिं आला सांब साह्य लवलाहें ॥
वधिली रघुसेना रे! । पडिलें कृच्छ्र[11] जनां रे! ॥ ९०
वीर जिवंत कराया आला द्रोणाचल नेयाला ।
शीघ्र औषधी देउनि टाळा करुनि प्रसन्न तयाला ॥
वाचा सकळ तधीं हो! । न जीता तुम्ही कधीं हो! ॥ ९१

(दोहा.)

सेस भने मुनि पीयहु अब रामकथारस तोय ।
इंद्र कहे गुरु! गिरि गये सुरजीवन किहि होय. ॥ ९२

(कुंडरिया.)

कारज होवे रामको कपि पावे संतोख ।
देव सुखी सब हो रहे ऐसी कर निर्दोख. ॥ ९३
ऐसी कर निर्दोख वो सुनि सुरगुरुने बानी ।
चल्यो बिबुध[12] ले साथ[13] सक्रको कर अँगवानी[14]. ॥ ९४
हतो रामको दूत तहा आयो करि आरज ।
कहे धन्न[15] तुव भाल लगत सियपतपदका[16] रज. ॥ ९५

---

१. रक्तानें. २. भिजलेले. ३. देवश्रेष्ठ (इंद्र). ४. बृहस्पतीला. ५. बलवान्. ६. गुरु=अंधकारनिरोधक. 'शब्दगुस्त्वंधकारश्च रुशब्दस्तु निरोधकः । अंधकारनिरोधत्वाद्गुरुशब्दो निगद्यते ॥' [सौरपुराण—अध्याय ६८ श्लोक १०.] ७. त्याचा. ८. त्याबरोबर. ९. युद्ध, लढाई. १०. घोर, भयंकर. ११. संकट. १२. देव. १३. बरोबर. १४. पुढारी. १५. धन्य. १६. सीतापतीच्या पायांची धूळ.

(पद.)

जानो जानो नहि देवन तेरो बल पार कछू ॥ ध्रुवपद. ॥
कोप समाय छिमा करिये सब । [1]पोखिय अब [2]सुरराजा ॥ १ ॥
आये हो कोन काम तुम बातज । कर रहेंगे हम तुव काजा. ॥ २ ॥ ९६

(साक्या.)

**वा**चस्पतिचें वाक्य ऐकुनी **मा**रुति वदता झाला, ।
‘**रा**म सैन्य **शि**वहत [3]जिववाया नेतों **द्रो**[4]णनगाला ॥
मातें सुरीं उपद्रव करितां म्यां शिक्षिलें तयाला ।
द्या पर्वत कीं औषधि मज मग निर्भय असो तुम्हाला.’ ॥
ऐकुनि दिधलें [5]अमरीं तें । संजीवन औषध कपितें. ॥ ९७
औषधि घेउनि **अं**जनिसुत रणिं येतां विस्मय करिती ।
‘साधु साधु’ नर उभय दळींचे बोलुनि मान [6]तुकविती ॥
कपिनें पुष्कळ तनूसि शीर लावुनिया औषधि ती ।
वालुनि म्हणे, ‘**रा**मासि जरी मी प्रभु मानीं दृढ चित्तीं ॥
तरि या औषधिनें वांचो । **पु**ष्कर उठुनि रणीं नाचो.’ ॥ ९८
ऐसी कहतहि उठो **भ**[7]रतसुत कहे, ‘[8]धनुक कह मेरो?’ ।
कहां गयो गण **बी**[9]रभद्र वह मारों ताह भगेरो ॥
फिर आयो **स**त्रुघ्नपास कपि ताउर वोखद पेरो ।
कहे, ‘ब्रह्मचारी जो मैं सच उठ **स**त्रुघ्न [10]संबेरो’ ॥
सावध हो लागे [11]चितहूं । कहे, ‘**ह**र भाग गया [12]कितहूं.’ ॥ ९९

(दोहा.)

ऐसे सब [13]जोधा तबे **मा**रुत उठवे ताहे ।
[14]सिद्ध भये रथ बैठके [15]संज आये रणमाहे. ॥ १००

---

१. पोखणें=रक्षण करणें. २. इंद्र, देवाधिप. ३. जीवंत कराया. ४. द्रोणागिरी पर्वताला. ५. देवांनीं. ६. डोलविती. ७. भरताचा मुलगा (पुष्कल-पुष्कर). ८. माझें धनुष्य कोठें आहे? ९. वीरभद्र=एक शिवपार्षद. यानेंच दक्षयज्ञाचा विध्वंस केला. [वीरभद्रानें दक्षयज्ञाचा विध्वंस केला व त्याचें शिर तोडून पुन्हां दक्षप्रजापतीस मेंढ्याचें शिर लावलें या कथानकास अनुसरून गेल्या शतकांत हेबळीकर मोरेश्वर या कवीनें ‘श्रीवीरभद्रचरित्र’ नांवाचा ७००० ग्रंथसंख्येचा वीररसपरिपूर्ण असा ग्रंथ केला आहे. हा ग्रंथ ओंवीवृत्तांत रचलेला आहे.] १०. लवकर. ११. निरखायला लागला. १२. कोणीकडे, कोठें. १३. योद्धा. १४. तयार झाले. १५. सज्ज. ‘सह’ ‘सब’ असे अन्य पाठ आहेत.

(ओंव्या.)

पूर्ववत युद्ध होउं लागलें । शत्रुघ्नें शिवासि पाचारिलें[१] ।
तों वीरमणीनें धांवणें केलें । शर सोडिले तयावरी. ॥ १०१
शत्रुघ्नाचे शतरथ । भग्न करी नृपनाथ ।
शत्रुघ्न कोपोनि अत्यंत । अग्न्यस्त्र सोडीत लवलाहें[२]. ॥ १०२
तें वारुणास्त्रें निवारिलें । शत्रुघ्नें वायव्यास्त्र सोडिलें ।
नृपें पर्वतास्त्र टाकिलें । नगातें फोडिलें वज्रास्त्रें. ॥ १०३

(श्लोक.)

क्षोभुनियां ब्रह्मास्त्र विमोची नृपतापी
बाण योगिनी दत्त योजुनी दृढचापी ।
तो रिपुसूदन मोहनास्त्रकें शर तोही
तोडुनी मूर्च्छा आणुनी भूपाप्रति मोही ॥ १०४
बाण शतावधि सोडुनि गण मूर्छित केले
वीरासह ते सांबपदा शरणा गेले ।
कोपुनियां शिव शस्त्रास्त्रें त्या समयाला
शत्रुघ्नाप्रति अति विव्हळ करिता जाला. ॥ १०५

(साकी.)

पडा वीर संकटमें सुमरो राम अजुध्याबासी ।
आहा नाथ! दौडो रनमें हर प्राण लेत, दे फासी ॥
भाई दौर करो रे! । दुख मेरो आज हरो रे! ॥ १०६

(पद.)

रघुराज कौन[३] आज मेरी लाज रखावे? ॥ ध्रुवपद. ॥
तुज बीन अब कौन तुर्त अर्त मिटावे । दुखके जंजाल कौन छुडावे ॥ १ ॥
आयो हर बाघ, प्राण मृगपर धावे । रघुबर बिन सिंहके कौन बचावे ॥ २ ॥
बिलपत नर शत्रुसूदन मन न डुलावे । अंतर धर ध्यान टेर बुलावे ॥३॥ १०७

(साकी.)

झनक[४] परी सत्रुघ्नकि कानन[५] प्रगट भये रघुराई ।

---

१. बोलाविलें. २. लवकर. ३. कोण. ४. ध्वनि. ५. कानांत.

नीलकमलदलश्याम अजब छब्र कर धनबान सुहाई ॥
कँट मृगसिंग सुहो रे! । दिछिँतरूप लसो रे! ॥ १०८

(घनाक्षरी.)

मुनसे कहेताहे अँनंत । ऐसा प्रगटा भगवंत ।
पालनेको साधुसंत । जाको अंत लगेना. ॥
देख रनमें श्रीराम । भया सबको आराम ।
सक्त आई संग्राम । करन धाम अतुलकी. ॥ १०९

(चौपई.)

उठ सत्रुघ्नसहित हनुमाना । वंद रामपद सीस लुभाना ।
कहे मारुत हम धन्न भये रे! । अब छिँनमें रिपु जीत लिये रे! ॥ ११०

(लावणी.)

सगुण स्वरुप श्रीराम जिवा विश्राम रणीं प्रगटला ।
असा पाहोनि धावोनि शंभु जाओनि पदिं लँागला ॥ ध्रुवपद. ॥
उभय जोडुनी हस्त करुनि मन स्वस्थ म्हणे तूं प्रकृतिचाहि उपरणा ।
अससि बा! सत्य जगत्कारणा ॥
येक असुनि बहुरूप दाविसी खूब निजांश कला विश्वकारणा! ।
पुरुष साक्षात्परंधारणा ॥
ब्रह्मरूप सृष्टीसि स्वयें पुष्टिसि नटसि मद्रुपकसंहारणा! ।
भक्तभवभयनिवारणा! ॥
ईश तूंचि सुसमर्थ तुला हें किमर्थ ब्रह्महत्येचें पातक रणा ।
हेतु हयमेध कीं विचारणा ॥
ज्या पदनिर्गत गांगवोघ शिर सांग पापशांत्यर्थ मला विनटला ।
त्यासि पापाचा अणुमात्र भाग मग डाग कुठुनि लगटला.॥सगुण०॥१॥
म्यां तरि केलें कर्म तूं वागविं धर्म जाणसी मर्म परि करिं क्षमा ।
सत्य रक्षाया चँरलों क्रमा ॥

---

१. कमरेमध्यें मृगाचें शिंग शोभत होतें. २. यज्ञाची दीक्षा घेतल्यामुळें राम दीक्षितरूपानें प्रगट झाला. ३. शेष. ४. क्षणांत. ५. 'झगटला' व 'लगटला' असे अन्य पाठ आहे. ६. आचरलों.

हा नृप पूर्वीं स्वकाजिं उज्जनीमाजि येउनी महाकाळआश्रमा ।
तपस्या केली अद्भुतोपमा ॥
मी प्रसन्न होउनि देवपूर राज्य तया देउनि करुनि संभ्रमा ।
बोलिलों ऐसें कल्पद्रुमा[1] ॥
जो रामअश्व येईल तवचि होईल त्रास रक्षाया तव पुरि आम्हा ।
दिलें वरदान उत्तमोत्तमा[2] ॥
म्हणुनि भक्तरक्षार्थ समर[3] म्यां सार्थ करुनि परमार्थ मार्ग सुघटला ।
आतां हा राजा हय देईल तुज सेविल वैरी[4] निपटला.' ॥सगुण० ॥ २ ॥
शर्ववाक्य परिसुनि मंजुळ ध्वनि धीर गंभीर वदे रघुपती, ।
'शिवा! त्वां केलें उत्तम अती ॥
भक्ता करणें शर्म[5] सुराचा धर्म, नर्म[6] ना साक्ष निगम[7] बोलती ।
नसावी खंती कीं तुजप्रती ॥
मद्धृदयीं[8] तव ठसा पूर्ण भरंवसा तुझ्या मीं वसतों अंतरगती ।
ऐक्य उभयांचें मूर्ख नेणती ॥
तुझे भक्त ते मला भक्त, माझे तुज प्रिय वाटती ।
असी दोघांचि परस्पर मती ॥
तुज मज करि जो भेद घडे त्या खेद, असा भवभेद शब्द उमटला ।
पडे शठ नर्की तो भुक्तिमुक्तीपासोनि जाण निसटला.' ॥ सगुण० ॥ ३ ॥
शेष म्हणे, 'मुनिवर्य! परमगुण! आर्य! एक आश्चर्य कसें वर्तलें ।
सैन्य जें होतें संवर्तलें[9] ॥
कर स्पर्शुनी शिवें उठविलें किंवा तयांचें गतजीवन परतलें? ।
हर्षयुक्त तत्र नर्तले[10] ॥
वीरमणी सुतसहित उठविला ज्याशी मूर्च्छेनें व्यावर्तलें ।
त्यासि श्रीकंठें आज्ञापिलें ॥
पुत्रपौत्र परिवार घेउनी दार रामपादिं सहय राष्ट्र अर्पिलें ।
रणीं रामाशि नृपें तर्पिलें ॥

---

१. कल्पवृक्षा. २. उत्तमांत उत्तम, फारच उत्तम. ३. युद्ध. ४. 'वैरा' असा अन्य पाठ आहे. ५. सुख. ६. लज्जा. ७. वेद. ८. मत्+हृदयीं=माझ्या हृदयांत. ९. गतप्राण झालें. १०. नाचले.

'धन्य भूप तूं' म्हणुनि स्यंदनावरुनि[1] गुप्त राघव होतां दाटला ।
मनीं विस्मय, तों सर्वांसि तया पर्वासि द्वेष सूटला. ॥सगुण० ॥४॥ १११

(छप्पै.)

सुन सम अस्तुत सबहि सबनकी पुनि सीतापत ।
भये गुप्त तत्काल होत अचरज[2] सबहूं अत[3] ॥
राम न मानुख[4] जान सरनप्रतपाललोकबर[5] ।
गावत बेद पुरान सिद्ध जोगी सुरमुननर ॥
व्यापो आकासपताललों सो नही रीतो[6] कहूं ठावही ।
ईक बाल जाके ख्याळको सो मर्म न काहूं पावही. ॥ ११२

(कबित्त.)

जानो कहता है जानो न जाय जाकी करतूतका मैं कैसो समानो ।
मानो तो एक नातो बिफर अनेक जो न थोडो बहुत हाटबाट न बिकानो ॥
कानोके कुरस्यानो कुबरो सुहानो जाको राघव परत पार कहूं न दिखानो ।
खानो गरम श्रीराम रमन पावे बिध क्या है फकिरी क्या अटल खजानो. ११३

(दिंडी.)

जगद्यापि श्रीरामदर्शनेन । जन्यते वै सर्वतः प्रमोदेन[7] ।
मिथः सैन्यं मीलितं महाप्रीत्या । अवादंत वाद्यानि एकमत्या. ॥ ११४
शिवोऽप्यापृच्छत्क्ष्माभृतं जगाम । तिरोभूत्वा प्रमथादिभिः स्वधाम ।
वीरमणिना शत्रुघ्नसमेतेन । कृतं गमनमश्वानुसारकेन ॥ ११५

(साक्या.)

रामचरित जे ऐकिति नर त्यां अणु[8] भवदुःख न बाधे ।
इहपर सौख्य घडुनि निजदेही आत्मरूपता लाधे ॥
ऐसी व्यासध्वनी[9] हो! । निश्चय धरा मनीं हो! ॥ ११६
बल्लाळ श्रीसद्गुरुपदपंकजिं निज ठेउनि माथा ।
पद्मपुराणांतर्गत सुंदर संपविली रघुगाथा ॥
गाउनि गोड करा रे![10] । जिविं शिशुवाक्य धरा रे! ॥ ११७
मज्जनिता[11] श्रीव्यंकटेशवर दिव्य रमा मन्माता ।

---

१. रथावरून. २. आश्चर्य. ३. अति, पुष्कळ. ४. मनुष्य. ५. शरणांचें प्रतिपालन (रक्षण) करणारे जे लोक आहेत त्यामध्यें श्रेष्ठ. ६. रिकामा. ७. आल्हादेन. ८. तिळमात्र, थोडें देखील. ९. व्यासवाणी. १०. 'जिविंशि सुवाक्य धरा' असा अन्य पाठ. ११. माझा पिता.

मध्यमसुत कविराघव रघुवरअश्वमेध गुणगाता ॥
बुधजन काव्य कथा हे । लावा मान्य पथा हे. ॥ ११८

---

# अनामकविकृत

## २४. राधाकृष्णसंवाद.

(गीतिवृत्त.)

गोविंदा! गोपाळा! कृष्णा! विष्णू! मुकुंद! घननीळा! ।
धृतकौस्तुभवनमाळा! पीतांबरधारि! देवकीबाळा! ॥ १
कोणी एके दिवशीं रतिसुख देऊनि सत्यभामेला ।
गेला तो राधेच्या सदनीं, जो कां बहूत घामेला. ॥ २

(श्लोक.)

राधा प्रितीनें पुसते हरीसी, 'आरक्त ते लोचन कां तुम्हासी? ।
कोणे स्त्रियेशीं रतिसंग केला? मुखीं असे पिंगट वर्ण आला?' ॥ ३

(गीतिवृत्त.)

श्वास मुखीं, नरवरमुखक्षतचिन्हें पाहिलीं तिनें सकळ ।
'न कळत मज सवतीशीं रतला' म्हणऊनि जाहली विकळ. ॥ ४
पडतां विकळ सकळगुणसंपन्न हरी म्हणे, 'अहो! राधा! ।
आतां सांग सखे! मज कैशी इतुक्यांत जाहली बाधा?' ॥ ५

(श्लोक.)

'चिरा मस्तकींचा कसा चोळलासे, विचारें कधीं पेंच कां मोकळासे? ।
सुगंधादिकीं केश ते सिक्त होती, बहू वेळ तूं रे! कुठें गुंतलासी?' ॥ ६

(गीतिवृत्त.)

'करितीस कलह कां तूं? कथितों मी ऐक धरुनि विश्वास ।
होतांचि स्मृति धांवत आलों म्हणऊनि दाटला श्वास.' ॥ ७

---

१. कौस्तुभ व वनमाळा धारण करणारा. २. ज्याला घाम आला होता असा. ३. लाल, तांबडे. ४. नर+वर+मुख+क्षत+चिन्हें=मनुष्य+श्रेष्ठ+तोंड+क्षत, छिद्र+खुणा=मनुष्यश्रेष्ठ जो कृष्ण त्याच्या तोंडाला क्षतें पडलीं आहेत असें राधेला वाटलें. [कोणी स्त्रीनें कृष्णाचें चुंबन घेतल्यामुळें क्षत पडलें असावें.] ५. हें राधेचें भाषण आहे. ६. 'ओळलासे' असा अन्य पाठ आहे. ७. हें कृष्णाचें भाषण आहे. ८. आठवण.

[१]कोठें गेलां होतां माधवजी! घर्म केंवि अंगाला? ।
सांगा, लाज नका धरूं, पाहों द्या काय लागलें गाला?' ॥ ८

(श्लोक.)

'[२]वेनीं पों[३]वळी गाय माझी पळाली, तियेलागिं आणावया रात्र झाली ।
अशा जाग्रणें नेत्र आरक्त झाले, मुखीं तेज नाहीं असे कष्ट केले. ॥ ९

(गीतिवृत्त.)

गाई चारित उष्णीं फिरलों म्हणऊनि घर्म अंगाला ।
कस्तूरीतिलकातें लावीतां हात लागला गाला.' ॥ १०
मग ती विभुलागिं पुसे, 'तुमची विपरीतसंगमीं चर्या ।
मर्यादेची मजहुनि कोण मिळाली तुम्हांस यदुवर्या!' ॥ ११

(श्लोक.)

'[२]मध्यान्हीं अतिगंधि तीं [४]सुमनसें आणावया पातलों
आकाशीं घन दाटलें म्हणउनी जाईतळीं बैसलों ।
पुष्पांचे रसबिंदु जाण पडले तेणें सुगंधू सये!
पागोटें जरि गुंतलें तरुवरी हें ठाउकेंही नव्हे.' ॥ १२
'[५]ओष्ठीं दिसे अंजन कां तुम्हासी, [६]ठसावलें कंकण [७]पृष्ठिकेसी ।
[८]वक्षस्थळीं माळ हि रूतलीसे.' अशा विनोदें हरिलागिं पूसे. ॥ १३
'[९]वेनीं जांबुळें भक्षिलीं येतयेतां, दिसे ओष्ठ काळा सखे! तूज आतां, ।
अकस्मात येतां तुझे मंदिरासी, तुझें द्वार गे! लागलें पृष्ठिकेसी.' ॥ १४

(गीतिवृत्त.)

'[५]माझें दुर्दैव सख्या! म्हणउनि तुज गोष्ट हे बरी सुचली ।
जारा! बारा घरच्या चोरा! तुज सांग कोण ती रुचली?' ॥ १५
'[९]घरीं गाय वत्सें असे मोकळीं गे! तयाचें लघू शृंग तें लागलें गे!' ।
अशीं उत्तरें देत तो राधिकेसी, 'पुरे बोलणें कृष्णजी! तूजपाशीं.' ॥ १६

---

१. हें राधेचें भाषण आहे. २. हें कृष्णाचें भाषण आहे. ३. पोंवळी हें गाईचें नांव आहे. ४. पुष्पें. ५. हें राधेचें भाषण. ६. बोंचलें. ७. पाठीसी. ८. उरीं. ९. हें कृष्णाचें भाषण.

# [1]मोरेश्वरकविविरचित

## २५. [2]चंद्रावलीचरित.

(गीतिवृत्त.)

[3]कुटिला [4]विमला मतिनें [5]वंचितसे जो [6]व्रजांत [7]जायांतें ।
नमुं त्या श्रीहरिचरणा दुर्धर [8]संसारव्रजिन [9]जायातें. ॥ १
श्रवणीं [10]वंशी वंशि[11]ध्वनि संचरतां स्मरोनि कुंजातें ।
[12]युवतिजन चालिला त्या [13]सुरभिसमयसमलता निकुंजातें. ॥ २
त्या [14]एकसरें उठल्या वाटति गो[15]कुलघनांतुनी [16]चपला ।
किंवा व्रजकुंडांतुनि निघति स्मरवन्हिच्या [17]शिखा [18]चपला. ॥ ३
[19]स्वस्वगृहाहुनि सर्वहि गोरसविक्रय करावया रमणी ।
निघतां सत्वर मार्गीं पाहति सहसा मुकुंद [20]जारमणी. ॥ ४
[21]गोपावृत गोपाळा पाहुनि, गोपी सशंक चालाया ।
होउनि, 'काय करावें?' म्हणती, 'पशुपाळका [22]कुचाळा या. ॥ ५
चंद्रावळि या नावें [23]मुखरिण गोपी बहीण [24]राईची ।
[25]धीट सुरूपा, चतुरा, संगति अवघ्या दढा धरा [26]ईची.' ॥ ६
यापरि निश्चय करुनी, चालति मागें समस्तही [27]वनिता, ।
वनिं तांडव करि [28]खांडवरिपुचा सारथिहि [29]आत्मभूजनिता. ॥ ७

---

१. हा कवि कोण होता, काय करीत असे, किती वर्षांपूर्वीं होऊन गेला इत्यादि माहिती मुळींच कळत नाहीं. ह्या कवीनें आपणास 'धुंडिकुमार' असें म्हटलें आहे यावरून त्याच्या बापाचें नांव धोंडोपंत किंवा धुंडिराज असावें. धुंडिराजकृत 'प्रऱ्हादचरित्र' या भागांत मागेंच आम्हीं छापविलें आहे. (पृ० ४३-४८ पहा.) २. ही कथा 'अग्निपुराणां'त आहे. याच कथानकावर भिंगारकर नागेश कवीनेंही एक श्लोकबद्ध काव्य रचिलें आहे. चंद्रावळी ही राधेची बहीण होती. हें आख्यान बरेंच सरळ व रसाळ आहे. ३. कपटी. ४. पवित्र, शुद्ध. ५. फसवीत असे. ६. गोकुलांत. ७. स्त्रियांतें. ८. संसारातील पाप. ९. जावें म्हणून. १०. मुरली, पांवा. ११. मुरलीरव. १२. स्त्रीसमूह. १३. वसंतकाळ. १४. एकदम. १५. येथें 'उपमा' अलंकार आहे. १६. विद्युल्लता. १७. ज्वाळा. १८. चापल्ययुक्ता. १९. आपापल्या घराहून. २०. व्यभिचार करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ. २१. गोपांनीं आवृत (वेढिलेला), ज्याच्या सभोंवतीं गोप आहेत असा. २२. कुचेष्टा करणाराला. २३. श्रेष्ठ, पुढारी. २४. राधेची. २५. हीं चंद्रावळीचीं विशेषणें आहेत. २६. चंद्रावळीची. २७. स्त्रिया, बायका. २८. अर्जुनाचा सारथी. (कृष्ण.) यांत **पर्यायोक्त** अलंकार झाला आहे. २९. ब्रह्मदेवाचा बाप. (कृष्ण.)

तों [1]पथिं पेंधाप्रमुखा धांवति शिशु मुररिपू दयालु गडी ।
[2]अवरोधुनि तरुणीजन, झोंबति [3]अर्वाच्य फेडुनी लुगडीं. ॥ ८
सरकुनि चंद्रावळिनें पेंधा बडवुनि सवेग टाळीला, ।
स्फुंदत स्फुंदत सांगे, 'हरि! चल आणूं तये [4]खेटाळीला. ॥ ९
अतिरूप सुवय यांनीं मानी [5]तृणतुच्छ ऊर्वशी रंभा ।
हंसगती पदिं चमके गमती [6]नमिताति ऊरुशीं [7]रंभा. ॥ १०
सूच्यग्रापरि मुळिंचा खंडित दिसतो वलित्रया [8]माज ।
विश्रुत मदनास तशा जपुनि चला, हरि हरीं तिचा [9]माज. ॥ ११
[10]पीनोन्नत [11]कुच वर्तुल [12]स्मरदुर्जयदुर्गयुग्मसे दिसती, ।
[13]तनुवाङ्मन अति चंचल, म्हणवी [14]कुटिलालका अनादिसती. ॥ १२
अतिमृदुला [15]करवल्ली सह्लील हिं जीं [16]सनाल कीं कमळें ।
अद्भुत वदनश्रीची [17]सुषमा जी पाहतां [18]मृगांक मळे. ॥ १३
[19]विद्रुमभंगाचे परि शोभे अधरोष्ठ, [20]नासिका सरला; ।
तिलसुम [21]शुकचंचूचा पाहुनि मदगर्व सर्व [22]ओसरला. ॥ १४
सर्वोत्कृष्ट विराजे चपलायतदृष्टि ते [23]निकी लाली ।
लज्जित [24]शतपत्रश्री, [25]मज्जन करिते गभीर [26]कीकालीं. ॥ १५
यापरि सौंदर्याची सीमा कथितां हरि त्वरें उठिला, ।
खंडिन गर्व तियेचा, दाखविं मजला कुठें उभी [27]कुटिला? ॥ १६
पेंधा श्रीकृष्णातें दाखवि दुरुनी [28]सगोरसा [29]महिला, ।

---

१. रस्त्यांत, मार्गीं. २. अडवून. ३. चावट. हें पेंदाप्रमुखा शिशूंचें विशेषण. ४. दांडगीला. ५. तृणतुच्छ मानी=कःपदार्थ समजे, कस्पटाप्रमाणें मानी. ६. नमिताति=श्रेष्ठत्व कबूल करितात. ७. केळी, कदली. ८. कंबर. ९. उमटपणा. १०. पुष्ट व उंच. ११. स्तन. १२. स्मर+दुर्जय+दुर्ग+युग्म=मदन+जय मिळण्यास कठिण+किल्ले+द्वय. दोन=जय मिळण्यास कठिण असे हे स्तन मदनाचे दोन किल्लेच आहेत असें दिसतें, १३. तनु+वाङ्+मन=शरीर, वाचा आणि अंतःकरण. १४. कुरळकेशी. १५. हस्तरूपी लता. १६. देटासकट. १७. शोभा. १८. चंद्र. १९. विद्रुम=पोंवळें. २०. नाक. २१. पोपटाच्या चोंचेचा. २२. नाहींसा झाला. २३. खरोखर. २४. कमळाची शोभा. २५. स्नान. २६. पाण्यांत. २७. कपटी. २८. जिच्यापाशीं गोरस (दूध) आहे अशीला. २९. स्त्रीला.

जीच्या सौंदर्यातें साम्यचि न मिळे ससागरा[1] महिला'. ॥ १७
चंद्रावळिच्या रूपा पाहुनि इच्छी हरी मनीं सुरता ।
ते क्षणिं मूर्च्छित होउनि देवहि दवडी समग्र तो सुरता[2]. ॥ १८
ऐशा मतिनें यदुकुलभूषण तेव्हां सवें किशोराशीं[3] ।
येउनि, गोपस्त्रीला मागत दधि[4], दुग्ध[5] तो यशोराशी. ॥ १९
मस्तुमिषें[6] निजवस्तुसि याचित निस्तुलगुणी[7] स्त्रियांजवळी ।
कस्तुरिलिप्त स्तनिंचा चित्तें [हरुनी] हरी समाज वळी. ॥ २०
'शपथपुरःसर[8] करिसी जरि तूं संकल्प देहदानाचा ।
तरिच घडेल सुकृत[9] बहु, नातरि यापरि धना सदा नाशा.' ॥ २१
'बोलुंनि[10] मिथ्या पदरीं दुष्कृत[11] कां व्यर्थ घेसि वाचाळा[12]! ? ।
ठकविसि गोकुळतरुणी या तो स्थळिं सोड सर्वही चाळा.' ॥ २२
'नायिकसी[13] चंद्रावळि! जरि साधुत्वें[14] मदुक्ति या परमा[15] ।
दाविन जनदृष्टीसी निरसुनि चैला[16] दिगंबरा परमा[17].' ॥ २३
'सर[18] सर परता दुष्टा! क्लिष्ट[19] न बोलें वरिष्ठ[20] मी जाया[21] ।
काय वदूं तुजसंगें? पशुपा[22]! तटलें[23] निजाश्रमीं जाया. ॥ २४
दुर्धर[24] सर्पिणिदेहा स्पर्शिल हस्तांनिं कोण तो भलता? ।
रक्षक असतां विपिनीं[25] रंका लाभेल केंवि पुष्पलता? ॥ २५
गरुडध्वजगारुडिया! भारुड हें तूं किमर्थ दाखविसी? ।
तुजविषयीं मी न ढळें, [26]पंचाक्षरिमंत्र ज्या सदा खविसी[27]. ॥ २६
अर्भक गगनफळातें रडतां श्रमले, करोनि लोळणिसी ।
त्यापरि यत्न मुधा[28] ते मज तूं करिसी समर्थ गौळणिसी. ॥ २७

---

१. समुद्रवलयांकित पृथ्वीला. २. देवपणा. ३. मुलांस. ४. दहीं. ५. दूध. ६. लोण्याच्या मिषानें. 'मस्तु' याचा आजकाल हिंदीभाषेंत 'मस्का' असा अपभ्रंश झाला आहे. ७. निरुपम आहेत गुण ज्याचे असा. ८. हें कृष्णाचें चंद्रावळीपाशीं भाषण आहे. ९. पुण्य. १०. हें चंद्रावळीचें कृष्णाशीं बोलणें आहे. ११. पाप. १२. चावटा, बडबड करणाऱ्या. १३. हें कृष्णाचें भाषण आहे. १४. नीटपणें, सरळपणें. १५. उत्तमा. १६. वस्त्रा. १७. शेवटीं, अखेरीस. अन्वय—परमा (शेवटीं, माझें पूर्वार्धांतील सांगणें न ऐकशील तर) चैला निरसुनी (तुझें वस्त्र फेडून) दिगंबरा (नग्न) जनदृष्टीसी (लोकांना) दावीन (दाखवीन). १८. हें चंद्रावळीचें भाषण आहे. १९. अनिष्ट, आचरट. २०. श्रेष्ठ. २१. स्त्री. २२. पशूंचें पालन करणाऱ्या! (कृष्णा!) २३. अडलें. २४. हें अर्ध सुभाषितरूप आहे. २५. वनीं. २६. 'नमः शिवाय' हा पंचाक्षरी मंत्र. २७. जखीण. २८. व्यर्थ.

एक पदाही न पुरे त्या सुरवर्या फळे कसी जगती? ।
रवि शशि तारागण हे मुष्टित अवघी धरील हें जग ती. ॥ २८
विधि[1]वर्जित पुरुषातें लाभेल किं काय खाणि प[2]रिसाची? ।
दैवहता! गुणहीना! करिसी तृष्णा तयापरी साची. ॥ २९
नानापरि बडबडुनी मिरविसि लोकीं मृषा सदा [3]शीला ।
परिसांचीं मीं सदनें बांधुनि दिधलीं स्वदासदाशींला. ॥ ३०
[4]श्रोत्रियशालांतरिंची [5]अरणी कैसी मिळेल [6]मातंगा? ।
अथवा सिंहवधूसीं संगम कैंचा घडेल [7]मातंगा?' ॥ ३१
'[8]जगरक्षणयज्ञीं मी दीक्षित अध्वर्यु वीतिहोत्राही ।
नरसिंह मि, तव वदनें वदविन, 'हरि! तूं अम्हांसि हो! [9]त्राही.'॥ ३२
यापरि [10]केशिनिहंता या संकेतासि गोपजायांतें ।
बोलुनि सत्वर उठिला, निजसदनाप्रति [11]सगोप जायातें. ॥ ३३
गोपाळहि गोरक्षक संनिध बसवुनि [12]अनेकधा त्यांसीं ।
गोष्टी बऱ्या शिकविल्या, सृष्टिक्रमयुक्ति तेंवि धात्यासि. ॥ ३४
'मायामयची तेची मी धरितों सांग जगत्सूत्रा मा ।
[13]रुचिराकृति राईची तुमजे ते व्यक्ति विशद [14]सूत्रामा. ॥ ३५
नटवेषाकृति योषा होउनि दास्यत्व अंगिकारावें ।
सर्वहि अतिसौंदर्यें भासति जीतें तिला स्विकारावें.' ॥ ३६
सर्वाधीश [15]निदेशें वनितावेषें [16]शिशूतती व्रजिंची ।
चंद्रावळिच्या मागें निघति [17]अहंकृतिमदोर्मि तीव्र जिची. ॥ ३७
[18]श्रीमद्वृष्णिकुलेशें सुंदर वरिलें स्वरूप राईचें ।
[19]लीलानिधिगर्भीचें रत्नचि निर्मळ नवे [20]पराईचें. ॥ ३८

१. दैवहीन. २. हें अर्ध सुभाषितरूप आहे. परिस=याच्या स्पर्शानें लोखंडाचें सुवर्ण बनतें—अशी समजूत आहे. ३. शील=उत्तमाचार, सद्वर्तन, यथाशास्त्रवर्तन. ४. अग्नि-होत्र्याच्या शालेंतील. ५. समीध. ६. मातंगा=अतिशूद्रा, मांगाला. ७. हत्तीला. ८. हें कृष्णाचें भाषण आहे. ९. रक्षण कर. १०. केशिदैत्याचा नाशकर्ता. (कृष्ण.) ११. गोपाळांसह, गवळ्यांसहवर्तमान. १२. नानाप्रकारच्या. १३. सुंदर शरीर. १४. इंद्रास. १५. आज्ञेप्रमाणें, आज्ञेनें. १६. किशोरसमूह. १७. अहंकृति+मद+ऊर्मी=गर्व आणि उन्माद यांच्या लाटा. १८. यादवकुलांतील श्रेष्ठानें. (कृष्णानें.) १९. [कृष्णाची] लीला हाच निधि (ठेवा) त्याच्या गर्भांतील (पोटांतील) रत्न. २०. कौतुकाचें.

श्रीहरि चंद्रावळिच्या कृत्रिमवेशें गृहा करी गमन ।
[1]भगिनीआश्लेषाची उत्कट धरितो [2]स्पृहा [3]करीगमन. ॥ ३९
प्रेमालिंगन घडतां ठसली दृढताष्ट [4]सात्विका भावीं ।
चंद्रावळि भगिनीच्या मोहें ते मूर्ति [5]आत्मिका भावी. ॥ ४०
'शिणली बाई' म्हणउनि, घडिघडि कुरवाळुनी वरा ईतें ।
घेत असे, परि न कळे सुरवरऋषि मोहिनी बलाईतें. ॥ ४१
'[6]व्रतदानादिक सुकृतें देवहि जाले वसुंधरे वरिले ।
तुज पाहतां त्रिभुवनिचें वाटे साम्राज्य सुंदरी! वरिलें. ॥ ४२
[7]अष्टावष्टसहस्रा असतां युवती करीत जो [8]जारी ।
म्हणवी श्रेष्ठ [9]नियंता [10]खळजनहंता बहूत जो[11]जारी. ॥ ४३
तव वदनें ऐकावी वाटे मनिं कांतलोभवार्ता ते ।
[12]पुण्यश्लोका [13]ललिता ऐकत सुख देति कीं [14]भवार्तातें. ॥ ४४
श्रीवल्लभ तुजसंगें रतिविरतीतें कसा धरी सांगें, ।
[15]अनुमत होउनि [16]विवरीं बहु दिन राहे प्रबुद्ध रीसां गे!' ॥ ४५
'[17]असती बहु जरि [18]योषा तोषा मजविण नये, सये! हरिला ।
गर्व [19]प्रमदावलिचा मजसीं [20]अनुरक्तअन्वयें [21]हरिला. ॥ ४६
भामाप्रमुखा सवती शिकविति कुमती हरीस एकांतीं ।
परि [22]अनुरागें माझ्या, न दिसे [23]अणु [24]वक्रता सये! कांतीं.' ॥ ४७
पडतां वदनें जडली तत्पतिसुखकर कथावलीश्रवणें ।
प्रेमोत्कर्षें हृदयीं चंद्रावळि बहु [25]सुखावली [26]श्रवणें. ॥ ४८
'[27]अतिशयअनुरागत्वें कौस्तुभपद्मादि [28]उत्कटा ठेवी ।
हरि ठेवी मजपाशीं, कां करिसी या सये! उठाठेवी?' ॥ ४९

---

१. बहिणीच्या आलिंगनाची. २. इच्छा. ३. हत्तीसारखें चालणें आहे ज्याचें असा. ४. मागें पृष्ठ १६ टीप २ पहा. ५. आप्तसंबंधी. ६. हें चंद्रावळीचें भाषण आहे. ७. सोळा हजार. ८. जारकर्म करणारा, व्यभिचारी. ९. स्वामी, धनी, शासनकर्ता. १०. दुष्ट लोकांस दंड करणारा. ११. ज्याचा संसार मोठा आहे असा. १२. पवित्र. १३. स्त्रिया. १४. संसारार्तातें. १५. आपली संमती देऊन. १६. बिळांत. १७. हें राधारूपी कृष्णाचें भाषण आहे. १८. स्त्रिया, प्रमदा. १९. स्त्रीसमूहाचा. २०. मजवर प्रीति करून. २१. नाहींसा केला. २२. प्रीतीनें. २३. तिळमात्र, थोडासा देखील. २४. वांकडेपणा. २५. सुख पावली. २६. ऐकून. २७. फार प्रीतीच्या योगानें. हेंही राधारूपी कृष्णाचें भाषण आहे. २८. उत्तम, श्रेष्ठ.

प्रक्षाळुनि पदकमला कमलाक्षी ते न लावितां उशिरा ।
[1]शिशिरांबु प्राशविते [2]ऐलाकर्पूर घोळुनी [3]उशिरा. ॥ ५०
पाय धुतां पायातें पाहुनि, पुसते [4]स्वसेस पर्याई ।
'[5]हरिपदपद्मिंचि चिन्हें दिसती तरिही कसीच [6]पर्याई ?' ॥ ५१
'आंगीं लाउनि बाई! लेप चमेली [7]सुगंधरायाचा ।
ठेउनि वसनें व्हावें, नाहीं संशय दुजा धरायाचा. ॥ ५२
स्वकरें [8]ग्रंथि खुणेची दिधली हरिनें निरीस [9]कंचूला ।
विघड पडे जैं त्यातें जाचिल मजला धरूनि कंचूला. ॥ ५३
विंचरुनि वेणि करितो हरि तो [10]घनकांतिजित्वरां केशां ।
[11]मृगमदतिलक ललाटीं स्वकरें करितातिं वक्र [12]राकेशा. ॥ ५४
[13]वदंती उत्तम हें कीं लोकीं पतिचा [14]निदेश मानावा ।
त्यांत यशश्रीकीर्ती चढते [15]सुषमा पराक्रमा [16]नांवा. ॥ ५५
अस्ता दिनमणि जातां जनार्दना तूं [17]विवंचना रीते ।
उठवी [18]भुक्तिसि, जीचीं [19]करणें सुरतीं [20]विवंचं नारी ते. ॥ ५६
गोष्टि असो हे जाली भुक्तिचि तुझिया बहु त्वरा मातें.' ।
म्हणुनि कराब्जीं धरुनी ये निज सदनांत [21]गोपरामा ते. ॥ ५७
बहुविध पक्वान्नोदन खीरहि लेह्यादि, षड्रसें भरित ।
कर्मटि, पापड, शाका, कोशिंबरि, [22]तिक्तें फारसें भरित. ॥ ५८
तिखटें विविध [23]वैरान्नें रुचिकर वडिया किसूनि [24]कुष्मांड ।
जेववित बहिणीतें, ते जरि आली करोनि [25]कुष्मांड. ॥ ५९
पंक्तिसि सारुनि भुक्ती बोलत युक्ती [26]स्वकेलिगेहांत. ।
'स्वस्थ निजूं वो! सखये! तेथ' म्हणत धरुनि चाल गे! हात. ॥ ६०

---

१. हिमांबु, थंड पाणी. २. एला=वेलदोडा, वेलची. ३. वाळा (पाण्यांत घालण्याचा). ४. बहिणीस. ५. हें चंद्रावळीचें भाषण आहे. ६. आश्चर्य, कौतुक. ७. सुगंधराय=एक प्रकारचें सुगंधि तेल. ८. गांठ. ९. चोळीला. १०. काळे कुळकुळीत. मेघाच्या कांतीला जिंकणाऱ्या अशा. ११. कस्तुरी. १२. चंद्राला. १३. हें अर्थ उत्तम सुभाषितरूप होय. ह्या अर्थाप्रमाणें वागणाऱ्या आजकाल किती बायका आढळतील? १४. आज्ञा. १५. शोभा, सौंदर्य. १६. नांवाला. १७. काळजी. १८. भोग, उपभोग. १९. इंद्रियें. २०. वंचक, धूर्त, फसव्या. २१. अहीरभार्या, गौळीण. २२. तिखट. ['तिक्त' याचा मूळ अर्थ 'कडू' असा आहे.] २३. उत्तम अन्नें. २४. कोहळा. २५. खोटा आळ. २६. आपल्या क्रीडागृहांत.

रात्रीं राहुनि विपिनीं[1] रक्षिति पति साभिमान गोशाला[2] ।
व्याघ्रवृकादि[3] ससेही जागृत चढवुनि कमान गोशाला[4]. ॥ ६१
ऐकुनि वचनें **राई** लीलासदनांत सत्वरा गेली ।
पूर्विल **चं**द्रावळिचें पाहुनि जे नामसत्व[5] रंगेली[6].॥ ६२
सरस सुपारी चिकणी, वीड्या करुनी सुपक्क पानांच्या ।
भगिनीस देत जीच्या तृष्णा[7] दिसताति ओष्ठपानाच्या[8]. ॥ ६३
विविध सुगंध द्रव्यें, शय्या मृदु गेह चित्रशालेचें ।
प्रावर्णेहि[9] ज्या स्थानीं कार्पासान्वित[10] विचित्र शैलेचें[11]. ॥ ६४
सुखगोष्टी विमलांगी बसुनि पलंगीं परस्परें करिती ।
स्वस्वपतीचीं[12] चरितें प्रणयाचरितें[13] तशाच लोकरिती. ॥ ६५
झोंपिस जातां गोपी जगदाटोपी[14] त्यजोनि वेषातें ।
जो पीनस्तनिं[15] वोपी कर, अति सोपी करोनि योषा ते. ॥ ६६
गाढालिंगन[16] ओष्ठग्रह कुचपीडा क्रमें **र**माकांतें ।
सुरतारंभण केलें वंचकमतिनें मनोरमाकांतें. ॥ ६७
निधुवन[17] निजकांताचें मानुनि, बोले खलद्गिरा[18] पतिला, ।
'**रा**हि असे शेजारीं, पाहुनि विधि हा चढेल कोप तिला. ॥ ६८
दुजिया संनिध रमतां दोष विशेषें अयोग्य हें करणें ।
त्यांतहि माझे बहिणीदेखत अर्वाच्यता[19] कशी करणें ?' ॥ ६९
सुरतायासें तरुणी जागृत होउनि बरें विलोकी जों ।
हृदयावरि **मु**रलीधर रमतो, व्रजवेष दावि लोकीं जो. ॥ ७०
थरकुनि सरकुनि पाहे, परी **मु**कुंदें चहूं भुजीं धरिली ।
निरखुनि, रागें गरकुनि, बोले बरि खुण समग्र उद्धरिली. ॥ ७१
'शिव ! शिव ! करुणामूर्ते ! **सां**बा ! मति घोर संकटीं पडली, ।
विपिनामाजी निशिं या व्याघ्रकरीं जेंवि धेनु सांपडली. ॥ ७२

---

१. अरण्यांत. २. गोषाला, अंतःपुराला. ३. वाघ, लांडगे वगैरे. ४. गाईचा गोठा. ५. कीर्ति आणि सदाचरण. ६. रागावली, क्रुद्ध झाली. ७. तहान. ८. अधरपानाच्या. (चुंबन घेण्याच्या.) ९. पांघरूण. १०. कापूसाचें. ११. शाल=काश्मिरांतील लोंकरीचें उत्तम वस्त्र. १२. आपापल्या पतींची. १३. नेमचरितें. १४. जगत्+आटोपी=जगाला आटोपणारा (कृष्ण). असा प्राकृत संस्कृत शब्दांचा संधि करणें अप्रशस्त आहे. १५. पुष्टस्तनिं. १६. दृढ आलिंगन. १७. सुरत. १८. खलत्+गिरा=दुष्ट वाणी, रागाचे शब्द. १९. चावटपणा.

कृष्णा! पुरविलि तृष्णा लावुनि माझ्या कलंक वंशातें ।
वंचाया[1] कुलयुवती[2] फिरसी स्वकरीं धरूनि [3]वंशातें. ॥ ७३
आज्ञापावी तनु ते श्रीहरि हरिसुतनुता सुवास्तव्या ।
स्थिरचर विश्वव्यापक मूर्ती जे हीच मानवा स्तव्या[4]. ॥ ७४
भरतां मन्मथ देहीं, सुरतीं तेंही[5] रती[6] धरी दुपटा[7], ।
निष्कपटा श्रीहरिसीं विहरे, गतवास[8] कंचुकी दुपटा[9]. ॥ ७५
चतुरधिकाशितिबंधें[10] करुनि मुकुंदें बृहत्तरा रजनी ।
रत केलें, परि कोणा न कळे तिलमात्रही विचार जनीं. ॥ ७६
गोपि सकामा केली, अतिशय निष्काम पूर्णकामानें ।
दीनोद्धरतनुसंगें युवती अपवर्ग[11] कामुका माने. ॥ ७७
श्रीमच्छ्रीपतिहस्तस्पर्शें गोपांगना सदाचरणीं ।
राहुनि, नटली कुटिला मति ते त्यागुनि सुखें सदाचरणीं. ॥ ७८
सदसद्वस्तुविचारें चिन्मयपदलाभ जोडला सहजें ।
अद्वयवातें उडती, आनंदाब्धित तरंग त्यासह जे. ॥ ७९
सुरतांतीं हृदयावरि ठेवुनि कर [12]चीर सत्रपा[13] हुडकी[14] ।
वस्त्र न दे हें जाणुनि म्हणते, 'हा नंदपुत्र पाहुड कीं.' ॥ ८०
नम्रमुखें सखि विस्मित होउनि सुस्मित हरीस मागतसे, ।
'देइं दयाळा! लुगडें उघडें वपु नष्टकांति भासतसे.' ॥ ८१
वास[15] न दे तो कालियशासन[16] ललना कृशानुसी[17] दिसते, ।
कुतुकें बोले तिजला, 'नाठविसी काय मानसीं दिसे[18] ते. ॥ ८२
सामर अमरावतिचें जेणें वैभव दिलें शतक्रतुला ।
त्याप्रति नेणसि म्हणसी, 'नेदीं दधि, दुग्ध, लेश तक्र तुला.' ॥ ८३
'सर्व असो तें प्रस्तुत घडलें हें मान्य कर्मयोगानें ।
देउनि वसनें माझीं सुकृत तनू हो गृहोपयोगानें.' ॥ ८४
त्यानंतर यदुराजें त्या व्रजभाजेस देउनी वासा ।
प्रेमें हृदयीं धरुनी, इच्छित गमनासि देव [19]नीवासा. ॥ ८५

---

१. फसवाया, ठगवाया. २. गृहिणी. ३. मुरलीतें. ४. स्तवण्यास योग्य. ५. चंद्रावळी. ६. प्रीति. ७. दुप्पट. ८. नग्न. ९. उत्तरीय वस्त्र, शेला. १०. चौऱ्यायशीं आसनें. (हीं कामशास्त्रीं प्रसिद्ध आहेत.) अनंगरंग–दहावा भाग पहा. ११. मोक्ष. १२. वस्त्र. १३. लज्जेनें. १४. शोधी. १५. वस्त्र. १६. कालियनामक सर्पाला शासन करणारा. (कृष्ण.) १७. कृशानु= अग्नि. १८. दिवस. १९. गृहा, वसतिस्थाना.

'धन्य तुझी करणी हे कृष्णा! जननी तुतेंचि हो! व्याली[1] ।
'व्रजजन यापरि सर्वहि गाती विटेचौर्यशौर्यओव्याली[2].' ॥ ८६
'तुटती यातायातें जे नर मज ते अनन्य वोळगती[3] ।
निरसुनि दुरहंकृतितें देइन त्यातें सखे! विशाल गती.' ॥ ८७
'बकशकटादिक कपटा ब्रह्मेंद्रकृता निवारि घोषांच्या[4] ।
उभवति कामें गुढिया, उभवति इहपर सुकीर्ति घोषाच्या.' ॥ ८८
यमनियमाद्यष्टांगें[5] जें पद न मिळे महर्षिसिद्धांतें ।
तें गोपीप्रति दिधलें, धुंडिति जें शास्त्र, वेद, सिद्धांतें. ॥ ८९
यापरि करुणापांगें सुख करि अज्ञान बंधुरा[6] जीवा ।
तोषवि सर्वां, जैसा समुदित[7] शतपत्रबंधु[8] राजीवा[9]. ॥ ९०
बहुविध युक्ति विचारें बोधुनि आभीरभीरु[10] मा[11]कांतें ।
दर्शवितां निजरूपा, त्यजिना मग सर्वहि भ्रमा कां ते? ॥ ९१
चंद्रावळिसह सुरतें क्रमिली राहुनि तिचे गृहीं दोषा[12] ।
जगदीशें या कलिच्या विलया ने जो समग्रही दोषा. ॥ ९२
आश्वासुनि गोपस्त्री अभिरत जी कांत नाथ गोकुळिंचा ।
निजसदनाप्रति जाया उठिला निस्तुल[13] शिशू शशीकुळिंचा. ॥ ९३
शिशुपालांतक शिशुंतें अवघ्या जागें करुनि वेशाला ।
सोडुनि सत्वर गेला, सार्भक[14] सूर्योदयीं निवेशाला[15]. ॥ ९४
हरि तो प्रातःकाळीं कालिंदितटीं निकुंजकांतारीं[16] ।
गोप शिशूंसह विहरे जो निजभजनेंचि भावुकां[17] तारी. ॥ ९५
कर्कश रूप सितेचें[18], प्रथमचि अम्लस्वभाव गोस्तनिचें[19] ।
चंद्रावळिचरिताग्रीं क्षीरहि नीरस समग्र गोस्तनिचें[20]. ॥ ९६
क्षैण्य[21]विगर्हित लोकीं एकचि सकलंक चंद्रमा विधिनें ।
जाणुनि, चंद्रावळि ही सृजिली[22] निर्दोष अब्द या विधिनें. ॥ ९७

---

१. प्रसवली. २. जारकर्म, चोरी, शौर्य यांविषयींच्या ओव्यांचा समूह. ३. प्राप्त होती. ४. गोकुळाच्या. ५. मागें पृष्ठ १४८ टीप ५ पहा. ६. बंधुर=बहिरा. ७. आनंदित. ८. सूर्य. ९. कमलास. १०. गवळण. ११. कृष्णें. १२. रात्र. १३. अनुपमेय. १४. मुलांसह. १५. घरीं. १६. कांतार=वन. १७. भाविकभक्तांस. १८. खडीसाखरेचें. १९. गोस्तनी=द्राक्षा. २०. गाईच्या स्तनांतील. २१. क्षीणत्वामुळें निंद्य. २२. निर्मिली.

## उपसंहार.

(गीतिवृत्त.)

बहुत चरित्रें बहुतां कविनीं केलीं तथापि या [1]चरितीं ।
गुणरसिकां पुरुषांचे अद्भुत श्रद्धादि भाव आचरिती. ॥ ९८
[2]पर्युषितत्वें कथना सांडुनियां जरि दुजेंचि [3]वानावें ।
[4]धीरोदारगुणोत्तर यासम तरि कोण? दाखवा नांवें. ॥ ९९
धुंडलीं धुंडिकुमारें हिंडुनि नि[5]गमादिकें [6]भ्रमें श्रमुनी ।
परि फळ तें व्रजिं लाभे शोधिति जें नि[7]ग्रहें [8]अजस्र [9]मुनी. ॥ १००
[10]अग्निपुराणीं कथना सांगे जें सूत शौनकप्रमुखां ।
त्या कथनीं आज्ञापी श्रीहरि मोरे[11]श्वराख्य वि[12]प्रमुखा. ॥ १०१

---

१. या 'चंद्रावळीचरित्रां'त. २. पर्युषितत्व=शिळेपणा. ३. वर्णावें. ४. चातुर्य व औदार्य या गुणांनीं युक्त. ५. वेदादिक. ६. भ्रमानें, भटकून, हिकडे तिकडे फिरून. ७. जबरीनें, मुद्दाम. ८. निरंतर. ९. दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः । वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥५६ ॥ दुःखामध्यें ज्याचें मन संत्रस्त होत नाहीं, सुखासाठीं जो उचंबळ होत नाहीं, आवड भय क्रोध हीं ज्याचीं निवृत्त झालीं, त्या विवेकी मनुष्याला स्थितप्रज्ञ ह्मणतात. १०. अग्निपुराण—हा १६००० ग्रंथ असून त्यांत ईशानकल्पांतील कथा आहेत. त्यांत अग्नीनें वसिष्ठास सांगितलेल्या ज्या कथा व्यासास मिळाल्या त्याच सूतांनीं पुनः सांगितल्या आहेतः— 'यत्तदीशानकं कल्पवृत्तांतमधिकृत्य च । वसिष्ठायाग्निना प्रोक्तमाग्नेयं तत्प्रचक्षते ॥ तच्च षोडश साहस्रं सर्वक्रतुफलप्रदम् ॥' यांत तांत्रिक कर्में पुष्कळ असून बीजें, दीक्षा, गुरूचें माहात्म्य, गयामाहात्म्य, कांहीं इतर पुराणांतील अध्याय, कांहीं स्मृतींतील अध्याय, कांहीं वैद्यक ग्रंथांतील श्लोक, कांहीं व्याकरणशास्त्रांतील माहिती, राजनीति व धनुर्वेदांतील कांहीं अध्याय वगैरे अनेक प्रकारच्या प्रतिपादनांनीं भरलें आहे. ११. मोरेश्वर ज्याचें नांव आहे त्याला. १२. ब्राह्मणश्रेष्ठा. (मुख=प्रमुख, श्रेष्ठ; '**मुखं** तु वदने मुख्यारंभे द्वाराभ्युपाययोः' इति यादवः.

# अनेककविकृत लघुकाव्यमाला.

## भाग पहिला.

# परिशिष्टें.

## (१) शुद्धिपत्र.

| पद्य. | चरण. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| | | **१. द्रौपदीस्वयंवराख्यान.** | | |
| २ | ३ | (टीप ८) ह्यागेंच जनमेजय राजाला | ह्यानेंच जनमेजय राजाला | १ |
| ११ | २ | सिंहमाजी | सिंहमार्जी | ३ |
| १४ | १ | ते | तो | ४ |
| ,, | ४ | निर्बळां लस्करां | निर्वळा लस्करा | ,, |
| १८ | ३ | यंत्रसि क्षिती | यंत्र शिक्षिती | ,, |
| २२ | २ | विभवेंही | विभवेंहि | ५ |
| २३ | ३ | सुलक्षणीं नृपगुणीं | सुलक्षणी नृपगुणी | ,, |
| २७ | ४ | देखों न तें पावलें | देखेन तीं पावलें | ६ |
| २८ | २ | नृप हृदयिं | नृपहृदयिं | ,, |
| ,, | ,, | विजयिं | विज किं | ,, |
| ,, | ६ | दिठितें | दिठीतें | ७ |
| ,, | ,, | घटीते | घोंटीते | ,, |
| ३० | २ | पाहे | पाहें | ,, |
| ३१ | १ | (टीप ४) राधेनें पळलेला | राधेनें पाळलेला | ८ |
| ,, | ३ | पार्थिव | पार्थिव | ,, |
| ५० | २ | श्रम लोकपाळ शूळा | श्रमलों कपाळशूळा | १३ |
| ,, | ५ | नमिती मस्तक | नमितों मस्तक | ,, |
| ६० | १ | तूं करि | तूं करिं | १५ |
| ६३ | ३ | पति | पती | १६ |
| ६५ | १ | यादवपति | यादवपती | ,, |

| पद्य. | चरण. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| | | **२. गजेंद्रमोक्ष.** | | |
| १३ | ४ | मानीं | मानी | १९ |
| १६ | १ | राहे | राहें | ,, |
| २० | ४ | गेलें | गेले | ,, |
| २१ | २ | हाणे | हाणी | ,, |
| २२ | ४ | सरोवरातें | सरोवरांत | ,, |
| २७ | २ | सेवू | सेवूं | २० |
| ३१ | १ | झुगारे | झुगारी | ,, |
| ३३ | १ | आसुढी | आसुडी | ,, |
| ६१ | ४ | वीसरें | वीसरे | २३ |
| ९३ | ३ | मुक्ति कैवल्यदानीं | मुक्तिकैवल्यदानी | २६ |
| ९५ | ,, | नेणें | नेणे | ,, |
| | | **३. सुदामचरित्र.** | | |
| ८ | ४ | हळहळें | हळहळे | २८ |
| १४ | ,, | (टीप ३) जाच | जाचांत, कांचांत | २९ |
| २० | २ | (टीप २४) भट्टाचें (भटाचें=वीराचें) | भट्टाचे. (भटाचे=वीराचे) | ,, |
| ३८ | ,, | आयकोनि वचनोक्तिसुधा | आयकोनि वचनोक्तिसुधा | ३१ |
| ४१ | ३ | (टीप ७)=याय ठेवण्याची | पाय ठेवण्याची | ३२ |
| ,, | ४ | (टीप ८) ७. बिल्लोरांचें आंगण | ८. बिल्लोराचें आंगण. [पुढें २५ व्या टीपेपर्यंत आंकडे फिरवून घ्यावे] | ,, |
| १०२ | १ | जयाशी | जयासी | ३८ |
| १०७ | ३ | न कळचि | न कळेचि | ३९ |
| | | **४. पारिजातकाख्यान.** | | |
| १४ | ४ | दीसे | दिसे | ४२ |
| २० | २ | लेवविले | लेवविलें | ,, |
| २५ | ४ | सच्चिदानंदें | सच्चिदानंद | ४३ |

| पद्य. | चरण. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| | | **५. प्रल्हादचरित्र.** | | |
| ११ | २ | न गणीं | न गणी | ४४ |
| १९ | १ | शूलारोपण | शूलारोपण | ४५ |
| २० | १ | माता हातें | माताहातें | ,, |
| २४ | १ | वदे | वदें | ,, |
| २५ | २ | धरिजे—जे | धरितो—जो | ,, |
| २९ | १ | स्थाणुंत | स्थाणुंत | ४६ |
| ३१ | २ | तें | तैं | ,, |
| ४५ | १ | जयजय | ‘जयजय | ४७ |
| | | **६. नारदीचरित्र.** | | |
| ९ | ३ | तो या | तोया | ५१ |
| १० | ३ | उसंत=विलंब | उसंत=विसावा, आराम | ५२ |
| ११ | २ | बृहदुदरीं धुनि धून | बृहदुदरें धुणीं धुवून | ,, |
| १२ | ६ | क्षणइक | क्षणैक | ५३ |
| | | **७. गयगंधर्वाख्यान.** | | |
| २ | १ | पारिक्षता | पारीक्षिता | ५३ |
| ३ | १ | तें, | ते | ,, |
| ८ | १ | रमाकांता! | **नारद**–‘रमाकांता! | ,, |
| १३ | ४ | अर्घ | अर्घ्य | ५४ |
| १४ | १ | सुत | सूत | ,, |
| १६ | १ | ह्मणो–जणो | म्हणों–जणों | ५५ |
| १७ | ३ | करि | करीं | ,, |
| १८ | ,, | हरिकरार्घसंधी | हरिकरार्घ्यसंधी | ,, |
| २५ | १ | अर्घ देतां | अर्घ्य देतां | ५६ |
| २६ | २ | भामातें | भामा ते | ,, |
| २७ | ,, | निजोक्ति | निजोक्ती | ,, |
| ३० | १ | त्राही त्राही | त्राहि त्राहि | ५७ |
| ३१ | १ | परियेसी | परियेसीं | |

| पद्य. | चरण. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| ३२ | ४ | धरिलि | धरिली | ५७ |
| ३७ | २ | शराणगत | शरणागत | ५८ |
| ४८ | १ | भूपति | भूपती | ६० |
| ४९ | १ | काष्टातें | कष्टानें | ,, |
| ,, | २ | त्वद्रिपुविलयन | त्वद्रिपुविलय न | ,, |
| ,, | ,, | काष्टातें | काष्टांतें | ,, |
| ५० | २ | करि त्याचि | करि त्याचि | ,, |
| ,, | ,, | कठिण तान कोपविला | कठिणता नको पविला | ,, |
| ६१ | २ | 'हा वीर पाहा | 'वीर पाहावा' | ६१ |
| ६४ | ,, | हरिक्षयार्थ | अरिक्षयार्थ | ,, |
| ,, | ,, | पद भक्तये | पदभक्त ये | ,, |
| ६५ | १ | विप्र भवाटे | विप्रभ वाटे | ,, |
| ६६ | १ | पळला ।–अर्घ त्वरातें | पळाला ।–अर्घ्य त्वरा तें | ६२ |
| ,, | ४ | हरि | हरिं | ,, |
| ७० | २ | करवि | करविं | ६३ |
| ,, | ३ | वंदु | वदुं | ,, |
| ७४ | २ | नंदात्मजभगिनि | नंदात्मजभगिनी | ६४ |
| ७५ | १ | निजमनि | निजमनिं | ,, |
| ,, | ३ | सोडीन–हेची | सोडीं न–हेंची | ,, |
| ,, | ,, | गुरुवरवरदभी | गुरुवरवरद मी | ,, |
| ७६ | १ | होउनी | होउनि | ,, |
| ७७ | ३ | होसील | होसिल | ,, |
| ७८ | २ | दाटुनियां | दाटुनि | ६५ |
| ७९ | ३ | वधि न | वधिं न | ,, |
| ८२ | २ | पांडवसदनीं | पांडव सदनीं | ,, |
| ८३ | १ | सांगतो | सांगतों | ,, |
| ,, | ३ | तसातरि | त्यजा तरि | ६६ |
| ८६ | ४ | भिडे | भिडें | ,, |
| ८८ | १ | स्वस्त | स्वस्थ | ,, |
| ९५ | ४ | धुळीनें | धुळिनें | ६७ |
| ९९ | १ | शिशु! | शिशू! | ६९ |

| पद्य. | चरण. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| ११३ | ३ | पाहे | पाहें | ७१ |
| ११४ | १ | यापरी | यापरि | ,, |
| ११९ | २ | करि | करिं | ७२ |
| १२३ | २ | उठविल | उठविला | ,, |
| १२५ | १ | मंदहांसा | मंदहासा | ,, |
| ,, | ,, | विरघोष | वीरघोष | ,, |
| | | **८. सत्यभामाविनोद.** | | |
| | | (टीप १) मंगलवाचक लोक | मंगलवाचक श्लोक | ७३ |
| १ | २ | समरसलिलया लागिं | समरसलिलयालागिं | ,, |
| ९ | ३ | पुसताहे | पुसताहें | ७४ |
| ११ | १ | त्वद्दास | त्वद्धास | ,, |
| | | **९. गजगौरीव्रताख्यान.** | | |
| ३ | १ | कोणि—गांधारी | कोणी–गांधारि | ७५ |
| ८ | १ | ततक्षणीं | तत्क्षणीं | ७६ |
| १० | २ | कल्लोळी | कल्होळीं | ,, |
| १३ | ,, | येउनी | येउनि | ७७ |
| २३ | २ | पांडु त्रिभुवनीं नंदन | त्रिभुवनीं पांडुनंदन | ७८ |
| २७ | १ | दिधला | ‘दिधला | ७९ |
| ३८ | २ | द्रौपदी जवळा | द्रौपदीजवळा | ८१ |
| | | **१०. सारीपाटकथा.** | | |
| १२ | ४ | ज्ञानकळाहि | ज्ञानकळा हि | ८३ |
| १३ | २ | जी! | जी!’ | ,, |
| ,, | ३ | भीड—वनाला | ‘भीड–वनाला’ | ,, |
| १९ | २ | नगमेळी | नगमेळीं | ८४ |
| ३० | १ | काम | कामें | ८५ |
| ४६ | ४ | द्विजाती | द्विजां तीं | ८७ |

| पद्य. | चरण. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| | | **११. मंत्रमयध्रुवचरित्र.** | | |
| १४ | १ | विद्याबळ कांति तेज रूपादि | विद्याबलकांतितेजरूपादि | ८९ |
| १८ | १ | नृपासविध | नृपासविधें | ,, |
| ४१ | २ | व्हावे | व्हावें | ९१ |
| ४८ | २ | भजे | भजें | ,, |
| ५८ | १ | देहा हंते–करीं | देहाहंते–करीं | ९२ |
| ५९ | २ | मानिं | मानि | ,, |
| ७२ | १ | जे | जें | ९३ |
| ,, | २ | पासरते | पाझरतें | ,, |
| ७३ | ,, | तु | तुं | ,, |
| ७५ | १ | मंदहासाते | मंदहासातें | ,, |
| ,, | २ | ते | तें | ,, |
| ७७ | १ | करी | करीं | ९४ |
| ,, | २ | होइ | होइं | ,, |
| ८८ | ,, | संस्मरे | संस्मरें | ,, |
| ९० | ,, | खेचरांशि | खेचरासि | ९५ |
| १०० | २ | विशे | विशे | ,, |
| १०१ | १ | प्रविशे | प्रविशें | ,, |
| १०७ | १ | ते | तें | ९६ |
| ,, | २ | यशास | यशास | ,, |
| १११ | २ | क्रमे | क्रमें | ,, |
| ११३ | १ | गर्भी | गर्भीं | ,, |
| १२४ | ,, | अंगाते | अंगातें | ९७ |
| १२५ | २ | जाणो | जाणों | ,, |
| १३८ | २ | मीन | मी न | ९९ |
| १५६ | २ | यदंगे | यदंगें | १०० |
| १७१ | १ | मोहे | मोहें | १०१ |
| १८६ | २ | तदंति | तदंतिं | १०३ |
| १९७ | ,, | निजपुरी | निजपुरीं | १०४ |
| २०६ | १ | प्रभावातों | प्रभावातें | ,, |
| २१५ | १ | सुगर्जति | सुगर्जती | १०५ |

| पद्य. | चरण. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| २२० | २ | हनिती | हाणिति | १०६ |
| २३३ | २ | रणावनी | रणावनीं | १०७ |
| २४० | १ | यक्षाणीं | यक्षानीं | ,, |
| २५८ | २ | व्हावे | व्हावें | १०९ |
| २६९ | २ | नमनातें | नमनानें | ११० |
| | | **१२. द्रौपदीवस्त्रहरण.** | | |
| ७ | १ | अहाकार | हाहाकार | ११३ |
| ,, | ४ | रक्षि | राक्षिं | ,, |
| ८ | ९ | नेसली | नेसलीं | ११४ |
| ,, | १० | त्यागिलीं | त्यागिली | ,, |
| १३ | १ | महाफणीं | महाफणी | ११६ |
| ,, | १० | धरें | धरे | ,, |
| १५ | ७ | दुषी | दूषी | ११७ |
| | | **१४. शिवरात्रिकथा.** (प्रसंग पहिला.) | | |
| | | (टीप ६) क्षानें उपवास केला | त्यानें उपवास केला | १३१ |
| १० | ४ | पुण्याकरू | पुण्या करू | १३३ |
| १२ | ३ | आम्हासी | आम्हांसि | ,, |
| ३८ | २ | योनी (१) | योनी (२) | १३७ |
| ४२ | २ | स्तन दे | दे स्तन | ,, |
| ४४ | १ | कुरंगी | कुरंगि | ,, |
| ५६ | २ | तूजलागें | तूजला गे | १३९ |
| ५८ | ४ | राहोंच ना | राहेंच ना | ,, |
| ६१ | १ | निशित्रयेँ | निशित्रय | १४० |
| ६२ | ३ | कीं | किं | ,, |
| | | (प्रसंग दुसरा.) | | |
| ५ | ४ | आइका यासि | आइकायासि | १४२ |
| ७ | १ | सांगतों | सांगतें | ,, |
| २२ | ४ | कैसे | कसे | १४५ |

| पद्य. | चरण. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| | | **१६. कृष्णदानकथा.** | | |
| ४ | २ | शुभांगीं | शुभांगी | १५० |
| ११ | ३ | कृत्यविशषें | कृत्यविशेषें | १५१ |
| १३ | १ | वाचें | वाचे | ,, |
| १५ | २ | अर्पीतसें | अर्पी तसें | ,, |
| १६ | ३ | तरू तरू | तरू तरू | ,, |
| | | **१७. शांतादुर्गास्तुति.** | | |
| ५ | ३ | परां | परा | १५७ |
| | | **१८. एकनाथचरित्र.** | | |
| १५ | २ | हृदयांत | हृदयातें | १५९ |
| २४ | १ | पाहता | पाहतां | १६० |
| | | **१९. श्रीरामदासलीला.** | | |
| ४ | ९ | संमध | समंध | १६५ |
| ,, | ११ | तैसें | तैसे | ,, |
| ,, | १७ | ठेविं | ठेवी | ,, |
| ५ | १ | स्थापियलें | स्थापियले | ,, |
| ,, | ९ | (टीप ५) समर्थांचे समकालीन | समर्थांची समकालीन | ,, |
| | | **२०. उमाविलास.** | | |
| १ | ३ | त्र्यंबकांतें | त्र्यंबकातें | १६७ |
| ६ | ४ | त्यां | त्या | १६८ |
| ८ | ३ | गेला ! | गेला !’ | ,, |
| ९ | १ | ऐशी | ‘ऐशी | ,, |
| ११ | ४ | अनुदिनि | अनुदिनिं | १६९ |
| १२ | १ | सूमुक्तें | सुमुक्तें | ,, |
| ,, | ३ | सुगंधादि | सुगंधादी | ,, |

| पद्य. | चरण. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| १३ | २ | (टीप १९) धोतऱ्याचें फुल | धोतऱ्याचें फूल | १६९ |
| १५ | ,, | अबळीं | अबळी | १७० |
| १६ | ,, | निढळीं | निढळिं | ,, |
| १८ | १ | स्थळा | स्थला | ,, |
| २४ | २ | काकुळतीही | काकूळतीही | १७१ |
| ,, | ३ | सांडि | सांडिं | ,, |
| २२ | १ | (टीप २) विचार | 'विचार | ,, |
| २७ | २ | (टीप १८)**वारलासि** मत्सखीनें | **वरिलासि** मत्सखीनें | ,, |
| २८ | ४ | नाहीं | 'नाहीं | १७२ |
| ४३ | ४ | भुजगा ? | भुजगा ! | १७४ |
| ४४ | ३ | स्थाणु | स्थाणू | ,, |
| ४५ | ,, | वदे | वदें | ,, |
| ४८ | ,, | व्यभिचार कर्म | व्यभिचारकर्म | ,, |
| ५१ | ४ | भक्ति | भक्ति | १७५ |
| ५२ | ,, | उर्ध्व | ऊर्ध्व | ,, |
| ५३ | ,, | मानी | मानीं | ,, |
| ५४ | २ | किति | किती | ,, |
| ५५ | १ | कृष्णालया | कृष्णालय | ,, |
| ,, | ३ | (टीप २६) शंखमत्स्यादि | शंखमत्स्याहि | ,, |
| ,, | ,, | (,, ) [या श्लोकांचें | [या श्लोकाचें | १७६ |
| ५९ | १ | तयांचे | तयाचें | ,, |
| ५६ | ४ | (टीप १) जलशयांच्या सन्निध | जलाशयांच्या सन्निध | ,, |
| २ | ,, | (टीप १०) मानावें; लागेल | मानावें लागेल; | १७७ |

## २१. अमृतसार.

| पद्य. | चरण. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
|  |  | (टीप ११) ती मिळविण्याच्या | ती मिळविण्याचा | १७७ |
| २ | ४ | पाहिंजे | पाहिजे | १७८ |
| ३ | २ | निर्धारी | निर्धारीं | ,, |
| ५ | ,, | त्यांच्या वेगळलिया | त्यांचा वेगळाला | ,, |
| ७ | ३ | परियेसी | परियेसीं | ,, |
| ९ | १ | कल्पें | कल्पे | ,, |

| पद्य. | चरण. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| १६ | ४ | आदि स्फूर्ति | आदिस्फूर्ति | १७९ |
| २२ | १ | (टीप २) परिक्षा करणारा | परिक्षा करितो | १८० |
| २७ | २ | स्थूल सूक्ष्मकारण | स्थूल, सूक्ष्म, कारण | ,, |
| ,, | ३ | निर्धारी | निर्धारीं | ,, |
| २८ | २ | अर्थी | अर्थीं | ,, |
| ३५ | ३ | कंटाळे | कां टाळे | १८१ |

## २२. गंडिकाख्यान.

| पद्य. | चरण. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| | | (टीप १) निजानंदखामी व हे | निजानंदस्वामी व हा हे | १८२ |
| ४ | १ | (टीप १०) जींचे | जीचे | ,, |
| ५ | २ | पतीसा | पतीस | १८३ |
| ,, | ६ | अर्पि | अर्पी | ,, |
| ६ | ३ | त्याचि | त्याची | ,, |
| ,, | ४ | दीन–सुदीन | दिन—सुदिन | ,, |
| ८ | ३ | च्छळ | छळ | ,, |
| २० | ४ | प्रमोद भरि | प्रमोदभरिं | १८७ |

## २३. वीरमणिकथा.

| पद्य. | चरण. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| १ | ४ | सज्जिपास | सज्ज पास | १८७ |
| ,, | ५ | खुप्सुरत बनोट् | खूब सूरत बनोट | ,, |
| ,, | ७ | पर चोट | पर चोट | ,, |
| ४ | १ | (टीप ७) राम | नवरा (राम) | १८८ |
| ,, | ३ | संता नम्र | नम संतां | ,, |
| ५ | ४ | आभा तयाची ? | आ भात याची ? | १८९ |
| ८ | २ | त्यो | त्यों | ,, |
| १२ | ३ | तुजे रे! ।–मुजे रे ! | तुझे रे? ।–मुझे रे ? | १९० |
| १५ | १ | मुजे हय | मुझे है | ,, |
| १८ | ५ | भूप तिची | भूपतिची | १९१ |
| २० | २ | सोडी—राहे | सोडीं—राहें | ,, |
| २८ | ३ | (टीप ६) आणि | अक्षय | १९३ |
| ३४ | २ | सक्ती | सक्त | १९४ |

| पद्य. | चरण. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| ३४ | २ | (टीप १२) भयानें | याच रीतीनें | १९४ |
| ३५ | ४ | ठेर बलायो | टेर बुलायो | ,, |
| ३६ | १ | राजपर | राजापर | ,, |
| ४१ | ,, | ज्या है | जाहि | १९५ |
| ४३ | २ | अहिबिल | अहि बिल | १९६ |
| ,, | ,, | (टीप ४) बिळांतील सर्प | बिळांत आयतें दूध मिळाल्यावर | ,, |
| ४६ | | योगिनीकृत मांसाहार | योगिनी कृतमांसाहार | ,, |
| ,, | | (टीप १९) कोह्या | कोल्ह्या | १९७ |
| ४८ | ३ | बहु | बहू | ,, |
| ४९ | १० | (टीप २०) तीनशें | फक्त तीन वाणांनीं | ,, |
| ५७ | ३ | (टीप ८) बालक | चोपलें, मारलें | १९८ |
| ५८ | १ | पठके | पटके | ,, |
| ,, | २ | अचत | अचेत | ,, |
| ,, | ४ | (टीप १५) हापटी, आदळी | धाडलें, पाठविलें | ,, |
| ५९ | १ | (टीप १६) वळे | वेळ | ,, |
| ,, | ७ | सात | साथ | ,, |
| ६२ | ,, | भरतां गज | भरतांगज | १९९ |
| ,, | ३ | तोडिता | तोडितां | ,, |
| ६३ | ,, | पुष्कल कोतबे | पुष्कलको तबे | ,, |
| ६४ | १ | बिरजहिलकलकित | बिरजहि लकलकीत | ,, |
| ६६ | ३ | जो धन | जोधन | २०० |
| ६९ | २ | अरिसूदनने | अरिसूदॅनने | २०१ |
| ,, | ३ | हॅरने | हरने | ,, |
| ८१ | २ | यज्ञी–रणी | यज्ञीं–रणीं | २०२ |
| ८४ | १ | सिव | शिव | ,, |
| ,, | ४ | गयी | गयो | ,, |
| १०० | १ | ताहे | ताहि | २०५ |
| ,, | २ | रणमाहे | रणमाहि | ,, |
| १११ | ४ | सर्वांसि | सर्वांसि | २०९ |
| ११६ | १ | ऐकिति | ऐकति | ,, |
| ,, | २ | निजदेही | निजदहीं | ,, |

| पद्य. | चरण. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| | | **२४. राधाकृष्णसंवाद.** | | |
| ८ | १ | कोठें | कोटें | २१० |
| १० | ,, | गाई | 'गाई | ,, |
| १६ | १ | असे | अशीं | २११ |
| ,, | २ | तयाचें | तयांचें | ,, |
| | | **२५. चंद्रावळीचरित.** | | |
| १५ | २ | कीकालीं | कीलालीं | २१३ |
| २७ | १ | श्रमले | श्रमलें | २१४ |
| २८ | ,, | फळे | कळे | २१५ |
| ३४ | २ | गोष्टी–शिकविल्या–धाल्यासि | गोष्टि–शिकवील्या–धाल्यासी | ,, |
| ४० | १ | दृढताष्ट सात्विका | दृढताष्टसात्विका | २१७ |
| ४१ | ,, | कुरवाळुनी वरा ईतें | कुरवाळुनीच राईतें | ,, |
| ,, | २ | सुरवरऋषि माहिनी बलाईतें | सुरवरऋषिमोहिनीवरा ईतें | ,, |
| ५१ | १ | पर्याई | पर्याई | २१७ |
| ५३ | ,, | कंचूला | कंचुकिला | ,, |
| ,, | २ | कंचूला | कीं चुकिला | ,, |
| ५८ | ,, | कर्मटि | कर्कटि | ,, |
| ५९ | ,, | (टीप १८) भोग, उपभोग | जेवणाला | ,, |
| ७७ | ,, | अपवर्ग कामुका | अपवर्गकामुका | २१९ |
| ७८ | १ | सदाचरणीं | सदा चरणीं | ,, |
| ८८ | ,, | निवारि | निवारिं | २२० |
| ९४ | ,, | करुनि | करूनि | ,, |
| ९५ | २ | गोप शिशूंसह | गोपशिशूंसह | ,, |
| १०० | ६ | धुंडिलीं | धुंडिलिं | २२१ |

## (२) पाठभेद.

| पद्य. | चरण. | मूळपाठ. | पाठभेद. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| | | **१. द्रौपदीस्वयंवराख्यान.** | | |
| ३ | १ | सांगे–पितामहपिता | सांगा पितायमपिता | १ |
| ५ | ३ | दिसे | दिजे | २ |
| ६ | ४ | धराधिप | धरापति | ,, |
| ८ | ३ | नृपाळ कपाळ | नृपाळक भाळ | ३ |
| १० | २ | लोपला अंशुमाळी | लोटला हंसमाळी | ,, |
| १२ | १ | शोभे | बैसे | ,, |
| ,, | ४ | सकुमार फार | सबळ पुढें | ,, |
| १३ | २ | माजी | आजी | ,, |
| ,, | ४ | मानसीं | आरंभिं | ,, |
| १४ | ३ | तस्करा | अस्करा | ४ |
| १८ | १ | सुधापानिही नभा | सुधापान हीन भा | ,, |
| २१ | १ | त्र्यंबककोदंडमित्र | त्र्यंबककोदंडचाप | ५ |
| २२ | ३ | पावति | पाहति | ,, |
| २३ | ,, | नृपगुणीं | रुपगुणीं | ,, |
| २४ | ४ | कीर्तिभास्कर तस्करासम | कीर्ति लोपुनि भास्करापरि | ,, |
| २८ | २ | बहु वदनीं | अति बघुनी | ६ |
| ,, | ,, | नमनि नृप | नमुनि भुप | ,, |
| ,, | ५ | नृपसमूह | नृप समूळ | ७ |
| ,, | ६ | घटीते | घुंटिते | ,, |
| ,, | ,, | करिणिवरुनि | करिणिहुनी | ,, |
| २९ | ४ | रंकापरी | रंकापुढें | ,, |
| ३० | ३ | मोजूनियां | मोजूनि हो | ८ |
| ३२ | ,, | मत्स्याचिया | मत्स्यास या | ,, |
| ३४ | २ | कोण आहे पृथिवीस | ऐसें कोण घे विष | ९ |
| ३७ | १ | ही हारे | परिहारे | १० |
| ,, | ,, | मम | मनिं | ,, |
| ,, | २ | आले | आलों | ,, |
| ३८ | ,, | नृपा त्रास या | नृपाळास त्या | ,, |
| ,, | ३ | असे | अहो | ,, |
| ४४ | ४ | हेतचि राहिला–पाहूनि | एकचि राहिलें–पावोनि | ११ |

| पद्य. | चरण. | मूळपाठ. | पाठभेद. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| ४५ | १ | पावुनि | पाहुनि | १२ |
| ,, | ३ | सुटला | सुटतां | ,, |
| ,, | ४ | आपापरी | काकापरी | ,, |
| ५० | २ | वरुनि श्रमलों | वरुनि बसलों | १३ |
| ,, | ५ | वदनीं | वदोनी | ,, |
| ५१ | २ | हा श्लोक ह्या पोथींत असा आहे:— | धृष्टद्युम्न द्विशीर्षउद्भव सभे गर्जोनियां तेधवां, 'भेदा यंत्र' म्हणे 'उभारुनि धनू व्हा नोवरी तेधवां'। झाले दंग नृपाळ भंगति मनीं अष्टोत्तरादी मुखें, व्याधी सांगति ते; कितेक नवरी मानूनि माता सुखें॥ | ,, |
| ५२ | ३ | चापयंत्रा अशाला | यंत्रचापा कशाला | ,, |
| ५४ | २ | त्यांहीं | त्यांची | १४ |
| ५५ | १ | दे लक्ष | देईल | ,, |
| ५७ | ३ | येतां मनीं | येतांचि कीं | ,, |
| ,, | ४ | भेदील | विंधील | ,, |
| ५८ | २ | अन्य यथास्थित धन्य म्हणों ये | अन्यायास्तव धन्य म्हणा या | १५ |
| ५९ | ,, | इक्षुदंडा | इक्षु पूढें | ,, |
| ६० | १ | धनु हें मी | वोढुनि | ,, |
| ,, | ३ | करीं | कळविं | ,, |
| ६२ | – | करुनि सुमनहार | वरुनि सुमनभार | १६ |
| ६३ | १ | संजोगुनी | शृंगारुनी | ,, |
| ६४ | ४ | विस्तरे | प्रस्तरे | ,, |
| ६७ | ,, | पठणें | मननें | १७ |

## ९. गजगौरीव्रताख्यान.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | २ | बीजें | ओजें | ७५ |
| ९ | १ | ऐक–सांगतें | काय मि—सांगू | ७६ |
| १० | ,, | अंकापासुनी | तुझिये अंकापासुन | ,, |
| ,, | ४ | समुळीं | सगळी | ,, |

| पद्य. | चरण. | मूळपाठ. | पाठभेद. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| १२ | १ | सहदेवेशीं | सहदेवापाशीं | ७७ |
| ,, | ३ | तंव ते सखेद क्लेशी | सखेद चित्तीं दिसशी | ,, |
| ,, | ४ | ज्वर सोसी | जल शोषी | ,, |
| ,, | ५ | कैसें कळलें हें ।-हे | केवी कळणें हो! ।—हो! | ,, |
| १३ | १ | पृथा म्हणे हो ।-मी | पुत्रातें म्हणे—मग | ,, |
| ,, | ३ | सर्व चरण | पुत्राहातीं आणुनि माती केला हस्ती अभंगे । | ,, |
| ,, | ४ | वोवसिलें तिणें त्रिजग | तोषविलीं कीं त्रिजगें | ,, |
| १४ | ३ | वीर—करिती | विजय—करी | ,, |
| ,, | ४ | सर्व चरण | नेणों जन्म कवणें देखिला आतां हें व्रत करणें | ,, |
| ,, | ५ | पाहें | पाहणें | ,, |
| १८ | १ | कर्णीं | कानीं | ,, |
| ,, | २ | केविं पाय दे धरणी | येतो कैसा ? ये धरणी | ,, |
| ,, | ४ | देखिला | आणिला | ,, |
| ,, | ५ | आक्रमी | आणिशि कर्म | ,, |
| २० | १ | पत्र मुखीं | पत्रिका | ,, |
| ,, | २ | सद्गुरु | सदृढ | ,, |
| ,, | ३ | चकचक सर्वहि झाले | चकीत झालि सभा तैं | ,, |
| ,, | ४ | इंद्रासमिपें | स्वामिसमीपें | ,, |
| २२ | १ | सर्वेचि | रावेग | ,, |
| ,, | ३ | ऐसा हा अंदेशा | अध्वरेशा | ,, |
| ,, | ४ | हो देवेशा! | हानि नरेशा | ,, |
| २६ | २ | सर्व चरण | शैलाचीं म्यां मुळें कुठारें वज्रें खुडिलीं पाहें | ७९ |
| ,, | ४ | भिडों | भांडूं | ,, |
| २८ | १ | सगुणराशी | सद्गुणराशी | ,, |
| २९ | ,, | सुरगणपाळीं | सुरनरपाळीं | ,, |
| ,, | २ | बंधूच्या सम मेळीं | बंधू व्यास मौळीं | ,, |
| ,, | ४ | मेघजळासम | मेघजलापरि | ,, |
| ३० | ३ | लाहे | पावे | ८० |

| पद्य. | चरण. | मूळपाठ. | पाठभेद. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| ३० | ४ | सोमवंशकुलतीलक मंडन | सोमवंशकुलमंडन किरिटी ॥ | ८० |
| ३३ | १–२ | पहिले दोन चरण | तंव तो दिग्गज हस्ती सोडुनि चंद्रसें उटणें केलें । अर्कादितें रत्न स्वर्गिचें तेव्हां कैसें जडलें ॥ | ,, |
| ३५ | १ | तो वारण पुजोनि सर्व आले मिरवत | ती वायन घेउनि मिरवत आली तेव्हां | ,, |
| ,, | २ | पांडुरायाचे महाद्वारीं | मिरवत गांधारीच्या द्वारीं | ,, |
| ,, | ४ | गांधारी पूजाविधितें सारी | गांधारीतें दे ती वायन सारीं | ,, |
| ३७ | १ | पूर्ण | तो | ८१ |
| ,, | २ | ऐरावत सन्मानें | सन्मानेंशीं हस्ती तो | ,, |
| ,, | ३ | ऐशी पूर्वजकीर्ति वैशंपायन | पूर्वजकीर्ति व्यासशिष्य तो सांगे | ,, |
| ,, | ४ | सर्व चरण | दानदक्षिणा देउनि विप्राहस्तीं धाडुनि दिधला | ,, |
| ,, | ५ | बाळक राम अनन्य हो! | **राघव** सर्वां धन्य हो | ,, |

## १३. परमप्रकाश.

| पद्य. | चरण. | मूळपाठ. | पाठभेद. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| १ | ४ | आत्मस्वरूपाय नमो नमः | श्रीविठ्ठलरखुमादेवीभ्यां नमः | १२२ |
| ५ | १ | जी! तुमचा | मी तुमचा | १२३ |
| १४ | १ | पहिले तीन चरण | एक वाचासिद्ध जाहले, अंधा देती डोळे । एक वांझेसि पुत्र देऊं लागले । ऐसे सिद्ध जगीं मिरवले । | १२४ |
| ३६ | ४ | देखिजे पैं | ऊर्वरित देखिजे पैं | १२७ |
| ६९ | | पहिले तीन चरण | आद्य अनुविकार पुरीचा । अनुविकार भारतीचा । अर्थ अनुविकार सरस्वतीचा ॥ | १३० |
| ७० | १ | उल्लेख विकार | उरला विकार | ,, |

## (३) अधिक पद्यें.

### १. द्रौपदीस्वयंवराख्यान.

पृष्ठ १३ पद ९० तिसऱ्या कडव्यापुढें:—

मौन्यें पुढिलां दाविति बोटें । 'कां बसले? न उठा? ' ।
'अशक्त लागोनि व्यथा खोटी.' । 'कां बसले? न उठा? ।
'आमुचेन तंव वदवेना ओंठीं ' । 'कां बसले? न उठा?' ।
'उठती तिडका माझ्या पोटीं' । 'कां बसले? न उठा?' ॥ ४ ॥

### ९. गजगौरीव्रताख्यान.[१]

पृष्ठ ७९ साकी ३ च्या पुढें:—

रत्नसिंहासनीं गांधारी मग बसवी योगाधीशा ।
षोडश उपचारें त्या पूजुनि तोषवि वस्त्राभूषा ।
कांहीं श्रीकर व्रत सांगुनियां तोडविं या भवपाशा ।
नित्यानंदा! सुखकंदा! बा! पुरवीं माझी आशा ॥
सांगें सुव्रत कांहीं हो! । भव हा तरणें नाहीं हो! ॥ २ ॥

पृष्ठ ७६ साकी ४ च्या पुढें:—

ऐसें सांगुनि भवगजकेसरि गेला स्वसुख बोधें ।
वीणा पाणीं नामस्मरणी नाचे जो निजछंदें ।
दर्शनमात्रें त्रिताप हरती कलिमल होती शुद्धें ।
निजदैवें हा लाभ जयावरि पावति जे निजस्वपदें ॥
रमारमण ज्याचे हो । पतीतपावन साचे हो ॥ ४ ॥
ऐसें असतां स्वसुख बोधें । वर्षर्तू तो आला ।
भाद्रपदीं हस्तनक्षत्रीं रविदिन शुद्ध उदेला ।
कृष्णपक्ष तो सुमुहूर्तांशीं नारद सांगुनि गेला ।
बोलावुनि पुत्रा गांधारी म्हणे मान्य करा मम बाला! ॥
आणा सर्वहि हो! माती । बरवा करवा रे! हस्ती. ॥ ५ ॥
एकोत्तर शत मिळोनि गेले सर्वहि अरण्यवासा ।
खाणुनि माती केली गोळा अणिला पर्वत जैसा ।
सर्व मिळोनी केला हस्ती ऐरावत शिशु जैसा ।

---

१. ह्या काव्यांतील साक्या राघवकविकृत व पद बस्वलिंगकृत आहे. ह्या काव्यांत ह्या परिशिष्टांतील अधिक साक्या मिळविल्या म्हणजे राघवकृत साकीबद्ध 'गजगौरीव्रताख्यान' पुरें होतें. राघव व बस्वलिंग या कवींनीं केलेलीं काव्यें कोणी लेखकानें एके ठिकाणीं मिळविल्यामुळें अशी गडबड झाली.

सालंकृत विधिमंत्रें पूजुनि **गां**धारिस म्हण बैसा ॥
वरवीं दीजे वाणें हो! **कुं**तिशि लाजिरवाणें हो! ॥ ६ ॥

पृष्ठ ७६ साकी ७ च्या पुढें:—

ऐसें व्रत **गां**धारी कथितां **कुं**ती सखेद चित्तीं ।
अत्रीनंदन परमाल्हादें पंचपुत्र मज देती ।
पांच गोळे माती आणुनि हस्ती कैसा करती? ।
पुत्रवती **गां**धारी म्हणुनी या जगीं केली ख्याती ॥
दैवें अपुल्या द्यावें हो! । म्यां कवणातें रुसावें? हो! ॥ ८ ॥
जरि मी वाणें घेऊं हीचीं देऊं कवण्या जन्मीं? ।
म्हणुनी बाहेर नयेचि **कुं**ती लज्जा झोंबे वर्मीं ।
**गां**धारी घरिं टाकुनि वायन अहंकारें दशमी (?) ।
धन्य जगीं मी मानि श्लाघ्यता पुत्रवती ते हो! मी ॥
ऐसी ती अभिमानेसीं । गेली निजभुवनासीं ॥ ९ ॥
इकडे **पां**डवकुलवल्ली झांकलि कळली असतां ।
पुत्रवती **गां**धारि म्हणावी, व्यर्थ मि **पां**डुवनिता ।
येरिति क्लेशा मानुनि हर्षाविरहित केली चिंता ।
वनांत **पां**डव खेळुनि पारध **भीम** पुढें ये त्वरिता ॥
नलिनी जिवनाविण ती हो! । तैसी झाली **कुं**ती हो! ॥ १० ॥
पूर्णचंद्र अमावास्या येउनि उडुगणें प्रकाश केला ।
अस्ताचळिं रवि हर्षें येउनि पूर्णोदरें उदेला ।
कां क्षिरसागर दैत्या मारूं क्षीराब्धि घरीं आला ।
कैंवि घडे हें सांग तुं जननी! सिंह तो कांपे गजाला ॥
मजला सांगें तूं माय! । **भीम** धरी दृढ पाय ॥ ११ ॥

पृष्ठ ७८ साकी १८ च्या पुढें:—

लिहिलें पत्रहि भूपसुरेशा भूषामंगलधामा ।
बाणाग्रीं स्थापुनियां सुदृढ बोले **य**दुवरनामा ।
घेउनि **गां**डिव वोढी काढुनि धाडी **अ**मरग्रामा ।
कीं तो **ख**गवर ज्यापरि पावे अमृतप्रचुरकर्मा ॥
तैसा शर पथ पावे हो! । जेथें विबुध बसावे हो! ॥ १९ ॥

पृष्ठ ७८ साकी १९ च्या पुढें:—

घेउनि पत्रिका वाचे **सु**रगुरू सुक्षत्रिया गुरुवचना ।
‘स्वस्तिश्रीसालंकृत देवराया! दीनोद्धरणा! ।
**पा**कशासना! अमरआसना! कृपा करीं मज दीना ।
संकट मम मातेशीं पडलें यास्तव लिहिली सुचना ॥

कुलेश पाणी नमना हो! । साष्टांगेसी जाणा हो! ॥ २१ ॥
ऋषि नारद व्रत सांगुनि गेला मातेप्रति दिनबंधू ॥
नेणो जन्म पुढील कवणा कारण हा निजबोधू ।
पुढील जन्मीं प्राप्त होय हा ऐरावत अगाधू ।
.................................................. ॥
पुरवीं कुंतीव्रता हो! । धाडा ऐरावता हो! ॥ २२ ॥

पृष्ठ ८० साकी ३० च्या पुढें:—

पार्थें नमिलें त्या कुंतीतें सद्गुरु धर्मासहितें ।
अठवुनि कृष्णचरणां गांडिव धरिलें हातें ।
केली स्वर्गापासुनि वाट बांधुनि शर दृढ पंथें ।
पुन्हा बाण पत्रिका लिहुनियां पाठवितो अमरातें ॥
लिहिलें, शरपथ केला हो! । धाडा ऐरावताला हो! ॥ २९ ॥
शुक्रारि म्हणे शक्राधीशा! पार्थें अघटित करणी ।
केली कीं हे स्वर्गापासुनि पायवाट ते धरणी ।
आतां तुम्ही काय पहातां आणा दिग्गज खाणी ।
तव साक्षेपें शृंगारुनियां अमरावतिचीं लेणीं ॥
कैचें या भूलोकीं हो! । पार्थें आणिलें त्यासी हो! ॥ ३० ॥
देउनि ऐसें पत्र भीमा पाठविलें सुरनाथा ।
जाउनि भीमें नमन केलें त्या म्हणे वायुसूता! ।
काय म्हणउनी येणें केलें तें मज सांगें आतां ।
तंव तो बोले वृकोदर, 'जाणुनि कां हो! वेडे होतां? ॥
कोठें दिग्गजखाणी हो! । तें मज सांगा स्वामी हो! ॥ ३१ ॥
ऐकुनि बोले सहस्राक्ष क्रूर ऐरावत आहे ।
धरूं जातां भीमसेन तो शष्टायन पाडूं पाहे ।
बांधुनि चारी पाय गदा ती घालुनि खांदीं वाहे ।
देखुनि आश्चर्य करिती सुरगुरु धन्य म्हणे, 'तव बाहो!' ॥
सोडा ऐरावताला हो! । मानें न्या तुम्हि त्याला हो! ॥ ३२ ॥

पृष्ठ ८० साकी ३३ च्या पुढें:—

अर्जुन म्हणे जननी! आज तूं पाहें अपुल्या नेत्रीं ।
स्वर्गींचा ऐरावत प्रचंड चालवितो धरत्रीं ।
तरि पंडूकुमर आम्हीं म्हणवितों किं क्षत्री ।
नाहीं तरि वृथाचि भूभार वागवितों स्वक्षेत्रीं ॥
ऐसा केला म्यां पण हो! । नलगे आतांही क्षण हो! ॥ ३४ ॥

पृष्ठ ८० साकी ३९ च्या पुढें:—

मग ती ब्राह्मणसुवासिनीसी घेउनि जाते माहेरें ।

नाना वाद्यें वाजति तेथें नेत्रधामही न पुरे ।
सुरवर घेउनि पुष्पें वर्षति सुमनवृष्टिसी भारें ।
पुत्रवती कुंतीसी म्हणती त्रिजगीं कीर्ति प्रसारे ॥
स्वर्गी देव पहाती हो! । सुंदर कीर्ति गाती हो! ॥ ३६ ॥

## १३. परमप्रकाश.[1]

पृष्ठ १२४ ओवी ११ च्या पुढें:—

एक अष्टांगयोग साधिती । एक पंचाग्निधूम्रपान करिती ।
एक ऊर्ध्व बाहू करिती । परि वस्तु न पावती येणेंकरून. ॥ १२ ॥

पृष्ठ १२८ ओवी ४२ च्या पुढें:—

ऐसा तो सद्गुरू तत्पर जाण । ऐसा प्रवर्ते नित्य तें ध्यान ।
स्वरुपीं असावें तल्लीन । ती उघडीं समाधी शिष्यराया! ॥ ४४ ॥

---

१. ह्या ग्रंथाचें 'पावनप्रकाश' असेंही दुसरें नांव आहे.